UNIVERSAL
LIBRARY
OU_196061
UNIVERSAL
LIBRARY

# नीतिबोधमाला.

## सुमन तिसरें.

कृष्णराव अर्जुन केळूसकर

यांनीं तयार करून

मनोरंजन छापखान्यांत

छापून प्रसिद्ध केलें.

इ. स. १९१६.

( सर्व हक्क ग्रंथकारानें स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १२ आणे.

Printed By K. R. Mitra, at the Manoranjan Press, 1, Girgaon Road, Bombay, & Published by Krishnarao Arjun Kelusker, at Dadar, Bombay.



श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड,

सेनाखासखेल समशेरबहादर,

बडोदें संस्थानाचे अधिपति.

# अर्पणपत्रिका.

वटोदरसंस्थानाधिपति, सकलगुणैश्वर्यसंपन्न

श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड

यांचे चरणीं,

त्यांच्या ठायीं वसत असलेली अत्यंत स्तुत्यर्ह प्रजा-
पालनदक्षता, अपूर्व ज्ञानार्जनलालसा, अतुल
औदार्य, अप्रतिम सौजन्य, स्वप्रजाजनांमध्यें
सार्वत्रिक विद्याप्रसार व सदाचारप्रवृत्ति
व्हावी आणि देशी वाङ्मयाचें यथोचित
वर्धन व्हावें एतद्विषयक अनुपम
आस्था इत्यादि परमोज्ज्वल सद्गु-
णांस लुब्ध होऊन हें सदाचार-
परिमलजनक तृतीय सुमन
त्याच्या कर्त्यानें परमा-
दरपूर्वक, अनन्य
भावानें व अत्यंत
कृतज्ञताबुद्धीनें
समर्पण केलें
आहे.

## आभारप्रदर्शन.

**श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड सरकार** यांनीं कृपावंत होऊन ह्या मालेस उदार आश्रय देऊन तींत आणखी सुमनें गुंफण्यास प्रोत्साहन दिल्याबद्दल मालाकार त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | | | पृष्ठ. |
|---|---|---|---|---|
| **भाग पहिला**—खरें बोलणें. | ... | ... | ... | १ |
| **भाग दुसरा**—खोटें बोलण्यांचे वाईट परिणाम. | ... | | ... | ३० |
| **भाग तिसरा**—न्यायीपणा. | ... | ... | ... | ४७ |
| **भाग चौथा**—प्रामाणिकपणा. | ... | ... | ... | ७८ |
| **भाग पांचवा**—अप्रामाणिकपणाचे वाईट परिणाम. | ... | | ... | ११० |
| **भाग सहावा**—विश्वासूपणा. | ... | ... | ... | १३३ |
| **भाग सातवा**—वचन पाळणें. | ... | ... | ... | १५० |
| **भाग आठवा**—समाधानवृत्ति. | .. | ... | ... | १६४ |
| **भाग नववा**—महत्त्वाकांक्षा. | ... | ... | ... | १७६ |
| **भाग दहावा**—क्षमाशीलता. | ... | ... | ... | १८४ |
| **भाग अकरावा**—कृतज्ञता. | ... | ... | ... | १९८ |
| **भाग बारावा**—एकमेकांस साहाय्य. | ... | ... | ... | २१८ |
| **भाग तेरावा**—गर्व. | ... | ... | ... | २२७ |
| **भाग चौदावा**—लोभाचे वाईट परिणाम | | ... | ... | २४५ |

# नीतिबोधमाला.

## सुमन तिसरें.

## भाग पहिला.

### खरें बोलणें.

#### सत्यवक्त्यावरील भरंवसा.

अथेन्सनगरींत प्राचीन काळीं झिनोक्रेटिस नांवाचा एक तत्त्ववेत्ता होऊन गेला. तो मोठा प्रामाणिक व सत्यभक्त होता. तो कधींही खोटें बोलत नसे. त्यामुळें सर्व लोकांचा त्याजवर पूर्ण भरंवसा असे. एके समयीं त्यानें न्यायाधीशांपुढें एक गोष्ट प्रतिज्ञेवर सांगून ती निखालस खरी आहे अशी त्यांची खातरी करण्यासाठीं रीतीप्रमाणें तो वेदीवर शपथ वाहण्यासाठीं जाऊं लागला, तेव्हां न्यायाधीश ह्मणाले: ‘ झिनोक्रेटीस, तुह्मांला शपथ घेण्याचें कारण नाहीं. तुह्मी जें सांगत आहां, त्याविषयीं आह्मांला बिलकूल संशय वाटत नाहीं. ’

#### पेट्रार्ककवि.

हा इटालीदेशांतला एक महाकवि होय. हा चौदाव्या शतकांत होऊन गेला. तो अत्यंत प्रामाणिक व सत्यशील होता. ह्मणून एका मोठ्या कार्डिनलास ( पोपाच्या खालोखालचा अधिकारी ) तो फार

आवडूं लागला, आणि त्यानें त्याला आपल्या आश्रयास ठेवून घेतलें. एके दिवशीं ह्या कार्डिनलाच्या घरांतल्या कित्येक माणसांचा मोठा कलह होऊन ते हाणामारीवर आले. कार्डिनल घरीं आला तेव्हां त्यानें त्या भांडणाची चौकशी आरंभिली. त्याचें खरें कारण कळावें ह्मणून त्यानें घरांतल्या प्रत्येक इसमाला बायबलावर हात ठेवून शपथ घ्याव-यास सांगितलें. त्यांमध्यें त्याचा एक भाऊ असून तो बिशपच्या पद-वीला पोंचला होता. त्यालासुद्धां त्यानें अशी शपथ घ्यावयास लाविली. पुढें ह्या पेट्रार्ककवीची पाळी आली, आणि तो बाकीच्यांप्रमाणें बाय-बलावर हात ठेवून शपथ घ्यावयास पुढें सरसावला. तेव्हां तो कार्डि-नल पुस्तक बंद करून ह्मणाला: ‘ कविराज, तुह्मांला शपथ घेण्याचें कारण नाहीं. तुह्मी कधींही खोटें बोलणार नाहीं, अशी माझी पक्की खातरी आहे. ’

## खरें बोलायास न भिणारा मुलगा.

एक लहान मुलगा दिवाणखान्यांत माजराबरोबर खेळत असतां, त्याचा हात, एक सुंदर भांडें तेथें ठेवलें होतें, त्याला लागून तें खालीं पडलें आणि फुटलें. त्याबरोबर तो घाबरून रडूं लागला. इतक्यांत त्याचा एक सोबती तेथें आला, आणि त्याचें रडण्याचें कारण विचारूं लागला. तो मुलगा ह्मणाला: ‘ माझा हात लागून हें भांडें फुटलें. आतां मला बाबा शिक्षा करितील ह्मणून मी रडत आहें. ’ त्याचा सोबती ह्मणाला: ‘ अरे, भांडें माजरानें पाडिलें ह्मणून सांग, ह्मणजे तुझा मार चुकेल. ’ मुलगा ह्मणाला: ‘ छे, छे, असें खोटें मी बोलणार नाहीं. मीं आतांच बाबांकडे जाऊन आपण काय केलें तें सांगावें हें बरें. ’ असें बोलून त्यानें तत्काळ जाऊन आपल्या हातून झालेला अपराध बापाला कळविला. तो ऐकून त्या गृहस्थाला राग

तर आला नाहींच; पण तो उलट त्याला गोंजारून ह्मणाला: ‘ तूं फोडिलेंस तें भांडें मोठ्या किंमतीचें होतें हें खरें; पण तूं खरें बोललास, माराच्या भीतीनें खोटें बोलला नाहींस, हें पाहून मला मोठें समाधान वाटत आहे. माझा लाडका मुलगा खरें बोलायास न भिणारा आहे, हें मला तसल्या शंभर भांड्यांहून जास्त आहे ! ’

## पात्र फुटलें.

एक मुलगा आपल्या घरांतल्या दिवाणखान्यांत चेंडू उडवीत असतां, तो टेबलावर ठेविलेल्या चिनीमातीच्या सुंदर पात्रांत पडून तें फुटलें. त्याबरोबर तो घाबरून दिवाणखान्यांतून बाहेर पळून गेला. त्या वेळीं त्याची आई घरांत नव्हती. यास्तव तें कोणीं फोडिलें तें तिला कळलें नाहीं. तिनें दिवाणखान्यांत येऊन तें पात्र फुटलेलें पाहिलें, तेव्हां तिला तेथें जवळच सतरंजीवर स्वस्थ निजलेल्या कुत्र्याचा वहीम आला; आणि त्याला मार देण्यासाठीं चाबूक आणावयास ती जवळच्या खोलींत गेली. इतक्यांत तो मुलगा तेथें आला आणि दारापाशीं उभा राहून आईला विचारूं लागला: ‘आई, चाबूक घेऊन काय करितेस ?’ तिनें ह्मटलें: ‘निरोनें माझें सुंदर पात्र फोडिलें आहे, त्याबद्दल त्याला चोप देतें.’ तें ऐकून तो आईच्या मागून दिवाणखान्यांत गेला; आणि तिच्या हातांत चाबूक पाहून बिचारा निरो अगदीं घाबरून गेला. तेव्हां आपल्या अपराधाबद्दल कुत्र्यास विनाकारण मार मिळत आहे हें पाहून त्या मुलास फार वाईट वाटलें, आणि आईचा हात धरून तो ह्मणाला: “आई, निरोला मारूं नको. पात्र त्यानें फोडिलें नाहीं; तें माझा चेंडू लागून फुटलें आहे.” तें ऐकून ती त्याला ह्मणाली: “दिवाणखान्यांत चेंडू उडवूं नको ह्मणून तुला अनेक वेळां सांगितलें असतां, तो तूं येथें पुनः उडविला, आणि हा अपराध करून एवढा वेळ

उगी राहिलास, ह्याबद्दल तुला ह्या खोलींत आज कोंडून ठेवायाचें. तूं कबूल झालास ह्मणून तुला याहून जास्त शिक्षा मी करीत नाहीं."

### माझ्यानें खोटें बोलवत नाहीं.

संयुक्त संस्थानांला स्वातंत्र्य मिळवून देणारा व त्या संस्थानांचा पहिला अध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन हा सहा वर्षांचा असतां त्याला कोणीं एक कुऱ्हाड बक्षीस दिली. ती मिळाल्यानें आनंद पावून ती कशी लागते तें पाहण्यासाठीं तो आपल्या बागेंतल्या झाडांवर ती मारूं लागला. असें करीत करीत तो एका लहान फळझाडापाशीं आला, आणि त्यावर कुऱ्हाडीचे आघात करून त्यानें तें अगदीं जायबंदी करून टाकिलें. तें झाड त्याच्या बापाच्या आवडीचें असून त्यानें तें मोठ्या प्रयासानें मिळविलें होतें. तें असें तोडिलेलें पाहून तो फार संतापला, आणि तें कोणीं तोडिलें ह्मणून चौकशी करूं लागला. पण त्याला कांहीं दाद लागेना. इतक्यांत जॉर्ज हातांत कुऱ्हाड घेऊन बाप होता त्या ठिकाणीं आला. तेव्हां त्यानें त्याला विचारिलें: 'हें झाड कोणीं तोडिलें तें तुला ठाऊक आहे काय?' तो रागाचा प्रश्न ऐकून तो मुलगा अमळ घुटमळला आणि ह्मणाला: 'बाबा, माझ्यानें खोटें बोलवत नाहीं; हें झाड ह्या कुऱ्हाडीनें मीं तोडिलें.' हे शब्द ऐकतांच त्याचा राग साफ नाहींसा होऊन त्यानें त्यास पोटाशीं धरून त्याचा मुका घेतला आणि ह्मटलें: 'माझ्या बाळा, तुझा असा खोटें न बोलण्याचा निर्धार पाहून मला आज जेवढा आनंद झाला आहे, तेवढा अशीं हजार झाडें मला कोणीं दिलीं तरी होणार नाहीं!'

### खरें बोलण्याचें धैर्य.

एक मुलगा रस्त्यांत चेंडूनें खेळत असतां तो उडून एका दुकानाच्या खिडकीला लागला, आणि त्यामुळें तिचें तावदान फुटलें.

तें पाहून त्याचे सोबती ह्मणाले: 'रे, पळ येथून, ह्मणजे कांच कोणीं फोडिली तें दुकानदाराला कळणार नाहीं.' तो मुलगा ह्मणाला: 'नाहीं, मी पळून जाणार नाहीं. मी दुकानरादाकडे जाऊन आपला गुन्हा कबूल करितों.' असें ह्मणून तो त्याजकडे गेला, आणि ह्मणाला: 'मी खेळत असतां माझा चेंडू तुमच्या खिडकीला अवचित लागून तिची कांच फुटली आहे. ह्या तुमच्या नुकसानीबद्दल मी फार दिलगीर आहें. माझ्याकडे पैसे असते तर तुमची नुकसानी मीं भरून दिली असती. तरी पण मला तुमच्याकडे कांहीं तरी काम द्या. तुमची नुकसानी भरून येईपर्यंत तुह्मी जें कांहीं काम सांगाल तें मी मोठ्या आनंदानें करीन.' हें त्याचें बोलणें ऐकून त्या दुकानदाराला त्याचें कौतुक वाटलें, आणि त्यानें त्याला आपल्या दुकानांत कांहीं काम सांगितलें. तें तावदान मोठ्या किंमतीचें असल्या कारणानें त्याला त्याच्या दुकानांत बरेच दिवस खपावें लागलें. ह्याप्रमाणें त्याच्या नुकसानाची भरपाई करून दिल्यावर तो त्याची रजा घेऊन जाऊं लागला. पण त्या मुलाचा असा प्रामाणिकपणा व मर्दुमकी पाहून तो दुकानदार फार संतुष्ट झाला, आणि त्यानें त्याला आपल्या दुकानांत कायमची नोकरी दिली.

## राजा आणि कैदी.

एक राजा आपल्या राज्यांतला एक मोठा तुरुंग पाहावयास गेला. त्याच्या आवारांतून तो चालला असतां, पांच कैदी कामावर जात होते, ते त्याच्या नजरेस पडले. तेव्हां त्यांला उभे करून राजानें प्रत्येकाला 'तूं तुरुंगांत कसा आलास ?' असा प्रश्न विचारिला. एकानें उत्तर केलें: 'मीं कांहीं गुन्हा केला नव्हता. माझ्याविरुद्ध साक्ष देणारा

एक माणूस खोटें बोलला म्हणून मजवर गुन्हा शाबीत झाला.' दुसरा ह्मणाला: 'न्यायाधीशाचा माझ्यावर दांत होता, ह्मणून त्यानें मला तुरुंगांत पाठविलें.' तिसऱ्यानें सांगितलें: 'न्यायाधीशाच्या चुकीनें मी गुन्हेगार ठरलों.' चौथ्यानें उत्तर केलें:॰ 'गुन्हा दुसऱ्यानें केला असून मला पकडून न्यायाधीशापुढें नेलें.' हीं अशीं चौघांनीं उत्तरें देऊन राजाजवळ क्षमा मागितली. मग पांचव्या कैद्याकडे वळून राजा ह्मणाला: 'बरें, तूं येथें कसा आलास रे?' त्यानें उत्तर केलें: 'सरकार, मीं एका इसमाची पैशाची थैली चोरिली. त्याबद्दल क्षमा मागण्यास मला धीर होत नाहीं.' हें ऐकून राजा ह्मणाला: 'अशा प्रामाणिक मनुष्यांबरोबर रहाण्यास तूं योग्य नाहींस. कारण, हे ह्मणतात, कीं, आपण कांहींएक गुन्हा केला नाहीं.' मग तुरुंगाच्या अधिकाऱ्याकडे वळून राजा ह्मणाला: 'ह्या मनुष्याच्या पायांतल्या बिड्या काढून याला सोडून द्या. यानें आपल्या गुन्ह्यांत खोटें बोलण्याच्या पापाची आणखी भर घातली नाहीं.'

## सर्वदां खरें बोलण्याचा निर्धार.

एका शाळेंतला एक मुलगा कुऱ्हाड घेऊन एक लाकूड फोडीत असतां, त्या शाळेच्या मुख्य शिक्षकाचें माजर तेथें आलें, आणि तो कुऱ्हाडीचा घाव लाकडावर घालीत असतां त्यानें त्यावर उडी मारिली. त्याबरोबर ती कुऱ्हाड त्याजवर बसून त्याचा प्राण गेला. तें पाहून त्याचे सोबती तेथें जमा होऊन त्या माजराची ती दशा पाहूं लागले. मग, त्यांतला एक जण अमळ विशेष हूड होता तो ह्मणाला: "चला रे, आपण हें माजर उचलून जवळच्या कुंपणांत फेकून देऊं, आणि गुरुजींला सांगूं कीं, त्या शेजारच्या कुत्र्यानें त्याला पकडून

फाडून टाकिलें." हे त्याचे शब्द ऐकून त्या लाकूड फोडणाऱ्या मुलास अतिशयित संताप आला, आणि तो लाल होऊन मोठ्यानें ह्मणाला: "असली लबाडी मी कधींही करणार नाहीं !" असें बोलून त्यानें तें माजर उचलिलें आणि त्या शिक्षकाकडे नेलें. त्याची ती अवस्था पाहून तो ह्मणाला: 'अरे, माझ्या आवडत्या माजराची अशी दशा कोणीं बरें केली ?' तो मुलगा धीर करून ह्मणाला: " गुरुजी, हा गुन्हा मजकडून घडला आहे. ह्याबद्दल मला अतिशयित वाईट वाटत आहे." हें ऐकून शिक्षक आतां त्याला खरपूस चोप देतो, असें सगळ्या मुलांस वाटलें होतें. पण तो हसून ह्मणाला: "मुला, तूं मोठा शूर आहेस. आवारांत काय झालें तें सगळें मीं माडीवरून पाहिलें व ऐकिलें आहे. तूं असा सत्यशील व अब्रूची चाड बाळगणारा मुलगा आहेस हें पाहून मला मोठें समाधान वाटत आहे." हे ममतेचे शब्द ऐकून त्या मुलाच्या डोळ्यांतून ढळढळां आसवें वाहूं लागलीं; आणि त्याच्या सोबत्यांनीं त्याच्या नांवाचा त्रिवार जयजयकार केला.

## रोख नाण्याऐवजीं कागदाचे तुकडे.

स्पेनदेशांत मूर लोकांचा अमल होता. तो नाहींसा करून पुनरपि तेथें स्प्यानिअर्ड लोकांची सत्ता बसविण्याचा उद्योग चालला असतां, स्पेनच्या दक्षिणभागीं आल्हामा नांवाचा किल्ला आहे, त्यावर मूर लोकांनीं स. १४८३ त मोठ्या निकराचा हल्ला करून त्याला वेढा घातला. आंतील शिपायांनीं तो बरेच दिवस मोठ्या शौर्यानें लढविला. त्या शिपायांचा सेनापति मोठा शूर व प्रामाणिक आहे अशी चोहोंकडे ख्याति होती. शत्रूचा वेढा पुष्कळ दिवस पडल्यामुळें

त्या सेनापतीकडची बहुतेक सामग्री खलास झाली, आणि शिपायांचे पगार थकल्यामुळें ते नाराज झाले. बाहेरून पैसा येण्याची तर मुळींच आशा नव्हती; आणि लष्करांत फिसाद झाली तर शत्रूच्या हातीं किल्ला जाण्याची भीति होती. असा पेंच आला, तेव्हां त्या सेनापतीनें शिपायांला पगार देऊन राजी ठेवण्याची एक युक्ति काढिली. ती अशी: त्यानें कागदांचे तुकडे करून त्यांवर शिपायांचीं नांवें घातलीं, आणि प्रत्येकाला किती पैसे द्यावयाचे तें लिहून त्यांवर आपल्या सह्या केल्या. मग त्यानें सगळ्या शिपायांना जमवून सांगितलें कीं, 'हे कागदाचे तुकडे पैशांऐवजीं घ्या. हे तुकडे तुह्मीं कोणालाही दाखविले तरी ते तुह्मांला पैसे किंवा कांहीं वस्तु हव्या असतील, त्या देतील; आणि मला पैशांची अनुकूलता झाली ह्मणजे हे तुकडे जे कोणी माझ्याकडे घेऊन येतील, त्यांना त्यांवरील रकमा मी देईन.' ही त्याची व्यवस्था त्या शिपायांला कबूल होऊन त्यांनीं ते कागदाचे तुकडे घेतले; आणि त्या सरदाराची चोहोंकडे प्रामाणिकपणाविषयीं कीर्ति असल्यामुळें त्यांनीं ज्यांला ते तुकडे दाखवावे, ते मोठ्या खुशीनें ते घेत व शिपायांच्या गरजा पुरवीत. पुढें ह्या सरदाराच्या हातीं पैसा आला तेव्हां त्यानें ह्या सगळ्या चिठ्या मागवून त्यांत लिहिलेल्या रकमांची फेड केली.

## खरें बोलणारा मुलगा.

दोघे मुलगे फुटबालानें खेळत होते. त्यावर जोरानें लाता मारून तो ते उंच उडवीत होते. असा तो उडवीत असतां बागेंतल्या फळझाडांच्या लहान रोप्यांवर तो पडावयास आला, तेव्हां तो खालीं पडण्यापूर्वीं त्यावर पुनः लात मारण्यासाठीं ते दोघेही धावले; पण

त्या घाईंत दोघेही एकमेकांवर पडले. त्यामुळें तेथले दोनतीन रोपे मोडले. ते त्या वेळीं खेळाच्या नादांत असल्यामुळें ही नुकसानी त्यांच्या लक्षांत आली नाहीं.

ही बाग ज्या मुलाच्या. बापाची होती तो मुलगा संध्याकाळीं घरांत जाऊन बसला असतां त्याचा बाप घरीं आला, आणि बागेंत एक फेरी घालून यावें, असें त्याच्या मनांत येऊन तो आपल्या त्या मुलास बरोबर घेऊन झाडें पाहत पाहत चालला. जातांजातां फळझाडांचे ते मोडलेले रोपे त्यानें पाहिले. तेव्हां तो ह्मणाला: " हे रोपे कसे मोडले बरें ? आपला कुत्रा दुसऱ्या कुत्र्याशीं झोंबी खेळत असतां ह्या ताफ्यावर लोळला असावा. बाळा, तूं त्याला पाहिलें होतें काय ?" हे बापाचे शब्द ऐकून त्यास पहिल्यानें असें वाटलें कीं, आपल्यावरचा दोष सहजीं कुत्र्यावर जात आहे. तर ह्या वेळीं आपण कांहींएक बोलूं नये हें बरें. पण त्याच्या मनांत लागलींच असा सुविचार आला कीं, आपल्या अपराधाबद्दल दुसऱ्याला दोषी ठरविणें कांहीं बरें नव्हे. असें मनांत आणून तो लागलींच ह्मणाला: " बाबा, हीं झाडें माझ्या हातून मोडलीं आहेत. शेजाऱ्याचा मुलगा आणि मी येथें फुटबालानें खेळत असतां, आह्मी दोघेही येथें पडलों, त्यामुळें हीं झाडें मोडलीं." हें ऐकून त्याच्या बापानें त्याला अशा निष्काळजीपणाबद्दल दोष दिला. पण तो खरें बोलला, व त्यानें आपला अपराध छपविला नाहीं, ह्मणून संतोष पावून त्यानें त्याला शिक्षा केली नाहीं.

## हेलेन वाकर.

स्कॉटलंडांत डंफ्रिजशहराजवळील एका खेड्यांत हेलेन वाकर नांवाची एक तरुण बाई रहात असे. तिचे आईबाप मरण पावल्या-

मुळें तिला शेतांत खपून आपला व आपल्या एका लहान बहिणीचा निर्वाह चालवावा लागे. अशा विपन्न स्थितींत असतां ह्या बाईच्या त्या धाकट्या बहिणीनें एक गुन्हा केल्यामुळें तिला न्यायाधीशापुढें चौकशी करितां नेलें. त्या काळच्या कायद्याप्रमाणें तिनें केलेल्या गुन्ह्याबद्दल तिला देहांतशिक्षा होणार होती. पण हा गुन्हा आपण केला असें तिनें दुसऱ्या कोणाला सांगितलें असल्याचा पुरावा झाला तर ती दोषमुक्त होणार होती. हेलेन वाकर हिनें न्यायाधीशापुढें अशी जबानी दिली असती, तर तिची ही बहीण सुटली असती. पण तिला तिनें तो गुन्हा केल्याचें कांहींएक कळविलें नव्हतें. ह्यासाठीं हेलेन वाकर खोटी जबानी देण्यास तयार झाली नाहीं. 'आपल्या लाडक्या बहिणीचा प्राण वांचविण्यासाठीं खोटें बोलण्याचें पातक मजकडून सहसा होणार नाहीं,' असा तिनें निक्षून जबाब दिल्यामुळें तिच्या बहिणीला देहांतशिक्षा देण्याचें न्यायाधीशानें ठरविलें. असा न्याय झाल्यावर हेलेन वाकर हिनें लंडनास जाऊन राणीपाशीं आपल्या बहिणीस क्षमा करण्याविषयीं अर्ज करण्याचा निश्चय केला; आणि ती गरीब मुलगी तीनशें मैल चालून लंडनास आली. राणीनें तिची हकीकत ऐकून घेऊन तिच्या बहिणीची शिक्षा रद्द करविली, आणि तिच्या सत्यभक्तीची अतिशयित तारीफ केली.

त्या काळीं सर वाल्टर स्कॉट ह्या नांवाचा एक मोठा ग्रंथकार प्रख्यातीस आला होता. त्यानें हेलेन वाकर हिची ही गोष्ट ऐकून तिच्या आधारावर आपली एक उत्तम कादंबरी रचिली आहे. त्याप्रमाणेंच ही गरीब बाई मरण पावली तेव्हां तिला ज्या ठिकाणीं पुरिलें होतें, त्यावर तिच्या स्मरणार्थ एक थडगें ह्या ग्रंथकारानें उभारविलें आहे.

## हें फूलझाड मीं मोडिलें.

एक मुलगा आपल्या बागेंत चाक फिरवीत असतां, तें एका फूलझाडावर जाऊन तें मोडलें. इतक्यांत त्याची आई तेथें आली आणि त्या फूलझाडाकडे पाहून ह्मणाली: 'अरेरे, वाऱ्यानें तें सुंदर फूलझाड मोडलें पाहा कसें तें!' मुलानें तिचे ते शब्द ऐकून ह्मटलें कीं, 'हें फूलझाड मीं मोडिलें.' आई ह्मणाली: 'अरे, तूं मोडिलेंस! कसें मोडिलेंस तें?' मुलगा ह्मणाला: 'मी चाक फिरवीत असतां, तें त्या फूलझाडावर जाऊन पडलें, त्यामुळें तें मोडून पडलें.' आई ह्मणाली: 'पण, तुला बागेच्या ह्या भागीं चाक फिरवूं नको ह्मणून सांगितलें आहे ना?' मुलगा ह्मणाला: 'होय, आई, मी चाक घेऊन इकडे आलों त्याबद्दल मला आतां फार वाईट वाटत आहे.' आई ह्मणाली: 'मलाही फार वाईट वाटतें. तुझे वडील हें झाड मोडल्याबद्दल फार रागावतील. त्यांचें तें मोठ्या आवडीचें होतें.' असें बोलून ती घरांत गेली; आणि तो तिच्या मागून आंत चालला असतां, बागवानाचा मुलगा त्याच्याकडे येऊन ह्मणाला: 'अरे, तूं कांहींएक बोलला नसतास तर वाऱ्यानें झाड मोडलें असें तुझ्या आईप्रमाणेंच तुझ्या बाबालाही वाटलें असतें. मीं कांहीं त्याविषयीं चकार शब्द काढिला नसता.' मुलगा ह्मणाला: 'मी कधीं खोटें बोलत नसतों.' बागवानाचा मुलगा ह्मणाला: "अरे, वाऱ्यानें फूलझाड मोडलें असें तुझी आई ह्मणाली, तेव्हां तुला एक शब्दही बोलण्याचें प्रयोजन नव्हतें. तूं उगी राहिला असतास तर खोटें बोलल्यासारखें झालें असतें काय?' मुलगा ह्मणाला: 'होय, झालें असतें. मी कांहींएक बोललों नसतों तर मीं माझ्या आईला फसविल्याप्रमाणें झालें असतें. अरे, कधींकधीं गुपचूप राहिल्यानें खोटें बोलल्याचा अपराध घडतो.'

हें त्यांचें बोलणें त्या मुलाचा बाप आडून ऐकत होता, तो पुढें येऊन ह्मणालाः ‘ माझ्या बाळा, तुझें ह्मणणें बरोबर आहे. तुझी ही सत्यप्रीति पाहून मला मोठें समाधान वाटतें. हें फूलझाड तूं मोडिलेंस ह्मणून तुला मी रागें भरणार होतों. पण, माझ्या बाळा, तुझ्यासारख्या सत्यवादी मुलावरून असलीं शंभर झाडें मी ओंवाळून टाकीन. भ्याड व नामर्द मनुष्य खोटें बोलून आपणावरचा दोष उडवूं पाहतो. पण जो खरा मर्द असतो, तो कधींही खोटें बोलत नाहीं.’

## सत्यवादी मुलगा.

एका शाळेंतल्या मुलांस बक्षिसें द्यावयाचीं होतीं. ज्या विषयांत जो मुलगा उत्तम ठरेल, त्यालाच फक्त त्या विषयांत बक्षीस मिळावयाचें होतें. त्या शाळेंत एक मुलगा होता, त्याला अक्षर तेवढें चांगलें लिहितां येत असे. बाकीच्या विषयांत तो बराच कच्चा होता. निदान अक्षराबद्दल तरी आपण बक्षीस मिळवावें, असा त्यानें निश्चय करून आपल्या वहींत साधेल तेवढें उत्तम अक्षर लिहून ठेविलें. नेमिलेल्या दिवशीं परीक्षकानें येऊन त्या मुलाची वही एका हातांत व दुसऱ्या हातांत दुसऱ्या एका मुलाची वही धरून म्हटलें: ‘ ह्या दोन्ही वह्यांतलीं अक्षरें अगदीं सारखीं आहेत; पण ह्या वहींतल्या एका पृष्ठावरचें अक्षर दुसऱ्या वहींतल्या अक्षराहून विशेष चांगलें असल्याकारणानें ही वही लिहिणाराला बक्षीस द्यावें.’ हें ऐकून तो मुलगा त्या परीक्षकाकडे जाऊन ह्मणालाः ‘ माझी वही मला अमळ पाहूं द्या.’ त्यावरून त्यानें ती त्याच्या हातीं दिली. ती उलटून पाहून तो मुलगा ह्मणालाः ‘ महाराज, ज्या पृष्ठावरील अक्षर तुह्मांला विशेष चांगलें वाटलें, तें माझें नव्हे. तें वरच्या वर्गांतल्या एका मुलानें माझी वही

चुकून घेऊन लिहिलें होतें.' हे शब्द ऐकतांच त्या परीक्षकानें त्या दोन्ही वह्या पुनः नीट तपासून पाहिल्या, आणि दुसऱ्या वहींतलें अक्षर चांगलें ठरवून बक्षिस दुसऱ्या मुलास देण्याची शिफारस केली.

हा प्रकार पाहून त्या मुलाच्या वर्गांतल्या सगळ्या मुलांनीं हसून त्याची टेर उडविली. ते ह्मणाले: 'तूं केवढा मूर्ख आहेस रे! उगी रहातास तर काय झालें असतें. तुझ्या वहींतलें तें पृष्ठ दुसऱ्या मुलानें लिहिलें आहे असें कोण सांगायाला येणार होता?' तो मुलगा ह्मणाला: 'मी उगी राहिलों असतों तर खोटें बोलल्याचा दोष माझ्या माथीं आला असता, व बक्षिसाला मी लायक नसतां तें मीं घेतलें असतें तर अन्याय घडला असता. खरें बोलावें, व न्यायानें वागावें, यांत जें सुख आहे, तें अशीं शेंकडो बक्षिसें मिळविल्यानें प्राप्त होणार नाहीं.'

## झैदुल्लाखानाचें इमान.

हिंदुस्थानाच्या वायव्येस अफगानिस्थानाच्या सरहद्दीवर डोंगरी प्रदेश आहे. तेथें अनेक कडव्या रानटी जाती आहेत, त्यांच्या आणि आमच्या सरकाराच्या वेळोवेळां झटापटी होत असतात. अशा प्रकारची एक लढाई स. १८६३ सालीं उपस्थित झाली असतां, ब्रिटिश सैन्यानें त्या जातींच्या लोकांचा पराभव करून त्यांची दाणादाण केली. तेव्हां ते लोक आपल्या डोंगरी किल्ल्यांतून दबा धरून बसले. त्यांपैकीं बुनर नांवाची एक जात ब्रिटिश लोकांला वश झाली होती. त्या जातीचा मुख्य सरदार झैदुल्लाखान नांवाचा एक गृहस्थ होता. ह्या वेळीं ब्रिटिश सैन्याच्या एका तुकडीला खैबर नांवाच्या पहाडी वाटेनें जाऊन मालका नांवाच्या किल्ल्यावर हल्ला करून तो उध्वस्त करून परत यावयाचें होतें. पण वाटेंतल्या पहाडांतून रानटी जातींचे बारा

पंधरा हजार लोक दबा धरून बसले होते. तेव्हां अर्थात् माल्का येथें जाऊन सुरक्षितपणें परत येण्याची आशा नव्हती. ह्मणून ब्रिटिश सेनापतीनें झैदुल्लाखानाची मदत मागितली. त्यावरून त्यानें ब्रिटिश सैन्याच्या एका तुकडीला माल्का येथें नेऊन परत आणण्याचें वचन दिलें. मग ही तुकडी झैदुल्लाखानाच्या लोकांबरोबर माल्काकडे जावयास निघाली असतां, मार्गांतल्या डोंगरी किल्ल्यांतले लोक जमा होऊन तिजवर हल्ला करावयास आले. त्यांस झैदुल्लाखानानें निक्षून सांगितलें कीं, 'ह्या गोऱ्या लोकांस माल्का येथें नेऊन परत सुरक्षित आणण्याचें वचन मीं दिलें आहे. तर मी तुम्हांला त्यांच्यावर हल्ला करूं देणार नाहीं. पहिल्यानें माझ्याशीं व माझ्या जातीच्या लोकांशीं लढून आह्मांला साफ मारून टाका आणि मग ह्या गोऱ्या लोकांवर चालून या. मी व माझे लोक जीवंत आहेत तोंपर्यंत आह्मी तुम्हांला ह्यांच्या वाटेस जाऊं देणार नाहीं.' ही अशी धमकी त्यांच्यापैकींच एका जातीच्या प्रमुख सरदाराची मिळाल्यामुळें ते लोक त्या ब्रिटिश सैन्याच्या वाटेस गेले नाहींत. कारण बुनर जातीचे लोक फार कडवे असून त्यांचा सरदार मोठा शूर व पराक्रमी होता, म्हणून त्यांच्याशीं विरोध करणें त्यांला बरें दिसलें नाहीं.

## फुलांची कुंडी.

एक गृहस्थ आपल्या घरासमोरील अंगणांत खुरचीवर बसून वाचीत असतां, माडीवरून एक चिनीमातीची सुंदर कुंडी खालीं पडून मोठा आवाज झाला, आणि तिचे तुकडे जिकडेतिकडे उडाले. हा एवढा आवाज झाला तरी तो मुळींच न घाबरतां स्वस्थपणें वाचीत होता. त्याच्या बायकोनें तो आवाज ऐकून बाहेर येऊन पाहिलें, तों ती तिची

आवडती कुंडी खालीं पडून फुटल्याचें तिच्या नजरेस पडलें. त्याबरोबर संतापून तिनें आपल्या दासीला रागानें हाक मारिली. ती कानीं पडतांच, ती माडीवर होती तेथून खालीं धावत आली. धनिणीनें तिला विचारिलें: 'काय ग, कुंडी कशी पडली? तो उनाड मुलगा वरती खेळत आहे काय? त्यानें ती लकटून दिली ना?' दासी ह्मणाली 'मुलानें नाहीं हो कुंडी ढकलून दिली. ती माझ्या हातानें पडली.' हें ऐकून ती त्या दासीवर चवताळून तिला शिव्याशाप देऊं लागली. इतक्यांत त्या बाईचा मुलगा धांवत खालीं येऊन ह्मणाला: 'अग, हे दाई, खोटें बोलूं नको. आई, दाईवर तूं रागावूं नको. कुंडी मीं ढकलली.' दासी ह्मणाली: 'बाईसाहेब, मुलाच्या हातून ती पडली असली तरी ती त्यानें मुद्दाम ढकलली नाहीं. तो बारीपाशीं उभा होता तों सहज त्याचा पाय कुंडीला लागला. असेंच ना बाळा? असेंच बोल, नाहीं तर बाबा तुजवर फार रागावतील.'

मग ती बाई ह्मणाली: 'माझ्या बाळा, तुझा पाय चुकून लागला असावा.ह्यापुढें संभाळून वागत जा. माझें अप्रिय केल्याबद्दल तुला वाईट वाटलें आहे, एवढें पुरे आहे.' असें ह्मणून तिनें त्याचा मुका घेतला. त्याबरोबर तो मुलगा ह्मणाला: 'आई, माझा मुका घेऊं नको. मुका घेण्यास मी लायक नाहीं. मीं ती फूलझाडाची कुंडी मुद्दाम लोटिली.' हे त्याचे शब्द कानीं पडतांच त्याचा बाप उठून त्याच्या जवळ येऊन ह्मणाला: 'तूं ती मुद्दाम लोटून दिली ह्मणतोस? ती काय ह्मणून?' मुलानें खालीं मान घालून उत्तर केलें: 'केवळ गमतीखातर; आवाज झाला ह्मणजे तुह्मी काय करितां तें पाहावें असें माझ्या मनांत आलें, ह्मणून मीं ती लोटून दिली. तर आतां, बाबा, मला ह्या गुन्ह्याबद्दल

वाटेल तें शासन करा, मी तें सोसण्यास तयार आहें.' हे त्या खऱ्या व धीट मुलाचे शब्द ऐकून त्या गृहस्थानें हातांतलें पुस्तक खालीं ठेवून त्याला कवटाळिलें आणि ह्मटलें: 'माझ्या बाळा, तूं हा मोठा अपराध केला, त्याबद्दल तुला कडक शिक्षा होईल हें पक्कें ठाऊक असतां, तूं न घाबरतां खरें बोललास, हें पाहून देवानें मला असा सत्यशील मुलगा दिल्याबद्दल मी त्याचे मोठे उपकार मानितों.'

## किल्ल्याचें चित्र.

एका मुलानें एका किल्ल्याचें चित्र काढून नाताळाच्या रजेंत घरीं न्यावयाचा बेत केला. तें त्यानें जेमतेम तयार केलें; पण तें त्याचें त्यालाच चांगलें दिसेना. ह्मणून त्यानें शाळेंतल्या आपल्या एका सोबत्याला तें दुरुस्त करायाला सांगितलें. त्याचा तो सोबती चित्रकलेंत चांगला हुशार होता. त्यानें त्याच्या चित्राला चांगलें स्वरूप दिलें, तेव्हां त्या चित्राची शाळेंतल्या शिक्षकांनीं तारीफ केली; आणि त्याच्या बापाला आपल्या मुलाची चित्रकलेंत एवढी गति झाली आहे हें पाहून मोठा संतोष झाला; आणि त्यानें त्याला शाबासकी देऊन कांहीं नवीं पुस्तकें बक्षीस दिलीं. मग त्याच्या आईबापांनीं ती आपल्या मुलाची उत्तम करामत म्हणून आपल्या दिवाणखान्यांत तें चित्र टांगून ठेविलें. सुटीच्या दिवसांत त्या मुलाची एक चुलतबहीण त्यांना भेटायाला आली. तिनें तें चित्र पाहून त्या मुलास ह्मटलें कीं, 'भाऊ, माझ्या चित्रें काढावयाच्या चोपडींत असेंच चित्र काढून दे.' तेव्हां त्यानें तिचें ह्मणणें मान्य करून तिची चोपडी त्या आपल्या सोबत्याकडे नेली, आणि तींत तें चित्र काढावयास त्याला सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें तें त्याला काढून दिलें.

पुढें त्याची ती चुलतबहीण व त्याचा एक चुलतभाऊ यांस बरोबर घेऊन तो येरुशलेमचा देखावा पाहावयास गेला. तेथें यरुशलेमचें देवालय पाहून त्यांस मोठें कौतुक वाटलें; आणि ती चुलतबहीण त्याला ह्मणाली: 'भाऊ, ह्या देवालयाचें एक लहानसें चित्र काढून मला दे. हा कागद घे;' आणि त्याचा चुलतभाऊ ह्मणाला: 'ही घे पेन्सिल.' तेव्हां तो मोठ्या संकटांत पडला. आतां आपली लबाडी उघडकीस येते असें त्याला वाटलें. पण आतां अवकाश नाहीं, असें सांगून ती वेळ त्यानें मारून नेली. घरीं आल्यावर त्याची चुलती त्याला ह्मणाली: 'बाळा, आमच्या गांवीं आह्मी एका गरिबांच्या शाळेला मदत करण्यासाठीं मजेच्या वस्तूंची जत्रा भरणार आहों. त्यांत ठेवायासाठीं तुझ्या ह्या किल्ल्याच्या सुंदर चित्राच्या सहा लहान नकला ह्या कार्डांवर काढून दे.' तेव्हां हा त्याला आणखी एक नवा पेंच आला. तो तीं कार्डें घेऊन पुनः त्या सोबत्याकडे गेला, आणि त्याला त्यांवर त्या चित्राच्या लहान नकला करण्यास सांगून घरीं आला. पण ह्या लबाडीबद्दल त्याचें मन त्याला खाऊं लागलें. आपणाला चांगलीं चित्रें काढितां येतात, अशी बतावणी केल्याचा त्याला अतिशयित पश्चात्ताप वाटूं लागला; आणि त्याचें चित्त अस्वस्थ होऊन त्याला सारी रात्र झोंप येईना. मग त्यानें असा निश्चय केला कीं, आपण ही निवळ लबाडी केली असें आपल्या वडिलांस व नातलगांस स्पष्टपणें कळवावें, यांतच खरें समाधान आहे. केलेल्या अपराधाची निष्कृति अशा रीतीनेंच केली पाहिजे, असा मनाचा धडा करून त्यानें सकाळीं उठतांच दिवाणखान्यांतलें तें चित्र खालीं काढून साफ जाळून टाकिलें, आणि चुलतबहिणीला काढून दिलेलें चित्र फाडून टाकिलें. त्याप्रमाणेंच आपल्या सोबत्याकडे धावत जाऊन

त्याच्या हातचीं तीं कार्डें घेऊन त्यानें फाडून टाकिलीं. त्याच्या वडिलांनीं त्याला असें करण्याचें कारण विचारिलें, तेव्हां त्यानें डोळ्यांत आसवें आणून आपली लबाडी कबूल केली.

## पुऱ्या धैर्याचा मुलगा.

थंड प्रदेशांत हिंवाळ्यामध्यें बरफाची वृष्टि होऊन जमिनीवर तें जिकडे तिकडे सांचतें; आणि कधीं कधीं ही वृष्टि एवढी होते कीं, घरां-सभोंवतीं बरफाचे ढिगारे होऊन दारें उघडण्याची व बाहेर रस्त्यांत जाण्याचीही पंचाईत पडते.

अशा समयीं कांहीं मुलगे बरफाचे गोळे करून एकमेकांवर मौजे-खातर मारीत असतां, एका लहान मुलाच्या हातचा गोळा चुकून एका दुकानाच्या तावदानाला लागला, आणि तें खळकन फुटलें. त्याबरोबर त्याचे सोबती ह्मणाले: 'रे, पळ येथून; नाहीं तर दुकानदार बाहेर येऊन तुला पकडील.' त्यांनीं त्याला असा धाक घातला, तरी तो जागचा हालेना. तेव्हां ते त्याला ह्मणाले: 'रे वेड्या, विनाकारण त्याच्या तावडींत कां सांपडतोस? आह्मी तुझें नांव त्याला सांगणार नाहीं. तूं बेशक पळून जा.' असें ते त्याला सांगत आहेत, तों दुकानदार दरवाजा उघडून बाहेर आला, आणि त्या मुलांस दरडावून ह्मणाला: 'ह्या तावदानावर बरफाचा गोळा कोणीं मारिला रे?' त्याला कोणीही तत्काळ जबाब देईना, तेव्हां त्यानें पुनः तोच प्रश्न विशेष रागावून विचारिला. त्याबरोबर ज्या मुलाच्या हातचा गोळा काचेला लागला होता, तो कांपत कांपत त्याच्या पुढें येऊन ह्मणाला: 'महा-राज, काच माझ्या हातून फुटली.' तें ऐकतांच त्या दुकानदारानें त्याची गरदन धरून ह्मटलें: 'काच मीं फोडिली असें मोठ्या धिटा-

ईनें सांगायाला पुढें आलास काय?' तो मुलगा ह्मणाला: 'मल माझा गुन्हा ना कबूल करवत नाहीं. तुमच्याकडे लबाडी करणें मल बरें वाटलें नाहीं.' हें त्याचें उत्तर ऐकून तो कठोर माणूस चपापला आणि त्या मुलाचा खरेपणा पाहून त्याचें हृदय विरघळलें. मग त्यां त्यलामुास आपल्या दुकानांत बोलावून नेऊन त्याचें नांव विचारिलें तें सांगून तो मुलगा ह्मणाला: 'महाराज, तुमचें नुकसान भरून देण्यासाठीं मी काय करूं तें सांगा. मी हवें तें काम करण्यास तया आहें. माझ्या आईकडे ह्याबद्दल पैसे मागूं नका. एवढी मजवर दय करा.' असें बोलून तो रडूं लागला. तो दुकानदार ह्मणाला: 'पुढील हिंवाळ्यांत बरफाची अतिवृष्टि होऊन माझ्या दुकानांतून बाहेर जाण्याची वाट बंद झाली ह्मणजे तूं येथें येऊन बरफ काढून टाकावें. एवढे काम केलेंस ह्मणजे मला पुरे आहे. मुलगा ह्मणाला: 'महाराज, हे काम मी हिंवाळाभर करीत राहीन, आणि आणखी कांहीं सांगाल तर तेंही करीन.' दुकानदार ह्मणाला: 'एवढें काम तूं केलें ह्मणजे पुरे आहे. तूं खरें बोलायास भ्याला नाहींस, ह्मणून तुला मी एवढ्याच करारावर सोडीत आहें. मला खरें बोलणारा मुलगा आवडतो.'

## खरा आणि खोटा.

फ्रान्क आणि रॉबर्ट असे दोघे मुलगे शेगडीपाशीं कुत्र्याबरोबर खिदळत असतां, शेगडीवर तापत ठेविलेलें दुधाचें भांडें त्यांचा धक्का लागून पडलें आणि फुटलें. तें पाहून दोघेही अगदीं घाबरून गेले आणि ह्मणूं लागले कीं, आपणाला आज रात्रीं दूध मिळायाचें नाहीं. फ्रान्क ह्मणाला: 'आपण आईला सांगूं या चल. तुमच्या हातून कांहीं फुटलें तर मला लागलींच सांगत जा, असें तिचें आपणास सांगणें

आहे.' रॉबर्ट ह्मणाला: 'मी येत नाहीं. मला भय वाटतें.' तेव्हां फ्रान्क एकटाच आईकडे धावत गेला. पण ती त्या वेळीं कोठें बाहेर गेली होती, ह्मणून त्यानें बागेंत धाव मारिली. इकडे रॉबर्ट त्या शेगडीच्या खोलींत एकटाच बसला होता. इतक्यांत त्यांच्या आईनें आंत येऊन दूध सांडलें आहे व भांडें फुटलें आहे असें पाहिलें. रॉबर्टला तेथें पाहून तिनें पुसलें: 'दुधाच्या भांड्याला कोणीं धक्का लाविला रे? रॉबर्ट ह्मणाला: 'मीं कांहीं त्याला धक्का लाविला नाहीं.' आई ह्मणाली: 'तर मग फ्रान्कनें हें काम केलें काय?' रॉबर्ट ह्मणाला: 'नाहीं आई; त्यानेंही धक्का लाविला नाहीं. तो मुळीं ह्या खोलींतच आला नाहीं. मी येथें बराच वेळ आहें.' आई ह्मणाली: 'तर मग दूध कोणीं ओतिलें हें तुला ठाऊक असलें पाहिजे.' रॉबर्टनें उत्तर केलें: 'त्या कुत्र्यानें तें पाडिलें असावें.' आई ह्मणाली: 'तर मग त्या कुत्र्याला चांगला झोडिला पाहिजे. बागेंत जाऊन शिपट्या घेऊन ये.' ही आज्ञा होतांच तो बागेंत धावत गेला. तेथें फ्रान्क त्याला भेटला. त्याला त्यानें सगळा आळ कुत्र्यावर घालून आपण दोघेही दोषांतून मुक्त झालों असें सांगितलें. पण फ्रान्क ह्मणाला: 'काय, आमच्या अपराधाबद्दल बिचाऱ्या कुत्र्याला मार! हें कांहीं बरोबर नाहीं. मी आईला खरी गोष्ट सांगणार!' असें ह्मणून तो घराकडे धावत गेला. रॉबर्टनें लगबग करून शिपट्या घेऊन आपल्या भावापूर्वीं घरांत शिरून दरवाजा लावून घेतला, व फ्रान्कनें आंत येऊं नये ह्मणून आंतून कडी लावून घेतली. आई हातांत शिपट्या घेऊन कुत्र्यावर मारणार, इतक्यांत फ्रान्क बारीशीं येऊन मोठ्यानें ओरडून ह्मणाला: 'आई, कुत्र्यानें दूध पाडिलें नाहीं. रॉबर्टानें आणि मीं तें पाडिलें आहे.' असें तो बाहेरून सांगत आहे तों त्याचा बाप तेथें आला आणि मोठ्यानें ह्मणाला: 'आह्मांला

आंत येऊं दे, दार उघड.' त्यावरून तिनें दार उघडिलें, आणि त्या आंत जाऊन सगळी चौकशी केली. तेव्हां खरी गोष्ट त्याला कळून त्या बायकोच्या हातच्या शिपद्या घेऊन रॉबर्टाला खोटें बोलल्याबद्दल ख पूस मार दिला आणि रात्रीं त्याला उपाशीं ठेविलें. मग फ्रान्कल पोटाशीं धरून त्याचा मुका घेऊन त्यानें ह्मटलें: 'माझ्या बाळ तूं खोटें बोलला नाहींस, ह्मणून तुला शिक्षा तर झाली नाहींच; प आतांपासून मला तूं अधिक प्रिय झाला आहेस. हा कुत्रा मी तुल देतों; आणि याच्यासाठीं एक छानदार नवा पट्टा आणून देतों. ह कुत्र्याचा मार तूं वांचविला, ह्मणून तूं याचा धनी होण्यास सर्वथ लायक आहेस. ह्या कुत्र्याला आजपासून तुझें नांव ठेवायाचें. कुत्र्या नांव बदललें कां? असें कोणीं विचारिलें तर त्याला आज घडलेल सगळा प्रकार आह्मी सांगूं.'

## शूर मुलगा.

एक जहाज लिव्हरपुलाहून न्युयार्कला जावयास निघालें. तें बंद सोडून भरसमुद्रांत गेलें तेव्हां त्यांतल्या मालाच्या कोठींत एक तरुण मुल लपलेला सांपडला. तेव्हां त्याला कप्तानापाशीं आणिलें. तो अंगा बारीक व निस्तेज असून त्याचे कपडे फाटके होते. कप्तानानें त्याल दरडावून विचारिलें: 'अरे, तूं ह्या जहाजांत कसा आलास ? त्या मुलानें न घाबरतां उत्तर केलें: 'माझे आईबाप मरण पावले असू मी माझ्या चुलत्यापाशीं होतों. त्याला माझें ओझें वाटून मला माझ्य मावशीकडे पाठवून द्यावें असें त्यानें योजिलें, व मला एका पोत्यां घालून या जहाजांतल्या मालाबरोबर चढवून दिलें. त्यानें मला हालिफाक येथें उतरून माझ्या मावशीचा पत्ता काढावयास सांगितलें आहे

हा पाहा तिचा पत्ता.' असें ह्मणून त्यानें खिशांतला एक मळका कागद काढून त्याच्या हातीं दिला. त्यावर त्याच्या मावशीचा पत्ता लिहिला होता. पण कप्तानाला ही त्याची गोष्ट खरी वाटली नाहीं. त्याला असा संशय आला कीं, कोणींतरी खलाश्यानें ही लबाडी केली असावी. मग त्यानें सगळ्या खलाश्यांला एके ठिकाणीं जमवून त्या मुलास ह्मटलें कीं, 'तुला येथें घेऊन येणारा माणूस दाखीव, नाहीं तर तुझीं शंभर वर्षे भरलींच ह्मणून समज.' तें ऐकून तो मुलगा न डगमगतां त्याच्या तोंडाकडे पाहून ह्मणालाः 'मी तुह्मांला खरा प्रकार काय आहे तो सांगितला, कांहींएक चोरिला नाहीं.' हें त्याचें धीटपणाचें उत्तर ऐकून कप्तानानें एक दोर आणवून डोलकाठीच्या आडव्या तीराला बांधविला आणि ह्मटलें: 'मुला, खरा प्रकार कबूल करण्यास तुला आणखी पंधरा मिनिटें देतों. एवढ्या अवकाशांत तूं खरें बोलला नाहींस, तर तुला ह्या फासावर चढवितों.' असें ह्मणून त्यानें त्या दोरीचा फास करून तो त्या मुलाच्या गळ्यांत घातला, आणि घड्याळ हातांत धरून तो उभा राहिला. त्या गरीब मुलाची ही अशी दशा पाहून सगळे खलाशी कष्टी होऊन तटस्थ उभे राहिले, व कित्येकांच्या मनांत त्याच्यासाठीं रदबदली करावी असेंही आलें. पण पुढें होण्यास कोणाचीही छाती होईना. पण तो मुलगा बिलकूल न घाबरतां स्वस्थपणें उभा राहिला. दहा मिनिटें लोटल्यावर कप्तान त्यास पुनः ह्मणालाः 'पाहा, दहा मिनिटें गेलीं, आणखी पांचच उरलीं. अजून तरी खरें बोल.' मुलगा ह्मणालाः 'खरें काय होतें तें मीं तुह्मांला एकदां सांगितलें. तुह्मांला तें खोटें वाटत आहे, याला माझा इलाज नाहीं. तुह्मी मला फाशीं देणारच तर मला देवाची प्रार्थना करावयास परवानगी द्या.' कप्तानानें मान हालवून परवानगी दिल्यावर त्यानें गुडघे

टेकून व हात वर करून देवाची प्रार्थना मोठ्या कळवळ्यानें केली, आणि मग वर उठून कप्तानाला ह्मटलें: 'आतां मरायाला माझी तयारी आहे.' हा असा त्या मुलाचा निश्चयीपणा व सद्भाव पाहून त्याला पराकाष्ठेचा गहिंवर आला; आणि त्याला दृढ आलिंगन देऊन व डोळ्यांत आसवें आणून त्यानें ह्मटलें: 'देव तुझें कल्याण करो. तूं खरा इंग्रज आहेस. आपल्या जिवाचें रक्षण करण्यासाठीं देखील तूं खोटें बोलला नाहींस. तुझ्या चुलत्यानें तुझा असा त्याग केला आहे, तर इतःपर मी तुझा पिता आहें, असें मान.' ह्या अभिवचनाप्रमाणें तो वागला. त्यानें हालिफाक्स येथें त्या मुलाच्या मावशीचा पत्ता काढून त्याला तिच्या स्वाधीन केलें, आणि त्याच्या प्रतिपाळासाठीं व शिक्षणासाठीं तिला कांहीं पैसे देऊन ठेविले. नंतर जेव्हांजेव्हां तो त्या बंदरांत जाई तेव्हांतेव्हां त्या मुलास भेटल्यावांचून पुढें जात नसे.

## खऱ्याची पारख.

स्कॉटलंडांतला एक मुलगा अमेरिकेंतल्या आपल्या नातलगांच्या घरीं रहावयास गेला. तेथें त्याच्या वयाचीं भावंडें होतीं, त्यांच्याइतकाच त्याचा विद्याभ्यास झाला असल्याकारणानें तो त्यांच्याबरोबर शाळेंत जाऊन त्यांच्याच वर्गांत बसला. त्या वर्गाच्या शिक्षकाचा असा नियम असे कीं, जो मुलगा आपले धडे बरोबर करील, त्याला दहा गुण (मार्क) मिळावयाचे. पण तो वर्गांत जितके वेळां बोलेल, तितके गुण त्यानें त्यांतून वजा करावे. दररोज सुटीच्या अगोदर तो शिक्षक मुलांचे गुण पटावर लिहून ठेवी. या परिपाठाप्रमाणें तो नांवें पुकारूं लागला. तेव्हां बहुतेक सगळ्यांनीं दहादहा गुण सांगितले. शेवटीं या नव्या मुलाचें नांव त्यानें घेतलें. तेव्हां तो ह्मणाला: 'मी बोललों.'

शिक्षकानें विचारिलें: 'अनेक वेळां बोललास ?' तो ह्मणाला: 'अनेक वेळां.' शिक्षकानें पुन: विचारिलें: 'काय! दहा वेळां बोललास?' मुलगा ह्मणाला: 'मला वाटतें मी दहा वेळां तरी निदान बोललों असेन.' शिक्षक ह्मणाला: 'तर मग तुला कांहींच गुण मिळत नाहींत, ही मोठीच अप्रतिष्ठा आहे.'

तो मुलगा घरीं गेल्यावर त्याच्या एका चुलतभावानें त्याला ह्मटलें: 'तुला एक शब्दही बोलतांना मीं ऐकिलें नाहीं.' तो ह्मणाला: 'तूं ऐकिलें नाहींस तरी मी माझ्या शेजारच्या मुलांच्या कानाशीं अनेक वेळां लागलों. दुसरे मुलगे असें करितांना पाहून मला वाटलें कीं, असें करण्यास कांहीं हरकत नाहीं.' त्याचा चुलतभाऊ ह्मणाला: 'शिक्षकाच्या त्या नियमांत मुळीं अर्थ नाहीं. सगळा दिवस एक-मेकांच्या शेजारीं बसून मुळीं एक शब्दही बोलल्यावांचून कसें कोणा-च्यानें रहावेल?' तो मुलगा ह्मणाला: 'मी तो नियम पाळण्यास झटेन; आणि तो मीं मोडला तर मोडला ह्मणून सांगेन. पण गुण मिळविण्याच्या आशेनें खोटें बोलणार नाहीं.' त्याचा चुलतभाऊ ह्मणाला: 'तो नियम आह्मी असा सक्तीनें पाळूं तर आह्मांला एकही गुण मिळ-णार नाहीं.'

हा मुलगा आपले धडे मोठ्या नेटानें व काळजीनें करी. धडे चोख झाले ह्मणजे मग तो खेळावयास जाई. पण त्याच्या हातून तो नियम कांहीं चांगला पाळला जात नसे. त्यामुळें त्याला नेहमीं कमी गुण सांगावे लागत. त्याचा असा खरेपणा पाहून दुसरे मुलगे त्याला मान देऊं लागले; आणि त्याच्या देखत आपण लबाडी कशी करावी, असें त्यांच्या मनाला वाटूं लागलें. त्यामुळें कांहीं मुलगे

आपल्या दहा गुणांतून कांहीं कमी करून सांगूं लागले. पूर्वी सगळेच दहादहा सांगत; तो प्रकार आतां बंद पडला. ह्याप्रमाणें तो नवा मुलगा आल्यापासून वर्गांत गडबडही कमी होऊं लागली. सहामाहीच्या अखेरीस शिक्षकानें सगळ्यांच्या गुणांची बेरीज करून रांगा लाविल्या, त्यांत ह्या नव्या मुलाची रांग अगदीं खालची लागली. आपण एवढा चांगला अभ्यास करून शेवटीं आपली रांग फार खालीं आली, हें पाहून त्याला फार वाईट वाटलें.

रांगा लाऊन झाल्यावर सुटी देण्यापूर्वी शिक्षकानें मुलांस थोडेंसें उपदेशपर भाषण केलें. त्यांत तो ह्मणालाः ‘ मुलांनों, एके वेळीं एक साधा पोषाक घातलेला माणूस मला रस्त्यांत दिसला. त्याच्याकडे न पाहतां मी आपला पुढें चाललों. पण इतक्यांत मला कोणीं सांगितलें कीं, ‘ तो साधा पेहराव केलेला माणूस मोठा शूर सेनापति आहे. आपल्या दरजास अनुरूप असा मोठा भपकेदार पोषाक करावासें त्याला वाटत नाहीं, ह्मणून तो कोणी मोठा माणूस आहे असें लोकांला वाटत नाहीं. ’ ह्या माझ्या बोलण्याचा अर्थ तुमच्या लक्षांत आला असेलच. तुमच्यापैकीं जो कोणी अतिशयित सत्यशील व विश्वासपात्र असेल, त्याला मी हें सुवर्णपदक देणार आहें. तर हें कोणाला द्यावें बरें ? ’ तो प्रश्न ऐकून वर्गांतलीं चाळीस मुलें एकदम ओरडून ह्मणालीं: ‘ स्कॉटलंडांतून आलेल्या ह्या नवीन मुलास तें योग्य आहे.’

## प्रामाणिक मुलगा.

दोन मुलगे गमतीखातर एकमेकांवर दगड मारीत असतां, एकाचा दगड जवळच्या मोठ्या वाड्याच्या खिडकीवर बसून त्याची काच फुटली. त्याबरोबर तो घाबरून जागच्याजागीं स्तब्ध उभा राहिला. तेव्हां त्याचा

सोबती त्याला ह्मणाला: ‘ अरे, असा येथें उभा राहून काय पाहतोस. येथून पळ. नाहींतर तुला पकडून पोलिसाच्या ताब्यांत देतील; आणि तूर्त तुझ्या बापाला कांहीं काम नसल्यामुळें तुला त्यांचें नुकसान भरून देण्याची पाळी आली असतां, तो तुला खरपूस मार देईल. ’ असें ह्मणून तो त्याला ओढून नेऊं लागला. तेव्हां तो मुलगा ह्मणाला: ‘ तूं मला ओढूं नको. मी त्या घराच्या मालकाकडे जाऊन आपला अपराध कबूल करितों, आणि त्याचें नुकसान भरून देतों ह्मणून सांगतों. ’ असें बोलून तो त्या वाड्यापाशीं जाऊन त्याचा दरवाजा ठोकूं लागला. तेव्हां चाकरानें तो उघडून ‘ काय काम आहे ? ’ म्हणून विचारिलें. मुलगा ह्मणाला: ‘ ह्या वाड्याचे मालक घरीं आहेत काय ? ’ चाकरानें ‘होय’ ह्मणून सांगितलें. तेव्हां तो ह्मणाला: ‘ मला त्यांस भेटावयाचें आहे. ’ चाकर ह्मणाला: ‘ तुला त्यांची भेट व्हावयाची नाहीं. काय काम असेल तें मला सांग, ह्मणजे मी तें त्यांला कळवितों. ’ मुलगा ह्मणाला: ‘ तुला तें सांगण्याजोगें नाहीं. मलाच त्यांला प्रत्यक्ष भेटलें पाहिजे. ’ मुलाचा असा आग्रह पाहून चाकरानें आपल्या धन्याला जाऊन सांगितलें कीं, ‘ एक गरीब मुलगा आपणाला भेटूं इच्छीत आहे. ’ त्या गृहस्थानें त्या मुलाचें तें निकडीचें बोलणें आंतून ऐकिलेंच होतें. तो ह्मणाला: ‘ त्याला आंत घेऊन ये. ’

त्यावरून त्या मुलास आंत नेलें, तेव्हां दिवाणखान्यांतली शोभा व उंची वस्तु पाहून तो अगदीं थक्क झाला. मग तो त्या गृहस्थाला लवून सलाम करून ह्मणाला: ‘ महाराज, तुमच्या खिडकीची काच फोडिल्याबद्दल मला अतिशयित वाईट वाटत आहे. माझा बाबा सध्यां रिकामा आहे. त्याला तुमच्या काचेची भरपाई करितां येणार नाहीं. पण

तुह्मी कृपा करून मला मिळतील तसे थोडेथोडे पैसे घ्याल, तर मी तुमचें सगळें नुकसान भरून देईन.' असें बोलून त्यानें, आपल्या खिशांत थोड्याश्या अर्ध्या पेनी होत्या, त्या काढून त्याच्या मेजावर ठेविल्या. हे त्याचे शब्द ऐकून तो गृहस्थ ह्मणालाः 'हें तुझें बोलणें प्रामाणिकपणाचें आहे. पण तूं बोलल्याप्रमाणें वागशील, याला प्रमाण काय ? माझ्या नुकसानाची भरपाई होईपर्यंत तुला पोलिसाच्या स्वाधीन करावें, हेंच मला चांगलें दिसतें.' मुलगा ह्मणालाः 'महाराज, मला पोलिसाच्या हवालीं करूं नका. माझ्या आईला पराकाष्ठेचें दुःख होईल. मी तुमचे सगळे पैसे देईन, खचीत देईन!' असें ह्मणून तो भळभळां रडूं लागला. ही त्याच्या मनाची अवस्था पाहून तो गृहस्थ गहिंवरला आणि ह्मणालाः 'तुला आपल्या आईविषयीं एवढी कदर आहे हें पाहून मला संतोष होतो. तिच्यासाठीं मी तुझ्यावर भरंवसा ठेवितों. पण हें पाहा, ह्या एवढ्या मोठ्या काचेची सगळी किंमत भरून द्यावयाला तुला किती दिवस लागतील ? तूं दुसरे पैसे केव्हां घेऊन येशील ?' मुलानें उत्तर केलें: 'आजपासून आठ दिवसांनीं मला जें कांहीं मिळेल तें घेऊन येईन.' असें बोलून त्याला लवून नमन करून तो निघून गेला.

वचन दिल्याप्रमाणें बरोबर आठव्या दिवशीं तो मुलगा त्या गृहस्थाकडे एक शिलिंग घेऊन आला, आणि तो त्याच्यापुढें त्यानें मोठ्या उत्साहानें ठेविला. तो गृहस्थ ह्मणालाः 'इतके पैसे तुझ्यासारख्या लहान मुलास एवढ्या थोड्या दिवसांत मिळाले, हें पाहून मला नवल वाटतें. हे तूं इमानानें मिळविलेस ना ?' त्याचा तो संशय पाहून त्या मुलास अमळ वाईट वाटलें, आणि तो ह्मणालाः 'महाराज, यांतल्या अकरा पेनी मीं स्वतः कष्ट करून मिळविल्या आहेत, व एक मात्र

आईनें दिली आहे.' मग कोणाकोणाचें कायकाय काम करून ते पैसे आपण मिळविले, तें त्यानें त्या गृहस्थाला तपशीलवार सांगितलें. तें ऐकून त्याला अतिशयित समाधान वाटलें, आणि तो ह्मणाला: 'माझ्या बाळा, तूं फार योग्य मुलगा आहेस अशी आतां माझी खात्री झाली आहे. तुझें नांव काय, व तूं कोठें रहातोस तें मला सांग.' मुलगा ह्मणाला: 'मी तीं लिहून देतों. पैसे टिपून ठेवण्याकरितां हा पाहा मीं कागद आणिला आहे. तुमचे सगळे पैसे थोड्याच दिवसांत फेडीन अशी मला उमेद आहे.कारण, मला कोणाचें तरी चिठीचपाटी पोंचविण्याचें काम मिळतें तर पाहणार आहें.' त्या गृहस्थानें विचारिलें: 'तुला लिहितां येतें तर? तूं शाळेंत जात असतोस काय?' तो ह्मणाला: 'होय, मी धर्मार्थ शाळेंत जात असतों.' असें बोलून त्यानें टेबलावरची लेखणी घेऊन आपलें नांव आणि पत्ता हीं लिहिलीं. त्याचें अक्षर पाहून तो गृहस्थ ह्मणाला: 'बाळा, तुझें अक्षर चांगलें आहे. शिपायाच्या कामाहून चांगल्या कामाला तूं लायक आहेस. बरें, तुला गणित येतें काय पाहूं.' असें बोलून त्याला गणितांतले कांहीं प्रश्न त्यानें विचारिले. त्यांचीं त्यानें बिनचूक उत्तरें दिलीं. तीं ऐकून तो गृहस्थ फारच खुश झाला. मग, आणखी आठ दिवसांनीं दुसरे पैसे घेऊन येतों, असें सांगून तो गेला.

पुनः आठ दिवसांनीं तो त्या गृहस्थाकडे आला. पण ह्या वेळीं त्याची चर्या प्रफुल्लित नव्हती. तो तोंड वाईट करून त्याला म्हणाला: 'महाराज, ह्या खेपेस मला अगदीं थोडे पैसे मिळाले आहेत. घोड्यावरून जाणाऱ्या प्रत्येक गृहस्थाला, मला कांहीं काम सांगा, अशी मीं विनंति केली. पण मला कोणीं फारसें काम दिलें

नाहीं.' असें बोलून त्यानें सहा अर्ध्यापेनी त्याच्यापुढें ठेविल्या. तो गृहस्थ ह्मणालाः 'माझ्या बाळा, कांहीं चिंता नाहीं. तुझा असा प्रामाणिकपणा पाहून मला फार संतोष झाला आहे. पुढल्या खेपेस कदाचित् तुला ह्याहून अधिक पैसे मिळतील.' असें बोलून त्यानें त्याला निरोप दिला.

ह्या मुलाचें असें उमदेपणाचें वर्तन पाहून तो गृहस्थ फार खुश झाला; आणि त्याचें कल्याण करावें, असें त्याच्या मनांत आलें. मग त्याच्या घराचा पत्ता काढून तो त्याच्या आईबापांस भेटला; आणि त्यांच्या मुलाची व आपली ओळख कशी झाली, तें सांगून त्यानें त्यांस विचारिलें: 'तुमच्याशीं त्याचें वर्तन कसें असतें?' त्यांनीं सांगितलें कीं, 'तो आमच्याशीं खऱ्या पुत्रधर्मानें चालतो, आणि सगळ्या बाबतींत नेहमीं प्रामाणिकपणानें व सत्यानें वागतो.' हें ऐकून तो गृहस्थ ह्मणालाः 'त्याचें बरें करावें असें माझ्या मनानें घेतलें आहे. तर ह्या दोन गिनी घ्या आणि त्याच्यासाठीं चांगले कपडे करा. पुनः आठ दिवसांनीं तो माझ्याकडे येणार आहे, तेव्हां ते त्याला घालून पाठवा.' ह्याप्रमाणें चांगला पेहराव करून तो मुलगा त्याच्याकडे गेला, तेव्हां त्यानें त्याला आपल्या वाड्यांत ठेवून घेतलें आणि चांगल्या शाळेंत पाठवून त्याची सगळी व्यवस्था आपल्या मुलाप्रमाणें ठेविली. ह्या कृपेस तो पूर्णपणें लायक होता, हें त्याच्या पुढील वर्तनावरून सर्वांच्या प्रत्ययास आलें.

# भाग दुसरा.

## खोटें बोलण्याचे वाईट परिणाम.

### अर्ध्या पेनीचा पौंड बनला.

विलायतेंतील एका कोळशाच्या खाणीजवळ एक गारोडी आपला खेळ करून दाखवीत असतां, तेथें एक बेलदार उभा होता, त्याजकडची अर्धी पेनी मागून घेऊन तो ह्मणाला कीं, "मी याचा पौंड करितों." मग त्यानें आपल्याकडचा पौंड त्या अर्ध्या पेनीच्या जागीं ढकलून देऊन, तो प्रेक्षकांच्या हातीं दिला आणि त्यांला तो पारखायाला सांगितला. तो एकएक जण हातीं घेऊन तपासूं लागला. असें करितां-करितां तो त्या बेलदाराच्या हातीं आला. त्यानें तो पाहिलासा करून खिशांत घातला आणि त्या गारोड्याला ह्मटलें कीं, "हा तुझ्या हातीं गेला तर पुनः अर्धी पेनीं होईल, ह्मणून हा मी तुझ्याकडे परत देत नाहीं."

### जन्मकैद.

अमेरिकेंतल्या एका सरन्यायाधीशापुढें एका गुन्हेगाराची चौकशी होऊन तो दोषी ठरला, आणि त्याला सात वर्षांची सक्त मजुरीच्या कैदेची शिक्षा झाली. तेव्हां गुन्हेगाराच्या वकिलानें शिक्षा कमी करण्या-विषयीं विनंति केली. त्या वेळीं त्यानें अशी अशी सबब सांगितली कीं, "गुन्हेगाराची प्रकृति फार क्षीण झाली आहे. तो तुरुंगांत

गेल्यावर सातांपैकीं निमें वर्षे कैद भोगण्यापूर्वींच आटपेल.''न्यायाधीश ह्मणाला: ''असें आहे तर मी त्याला जन्मकैदेची शिक्षा देतों.'' हा फेरफार अर्थात् त्या गुन्हेगाराला मान्य न होऊन तो पूर्वींची सात वर्षांची कैद भोगण्यास तयार झाला.

### गाढव आणि त्याचा धनी.

एक मनुष्य आपल्या एका शेजाऱ्याकडे त्याचा गाढव मागायाला गेला. तो ह्मणाला कीं, '' तुझा गाढव मला बाजारांत कांहीं माल न्यावयासाठीं दोन घटका दे.'' शेजारी ह्मणाला: '' नुकताच आमच्या गांवचा लोहार येऊन तो घेऊन गेला. त्यामुळें तुझी गरज मला करितां येत नाहीं ह्मणून वाईट वाटतें.'' इतकें तो बोलतो आहे तों त्याचा गाढव तबेल्यांत बांधिला होता तेथून तो मोठ्यानें ओरडला. ती त्याची ओरड ऐकून तो मनुष्य ह्मणाला: '' अरे, तुझा गाढव ओरडून तूं खोटें बोलत आहेस असें सांगत आहे तें ऐकिलेंस? तुला तो द्यावयाचा नाहीं तर तसें मला स्पष्टपणें सांगायाला कोणती हरकत आहे?''

### कवित्वशक्तीची खोटी फुशारकी,

इंग्लंडांत एक मोठा हुशार मुत्सद्दी होता. तो आपल्या अंगच्या योग्यतेनें फडनिशीच्या हुद्याला पोंचला होता. पण त्याला खोट्या गप्पा मारण्याचा अमळ नाद होता. लॉर्ड सॉमर्स ह्मणून एक कवि इंग्लंडांत त्याच्या वेळीं होता. त्यानें केलेल्या एका लहानशा काव्याची नकल करून तें आपण केलें आहे, असें हा फडनीस लोकांला सांगे. एके दिवशीं कवित्वाचा खोटा बाणा मिरविणाऱ्या या फडनिसाची आणि लॉर्ड सॉमर्स यांची कोणीं ओळख करून दिली असतां, लॉर्ड सॉमर्सनें त्याला विचारिलें: ''काय हो, ती कविता तुह्मींच केली काय?'' तो फडनीस

ह्मणालाः " होय, मीं ती सहज उडवून दिली. ती करायास मला फारसा प्रयास पडला नाहीं." हें त्याचें लबाडीचें उत्तर ऐकून तो मोठ्यानें हसला. तेव्हां आपली लबाडी त्याच्या लक्षांत आली असें समजतांच तो भारी ओशाळला आणि खालीं मान घालून तेथून चालता झाला.

## खोटें बोलणारा काची.

एक मोठा गृहस्थ एका काचीच्या दुकानीं जाऊन फळांचा भाव विचारूं लागला. काची ह्मणालाः "माझीं हीं फळें आपणांला विकण्यालायक नाहींत. हीं वाईट व सपक आहेत." हें ऐकून तो दुसऱ्या काचीच्या दुकानीं जाऊन फळें पाहूं लागला. त्या काचीनें आपलीं फळें फार नामीं आहेत असें सांगितल्यावरून त्या गृहस्थानें त्याच्याकडचीं बरींच फळें खरेदी केलीं; आणि तीं त्या व्यापाऱ्यानें. त्याच्या घरीं पोंचतीं केलीं. पण तीं अगदीं बेचव व सडलेलीं पाहून त्याला मोठा राग आला, आणि पुनः त्याच्या दुकानांत कसलाही माल खरेदी करावयाचा नाहीं असा त्यानें निश्चय केला. पुढें तीनचार दिवसांनीं त्याला आणखी फळें हवीं झालीं, आणि तो पुनः बाजारांत गेला. तेव्हां तो लबाड काची त्याला हाका मारून सांगूं लागला कीं, " आज माझ्याकडे त्या दिवसाच्याहून चांगला माल आला आहे." गृहस्थ ह्मणालाः " तूं मला आतां कितीही गोष्टी सांगितल्या तरी मी तुझ्या शब्दावर कधींही विश्वास ठेवणार नाहीं. तो दुसरा काची भला मनुष्य आहे. त्यानें मला फसविलें नाहीं. आपल्या मालाचें त्यानें मला खरें स्वरूप सांगितलें. यास्तव मी इतःपर त्याच्याकडेच सौदा करीन, तुझ्या दुकानीं कधींही येणार नाहीं."

## हुशार कुत्रा.

एका शेतकऱ्याचा एक हुशार कुत्रा होता. त्याला बरेच शब्द समजत. एके दिवशीं त्याचा धनी आपल्या एका मित्राबरोबर शेगडी-पाशीं बोलत बसला असतां, त्या कुत्र्याच्या हुशारीसंबंधानें गोष्टी निघाल्या. मग, आपला कुत्रा किती हुशार आहे, हें त्या मित्राला प्रत्यक्ष दाखविण्यासाठीं तो बोलतांबोलतां मध्येंच ह्मणालाः "बटाट्यांच्या वाफ्यांत गाय शिरली आहे." त्याचा तो कुत्रा जवळच शेगडीपाशीं डोळे झांकून उबेसाठीं पडला होता. धन्याचे हे शब्द त्याच्या कानीं पडतांच तो चटकन उठून, बारीवाटे उडी टाकून, जवळच एक उंच जागा होती तीवर चढून, तेथून बटाट्यांचे वाफे दिसत होते, त्यांकडे त्यानें पाहिलें तों तेथें गाय कांहीं दिसली नाहीं. मग गोठ्यांत ती बांधिल्या ठिकाणीं आहे, असें पाहून तो परत येऊन शेगडीपाशीं निजला. कांहीं वेळानें शेतकऱ्यानें पुनः तेच शब्द उच्चारिले. त्या-बरोबर तो पुनः उठून बाहेर गेला, आणि गाय वाफ्यांत नसून गोठ्यांत बांधिलेली आहे असें पाहून परत येऊन शेगडीपाशीं बसला. मग शेतकरी आणखी एक वेळ तेच शब्द बोलला. तेव्हां तो कुत्रा उठून किंचित् गुरगुरल्यासारखें करून व धन्याच्या तोंडाकडे पाहून पुनः जागच्या जागीं पडून राहिला. ह्यावरून त्यानें असें दर्शविलें कीं, खोटें बोलून आपणाला विनाकारण त्रास देणें बरोबर नाहीं.

## तळलेलें कोंबडें.

विलायतेंतील एका कुटुंबांतल्या एका मुलाचा वाढदिवस होता. त्या दिवशीं सगळ्या मुलांस चांगलेचांगले पदार्थ खाऊं घालण्याची तयारी चालली होती. संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं मुलांस कोंबडी

तळून घालावयास सांगितलें होतें. जेवायाचा वेळ झाला तेव्हां सगळीं मुलें मेजावर येऊन बसलीं, आणि स्वयंपाक्याला कोंबडी आणावयास सांगूं लागलीं. तो ह्मणाला: "ती तळायाला आणखी अर्धा तास लागेल. तोंपर्यंत धीर धरा." हें चाकराचें ह्मणणें ऐकून त्यांला वाईट वाटलें, आणि भूक लागली ह्मणून रडून तीं आकांत करूं लागलीं. तेव्हां स्वयंपाकी त्यांला ह्मणाला: "तुह्मी उगी बसून रहाणार नाहीं तर कोंबडी तळत आहे ती बागूलबावाला देऊन टाकीन." ह्या धाकाला न जुमानितां तीं अधिकच रडूंओरडूं लागलीं. तेव्हां त्या चाकरानें कोंबडी तळत असलेली काईल चुलीवरून उचलून दाराबाहेर नेली, आणि म्हटलें कीं, "बागुलबावा, ही घेरे तुला कोंबडी." इतक्यांत दारावरून घिरट्या घालणाऱ्या एका चोरानें ती काईल त्याच्या हातांतून हिसकावून घेऊन त्याचे आभार मानून पळ काढिला. तो चाकर त्याच्यामागें आरडाओरड करून धावला. पण तो फरारी झाला. ही गडबड ऐकून त्या मुलांची आई तेथें आली; आणि तिला सगळी हकीकत कळली, तेव्हां तिनें मुलांस ह्मटलें कीं, "तुमच्या उतावळेपणाला ही योग्य शिक्षा झाली. आतां तुह्मांला नुसती दूधभाकरी खावून निजावें लागेल." आणि त्या चाकराला ती ह्मणाली: "मुलांना अशी खोटी भीति घालूं नको, असें मीं तुला अनेक वेळां सांगितलें असतां, तूं पुन:पुन: असा प्रकार करितोस. ह्यासाठीं कोंबडीचे व कायलीचे पैसे तुझ्या पगारांतून मी कापून घेणार."

## लढाईला नालायक.

युरोपांतल्या व अमेरिकेंतल्या बहुतेक देशांत बऱ्याच लोकांस युद्धकलेचें शिक्षण ध्यावें लागतें. हें शिक्षण दोनतीन वर्षें घेतल्यावर

त्यांनीं हवा तो धंदा करावा; पण राष्ट्रावर प्रसंग आला असतां, त्यांनीं युद्धास जावयास तयार असलें पाहिजे, असा नियम आहे.

अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांत युद्ध सुरू झालें, तेव्हां अशा खासगी धंदा करणाऱ्या लोकांस लढाईवर जाण्याचा हुकूम सुटला. अशा लोकां-पैकीं ज्या कोणांची प्रकृति नादुरुस्त असेल, त्यांनीं वैद्यांचे दाखले मिळवून ह्या सक्तीच्या नियमांतून सुटावें, अशी सौलत दिली असल्या कारणानें सरकारानें ह्या कामासाठीं नेमिलेल्या वैद्यांकडे कित्येक लोक येऊन दाखले मागूं लागले. त्यांना तपासून ज्यांची प्रकृति खरोखरच बिघडली आहे असें आढळे, त्यांस ते दाखले देत. अशी त्यांची तपासणी चालली असतां, एक शेतकरी त्यांच्याकडे येऊन असा बहाणा करूं लागला कीं, "मला थंडीवाऱ्यांतून शेतांत खपावें लागत असल्यामुळें माझें सगळें अंग अगदीं ताठून गेलें आहे. मला माझे हातपाय नीट चाळवितां येत नाहींत. माझा हा उजवा हात तर इतका ताठून गेला आहे कीं, तो मला नीट वर करितां येत नाहीं." तें ऐकून एक वैद्य ह्मणाला: "खरेंच बुवा, तुह्मी बरेच आजारी दिसतां. तुमची प्रकृति बरी असे, तेव्हां हा तुमचा हात तुह्मांला किती उंच उचलितां येत असे बरें?" हा प्रश्न ऐकून व त्यांतली खुबी न समजून त्या शेतकऱ्यानें आपला हात बराच उंच करून ह्मटलें: "हा पाहा, एवढा उचलितां येत असे." तेव्हां अर्थात् त्याची लबाडी उघडकीस येऊन त्याला दाखला मिळाला नाहीं; आणि त्यास लढाईवर जावें लागलें.

## लबाड मुलगा.

एका शेतकऱ्याचा एक तरुण मुलगा होता, तो फार आळशी होता. त्यानें एकदां कांहीं फळें घरीं आणून एके ठिकाणीं ठेविलीं. तीं

तो पुनः येऊन पाहूं लागला, तों तीं त्याला तेथें सांपडतना. ह्मणून तो घरांतल्या माणसांला त्यांविषयीं विचारूं लागला. इतक्यांत त्याचा बाप व आई हीं गाडींत बसून शेजारच्या गांवीं कांहीं कामासाठीं जात होतीं, त्यांच्याकडे धावत येऊन तो त्यांस आपल्या फळांविषयीं विचारूं लागला. बाप ह्मणाला: "इकडे पाहा, तुझीं तीं फळें राहूं द्या एकीकडे. मी परत येईंपर्यंत शेतांतली ती जमीन नांगरून ये, आणि मांगरांत गहूं वाळत ठेविले आहेत, ते चांगले परत. ऐकिलेंस ना? तुझीं फळें तुला परत मिळतील. त्यांविषयीं काळजी करूं नको."

संध्याकाळीं बाप परत आला तेव्हां त्यानें त्याला विचारिलें, "काय रे, शेत नांगरिलेंस काय? त्यानें 'होय' ह्मणून उत्तर दिलें. "बरें, गहूं परतलेस काय?" असा बापानें दुसरा प्रश्न केला. त्यालाही त्यानें 'होय' असें उत्तर दिलें. मग बापानें विचारिलें: "आणि तुझीं फळें सांपडलीं काय?" तो प्रश्न ऐकून तो रडकुंडीस येऊन ह्मणाला: "नाहीं, बाबा, तीं मीं सगळ्या घरभर शोधिलीं. पण मला तीं मिळालीं नाहींत." हें उत्तर ऐकून बाप रागानें अगदीं लाल होऊन ह्मणाला: "अरे लुच्चा पोरा, तूं माझें सांगितलेलें काम कितपत ऐकितोस तें पाहण्यासाठीं मीं तुझीं तीं फळें त्या गव्हांच्या राशींत निरनिराळ्या ठिकाणीं पुरून ठेविलीं होतीं. तूं तें धान्य परतलें असतेंस, तर तुला तीं त्यांत खचीत सांपडलीं असतीं. ह्या तुझ्या वागणुकीवरून माझी आतां खात्री झाली आहे कीं, तूं मोठा लबाड व आळशी आहेस." हे शब्द ऐकून तो मुलगा अतिशयित लज्जित व खिन्न झाला, आणि खालीं मान घालून ह्मणाला: "बाबा, मी अपराधी आहें. मला एक वेळ क्षमा करा. मी पुनः अशी लबाडी करणार नाहीं व तुह्मी सांगाल तें काम झटून करीन."

## हें शिंगरूं आमचें नव्हे.

एका श्रीमंत गृहस्थाचें गांवढ्यांत एक मोठें शेत होतें, त्यावर त्यानें कांहीं माणसें ठेवून दिलीं होतीं; आणि तो मधूनमधून तेथें जाऊन त्यांच्या कामावर स्वतः देखरेख करीत असे. एके दिवशीं तो आपल्या शेतवाडीवर जाऊन पाहूं लागला, तों गव्हांच्या एका नामी शेतांत शिंगरूं बिनधोक चरत आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तें त्या शेतांत तडातड उड्या मारून व मागल्या दुगाण्या झाडून शेताची खराबी करीत होतें. तें पाहून तो एका चाकराला हाक मारून ह्मणालाः "हें शिंगरूं शेतांत शिरून त्याची नासाडी करीत आहे, ती तुह्मांला दिसत आहे कीं नाहीं ? ह्या शिंगरावर तुह्मीं मुळीं नजर ठेवीतच नाहीं काय ? त्याला हवें तिकडे फिरूं देतां ना ?" हें ऐकून त्या चाकराची अगदीं बोबडी वळली. त्याला काय सांगावें, तें त्यास सुचेना. पण कांहीं तरी लबाडी सांगून धन्याचा राग निववावा, असें मनांत आणून तो ह्मणालाः "धनीसाहेब, हें त्या चक्कीवाल्याचें शिंगरूं आहे. त्याला मी आतांच हाकून देतों, व चक्कीवाल्यास आपल्या जनांवरांला संभाळण्याविषयीं ताकीद देतों."

संध्याकाळच्या वेळीं हा गृहस्थ सहल करावयास निघाला असतां त्या चक्कीवाल्याच्या घरावरून गेला, आणि त्याला हाक मारून दरडावून ह्मणालाः "तुझें शिंगरूं आमच्या शेतांत पुनः शिरलें, तर त्याला मी गोळी घालून ठार करीन, हें पक्कें समज." चक्कीवाल्यानें हसून ह्मटलें कीं, "माझें शिंगरूं मस्त होऊन कधीं तुमच्या शेतांत शिरलेंच, तर त्याला तुह्मी खुशाल ठार करा. असें तुह्मीं कां केलें ह्मणून देखील मी विचारणार नाहीं." दुसऱ्या दिवशीं पुनः तेंच शिंगरूं त्या शेतांत शिरलेलें त्यानें पाहिलें. तेव्हां त्याला असें वाटलें कीं, तो चक्कीवाला

आपली अशी नुकसानी करीत आहे. तर त्याची चांगली खोड मोडावी, असें मनांत आणून त्यानें त्या शिंगरावर बंदूक रोखून सोडिली. त्यासरशीं तें तत्काळ मरून पडलें. बंदुकीचा आवाज ऐकितांच त्याचे चाकर तेथें धावत आले, आणि शिंगराची ती दशा पाहून ओरडून ह्मणाले: ‘ धनीसाहेब, हें तुमचेंच शिंगरूं. हें तुह्मीं कां ठार मारिलें !” ही त्यांची ओरड ऐकून त्याला फार वाईट वाटलें. आपण विचार केल्या-वांचून ही कृति केली हें बरोबर नाहीं, असें मनांत येऊन तो फार खिन्न झाला. कारण तें शिंगरूं फार नामीं होतें. ही आपली नुकसानी होण्यास मुख्य कारण तो लबाड चाकर आहे, असें ह्मणून त्यानें त्याला बोलावून आणून पुष्कळ दोष दिला आणि सांगितलें कीं, “ह्या शिंगराची किंमत तुझ्या पगारांतून कापून घ्यावयाची. ती भरून येईपर्यंत तुला पुरें वेतन मिळणार नाहीं. ”

## लबाडीचा सौदा.

एक मुलगा आपल्या सोबत्यास ह्मणाला: “ मित्रा, चल, आपण बाजारांत जाऊं. ” सोबती ह्मणाला: “ बाजारांत जाऊन तूं काय घेणार ?” मुलगा ह्मणाला: “ माझ्याजवळ दोन आणे आहेत, त्यांची मी मिठाई घेणार. ” सोबत्यानें विचारिलें: “ तुझ्याकडे एवढे पैसे कोठून आले रे ?” तो ह्मणाला: “माझा पतंग मी त्या सोनाराच्या मुलास दोन आण्यांस विकिला.” सोबती ह्मणाला: “ अरे, तूं तो दोन पैशांला घेऊन वापरलास आणि त्याला दोन आण्यांला विकिलास! त्यानें तो एवढे पैसे देऊन घेतला तरी कसा ?” तो ह्मणाला: “त्याला पतंगांच्या किंमती माहीत नाहींत. मीं त्याला ह्मटलें कीं, ‘ मीं हा पतंग चार आण्यांस घेतला आहे. तो मीं वापरला ह्मणून तुला दोन आण्यांस देतों. ’ तो सौदा फायद्याचा वाटून त्यानें तो मोठ्या खुशीनें दोन

आणे देऊन घेतला." सोबती ह्मणालाः "तर मग त्याला तूं भलतेंच सांगून फसविलें, आणि तेंही केवळ सहा पैशांच्या लाभासाठीं! ह्यावरून तूं मोठा लबाड आहेस असें सिद्ध होतें. ह्मणून मी आजपासून तुझी संगत धरणार नाहीं. लबाडाशीं संगत करून लबाड बनण्याची भीति असते. तुझीमाझी मैत्री आजपासून तुटली, हें खास समज. मी त्या सोनाराच्या मुलाकडे जाऊन तूं त्याला फसविलें ह्मणून सांगतों. मग तोही तुजवर पुनः कधीं विश्वास ठेवणार नाहीं." हें त्याचें धमकीचें बोलणें ऐकून तो मुलगा भारीं ओशाळला आणि ह्मणालाः "मित्रा, मला ह्याबद्दल क्षमा कर. मी अशी लबाडी पुनः कधींही करणार नाहीं. मी त्या सोनाराच्या मुलाकडे स्वतः जाऊन माझी लबाडी कबूल करितों आणि त्याचे पैसे त्याला परत देतों. मग तर झालें ना?" सोबती म्हणालाः "तर मग आतांच्याआतां जाऊन त्याची क्षमा माग व त्याचे पैसे त्याला परत कर. असें तूं करीस तोंपर्यंत मी तुला आपला मित्र ह्मणणार नाहीं. लोक लबाडावर कधीं विश्वास ठेवीत नाहींत. एकदां दोनदां फार तर लबाडी करून थोडासा फायदा झाला तर होतो. पण लबाडी एक वेळ उघडकीस आली ह्मणजे मग लबाड मनुष्यावर पुनः कोणीही विश्वास ठेवीत नाहींत."

## लबाड मुलगी.

विलायतेंत एका चांभाराची एक मुलगी होती. ती मोठी उद्योगी व हुशार होती. ती आपल्या बापाला त्याच्या कामांत चांगली मदत करी. ह्या मुलीच्या मनांत असें आलें कीं, आपल्यासाठीं चांगले उंची कपडे करावे. ह्यासाठीं तिनें रेशमी कापड विकत घेतलें. तें तिनें वाराला सहा शिलिंग ह्या दरानें विकत घेतलें; पण एवढ्या मोठ्या किंमतीचें कापड घ्यावयास आपला बाप पैसे देणार नाहीं, असें वाटून

तिनें त्याला असें सांगितलें कीं, "हें कापड मी वाराला तीन शिलिंग ह्या दरानें घेतलें आहे; तर मला एवढे पैसे द्या." तिचा फारच आग्रह पाहून तिचें कोड पुरविण्यासाठीं तिला तें कापड घेण्यापुरते पैसे त्यानें दिले. ते घेऊन त्यांत तिनें आपल्याजवळ जमलेल्या पैशांची भर घातली. मग तें बेतण्याकरितां शिंप्याला बोलावायाला ती गेली. ती घरांत नसतां एक चामड्याचा व्यापारी त्या चांभाराकडे आला आणि तें रेशमी कापड पाहून ह्मणाला: "हें कापड छानदार आहे बुवा! हें तूं कसें घेतलें?" चांभारानें उत्तर केलें: "तें फार महाग पडलें. तें माझ्या मुलीनें तीन शिलिंगांला वार ह्याप्रमाणें घेतलें आहे." तो व्यापारी ह्मणाला: "एवढ्या किंमतीला हें फारच स्वस्त आहे. मला हें द्याल तर मी वाराला चार शिलिंग द्यायाला तयार आहें." हा सौदा फायद्याचा आहे असें वाटून त्या चांभारानें तें सगळें कापड त्या व्यापाऱ्याला देऊन टाकिलें. मुलगी परत आली तेव्हां तिला तो ह्मणाला: "मुली, तुझें कापड चार शिलिंगांप्रमाणें विकून दर वाराच्या मागें एक शिलिंग फायदा मिळविला आहे. तर हे पैसे घेऊन तूं पूर्वीच्याहून उंची कापड विकत घे." बापाच्या तोंडचे हे शब्द ऐकून ती अगदीं भांबावून फिक्की पडली; आणि तिला रडें कोसळून ती मोठ्यानें ओरडली: "अरेरे! केवढें नुकसान हें!" ती अशी कष्टी होण्याचें कारण तिच्या बापाला कळलें, तेव्हां तो ह्मणाला: "वेडे पोरी, तूं मजकडे लबाडी केली त्याचा हा परिणाम. मला रेशमी कापडाची किंमत कळत नाहीं ह्मणून भलतेंच कांहींतरी सांगून तूं मला फसविलें, आणि काटकसर करून सांचविलेले आपले पैसे असे विनाकारण घालविले. ही तुला चांगली शिक्षा झाली. तूं मला असें फसविलें ह्मणून तुला आतां ह्या पैशांतला एक छदामही मी देणार नाहीं."

## भ्याड मुलगा.

एका मुलास त्याच्या बापानें एक शिलिंग दिला. त्याची त्यानें एक तकलादी तरवार आणि शिपाई घालतात तसला टिनाचा टोप अशीं विकत घेतलीं. मग टोप डोकीला चढवून व तरवार कंबरेला लटकावून तो शिपाई बनला; आणि आपले सोबती जमा करून त्यांची एक पलटण त्यानें तयार केली. पलटणींतल्या ह्या शिपायांच्या हातांत बंदुकांच्या ऐवजीं त्यानें काठ्या दिल्या; आणि आपण त्यांचा सेनापति बनला. ह्या पलटणीची कवायत तो आपल्या घराच्या अंगणांत करूं लागला. कवायत करितांकरितां तो त्यांस म्हणाला कीं, "आमचें घर हा किल्ला आहे असें समजूं या आणि त्याच्यावर हल्ला करूं या." असें सांगून त्यानें त्यांस एकदम किल्ल्यावर चालून जाण्याचा हुकूम फर्माविला, आणि आपण सगळ्यांच्यापुढें आपली तरवार मोठ्या डौलानें परजीत चालला. जातांजातां तो अगदीं घराजवळ गेला, आणि त्याच्या हातांतली तरवार बारीच्या तावदानावर आपटली. तेव्हां मोठा आवाज होऊन तें तावदान फुटलें. तें बळकट बसविलें असून धक्का मोठ्या जोराचा बसला नाहीं, ह्मणून तें फुटून त्याचे तुकडे खालीं पडले नाहींत. त्याला मोठा चीर मात्र गेला. अशी मोठी आगळीक झालेली पाहून ते सगळे मुलगे जागच्या जागीं थबकून राहिले; आणि त्यांतला एक जण त्या छोट्या सेनापतीला ह्मणाला: "आतां तूं काय करिशील?" तो ह्मणाला: "त्याची कांहीं मी परवा करीत नाहीं. तावदान माझ्या हातून फुटलें असें बाबाला कांहीं कळावयाचें नाहीं. मला त्यानें विचारिलेंच तर मी ह्मणेन कीं, त्याला बरेच दिवस चीर पडला आहे. असें सांगितलें ह्मणजे अर्थात् चाकराच्या हलगरजीपणामुळें ही काच फुटली असावी असें त्याला वाटेल." ह्याप्रमाणें आपल्या सोबत्यांचें

समाधान करून तो लबाड मुलगा पुनः आपला खेळ खेळूं लागला. पण त्यांच्या त्या खेळाला पूर्वीच्यासारखा रंग येईना. शिवाय, आपला हा सेनापति लुच्चा आहे, असें त्या मुलांच्या लक्षांत येऊन त्याच्याविषयीं त्यांचें मनही कलुषित झालें.

ह्या वेळीं त्या मुलाचा बाप घरांत होता. आपल्या मुलाचें तें बोलणें ऐकून तो फार कष्टी झाला, आणि त्याला चांगली शिक्षा करून वाटेवर आणावें ह्मणून तो दार उघडून बाहेर येऊन त्याला हाका मारूं लागला. बापाची हाक ऐकितांच त्याची ती सेनापतीपणाची ऐट तत्काळ जिरून तो त्याच्याकडे आला. बापानें विचारिलें "हें तावदान कोणीं रे फोडिलें?" मुलगा ह्मणाला: "तें आज बरेच दिवस फुटलेलें आहे! तें चाकरानें फोडिलें असावें." हें उत्तर ऐकून तो फार संतापला आणि ह्मणाला: "लुच्च्या पोरा, तूं अपराध करून तो दुसऱ्यावर लादूं पहातोस काय? चल इकडे ये, आणि ती तुझी तरवार आणि टोप मजकडे दे. तुझ्या ह्या लबाडीबद्दल तीं तुजकडून घेऊन मी दुसऱ्या कोणा तरी चांगल्या मुलास देणार. तीं वापरण्यास तुझ्यासारखा भ्याड मुलगा मुळीं लायक नाहीं. तुझ्या ह्या सोबत्यांदेखत तुझी अशी फजिती झाली आहे, एवढीच शिक्षा तुला तूर्त बस आहे. पुनः कधीं खोटें बोलशील तर तुला याहून कडक शिक्षा मी करीन."

## उत्कृष्ट निवाडा.

दोघे वृद्ध गृहस्थ एका न्यायाधीशाकडे न्याय मिळावा ह्मणून गेले. त्यांतला एक जण न्यायाधीशाला ह्मणाला: "महाराज, ह्या गृहस्थानें कांहीं दिवसांपूर्वीं मजकडून दहा रुपये उसने घेतले. ते मीं याजकडे बरेच दिवस मागितले नाहींत. हल्लीं मी याजकडे ते मागूं लागलों,

तेव्हां हा म्हणतो कीं, ‘ तुझें मी कांहीं लागत नाहीं. तुझ्याकडून एवढी रकम मीं कधीं घेतलीच असेल तर ती मीं तुला परत दिली असेल.’ ह्याच्याशीं माझा हा व्यवहार झाल्याची साक्ष द्यायाला कोणी नाहीं. तर आतां याला शपथ घालून, हा माझें कांहीं देणें लागतो कीं काय, तें विचारा. हा शपथेवर नाहीं ह्मणेल, तर मग मी याला ती सोडून देईन. ” न्यायाधीशानें त्या दुसऱ्या ह्मातार्‍याला, हा सांगतो तें खरें आहे काय, ह्मणून विचारिलें. तेव्हां तो ह्मणालाः “महाराज, यानें मला पैसे उसने दिले होते, ही गोष्ट खरी आहे; आणि मीं याचे पैसे परत केले, हें मीं शपथेवर सांगावें, अशी याची इच्छा आहे. तरी महाराज, आपल्या हातांतलें वेत्र खालीं करा, ह्मणजे मी त्याजवर आपले हात ठेवून शपथ वाहतों.” असें ह्मणून, त्याच्या हातांत एक काठी होती, ती त्यानें त्या पैसे मागणाऱ्या ह्मातार्‍याला अमळ हातांत धर ह्मणून सांगितलें. मग त्यानें न्यायदंडावर हात ठेवून अशी शपथ वाहिली कीं, ह्या गृहस्थानें मला पैसे दिले होते खरे, पण मीं ते त्याच्या हातीं दिले असें मी प्रतिज्ञेवर सांगतों.”

अशी शपथ त्यानें वाहिली, तेव्हां न्यायाधीशानें त्या पैसे मागणाऱ्या ह्मातार्‍याला पुसलें: “ आतां तुझें काय ह्मणणें आहे ?” तो ह्मणालाः “माझें एवढ्यानें समाधान झालें आहे. हा अब्रूदार गृहस्थ असून दहा रुपयांसाठीं अशी खोटी शपथ घेणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. त्यानें ते पैसे परत केल्याची मला कदाचित् आठवण नसेल.” असें बोलून त्यानें ती काठी त्या ऋणकोच्या हातांत परत दिली. ती घेऊन तो मोठ्या हर्षानें न्यायकचेरींतून त्वरित निघून गेला. त्याची ती तऱ्हा पाहून न्यायाधीशाला वहीम आला, आणि त्यानें त्या ऋण-कोला परत बोलावून आणून त्याची काठी सहज पाहावयास

ह्मणून मागितली. ती त्यानें बिनदिक्कत त्याच्या हातीं दिली. न्यायाधीशानें ती काठी घेऊन त्या धनकोच्या हातीं देऊन ह्मटलें: "जा आतां. तुझी रकम तुला पोंचली आहे." तो ह्मणाला: "कशी बरें? ह्या काठीची किंमत कांहीं तेवढी नाहीं." न्यायाधीश ह्मणाला "ही काठी मोडिलीस तर तींत तुला तुझे पैसे सांपडतील." असें बोलून त्यानें न्यायकचेरींतल्या एका कामदाराला ती काठी आपल्या देखत मोडायास सांगितली. ह्या हुकमाप्रमाणें त्यानें ती मोडिली, तेव्हां तिच्या पोकळींतून रुपये खालीं पडले. ते बरोबर दहा होते! ते त्यानें त्या धनकोच्या स्वाधीन करून त्या लबाड म्हाताऱ्याला चांगली शिक्षा केली.

## लबाडीचा वाईट परिणाम.

विलायतेंत मेन्डाक्युलस नांवाचा एक गृहस्थ होता. लहान वयांत त्याला खोटें बोलण्याची वाईट खोड लागली होती. त्यामुळें त्याजवर कोणी विश्वास ठेवीत नसे. एके दिवशीं तो आपल्या बागेंत गेला असतां, तेथें शेजारच्या कुरणांतलीं गुरें कुंपण मोडून त्याच्या बागेंत शिरलीं आहेत, आणि भाजीपाल्याचे ताफे खाऊन व तुडवून टाकीत आहेत, असें त्यानें पाहिलें. त्यांनां हाकायाला जावें, तर तीं फुलझाडांच्या ताफ्यांत शिरणार, असें पाहून त्यांला दुसरीकडून आडविण्यास कोणाची तरी मदत हवी असें त्याच्या ध्यानांत आलें, आणि तो माळ्याला बोलावण्यास धावला. पण माळी ती त्याची निवळ लबाडी समजून त्याच्याबरोबर लागलींच गेला नाहीं. त्यामुळें बागेची फारच खराबी झाली.

दुसऱ्या एका प्रसंगीं तो आपल्या बापाबरोबर घोड्यावर बसून दूरच्या एका गांवीं चालला असतां, त्याचा बाप घोड्यावरून खालीं

पडून फारच दुखावला. तेव्हां त्याला कोणातरी जाणत्या माणसाची मदत पाहिजे ह्मणून त्यानें जवळच्या गांवांत घोडा पिटला; आणि जो जो वाटेंत भेटला त्याला आपल्या बापास घडलेल्या अपघाताविषयीं सांगून मदत करण्यासाठीं तो बोलावूं लागला. पण, तो मोठा लबाड पोर आहे, असें त्यांस मांहीत असल्यामुळें त्याच्याबरोबर जावयास कोणीही कबूल होईना. शेवटीं तो निराश व खिन्न होऊन बाप पडला होता त्या ठिकाणीं रडत आला. पण त्याच्या पश्चात् त्या वाटेनें एक डांकेची गाडी आली, तींत त्याच्या बापाला घालून नेलें असल्यामुळें तो त्याला तेथें दिसला नाहीं. ह्यामुळें तो पराकाष्ठेचा घाबरून आपल्या घरीं रडतओरडत गेला.

ह्याच्या खोटें बोलण्याच्या सवईचा आणखी एक परिणाम सांगतात. तो असा. ह्याच्या शाळेंतल्या एका मुलाचा यानें कांहीं अपराध केला होता. त्याचा सूड उगविण्याचा निश्चय करून तो मुलगा ह्याला जेव्हां तेव्हां वाटेंत गांठून सपाटून ठोक देई व त्याच्याजवळ कांहीं असेल नसेल तें लुबाडून घेई. ह्याबद्दल शिक्षकाकडे त्यानें अनेक वेळां कागाळी केली. पण ती त्याला सारी लबाडी वाटे. मग तो ही गोष्ट आपल्या बापाला सांगूं लागला. त्यालाही ती पहिल्यानें खरी वाटली नाहीं. पण तो अशी कागाळी पुनःपुनः करूं लागला, तेव्हां त्याच्या बापानें ही गोष्ट त्या सूड उगविणाऱ्या मुलाच्या बापाच्या कानावर घातली, तेव्हां तो ह्मणालाः " तुमचा मुलगा अट्टल सोदा आहे. त्याचें तुम्ही खरें मानूं नका." ह्याप्रमाणें त्या मुलाचा कांहींएक बंदोबस्त होईना. ह्मणून ह्या लबाड मुलास त्याचा मार खाऊन निमूट रहावें लागे. त्याचा यथास्थित सूड उगविल्यावर तो खुनसी मुलगा त्याच्या वाटेस जाईनासा झाला. पण ह्यामुळें मेन्डाक्युलस ह्याच्या वर्त-

नांत उत्तम फरक पडला. लबाडीचे परिणाम कसे भयंकर होतात, हें आतां त्याच्या लक्ष्यांत चांगलें आलें; आणि त्यानें खोटें कदापि बोलावयाचें नाहीं असा निश्चय केला. तेव्हांपासून तो फार जपून बोलूंचालूं लागला.



# भाग तिसरा.

## न्यायीपणा.

### एका लोकनियंत्याचा निःपक्षपातीपणा.

प्राचीन काळीं लोक्रिअन नांवाचे लोक होते. त्यांचा झाल्युकस नामेंकरून एक लोकनियंता होता. लोकनियंता ह्मणजे कायदेकानू करून लोकांच्या परस्परवर्तनास आळा घालणारा होय. ह्या लोकनियंत्यानें असा एक नियम केला कीं, कोणीं व्यभिचार केला असतां, त्याचे दोन्ही डोळे फोडावे. हा नियम केल्यावर हा गुन्हा प्रथमच त्याच्या मुलानें केला. तेव्हां त्याला मोठें संकट पडलें. कारण ह्या मुलावर त्याचें पराकाष्ठेचें प्रेम होतें. परंतु गुन्ह्याबद्दल कायद्याप्रमाणें शिक्षा अमलांत आणिली नाहीं तर लोक आपणास पक्षपाती समजून आपणावर रुष्ट होतील, ते न व्हावे ह्मणून त्यानें आपल्या मुलाचा एक डोळा फोडिला आणि एक आपला फोडिला!

### डायओक्लिज.

ह्या नांवाचा एक लोकनियंता ग्रीस देशांत होऊन गेला. त्यानें असा नियम केला होता कीं, महाजनसभेंत येतांना कोणींही आपलीं शस्त्रें घेऊन येऊं नये; कोणी आला असतां त्याला देहांतशासन होईल. एके दिवशीं डायओक्लिज स्वतः तरवार कंबरेस लटकावून सभेंत आला. हा नियमभंग त्याच्या हातून केवळ अवचित विसरतेपणीं घडला. तो असा आंत आलेला पाहून एक सभासद ह्मणालाः

" ह्यानें केलेला नियम ह्यानेंच स्वतः कसा मोडिला पाहा ! " हे उद्गार ऐकून डायओक्लिज ह्मणालाः " नाहीं, कायदा मोडिल्याचें प्रायश्चित्त मलाही चुकणार नाहीं. " असें ह्मणून कंबरेच्या तरवारीनें त्यानें तेथल्यातेथें स्वतांला छाटून घेतलें !

## क्यांबिसेस राजाची न्यायप्रीति.

क्यांबिसेस नामेंकरून एक इराणदेशाचा राजा होता. तो आपल्या प्रजेला न्याय मिळावा ह्मणून सर्वदा झटत असे. त्याच्या कृपेंतला एक मनुष्य होता, तो मोठा हुशार असल्याकारणानें त्याला त्यानें न्यायाधीशाचा हुद्दा दिला. हा हुद्दा मिळाला तेव्हां तो राजकृपेंतला माणूस फारच चढून गेला, आणि त्याचा द्रव्यलोभ अनावर झाला. त्याच्यापुढें कोणताही खटला आला असतां, जो कोणी पक्षकार त्याला मोठा लांच देई, त्याच्यासारखा निकाल तो देई. अशा रीतीनें त्यानें पुष्कळ द्रव्य मिळविलें. त्याच्या अशा अन्यायाच्या वर्तनामुळें सगळे लोक त्याचा द्वेष करूं लागले, आणि त्याच्या दुष्कर्माच्या कागाळ्या राजाच्या कानांवर चोहोंकडून येऊं लागल्या. त्या मनुष्याला असा पक्का भरंवसा होता कीं, राजाची आपणावर कृपा असल्याकारणानें त्याची सहसा इतराजी व्हावयाची नाहीं. परंतु हा त्याचा भ्रम होता. राजाला त्याचा मनस्वी राग येऊन त्याला त्यानें त्या कामावरून दूर केलें, आणि त्याची धिंड काढून त्याला जाळून मारिलें.

## प्रामाणिक न्यायाधीश.

पूर्वकाळीं विलायतेंत अशी चाल होती कीं, न्यायाधीशांनीं निरनिराळ्या प्रांतांत हिंडून तेथल्या लोकांच्या कांहीं फिर्यादी व तक्रारी असतील त्या ऐकाव्या, आणि साक्षीपुरावा पाहून न्याय द्यावा. अशा फिरत्या न्यायाधीशांपैकीं हेलनामा एक न्यायाधीश एका प्रांतांत गेला

असतां, तेथल्या एका गृहस्थानें त्याला एक चांगला हरिण नजर पाठविला. पुढें त्याच्यापुढें एक खटला आला असतां, त्यांतला एक पक्षकार तो हरिण पाठविणारा गृहस्थ आहे असें पाहून तो ह्मणालाः "ह्या खटल्याची चौकशी करण्यापूर्वीं मला तुझ्या हरिणाचे पैसे दिले पाहिजेत. ते दिल्यावांचून मी हा खटला ऐकणार नाहीं." असें बोलून तो त्याला त्याबद्दल पैसे देऊं लागला. तेव्हां तो गृहस्थ ह्मणालाः "माझ्या तर्फेचा खटला व्हावा ह्मणून कांहीं मीं तुह्मांस हरिण दिला नाहीं. ह्या प्रांतांत कोणीही सरकारी कामदार आला, तरी मी त्याला असाच कांहीं ना कांहीं नजराणा देत असतों." न्यायाधीशाबरोबर बसलेल्या पंचांनींही त्या गृहस्थाची अशी चाल असल्याचें सांगितलें. तरी तो न्यायाधीश त्या हरिणाचे पैसे त्याच्या हातावर ठेवीपर्यंत त्या खटल्याच्या चौकशीला आरंभ करीना.

## तूं राजपदाला लायक नाहींस.

मासिडोनदेशाचा डेमिट्रिअस नामेंकरून एक राजा होता. तो मोठा पराक्रमी होता. पण लढाया आणि मोहिमा यांवांचून दुसऱ्या कशांतही त्याचें मन रमत नसे. प्रजेला योग्य न्याय द्यावा, आणि त्यांच्यांत शांति व सौख्य नांदेल असें करावें, हें त्याच्या गांवींही नसे. त्याच्याकडे कोणी अर्ज करून दाद मागितली असतां, तो त्यांचे अर्ज फेकून देई. ह्यामुळें त्याच्या राज्यांत मोठी अंदाधुंद माजून राहिली. एके दिवशीं एक वृद्ध बाई ह्या राजापाशीं येऊन आपलें गाऱ्हाणें तोंडीं सांगूं लागली. तेव्हां तो ह्मणालाः "मला तुझें गाऱ्हाणें ऐकायाला वेळ नाहीं. तूं येथून चालती हो." ती ह्मातारी संतापून मोठ्यानें ओरडलीः "तर मग तूं राजपदाला बिलकूल लायक नाहींस." हे तिचे शब्द त्या राजाच्या जिव्हारीं लागले. मग तो राजवाड्यांत आल्यावर बाकीचीं

सगळीं कामें एकीकडे ठेवून कोणाचे कांहीं अर्ज आहेत काय, ह्मणून विचारूं लागला. त्यावरून त्याच्या कारभाऱ्यांनीं त्याच्यापुढें अनेक अर्ज मांडिले. पहिल्यानें त्या ह्मातारीचा अर्ज त्यानें ऐकिला, आणि ज्या मनुष्यानें तिचा अन्याय केला होता, त्याला त्यानें शिक्षा केली. असेच दुसरेही अर्ज ऐकून त्यानें त्यांचा योग्य निकाल लाविला; आणि ह्यापुढें तो लोकांचीं गाऱ्हाणीं लक्षपूर्वक ऐकून त्यांस योग्य न्याय देण्यास सर्व काळ झटूं लागला.

## सर टॉमस मोर.

हा एक विलायतेंत अतिविख्यात न्यायाधीश होऊन गेला. ह्याच्या निःपक्षपातीपणाची एक गोष्ट सांगतात, ती अशीः एकदां एका गरीब बाईचा एक नामी कुत्रा नाहींसा झाला. चौकशी करितां, तो न्यायाधीशाच्या बायकोजवळ आहे असें तिला कळलें. ह्या बाईला तो कोणीं गृहस्थानें नजर केला होता.ती गरीब बाई आपली दाद लागावी, ह्मणून न्यायाधीशापाशीं गेली. तिची तक्रार ऐकून घेऊन सर टॉमस यानें आपल्या बायकोला कुत्रा घेऊन न्यायकचेरींत बोलाविलें. मग कुत्रा आपल्याजवळ ठेवून आपल्या बायकोला दिवाणखान्याच्या एका टोंकाला उभें केलें, आणि त्या गरीब बाईला दुसऱ्या टोंकाला उभें केलें. अशा त्या उभ्या राहिल्यावर त्या दोघींलाही कुत्र्याला आपल्याकडे बोलावावयास सांगितलें. त्यांनीं तसें केलें तों तो कुत्रा त्या गरीब बाईकडे धावत गेला. तेव्हां तो तिचा खरा असें ठरून त्यानें तो तिच्या स्वाधीन केला. हा असा चोख न्याय पाहून त्याच्या बायकोला कांहींएक बोलतां येईना. पण असा उत्तम कुत्रा आपल्या हातचा गेला याचा तिला मनस्वी खेद झाला. तेव्हां तिच्या संतोषासाठीं त्या बाईला तो कुत्रा विकत देतेस काय ह्मणून त्यानें विचारिलें. ती बाई फार गरीब असल्या-

मुळें तो विकावयास ती सिद्ध झाली. मग त्याबद्दल तिला बरेच पैसे देऊन तो त्यानें विकत घेऊन आपल्या बायकोचें कोड पुरविलें.

## मातीचें पोतें.

एक गरीब विधवा होती, तिचें एक लहानसें शेत होतें. त्यावर ती आपला निर्वाह करीत असे. ह्या बाईच्या शेजारीं एक श्रीमंत गृहस्थ रहात असे. त्याचा बाग ह्या बाईच्या शेताला लागून होता. ह्या श्रीमंताला आपला बाग वाढविण्याची इच्छा झाली, आणि त्यानें त्या बाईची जमीन जबरदस्तीनें घेऊन तीवर बाग केला. बाई गरीब असल्यामुळें तिला न्यायकचेरींत त्याजवर फिर्याद मांडण्याचें सामर्थ्य नव्हतें.एके दिवशीं ती त्या श्रीमंत माणसाकडे रिकामें पोतें घेऊन आली आणि ह्मणाली: “ माझ्या वडिलांच्या ह्या जमिनींतून मला एवढें पोतें भरून माती नेऊं द्या.” ती तिची वेडेपणाची विनंति त्यानें मान्य केली. मग तिनें त्या पोत्यांत माती गच्च भरून त्याला पुनः विनंति केली कीं, “एवढें ओझें मला उचलायास लागा.” ती तिची विनंति तो ऐकेना. पण तिनें अतिशयीत आग्रह केल्यामुळें शेवटीं तो तिला तें ओझें उचलायास लागला. तेव्हां तें फारच जड असल्यामुळें त्यांना तें मुळीं हालेना. हें पाहून तो ह्मणाला: “हें फार जड आहे. यांतली थोडी माती कमी कर, ह्मणजे हें हलकें होईल.” ती बाई ह्मणाली: “ह्या जमिनींतल्या मातीचें एवढें एक पोतें जर इतकें जड आहे, तर अशीं हजारो पोतीं माती ह्या जमिनींत आहे, तिचें ओझें तूं आपल्या माथीं अनंत काळ कसें वागविशील ?” हा तिचा प्रश्न ऐकून तो मनुष्य ओशाळला, आणि एवढें पातक जोडिल्याचें त्याला भय वाटून त्यानें त्या बाईची सगळी जमीन सोडून दिली.

## फिलिपराजाची न्यायप्रीति.

मासिडोनियाचा राजा फिलिप ह्याच्या एका मानकऱ्यावर कांहीं गुन्हा केल्याचा आरोप येऊन त्याची न्यायाधीशापुढें चौकशी होऊं लागली असतां, त्या आरोपीच्या कांहीं मित्रांनीं राजाकडे रदबदली करून म्हटलें कीं, "आपण न्यायाधीशाला दोन शब्द सांगाल, तर आपल्या मानकऱ्याची अब्रु राहील; नाहीं तर त्याला जगांत तोंड दाखवायाला नको असें होईल." राजा म्हणाला: "न्यायाधीशाकडे माझें वजन खर्चून त्याला अन्याय करावयास लाविल्यानें माझी नाहीं का बेअब्रू व्हावयाची ? माझ्या अब्रूला विनाकारण धक्का यावा, त्यापेक्षां तो खरा गुन्हेगार ठरल्यास त्याची बेअब्रू झाली तर त्यांत वाईट तें काय होईल ?"

दुसऱ्या एका प्रसंगीं त्याच्या दरबारच्या कांहीं गृहस्थांनीं, कोणी एक मोठा अंमलदार राजासंबंधानें वाईट बोलत असतो, ह्यासाठीं त्याला कामावरून दूर करावें, असें त्याला सांगितलें. ही कागाळी ऐकून तो म्हणाला: "माझें वर्तनच जर त्याला दोषास्पद वाटत असेल, तर त्यानें मला ठपका दिला तर त्यांत वावगें तें काय झालें ?"

पुढें हा कामदार अगदीं पेंचांत येऊन कर्जबाजारी झाला. तेव्हां त्याच्या विरुद्ध असलेल्या दरबारच्या लोकांच्या चिथावणीवरून सावकार त्याला तगादे लावूं लागले. ही अशी त्याची अवस्था पाहून राजानें त्याला द्रव्यसाहाय्य करून ऋणमुक्त केलें. हें असें त्याचें औदार्य पाहून तो स्पष्टवक्ता कामदार राजाची निंदा करीनासा झाला.

## न्यायाधीशाची निवड.

स्पेनच्या एका राजाला एक न्यायाधीश नेमावयाचा होता. यास्तव जे कोणी ह्या जागेला लायक असतील, त्यांनीं अमक्या दिवशीं राज-

वाड्यांत यावें, असें त्यानें जाहीर केलें. त्याप्रमाणें नेमिलेल्या वेळीं तीन उमेदवार तेथें आले. राजवाड्याजवळून एक नाला वाहत होता, त्यांत राजानें अर्धें नारिंग सोडिलें होतें. त्याकडे बोट करून राजानें त्या उमेदवारांपैकीं एकाला तें काय आहे म्हणून विचारिलें. तेव्हां त्यानें तें नारिंग आहे असें चटदिशीं उत्तर दिलें. तोच प्रश्न त्यानें दुसऱ्या उमेदवाराला केला. त्यानें तें अर्धें नारिंग आहे, असा जबाब दिला. मग त्यानें तिसऱ्या उमेदवाराला बोलावून आणून तोच प्रश्न केला. तेव्हां त्यानें आपल्या हातच्या काठीनें तें नाल्याच्या कडेस ओढून आणून हातीं घेतलें, आणि नीट तपासून पाहून म्हटलें कीं, "महाराज, हें अर्धें नारिंग आहे." ह्या उत्तरानें समाधान पावून त्यानें ह्या तिसऱ्या उमेदवाराची न्यायाधीशाच्या जागीं योजना केली. त्याची निवड करण्याचें कारण त्यानें असें सांगितलें कीं, "दुसऱ्या दोघां उमेदवारांनीं कांहींएक विचारपूस न करितां एकदम तें नारिंग आहे ह्मणून सांगितलें. पण ह्या उमेदवारानें आपल्या नजरेवर भरंवसा न ठेवितां तें हातीं घेऊन नीट तपासून मग तें काय आहे तें सांगितलें. न्यायाच्या कामाला असाच चौकस माणूस हवा असतो. आपला निकाल चटकन बोलून जाणाराच्या हातून पुष्कळ अन्याय होण्याचा संभव असतो."

## न्यायदेवता आपपरभाव ओळखीत नाहीं.

कायसमेरिअस नामेंकरून एक मोठा रोमन अधिकारी होता. तो सैन्य घेऊन मोहिमेवर गेला असतां, त्याच्या हाताखालीं त्याचा पुतण्या बडा लष्करी अमलदार होता. त्यानें लष्करांतल्या एका चांगल्या देखण्या शिपायाशीं मोठें बेशरमपणाचें वर्तन केल्यावरून तो शिपाई संतापला, आणि रागाच्या आवेशांत त्यानें आपला खंजीर

काढून त्या अमलदाराच्या उरांत मारिला. त्यासरशीं तो बदफैल मनुष्य प्राणास मुकला. अशा रीतीनें सेनापतीच्या पुतण्याचा खून झाल्यामुळें सगळ्या सैन्यांत खळबळ उडाली. कित्येक तोंडपुजे लोक सेनापतीला सांगूं लागले कीं, अशा बेकैद शिपायाला एकदम देहांत-शासन करावें. पण त्यांची ती मसलत त्या न्यायी सेनापतीनें मनास आणिली नाहीं. त्यानें त्या गोष्टीची योग्य चौकशी करून त्या शिपायाला दोषमुक्त ठरविलें. इतकेंच नव्हे, तर, एकाद्या वीरानें युद्धांत चांगलें शौर्य दाखविलें असतां, त्याच्या डोकीला पुष्पमुकुट घालून त्याला गौरविण्याची चाल त्या काळीं असे, तीप्रमाणें त्या सेनापतीनें आपल्या हातानें त्या शिपायाच्या मस्तकीं पुष्पमुकुट चढविला. असें करितांना तो ह्मणाला कीं, "न्यायदेवता आपापरभाव मनांत वागवीत नसते. माझा पुतण्या मोठा शूर व हुशार असून मला अतिप्रिय होता हें खरें. पण त्याच्या अनन्वित कर्माला असेंच शासन हवें होतें. तें ह्या शिपायानें ताबडतोब दिलें, हें त्यानें मोठें शौर्याचें व योग्य कृत्य केलें, असें मी समजतों."

## न्यायी बादशाहा.

दुसरा महमद नांवाचा एक तुर्क लोकांचा बादशाहा होता. त्याचा मुस्ताफा नामेंकरून एक मुलगा होता. हा शाहाजादा मोठा शूर व हुशार होता, पण मोठा बदफैल होता. त्यानें एका अमिराच्या स्त्रीवर बलात्कार केला. तेव्हां त्या अमिरानें बादशाहाकडे त्यासंबंधाची कागाळी केली. बादशाहा ह्मणाला: " माझी सगळी प्रजा माझ्या गुलामाप्रमाणें आहे. तिचा हवा तसा उपयोग करण्याचा मला अधिकार आहे. तूंही माझा गुलाम आहेस, ह्मणून तुझ्या बायकोचा वाटेल तसा उपयोग करण्याचा अधिकार मला आहे; आणि मुस्ताफा माझा मुलगा असल्या-

कारणानें त्यालाही हा अधिकार पोंचतो." असें बोलून राजानें त्या उमरावास आपल्या समोरून घालवून दिलें. पण त्याची मनोदेवता त्याला असें सांगूं लागली कीं, हा असा जुलूम आपल्या रयतेवर करणें कांहीं बरोबर नाहीं. देव अशांत राजी नाहीं. तर आपला पुत्र झाला ह्मणून त्याला अशा घोर अन्यायाबद्दल शिक्षा करूं नये, हें कांहीं रास्त नव्हे. मग त्यानें त्या बदफैल शाहाजाद्याला आपल्यासमोर बोलावून आणून त्याची त्या कर्माबद्दल पुष्कळ निर्भर्त्सना केली. पुढें याला शिक्षा काय करावी, याचा त्यानें आणखी तीन दिवस विचार करून शेवटीं असें ठरविलें कीं, त्याला त्या दुष्कर्माबद्दल देहांतशासनच योग्य आहे. असा निश्चय करून त्यानें त्या आपल्या पुत्राला ठार मारण्याचा हुकूम केला. !

## पांचशें साक्षीदार.

एका श्रीमंत मनुष्यानें एका गरीब मनुष्याचें घर बेकायदेशीर रीतीनें आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हां त्या गरीब मनुष्यानें त्याच्यावर न्यायाधीशाकडे फिर्याद केली. त्याचा पुरावा काय तो एक त्याच्या नांवाचा दस्तऐवज होता. श्रीमंत मनुष्यानें आपल्या तर्फेनें साक्ष द्यावयासाठीं अनेक माणसें उभीं करून आणखी न्यायाधीशाला पांचशें होनांची एक थैली नजर केली. न्यायाधीशापुढें खटला आला, तेव्हां त्या गरीब मनुष्यानें आपल्या नांवाचा तेवढा दस्तऐवज पुढें आणिला. त्याशिवाय आणखी साक्षीदार आणून आपल्या हक्काची शाबिदी त्याला करितां आली नाहीं. त्या श्रीमंत माणसानें आपला हक्क स्थापित करण्यासाठीं अनेक साक्षीदार न्यायासनापुढें हजर केले आणि आपल्या तर्फे निवाडा व्हावा अशी न्यायाधीशाला विनंति केली. शेवटीं न्यायाधीशानें आपल्याजवळची ती पांचशें होनांची पिशवी उचलून वर धरून ह्मटलें:-

" हे मनुष्या, तुला माझा स्वभाव अद्यापि कळला नाहीं. मी कधीं लांच घेत नसतों. ह्या गरीब मनुष्याला एकही साक्षीदार माझ्यापुढें आणितां आला नाहीं, तरी माझ्याकडे हे पाहा त्याच्या तर्फेचे पांचशें साक्षीदार आहेत. तुझा पक्ष खरा असता, तर तूं मला असा लांच देऊन वश करून घेण्याचा प्रयत्न केला नसता. ह्या तुझ्या प्रयत्नावरूनच हें स्पष्टपणें सिद्ध होत आहे कीं, तूं ह्या गरीब मनुष्याच्या हक्काची पायमल्ली केली आहे." असें बोलून त्यानें ती थैली त्या श्रीमंत मनुष्याच्या अंगावर फेकून दिली, आणि त्याची पुष्कळ निर्भर्त्सना करून त्या गरीब मनुष्याच्या तर्फे न्याय दिला.

## डेनमार्कचा राजा.

अकराव्या शतकांत इंग्लंडांतले कांहीं ख्रिस्तीधर्मप्रसारक डेनमार्कनामक देशांत जाऊन तेथें ख्रिस्तीधर्माचा प्रसार करीत होते. त्या देशाचा राजा व अर्धेअधिक लोक त्यांच्या परिश्रमानें ख्रिस्ती झाले होते; आणि झिलंडनामक बेटांत एक मोठें देवालय बांधून त्यावर उइलिअमनामक एका इंग्रज बिशपाची योजना केली होती. ह्या वेळीं स्वेन्ड नांवाचा राजा त्या देशावर राज्य करीत होता. ह्या राजानें आपल्या हाताखालच्या कित्येक कामदारांवर कांहीं गुन्ह्याचा दोषारोप करून ठार मारिलें, त्यांची चौकशी वगैरे कांहीं केली नाहीं. हा मोठा भयंकर अन्याय त्यानें केल्याचें वरील बिशपाला कळलें, तेव्हां त्याचा त्याला फार तिटकारा वाटला; आणि त्याला देवालयांत घ्यावयाचें नाहीं असें ठरविलें. राजा नित्यक्रमाप्रमाणें आपल्या लोकांसहवर्तमान देवालयाच्या दरवाज्यापाशीं आला, तेव्हां त्या बिशपानें आपल्या हातांतलें वेत्र दरवाज्याला आडवें लावून त्याला ह्मटलें कीं, "तूं घोर अन्यायाचें व क्रूर कर्म केलें आहे. तुझ्यासारखा खुनी माणूस ह्या प्रभुमंदिरांत

प्रवेश करण्यास सर्वथा लायक नाहीं." हा असा राजाला प्रतिबंध झालेला पाहून त्याच्या लोकांनीं आपल्या हातांतले परशु त्या बिशपावर उगारिले. तेव्हां त्या धीट पुरुषानें मस्तक खालीं लववून त्यांचे प्रहार घेण्याविषयीं आपली तयारी दर्शविली. पण राजानें त्यांला निवारून मुकाट्यानें आपल्या वाड्याचा रस्ता धरिला. वाड्यांत जाऊन त्यानें आपला सगळा उंची पेहराव व मुगुट उतरून ठेवून तो उघडाबोडका व अनवाणी देवालयापर्यंत चालत आला आणि दारापाशीं उभा राहिला. तेव्हां त्याचा असा अनुताप व नम्रता पाहून त्या बिशपानें धावत येऊन त्याचा हात धरिला, आणि त्याचें चुंबन करून त्याला देवालयांत नेऊन बसविलें.

## वॉट टायलर.

इंग्लंड व फ्रान्स ह्या देशांत प्राचीन काळीं एकसारख्या लढाया चालत. त्यामुळें इंग्लंडांतल्या गरीब रयतेची स्थिति अगदीं निकृष्ट झाली. लोकांना पोटभर अन्नही मिळेनासें झालें. त्यामुळें त्यांना वाटूं लागलें कीं, राजा आणि श्रीमंत लोक यांच्या अन्यायामुळें आपली अशी दशा झाली आहे. ह्मणून त्यांनीं राजाकडे जाऊन आपलें गाऱ्हाणें करावें, असा निश्चय केला; आणि त्यांचा पुढारीपणा वॅाट टायलर नांवाच्या एका धीट मनुष्यानें स्वीकारून त्यांला लंडनास आणिलें. लोक नाराज होऊन लंडनावर चालून आल्याचें वर्तमान कानीं आलें, तेव्हां त्या वेळचा दुसरा रिचर्ड राजा त्यांची गांठ घेण्याकरितां स्वतः घोड्यावर बसून गेला. त्यानें त्यांचा पुढारी वॉट टायलर यास भेटून लोकांचें ह्मणणें काय आहे ह्मणून विचारिलें. तेव्हां असा अल्पवयी राजा न डगमगतां आपलीं गाऱ्हाणीं ऐकण्यासाठीं प्रत्यक्ष आला हें पाहून त्या लोकांचा संताप बराच कमी झाला; आणि टायलरानें राजाला सांगितलें कीं,

"लोकांना न्यायानें वागवा, आणि रानांत पारध करण्याची मनाई कोणालाही न होईल अशी व्यवस्था करा." तो असा राजाशीं धीटपणानें बोलतांना पाहून राजाच्या दरबारांतील एका उमरावाला क्रोध येऊन त्यानें तरवारीचा वार करून टायलराला ठार केलें. तेव्हां आपला पुढारी पडला असें पाहून ते लोक अगदीं खवळून गेले आणि मोठ्यानें ओरडून राजाच्या लोकांवर चालून गेले. हें पाहून राजानें त्यांच्यापुढें आपला घोडा घालून ह्मटलें: "माझ्या लोकांनों, हें काय करितां? तुह्मी आपल्या राजाला मारणार काय? चला, टायलराच्या ऐवजीं मी तुमचा पुढारी होतों आणि तुह्मांला जें काय हवें तें देतों." राजाचा असा धीटपणा व प्रसंगावधान पाहून ते चकित झाले आणि त्याच्याबरोबर शहराबाहेर चालते झाले; आणि त्या दयाळू, धीट व न्यायप्रिय राजाचें आश्वासन मिळाल्यामुळें ते तेथून आपआपल्या गांवीं मुकाट्यानें गेले. तरी त्यांच्यापैकीं जे कित्येक राजाच्या माणसांच्या हातीं लागले, त्या सगळ्यांला देहांतप्रायश्चित्त मिळालें.

## चतुर न्यायाधीश.

अलेप्पो शहरांतल्या एका ख्रिस्ती व्यापाऱ्यानें रेशीम खरेदी करून, त्याचे गठ्ठे एका तुर्की लमाणवाल्याच्या उंटांवर चढवून त्याच्याबरोबर कॉन्स्टन्टिनोपल शहराकडे चालला असतां, तो मार्गांत आजारी झाला, आणि त्याला लमाणाबरोबर जातां येईना. तेव्हां तो तुर्क त्याला तेथेंच टाकून पुढें चालता झाला. कॉन्स्टंटिनोपल येथें पोंचल्यावर त्यानें त्या ख्रिस्ती व्यापाऱ्याची कांहीं दिवस वाट पाहिली. पण तो येईना, तेव्हां तो मेला असावा, अशी कल्पना करून त्यानें त्याचें तें सगळें रेशीम विकून टाकिलें आणि आपलीं उंटें विकून तो खुशाल चैन करीत

राहिला. इकडे तो व्यापारी बरा झाल्यावर कांहीं दिवसांनीं तुर्की राजधानींत येऊन दाखल झाला आणि त्या तुर्की लमाणवाल्याचा शोध करूं लागला. बराच तपास केल्यावर तो तुर्क त्याला सांपडला; आणि तो त्याच्याकडे आपला माल किंवा मालाची किंमत मागूं लागला. त्या तुर्कानें कानांवर हात ठेवून ह्मटलें: "तुला मीं कधीं पाहिलें सुद्धां नाहीं; व मीं कधीं लमाण वाहण्याचा धंदाही केला नाहीं. असें असतां तूं मजकडे आपला माल मागतोस त्या तुला वेड तर लागलें नाहीं ना?" हा त्याचा जबाब ऐकून त्या व्यापाऱ्यानें तेथल्या काजीकडे त्याच्यावर फिर्याद केली. काजीनें त्या तुर्काला बोलावून आणून ह्या व्यापाऱ्याच्या ह्मणण्यावर तुझें काय उत्तर आहे ह्मणून विचारलें. तो ह्मणाला: "ह्या व्यापाऱ्याला ह्यापूर्वीं मीं कधींही पाहिलें नव्हतें; आणि मी लमाण वाहण्याचा धंदाही कधीं केला नाहीं." त्यावर काजीनें त्या व्यापाऱ्याला कांहीं पुरावा आहे काय ह्मणून विचारिलें. तो ह्मणाला: "माझ्यापाशीं कांहींएक पुरावा नाहीं." तेव्हां काजीनें ह्मटलें कीं, "तुह्मीं दोघेहि वेडे आहां; चालते व्हा येथून." मग ते दोघेही काजीच्या घरांतून बाहेर पडून चालले असतां, न्यायाधीशानें बारीपाशीं जाऊन मोठ्यानें ह्मटलें: "अरे लमाणवाल्या, तुझ्याशीं मला कांहीं बोलावयाचें आहे." हे शब्द कानीं पडतांच त्या तुर्कानें पटदिशीं मान फिरविली. आपण लमाण वाहण्याचा धंदा कधींही केला नाहीं, असें जें त्यानें काजीपुढें सांगितलें होतें, त्याचें भान त्याला राहिलें नाहीं. लमाणवाला ह्मणून हाक मारिल्याबरोबर त्यानें मान फिरविली, असें पाहून न्यायाधीशानें त्याला मागें खेंचून आणविलें आणि त्याला त्याच्या लबाडीबद्दल चांगले फटके दिले. मग त्या व्यापाऱ्याच्या मालाची सगळी किंमत त्याला द्यावयाचा त्यानें हुकूम केला. आणि न्यायासनापुढें खोटी शपथ वाहिल्याबद्दल त्याला मोठा दंड केला.

## न्यायाचा मनोरा.

प्राचीन काळीं एक न्यायी राजा होऊन गेला. त्यानें आपल्या प्रजेला योग्य न्याय जेव्हांचा तेव्हां मिळावा ह्मणून एक मोठा मनोरा उभारून त्याला एक घांट लाविली, आणि त्या घांटेच्या लोळ्याला दोरी बांधून ती मनोऱ्याबाहेर खालपर्यंत सोडून दिली. मग त्यानें असा जाहीरनामा लाविला कीं, ज्या कोणास न्याय हवा असेल, त्यानें ती घांट वाजवावी. ती घांट कोणीं वाजविली ह्मणजे राजा आपले मंत्री त्या मनोऱ्यांत जमवून त्यांच्या सल्ल्यानें घांट वाजविणाराच्या फिर्यादीचा निकाल लावीत असे.

एके दिवशीं रात्रीं थंडी पडली असतां ती घांट वाजली. त्याबरोबर राजानें मनोऱ्यांत येऊन घांट कोणीं वाजविली त्याची चौकशी करविली. तेव्हां चाकरांनीं येऊन सांगितलें कीं, घांट वाजविणारें कोणी माणूस नसून एक रोड झालेलें घोडें आहे. राजा ह्मणाला: "कांहीं चिंता नाहीं. त्या घोड्याची अशी अवस्था कशानें झाली, तें आपण पाहूं." असें ह्मणून त्यानें आपल्या मंत्र्यांस बोलावून आणून त्या घोड्याच्या मालकाचा तपास करावयास सांगितला.तपासाअंतीं असें आढळून आलें कीं,तें घोडें राजाच्या मुख्य वजिराचें आहे. ह्या वजिरापाशीं तें लहानाचें मोठें होऊन त्याच्या फार उपयोगीं पडलें होतें. पुढें तें ह्मातारें होऊन कसल्याच कामास येण्याजोगें नाहीं, असें पाहून त्यानें त्याला रानांत सोडून दिलें होतें. कारण त्याला फुकट खायाला घालणें त्यास बरें वाटलें नाहीं. ते दिवस थंडीचे असून चोहोंकडे बरफ पडल्यामुळें त्या घोड्याला कोठेंच कांहीं खायाला मिळेना.ह्मणून तें भटकत मनोऱ्यापाशीं आलें. तेथें ती घांटेची दोरी लोंबत होती, ती त्याला वेलासारखी दिसून तिचा चावा घेऊन तिला त्यानें हिसडा दिला. त्यामुळें ती घांट

वाजली. हा असा प्रकार पाहून राजाला फार वाईट वाटलें, आणि, तो वजीर तेथें हजर होताच, त्याला तो ह्मणाला: " जो पशु तुझ्या सेवेंत ह्यातारा झाला, त्याचे तूं असे हाल केले, यावरून तुझ्या ठायीं भूतदया व न्यायबुद्धि मुळीं वसत नाहीं, हें सिद्ध होतें. असला वजीर माझ्या रयतेच्या कांहींएक कामाचा नाहीं. तूं हा घोडा ह्मातारा झाला ह्मणून हाकून दिला, तसाच तुलाही तुझ्या उतार वयांत मीं माझ्या नोकरीवरून दूर केलें, तर मीं अन्याय केला असें होईल काय? पण नाहीं; तूं इतकीं वर्षें इमानेंइतबारें माझी नोकरी बजाविली आहेस, ह्मणून तुला तुझ्या उतारवयांत तीवरून काढून टाकणें बरोबर होणार नाहीं. तर आतां ह्या घोड्याला आपल्या तबेल्यांत नेऊन ठेव, आणि हा मरेपर्यंत याची चांगली निगा राख. त्याचे हाल केलेस तर संभाळ."

## सरदार आणि चक्कीवाला.

फ्रेडरिक दि ग्रेट राजाच्या कारकीर्दींत प्रशिया देशांत कुस्त्रीन शहरानजीक एका बड्या सरदाराच्या वतनांत एका चक्कीवाल्यानें आपली पाणचक्की बांधिली होती. ही चक्की तेथल्या ओहळाच्या प्रवाहाच्या जोरानें चालत असे. चक्कीवाल्यानें त्या सरदाराकडून ही जागा भाडेचिठी लिहून देऊन कांहीं वर्षांच्या करारानें घेतली होती. ह्या ठिकाणीं त्या चक्कीवाल्याचा धंदा चांगला चालून तो तेथें आपल्या कुटुंबासह पांचसहा वर्षें सुखानें राहिला. सहाव्या वर्षी त्या सरदाराच्या डोक्यांत अशी लहर आली कीं, आपलें मासे मारायाचें तळें आहे तें मोठें करावें. ह्या उद्देशानें त्या ओहळांतून पाण्याचा मोठा पाट काढून त्यानें तो त्या तळ्यांत नेऊन सोडिला. ही अशी व्यवस्था तो करावयास लागला, तेव्हां चक्कीवाल्यानें त्याच्यापाशीं अशी तक्रार

केली कीं, "असा पाट काढिल्यानें ओहळाचा प्रवाह कमी होऊन माझी चक्की नीट चालणार नाहीं; आणि त्यामुळें माझा धंदा बसेल. तर तुह्मांला असा पाट काढावयाचाच असला, तर माझा करार रद्द करून मला येथून दुसऱ्या कोणीकडे तरी जाऊं द्या." ही त्याची तक्रार त्या सरदारानें मनास आणिली नाहीं व त्याचा कराराही रद्द केला नाहीं. तेव्हां त्या बिचाऱ्या चक्कीवाल्यास तेथेंच रहावें लागलें. पाण्याचा जोर कमी झाल्यामुळें त्याची चक्की नीट चालेना. पाऊस पडून ओहळाला थोडासा पूर आला तरच ती चांगली चाले. ह्यामुळें तो अगदीं टेकीस आला. तेव्हां त्यानें त्या सरदारावर खटला केला. त्याची बरेच दिवस चौकशी चालून शेवटीं न्यायाधीशानें त्याच्या विरुद्ध निकाल दिला. ह्याप्रमाणें केलेला खर्च अंगावर येऊन तो कर्जबाजारी झाला, आणि त्या सरदाराच्या जमिनीचें भाडेंही बरेंच थकलें. तेव्हां कर्जदारांनीं व त्या सरदारानें त्याच्यावर फिर्याद करून त्याची सगळी चीजवस्त कर्जासाठीं जप्त केली. ह्याप्रमाणें तो अगदीं कंगाल होऊन भिकेस लागला. ही त्याची दशा पाहून त्याच्या एका मित्रानें त्याला अशी सल्ला दिली कीं, फ्रेडरीकराजा मोठा दयाळू व न्यायी आहे. त्याला अर्ज करून आपली ही सगळी हकीकत कळीव. ह्या मसलतीप्रमाणें त्यानें राजाला अर्ज केला. तो वाचून राजानें आपला एक माणूस कुस्त्रीनशहरीं पाठवून खरा प्रकार काय आहे त्याची चौकशी करविली, आणि त्या खटल्यांतले सगळे कागद मागवून ते नीट काळजीपूर्वक वाचून पाहिले. तेव्हां राजाची पुरी खातरी झाली कीं, त्या मनुष्यासंबंधानें अन्याय झाला आहे. मग तो खटला चालविणाऱ्या न्यायाधीशांस व वकिलांस त्यानें आपल्या दरबारांत

बोलावून आणिलें, आणि त्यांच्या खोट्या निकालावर टीका करून हा असा धडधडीत अन्याय केल्याबद्दल त्यांला ठपका दिला; आणि त्यांनीं त्या सरदाराकडून लांच खाऊन असा पक्षपात केला ह्मणून त्यांला त्यानें नोकरीवरून काढून टाकिलें. इतकेंच करून तो राजा राहिला नाहीं, तर त्या कामदारांवर लांच खाल्लयाबद्दल व पक्षपात केल्याबद्दल त्यानें खटला करविला; आणि त्या चक्कीवाल्याचें जेवढें नुकसान झालें होतें, तेवढें त्यांच्या पगारांतून कापून घ्यावयाचा हुकूम त्यानें केला. त्याप्रमाणेंच त्या सरदारानें ओहळाचा पाट काढिल्यापासून जेवढें भाडें त्या चक्कीवाल्याकडून घेतलें होतें, तेवढें सगळें त्याला त्यास परत द्याव-यास लाविलें.

## शीघ्र न्याय.

एक रशियन व्यापारी युरोपांतून प्रवास करीतकरीत पोलंडची राजधानी वार्सा येथें आला. ह्या शहरच्या एका मोठ्या गृहस्थावर त्यानें पत्र आणिल्यामुळें त्याला त्याच्या घरीं रहावयास चांगली जागा मिळाली; व त्या गृहस्थानें त्याची यथायोग्य बरदास्त ठेविली. तो व्यापारी त्याच्या घरीं सातआठ दिवस राहिला. तेवढ्या अवकाशांत त्या शहरांतल्या पाहण्यासारख्या सगळ्या गोष्टी त्यानें पाहिल्या. मग त्याला तेथली अगदीं वाईट वस्ती पाहण्याची इच्छा झाली. ती पुरविण्यासाठीं त्या गृहस्थानें तेथें फिरावयास जाण्याची तयारी केली. पण बाहेर पडण्या-पूर्वीं तो व्यापारी त्याला ह्मणाला कीं, माझ्यापाशीं मोठ्या मोलाच्या रत्नांची एक डबी आहे, ती अशा ठिकाणीं फिरतांना जवळ ठेवणें बरोबर नाहीं. तर एवढी तुमच्याकडे ठेवून द्या." ही गोष्ट मान्य करून त्या गृहस्थानें त्याची ती डबी आपल्या बायकोच्या स्वाधीन केली. शहराचा तो भाग पाहून आल्यावर व्यापारी ती डबी

परत मागूं लागला. तेव्हां तो गृहस्थ डबी कोठली ह्मणून विचारूं लागला; आणि त्याची बायकोही ह्मणूं लागली कीं, "तुमच्या बुद्धीला भ्रम झाला असावा. एरवीं तुह्मीं डबी आमच्याकडे मागितली नसती." हें त्याचें कपट व लबाडी पाहून तो व्यापारी तत्काळ तेथून निघून त्या शहरच्या पोलिस अधिकाऱ्याकडे गेला, आणि त्याला त्यानें आपली ही गोष्ट कळविली. तो अधिकारी म्हणालाः "डबी देतांना कोणी साक्षीदार जवळ नव्हता, कीं ती घेतल्याबद्दल त्याच्याकडून तुह्मीं पावती वगैरे कांहीं लिहून घेतली नाहीं. तेव्हां त्याच्यावर तुमचा खटला चालेल तरी कसा?" तो गृहस्थ ह्मणालाः "माझ्यापाशीं त्या डबीची चावी आहे, एवढाच काय तो माझा पुरावा आहे." हें ऐकून त्या अधिकाऱ्यानें त्याला त्या देशाच्या सुभेदाराकडे नेलें. त्यानें सगळी हकीकत ऐकून घेऊन त्या गृहस्थाला आपल्यासमोर बोलावून आणिलें. तो आला तेव्हां त्याला सांगितलें कीं, "ह्या कागदावर मी सांगतों तो मजकूर लिहा." तो गृहस्थ लेखणी हातीं धरून लिहावयास तयार झाला, तेव्हां त्या सुभेदारानें पुढील मजकूर त्याला लिहावयास सांगितलाः "माझे प्रिय स्त्रिये, आपण केलेलें कृत्रिम सगळें उघडकीस आलें आहे. त्या व्यापाऱ्याची ती डबी ही चिठी घेऊन येणाऱ्या इसमाकडे ताबडतोब पाठवून दे." हा मजकूर ऐकून तो गृहस्थ लेखणी खालीं ठेवून उठला आणि ह्मणालाः "हा मजकूर मी लिहिणार नाहीं." सुभेदारानें दरडावून ह्मटलें: "हा मजकूर तुला लिहिलाच पाहिजे, लिहिला नाहींस तर तूं गुन्हेगार आहेस अशी माझी पुरी खात्री होईल." तेव्हां निरुपायास्तव त्याला तो मजकूर लिहून खालीं आपली सही करावी लागली. ही चिठी देऊन एक इसम त्याच्या बायकोकडे त्यानें

पाठविला. ती वाचून तिची अगदीं त्रेधा उडाली; आणि ती डबी तिनें त्याच्या हवालीं केली. ती हातीं आल्यावर सुभेदारानें त्या व्यापाऱ्याला बोलावून ती चावी लावून उघडून पाहावयास सांगितलें. त्याप्रमाणें ती त्यानें उघडून पाहतां तींतलीं सगळीं रत्नें आहेत असें त्याला दिसलें. मग त्या व्यापाऱ्याला रजा देऊन सुभेदारानें असा हुकूम केला कीं, "ह्या दगलबाज गृहस्थाला येथून परस्पर सैबेरियाप्रांतांत नेऊन ठेवा. ह्याला पुनः आपल्या घराचा उंबरठाही चढूं देऊं नका."

## शार्लमेनराजा व त्याचा एक सरदार.

प्राचीन काळीं फ्रान्सदेशांत शार्लमेननामा अतिविख्यात राजा होऊन गेला. त्याच्या कारकीर्दींत होन नांवाच्या एका बड्या सरदाराची सगळी वतनवाडी त्याच्या भावानें बळकावून त्याच्यावर व त्याच्या बायकोवर राजद्रोहाचा आरोप आणिला. त्यावरून त्यांस पकडून बोर्डो येथें कारागृहांत ठेविलें. हा सरदार पूर्वदेशांत जाऊन फार दिवस तिकडेच राहिला असतां, त्याच्या भावानें दरबारच्या लोकांस अवदानें चारून वर सांगितल्याप्रमाणें डाव साधिला होता; आणि हा सरदार परत येऊन आपल्या वतनाचा ताबा मागूं लागला, तेव्हां त्याच्या भावानें ही तोहमत त्याच्यावर घेऊन त्याला पेंचांत आणिलें होतें. त्या दोघां नवराबायकोबरोबर आणखी त्यांचा एक जिवलग मित्र त्यांचा साथीदार ह्मणून पकडला होता. त्यांची चौकशी करण्यासाठीं ह्मणून शार्लमेनबादशहा आपले दरबारचे उमराव घेऊन मुद्दाम बोर्डो येथें आला. त्यांला तेथें त्या सरदाराच्या भावानें मोठी मेजवानी दिली, आणि ज्या जागीं त्या सरदारास त्याच्या बायकोसह अटकेंत ठेविलें होतें, तीजवळच मेजवानीची जागा योजिली. राजा आणि सरदार

लोक मेजवानीला बसले असतां व मोठी मौज चालली असतां, त्यांमध्यें एक थोर मनाचा सरदार होता, त्याचें चित्त हा सगळा प्रकार पाहून फार अस्वस्थ झालें, व शेवटीं तो पटदिशीं उठला; तेव्हां त्याच्या धक्कानें मेजावरचीं मद्यपात्रें वगैरे खळाखळ पडून फुटलीं. हें पाहून राजा त्याला ह्मणाला: "तूं असा मध्येंच उठून सगळ्या मेजवानीचा विरस केलास याचें कारण काय?" त्या सरदारानें धीटपणानें असें उत्तर केलें कीं, "राजाधिराज, आपण येथें आलों आहों, ते चैन करण्याकरितां नाहीं. आपल्या दरजाच्या व शूर अशा एका सरदाराला इतके दिवस अटकेंत पडून विपत्ति भोगावी लागत आहे, त्याची चौकशी करण्याकरितां आपण आलों आहों. तो, त्याची निरपराध स्त्री व त्याचा प्रेमळ मित्र हीं जवळच्या घरांतल्या अंधारखाणींत खितपत पडून शोक करीत असतां, आह्मी येथें बसून चैन करावी, हें आमच्या माणुसकीला शोभत नाहीं. नुसती चैनच मारावयाची होती तर, महाराज, आपणांला ती पारिस शहरांत काय कमी होती? तेव्हां इतक्या दूर ज्या कामासाठीं आपण आलों आहों, तें आधीं करूं या आणि मग हवी तशी चैन मारूं या. होनसरदाराला कदाचित् अन्यायानें पकडून कैद केलें असल्यास त्याला चौकशीवांचून कारागृहांत एक पळभरही ठेवणें बरोबर होणार नाहीं." हें त्या सरदाराचें खरमरीत उत्तर ऐकून राजा तत्काळ शुद्धीवर आला, आणि मेजवानी सोडून पहिल्यानें होनसरदाराची चौकशी करण्यासाठीं त्यानें न्यायकचेरी भरविली. मग त्या कैद्यांस न्यायासनापुढें आणवून त्यांची चौकशी केली. तींत त्या सरदारावर किंवा त्याच्या मित्रावर व बायकोवर कसलाच गुन्हा शाबूद न होऊन तीं दोषमुक्त ठरलीं; आणि राजानें त्यांचें सगळें वतन त्यांच्या स्वाधीन करावयास लाविलें.

## राजा आणि चक्कीवाला.

फ्रेडरिक दि ग्रेटच्या कारकीर्दींत प्रशियादेशांत एक चक्कीवाला होता. त्याची चक्की राजाच्या एका वाड्याजवळ होती. ती आपल्या वाड्याजवळ असावी, हें त्या राजाला बरें न वाटून त्या चक्कीवाल्यास त्यानें आपल्यासमोर बोलावूंन आणिलें आणि, तुझी ती चक्की केवढ्याला देतोस, असें विचारलें. चक्कीवाला ह्मणालाः "मी ती कदापि विकणार नाहीं." हें त्याचें उद्दामपणाचें उत्तर ऐकून राजा संतापला आणि आपल्या नोकरांला ह्मणालाः "जा रे, ह्याची चक्कीब्रिक्की पाडून टाकून जमीन-दोस्त करा आणि ह्याला तेथून हाकून द्या." हा हुकूम ऐकून तो चक्की-वाला ह्मणालाः "राजानें असें करावें, ह्मणजे प्रशिआदेशाचे कायदे माझा हक्क शाबूद करण्यास मला साहाय्य करितात कीं कसें, तें मी पाहीन." राजाच्या आज्ञेप्रमाणें त्याची चक्की पाडून टाकिल्यावर त्या मनुष्यानें राजावर फिर्याद केली. हा त्याचा खटला न्यायाधीशानें ऐकून घेऊन त्याच्यातर्फे निकाल दिला, आणि त्याची ती चक्की त्या ठिकाणीं पुनः बांधून देऊन, त्याच्या नुकसानीची भरपाई करण्या-साठीं राजानें त्याला मोठी रकम द्यावी, असें ठरविलें. आपल्या प्रजे-पैकीं एकानें वादांत आपणास हरवावें, याचें फ्रेडरिकराजाला फार वाईट वाटलें. पण तो जाल्या मनाचा थोर असल्याकारणानें आपल्या दरबारच्या लोकांसमोर त्यानें असे उद्गार काढिले कीं, "माझ्या राज्यां-तले कायदे उत्कृष्ट असून न्यायाधीश प्रामाणिक व न्यायभक्त आहेत; व मीं अन्याय केला असें त्यांला वाटल्यावरून माझ्याविरुद्ध निकाल देण्याइतकें धैर्य त्यांच्या अंगीं आहे, हें पाहून मला मोठें समाधान वाटतें." असें बोलून त्यानें न्यायाधीशाच्या निकालाप्रमाणें सगळी व्यवस्था करण्याचा हुकूम केला.

पुढें ह्या चक्कीवाल्याचा एक वंशज ती चक्की चालवीत असतां अगदीं खराबीस आला. त्याला लोकांचें भारी देणें झालें. ह्या संकटांतून पार पडण्यासाठीं त्यानें त्या वेळच्या राजाला अर्ज करून कळविलें कीं, "माझी स्थिति अगदीं खालावली आहे. मी ही चक्की सरकाराला विकून टाकण्यास राजी आहें." ह्या अर्जांत त्यानें, फ्रेडरिकराजानें ती विकत मागितली असतां, आपल्या पूर्वजानें कशी हरकत घेतली होती, तेंही नमूद केलें होतें. राजानें हा अर्ज वाचून आपल्या हातानें त्याच्या अर्जाला येणेंप्रमाणें जबाब लिहिला: "माझ्या प्रिय शेजाऱ्या, तुला ती चक्की मी विकूं देणार नाहीं. तुझ्या कुटुंबाच्या ताब्यांत ती अक्षय राहिली पाहिजे. कारण त्या इमारतीचा प्रशियाच्या इतिहासाशीं संबंध जडला आहे. आमच्या देशांतल्या न्यायाधीशांच्या प्रामाणिकपणाचें व आमच्या देशाच्या कायद्यांच्या निःपक्षपातपणाचें उत्तम स्मारक ती इमारत होऊन राहिली आहे. आतां तुझी स्थिति सांप्रत निकृष्ट झाली आहे, हें ऐकून मला फार वाईट वाटतें. ह्मणून मी तुला सहा हजार डॉलर पाठवीत आहें. एवढ्या रकमेनें तुझें कर्ज फिटेल अशी मला उमेद आहे. मी तुझा एक मायाळू शेजारी आहें, असें मला मान."—फ्रेडरिक उइलिअम.

असें सांगतात कीं, ती चक्की अजून त्या ठिकाणीं असून, त्या धीट चक्कीवाल्याच्या वंशजांच्या ताब्यांतच ती राहिली आहे.

## मेसिनाशहरचा चांभार.

सिसिलीबेटांतलें मुख्य शहर मेसिना येथें एक चांभार रहात असे. तो मोठा प्रामाणिक असून कोणींही लबाडी केलेली त्याला खपत नसे. त्या शहरांतला कारभार मोठा अंदाधुंदीचा होता. कामदार

लोकांला अवदानें चारिलीं ह्मणजे वाईट लोकांला वाटेल तो अन्याय, जुलूम, दगाबाजी व लुटालूट करावयाला मुभा मिळे. त्यामुळें गरीब रयतेचें अनेक प्रकारीं नुकसान होई. त्या प्रांताचा कारभार पाहणारा सुभेदार स्वकर्तव्यास अनुसरून वागत नसे; व त्याला ही अंधाधुंद कशी मोडावी हें कळत नसे. हा असा अनिष्ट प्रकार सर्वत्र चाललेला पाहून सदरील चांभाराला नेहमीं पराकाष्ठेचा खेद होई. लुच्चे व लफंगे लोक रयतेला हवे तसे लुबाडीत, हें पाहून त्याला पराकाष्ठेचा संताप येई. शेवटीं त्यानें असा निर्धार केला कीं, ही झोटिंगपादशाही मोडून टाकण्याचा आपल्याच्यानें होईल तो प्रयत्न आपण करावयाचा. असा निश्चय करून तो एक लहानशी बंदूक बगलेंत लिकवून शहरांतून गुपचूप हिंडूं लागला; आणि जेवढा ह्मणून लुच्चा व जुलमी कामदार किंवा दुसरा एकादा मनुष्य नजरेस पडे, त्याला तो गोळी घालून ठार करूं लागला. हे खून तो असे युक्तीनें करी कीं, त्याचा वहीम कोणालाही कधीं येत नसे.

असे एकामागून एक खून होऊं लागले, तेव्हां सगळ्या शहरांत मोठी चळवळ उडून गेली. सरकारी कामदार खुनी मनुष्याचा पत्ता लावितांलावितां अगदीं टेकीस आले. दुसरें असें आढळे कीं, ज्यांचा खून होई, त्यांच्या अंगावर कांहीं डागिने वगैरे बहुमोल वस्तु असल्या किंवा कांहीं पैसाअडका त्यांच्या खिशांत असला, तर तो जशाचा तसाच राही. त्यावरून खून करणारा मनुष्य पैशाच्या लोभानें ते करीत नाहीं, असें प्रत्ययास येई. शिवाय मोठमोठ्या जुलमी व लफंग्या माणसांचे सरसकट खून होत, त्यावरून खुनी मनुष्य कांहीं द्वेष उगविण्यासाठीं ते करीत आहे, असें ह्मणण्यास आधार नव्हता. शेवटीं असे बरेच खून झाले तेव्हां तेथल्या सरकारानें असा जाहीरनामा लाविला कीं,

जो कोणी खुनी मनुष्याला पकडून देईल, त्याला दोन हजार क्राऊन बक्षीस देण्यांत येतील; आणि स्वतः खुनी मनुष्य पुढें येऊन आपला गुन्हा कबूल करील, तर त्याचा गुन्हा माफ करून त्याला दोन हजार क्राउन बक्षीस देण्यांत येतील. हा जाहीरनामा वाचून चांभारानें असा विचार केला कीं, आपल्या ह्या जहाल उपायाच्या योगानें लुच्च्या-लफंग्या लोकांला चांगली दहशत पोंचली आहे; तरी आपण स्वतः जाऊन आपला गुन्हा कबूल करावा. मग त्या सुभेदाराकडे जाऊन त्यानें आपणच हे सगळे खून केले असें सांगितलें आणि ते करण्याचा आपला उद्देशही स्पष्टपणें कळविला. तो आणखी ह्मगाला: "महाराज, तुमच्या हातूनही लोकांवर बराच जुलूम झाला आहे. यास्तव तुमचाही खून होणें इष्ट आहे. परंतु तुह्मी माझ्या राजाचे प्रतिनिधि असल्यामुळें मला तुमच्यावर शस्त्र धरवलें नाहीं." त्याची ती स्पष्टोक्ति ऐकून तो सुभेदार चकित झाला, आणि त्यानें आपल्यापासून कांहींएक छपविलें नाहीं अशी त्याची खातरी झाली. मग त्यानें जाहीरनाम्यांत दिलेल्या वचनाप्रमाणें त्याला त्याचे ते सगळे गुन्हे माफ करून दोन हजार क्राऊन बक्षीस दिले. ते हातीं पडल्यावर तो तें शहर सोडून जिनोवा येथें जाऊन सुखवस्तु राहिला.

## अन्यायाबद्दल प्रायश्चित्त.

चौथ्या शतकाच्या अंतीं रोमनगरींत थिओडोसिअस नांवाचा बादशाहा राज्य करीत असतां, इटलींतल्या एका प्रांतावर नेमिलेल्या सुभेदाराला तेथल्या नाटकगृहांतील प्रेक्षकांनीं धोंडमार करून ठार मारिलें. त्याच्यावर लोक संतापण्याचें कारण असें होतें कीं, त्यानें एका लोकप्रिय नटाला अन्यायानें कारागृहांत घातलें होतें. तो नट रंगभूमीवर आला नाहीं हें पाहून सगळ्या प्रेक्षक लोकांनीं मोठा गिल्ला केला.

आणि त्याला बंदमुक्त करावें असा अर्ज सुभेदारास केला. पण त्याकडे त्यानें दुर्लक्ष केल्यावरून त्यांनीं त्याला व त्याच्या हाताखालच्या अमलदारांला धोंडमार करून ठार केलें. हें भयंकर वर्तमान बादशाहाला कळतांच त्यानें रागाच्या आवेशांत असा हुकूम सोडिला कीं, नाटकगृहांत जेवढे लोक जमा होतील तेवढ्यांची कत्तल उडवावी. या हुकमाप्रमाणें लष्करी शिपायांनीं तेथल्या सात हजार लोकांचा संहार केला. हें अतिघोर अन्यायाचें व क्रूरपणाचें कृत्य बादशाहानें केल्याचें वर्तमान मिलन येथील मुख्य धर्माधिकारी आंब्रोज याच्या कानीं आलें. तेव्हां त्यानें बादशाहाला बहिष्कार घालण्याचा निश्चय केला. ह्या बादशाहाची स्वारी नेहमींच्या क्रमाप्रमाणें रविवारच्या दिवशीं उपासनेसाठीं देवालयांत येऊं लागली, तेव्हां ह्या धर्माधिकाऱ्यानें देवालयाच्या दरवाज्यावर उभें राहून बादशाहाला आंत पाऊल ठेवण्याला प्रतिबंध केला. सार्वभौम बादशाहाला अशा यःकश्चित् मनुष्यानें असा मज्जाव करावा, हें मोठें विचित्र व विलक्षण धिटाईचें काम होतें. पण तो धर्माधिकारी पवित्र आचरणाचा व धर्मपरायण असल्यामुळें बादशाहाच्यानें त्याच्यावर हात करवला नाहीं. शिवाय त्याच्या भयंकर दुष्कर्माची त्याला आठवण होऊन त्याचें मन त्याला खात होतेंच. यास्तव तो तेथून परतला आणि आपल्या वाड्यांत जाऊन शोक करीत बसला. हा असा बहिष्कार त्याला घातल्यावर आठ महिनेपर्यंत देवालयांत पुनः प्रवेश करण्याचें धैर्य त्याला झालें नाहीं; किंवा त्या उपाध्यायाचा नाश करण्याची कल्पना त्याच्या मनांत आली नाहीं.

पण देवालयांत सगळे लोक उपासनेला जात असतां व सणासुदिशीं उत्सव करीत असतां, आपण एकीकडे बसून रहावें, हें त्याला बरें न वाटून, त्यानें शेवटीं असा निश्चय केला कीं, तो उपाध्याय

सांगेल तें प्रायश्चित्त करून पुनः देवालयांत जावें. मग तो एके दिवशीं आपल्या लोकांसह पुनरपि देवालयाच्या दारापाशीं आला. तेव्हां तो धर्माधिकारी त्याला हरकत करण्यासाठीं दाराकडे धावत आला. जुलूम करून आंत शिरावें असें बादशाहाच्या मनांत मुळींच नव्हतें. त्यानें त्या धर्माधिकाऱ्याला बाहेर बोलावून जवळच्या इमारतींत नेलें आणि विचारिलें: "मीं कोणतें प्रायश्चित्त केलें ह्मणजे मला तूं पुनः देवालयांत घेशील? माझ्या अन्यायाच्या कर्माचा मला गेले आठ महिने एकसारखा अनुताप तर होत आहेच. तेव्हां मला माझ्या पातकाची क्षमा अवश्य झाली पाहिजे." असें पश्चात्तापाचें व नम्रतेचें भाषण ऐकून तो धर्माधिकारी ह्मणाला: "हे सार्वभौम बादशाहा, तुला अनुताप झाला आहे हेंच तुझ्या दुष्कर्माचें प्रायश्चित्त होय. तथापि आजपासून तूं आपल्या सगळ्या साम्राज्यांत असा नियम कर कीं, कोणालाही देहांतशासनाची शिक्षा झाली असतां, ती तीस दिवसपर्यंत अमलांत आणूं नये. हें फरमान आतांच्या आतां आपल्या हातानें लिहून त्यावर सही कर आणि मग देवालयांत येऊन बस." ह्या त्याच्या म्हणण्याप्रमाणें बादशाहानें तत्काळ केलें, आणि देवालयांत जाऊन तो एका कोपऱ्यास बसला. हा असा नियम केल्यामुळें किती निरपराध माणसांचा बचाव झाला असेल, हें कांहीं सांगायाला नको.

## राजपुत्र आणि न्यायाधीश.

इंग्लंडचा पांचवा हेन्रि राजा हा युवराज असतां, अतिशयित आडदांड व आपढंगी होता. तो वाईट लोकांच्या संगतीला लागून अनेक वेडे चाळे व अनन्वित कर्में करी. एके समयीं त्याच्या एका सोबत्यावर कांहीं गुन्हा केल्याचा आरोप येऊन त्याची चौकशी सरन्यायाधीशापुढें झाली. शिक्षा सांगतेवेळीं हा युवराज न्यायकचेरींत

होता. ती ऐकून तो भारी संतापला आणि त्या रागाच्या झपाट्यांत न्यायाधीशाला अद्वातद्वा शब्द बोलून त्याला ह्मणालाः " माझ्या मित्राला सोडून द्या. मी युवराज आहें. माझा मित्र तुरुंगांत जातां कामा नये. तर मी तुह्मांला हुकूम करितों कीं, ह्या माझ्या मित्राला एकाद्या सामान्य चोराप्रमाणें तुरुंगांत पाठवूं नका." न्यायाधीश ह्मणालाः "तुह्मी युवराज असा कीं दुसरे कोणी असा. राजाच्या न्यायाधीशाला अशा रीतीनें बोलण्याचा तुह्मांला अधिकार नाहीं. न्याय करावा हें माझें कर्तव्य आहे, आणि तें मी करणार."

हें त्याचें उत्तर ऐकून युवराज अधिकच संतापला आणि त्या कैद्याला सोडविण्याचा प्रयत्न स्वतः करूं लागला. तें पाहून न्यायाधीश धिमेपणानें ह्मणालाः "येथें तुमचें कांहीं काम नाहीं. असा दंगा न्यायकचेरींत करूं नका." हे त्याचे निषेधपर शब्द ऐकून युवराज अधिकच क्रोधाविष्ट होऊन न्यायाधीशाच्या अंगावर चालून गेला, आणि त्याच्या तोंडावर त्यानें एक ठोसा लगाविला. तेव्हां न्यायाधीशानें युवराजासही पकडून त्याच्या मित्राबरोबर तुरुंगांत न्यावयाचा हुकूम कचेरींतल्या अमलदारांस केला. असा हुकूम देतांना तो गंभीरपणें ह्मणालाः " मी युवराजांला तुरुंगांत पाठवीत आहें, तो कांहीं त्यांनीं मला मारिलें ह्मणून नव्हे, तर राजाच्या कायद्याची त्यांनीं बेअदबी केली ह्मणून त्यांना ही शिक्षा करीत आहें." मग तो न्यायाधीश युवराजाकडे वळून ह्मणालाः "युवराज, तुह्मीं जर आज असें राजाच्या कायद्याचें उल्लंघन केलें, तर तुह्मी स्वतः राजे झालां ह्मणजे तुमची प्रजा तुमच्या हुकमांत वागण्याची अपेक्षा तुह्मांला कशी बरें करितां येईल?" हें ऐकून युवराज अगदीं ओशाळला. तो एक शब्दही परत बोलला नाहीं.

आपली तरवार खालीं ठेवून आणि न्यायाधीशाला नमन करून तो तुरुंगांत चालता झाला.

ही गोष्ट चौथ्या हेन्रि राजाच्या कानावर गेली तेव्हां तो ह्मणालाः "कायद्याची अमलबजावणी अशी धीटपणानें करणारा न्यायाधीश ज्याच्या पदरीं आहे, आणि कायद्याप्रमाणें वागलें पाहिजे हें जाणणारा पुत्र ज्याला आहे, तो राजा धन्य होय !"

पुढें लौकरच हा उद्दाम राजपुत्र गादीवर आला. तेव्हां तो आतां कसा वागतो, याकडे सगळ्यांचे डोळे लागून राहिले. तो राजपदावर चढला तेव्हां रीतीप्रमाणें मुजरा करण्याकरितां चोहोंकडचे लोक येऊं लागले. इतरांप्रमाणें त्याचे पूर्वींचे मित्रही आले. त्यांला असें वाटलें होतें कीं, आपणांला राजा आतां आपल्याजवळ ठेवून घेऊन आपलें कल्याण करील. पण हा त्यांचा भ्रम लौकरच फिटला. राजानें त्यांला निक्षून सांगितलें कीं, मीं आतां माझे सगळे वेडे चार सोडून दिले आहेत. तर तुह्मीही ते सोडून देऊन आपलें वर्तन सुधराल, तरच तुमचा माझा स्नेह कायम राहील.

इतरांप्रमाणें त्या न्यायाधीशालाही ह्या नव्या राजाला मुजरा करावयास यावें लागलें. हा आतां आपलें मागलं वर्तन आठवून आपणाला आपल्या हुद्यावरून दूर करील, असें त्याला वाटलें होतें. परंतु त्याची त्याला परवा नव्हती. कारण, आपण आपलें कर्तव्य केलें, विशेष कांहीं केलें नाहीं, असें त्याची मनोदेवता त्याला सांगत होती. परंतु ह्या गृहस्थाची ही अटकळ अगदीं चुकली. राजानें त्याचा मोठ्या आदरानें सत्कार केला, आणि आपणाला त्यानें त्या प्रसंगीं चांगलें शुद्धीवर आणिलें ह्मणून त्यानें त्याचे आभार मानून ह्मटलें: "तुह्मीं आजपर्यंत

न्यायाधीशाचें काम उत्तम रीतीनें केलें आहे, तरी तेंच आपण शेवटपर्यंत करावें. मीं तुमच्याशीं त्या प्रसंगीं जसें वर्तन केलें, तसें वर्तन करणारा मुलगा मला झाला असतां, त्याला वाटेवर आणायाला तुमच्यासारखा धीट न्यायाधीश माझ्या पदरीं असावा.''

## खानाचा डावा डोळा.

एका सधन गृहस्थाच्या तीन कन्या होत्या. त्यांतली धाकटी मोठी सुज्ञ व शहाणी होती. तो गृहस्थ आपलीं कांहीं गुरें विकायासाठीं खानाच्या बाजारांत जाऊं लागला, तेव्हां त्यानें आपल्या मुलींस बाजारांतून कोणत्या वस्तु आणूं ह्मणून विचारलें. दोघां मोठ्या मुलींनीं आपल्या आवडीच्या अशा कांहीं वस्तु आणावयास सांगितल्या. पण धाकटी मुलगी ह्मणाली कीं, ''मी जी विनंति करीन, तीप्रमाणें वागावयास तुह्मांला मोठी अडचण पडेल, किंबहुना तुह्मी कदाचित् मोठ्या संकटांतही पडाल.'' तो ह्मणाला: ''कांहीं चिंता नाहीं. तुला जें कांहीं सांगावयाचें असेल तें खुशाल सांग. त्याप्रमाणें वागतांना माझा प्राणही खर्ची पडला तरी मला त्याची परवा नाहीं.'' बापाकडून असें आश्वासन मिळाल्यावर ती शहाणी मुलगी ह्मणाली: ''आपला तो तपकिरी रंगाचा गोऱ्हा आहे कीं नाहीं, तो कोणीं मागूं लागला असतां, खानाचा (राजाचा) डावा डोळा घेऊन तो देईन असें सांगा.'' ही तिची विचित्र विनंति ऐकून त्या गृहस्थाला मोठा विस्मय वाटला. पण ती चतुर आहे अशी त्याची खातरी असल्याकारणानें त्यानें तिच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचा निश्चय केला. बाजारांत गेल्यावर त्याचीं सगळीं गुरें खानाच्या नोकरांनीं विकत घेऊन त्या तपकिरी गोऱ्ह्याची किंमत त्याला विचारिली, ती त्यानें खानाचा डावा डोळा ह्मणून सांगितली. हा त्याचा उद्दामपणा पाहून कामदारांनीं त्याच्या मुसक्या बांधून

त्याला खानासमोर नेलें. तेव्हां त्या गृहस्थानें त्याला अर्ज केला कीं, "माझी एक चतुर व शहाणी मुलगी आहे, तिच्या सांगण्यावरून मीं माझ्या ह्या गोऱ्ह्याची अशी विलक्षण किंमत सांगितली." हें ऐकून खानाच्या मनांत असें आलें कीं, ह्यांत कांहीं तरी गूढ अर्थ असावा. म्हणून त्यानें त्याच्या त्या मुलीस दरबारांत बोलावून आणिलें आणि तिला असा प्रश्न केला कीं, "ह्या गोऱ्ह्याची किंमत माझा डावा डोळा माग, असें तूं बापाला सांगितलें तें काय म्हणून?" तिनें उत्तर केलें: "अशानें आपली जिज्ञासा जागृत होऊन आपण मला दरबारांत बोलावून आणाल, असें मला वाटलें. आतां, महाराज, आपल्या व आपल्या रयतेच्या हिताची अशी एक गोष्ट मला आपणांस सांगावयाची आहे. आज्ञा होईल तर ती सांगतें." खान म्हणाला: "काय सांगावयाचें असेल तें बिनदिक्कत सांग." असें आश्वासन मिळाल्यावर ती म्हणाली: "महाराज, आपल्यापुढें एकादा खटला आला असतां, जे श्रीमंत आणि खानदानीचे पक्षकार असतात, ते आपल्या उजव्या अंगास उभे रहातात, आणि गरीब व दुबळे पक्षकार आपल्या डाव्या अंगाला उभे रहातात. आतां मी असें ऐकितें कीं, आपण श्रीमंत लोकांच्या तर्फेचा न्याय करितां आणि दीन व अनाथ लोकांकडे मुळीं पाहत नाहीं. ह्यावरून आपल्या डाव्या डोळ्याचा कांहींएक उपयोग नाहीं, असें मला वाटलें, आणि माझ्या बापाला तो ह्या बैलाची किंमत म्हणून मागावयास मीं सांगितलें." हें उत्तर ऐकून खान संतापला. पण, हें तिचें वर्तन द्रोहमूलक आहे कीं चातुर्यमूलक आहे, हें पाहण्यासाठीं त्यानें तिला अनेक बिकट प्रश्न विचारिले. त्यांचीं समर्पक उत्तरें तिनें दिलीं. असें तिचें चातुर्य पाहून खान चकित झाला. पण तिची पुरी कसोटी पाहण्याकरितां तिला

तो ह्मणाला कीं, " माझ्या जामदारखान्यांत किती दौलत आहे तें सांगशील, तर मी तुला तुझा हा गुन्हा माफ करून सोडून देईन." ती ह्मणाली: " महाराज, मी सांगतें त्याप्रमाणें आपण तीन दिवस वागण्यास तयार व्हाल, तर मी आपली दौलत किती आहे तें सांगेन." तिच्या चातुर्याची पुरी पारख करावी असा खानाचा निर्धार झाला असल्याकारणानें त्यानें तिच्या सांगण्याप्रमाणें वागण्याचें वचन दिलें. मग तिनें त्याला तीन दिवस मुळीं अन्नग्रहण करूं नका असें सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केल्यावर चौथे दिवशीं तिनें त्याच्यापुढें थोडेंसें मांस ठेविलें आणि त्याला मोठ्या अदबीनें विचारिलें कीं, "महाराज, आपल्या सगळ्या दौलतीची किंमत मांसाच्या ह्या तुकड्याइतकी आहे कीं नाहीं तें कृपा करून सांगा." हें असें तिचें चातुर्य पाहून खान संतुष्ट झाला, आणि त्यानें तिचें लग्न आपल्या मुलाशीं करून देऊन तिला ह्मटलें कीं, " माझ्या हातून एकादे वेळीं अन्याय घडला तर मला त्याविषयीं नेहमीं सांगत जा."

# भाग चौथा.

## प्रामाणिकपणा.

### मुलगा आणि बोरें.

एक मनुष्य डोकीवर बोरांनीं भरलेली टोपली घेऊन चालला असतां, त्यांतलीं थोडीं खालीं पडलीं. तें त्याला न समजून तो पुढें चालता झाला. तीं अशीं पडलीं हें एका गरीब मुलानें पाहून त्याला हाक मारून उभा केला आणि तीं बोरें उचलून त्याच्याकडे नेऊन दिलीं. तीं घेऊन त्यानें त्याचे आभार मानिले आणि त्याच्या हातावर दोन मोठीं बोरें ठेवून ह्मटलें: "मुला, तूं मोठा प्रामाणिक आहेस. हीं तुला घे." असें बोलून तो पुढें चालता झाला. इतक्यांत दुसरा एक मुलगा त्या मुलापाशीं येऊन ह्मणाला: "अरे, तीं सगळीं बोरें तूं ठेवावयाचीं होतीं. त्याला कांहींएक कळलें नसतें. तसें तूं केलें असतें, तर तुला त्यांतलीं थोडीं मला देतां आलीं असतीं." तो ह्मणाला: "छे! छे! तसें करणें बरोबर नव्हतें. तुला हवें असेल तर हें बोर घे. हें माझें आहे. त्याचीं पडलेलीं सगळीं बोरें मीं घेतलीं असतीं, तर मीं चोरी केली असें झालें असतें. मी गरीब आहें हें खरें, तरी माझी बेअब्रू व्हावी, हें मला कधीं बरें वाटणार नाहीं."

### प्रामाणिक मुलगा.

एका मोठ्या शहरांतल्या रस्त्यांतून एक बडा सरदार चालला असतां, त्याला एका गरीब मुलानें सलाम करून, "कांहीं तरी पोटास

द्या," अशी त्याची विनवणी केली. तो सरदार ह्मणालाः "माझ्यापाशीं सुटे पैसे नाहींत." मुलगा ह्मणालाः "मी मोड आणितों." तेव्हां त्या सरदारानें एक शिलिंग त्याच्या हातावर ठेविला. तो घेऊन तो मोड आणायासाठीं धावला. इकडे तो सरदार त्याची वाट पाहत राहिला नाहीं. तो पुढें चालता झाला. त्या मुलास मोड मिळायाला अमळ विलंब लागला. ती मिळाल्यावर तो तेथें धावत येऊन पाहतो तों तो सरदार चालता झाला, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याला गांठण्यासाठीं तो रस्त्यांतून बराच दूर धावत गेला. पण तो त्याला कोठें दिसला नाहीं. मग ज्या वाटेनें तो गृहस्थ आला होता, त्या वाटेवर तो दररोज जाऊन त्याला पाहत उभा राही. एके दिवशीं तो गृहस्थ पुनः त्याच वाटेनें आला, तेव्हां त्याच्याकडे धावत जाऊन त्यानें शिलिंगाची मोड त्याच्या हातावर ठेविली. हा असा त्या गरीब मुलाचा प्रामाणिकपणा पाहून त्या सरदारास मोठा संतोष वाटला; आणि त्यानें त्या मुलाची चौकशी करून त्याला आपल्या खर्चानें शाळेंत पाठवून शिकविलें. मग तो चांगला विद्याभ्यास करून हुशार झाला, असें पाहून त्याला त्यानें चांगला उद्योग लावून दिला.

## प्रामाणिक शेजारी.

एका गांवांत दोन मुलगे होते. त्यांचीं घरें एकमेकांपासून अमळ दूर होतीं; तरी ते नेहमीं एके ठिकाणीं मिळून खेळत असत. त्या दोघांनीं खबुतरें पाळिलीं होतीं. पण एकाचीं खबुतरें उत्तम जातीचीं होतीं, आणि दुसऱ्याचीं साधरण प्रतीचीं होतीं. एके दिवशीं त्या उत्तम खबुतरांपैकीं दोन येऊन दुसऱ्या मुलाच्या खबुतरांत मिसळलीं. तीं पाहून त्या मुलाच्या मनांत असें आलें कीं, अशीं नामीं खबुतरें आपणास मिळाल्यास चांगलें होईल. हीं आयतींच आपल्या घरीं आलीं आहेत,

तर तीं कांहीं दिवस येथें कोंडून ठेवावीं, ह्मणजे तीं आपणाकडे रहातील. पण लागलींच त्याला सुबुद्धि सुचून असली लबाडी आपण करूं नये असें त्याला वाटलें. मग त्यानें तीं खबुतरें पकडून आपल्या त्या सोबत्याकडे नेलीं. तीं गमावलेलीं खबुतरें पुनः मिळाल्याबद्दल त्याला मोठा आनंद झाला, आणि त्या आपल्या सोबत्याच्या प्रामाणिकपणाची त्यानें तारीफ केली. पुढें त्या चांगल्या खबुतरांनीं अंडीं घातलीं, तेव्हां त्यांतलीं दोन नेऊन त्यानें आपल्या त्या प्रामाणिक सोबत्याच्या खबुतरांच्या पोटांखालीं ठेविलीं. आपण काय केलें हें त्यानें त्याला कळूं दिलें नाहीं. पुढें तीं अंडीं उबून त्यांतून पिलें बाहेर पडलीं. तीं अर्थात् उत्तम जातीचीं होतीं. तीं पाहून त्या मुलास अतिशयित हर्ष झाला; आणि तो चमत्कार त्यानें आपल्या सोबत्यास कळविला. तो ऐकून त्यानें हसून आपण काय केलें होतें तें त्याला सांगून ह्मटलें कीं, "तो तुझ्या प्रामाणिकपणाचा मोबदला आहे."

## पायांत जोडे नाहींत.

एक गरीब मुलगा एका धनगराकडे नोकरीस राहून त्याचीं मेंढरें राखीत असे. तो अगदीं गरीब असल्यामुळें त्याला पायांत घालायाला जोडे मिळत नसत. ते दिवस थंडीचे असून चोहोंकडे बरफ सांचूं लागल्यामुळें त्याला त्यांतून अनवाणी चालावें लागे. एके दिवशीं रानांत एका निवाऱ्याच्या जागीं बसून तो आपल्या पायांला ऊब आणण्याकरितां ते हातांनीं चासून ह्मणत होता कीं, "आपणाला जोडे मिळतील तरच निभाव आहे; नाहीं तर ह्या बरफांतून हिंडावें लागून आपले फार हाल होतील." हे त्याचे शब्द एका चोरानें ऐकिले, आणि तो त्याच्या समोर येऊन ह्मणालाः "मुला, हें असलें रडकें काम सोडून तूं माझ्या धंद्यांत शीर. तूं माझ्याजवळ नोकरीस रहा.

ी तुला माझ्या धंद्यांत चांगला तरबेज करितों. मग तुला असलीं फाटकीं वस्त्रें पेहरावीं लागणार नाहींत, आणि अनवाणी चालावें लागणार नाहीं. फार काय, पण तुला कशाचीच ददात पडणार नाहीं." ई त्याचें गुलकावणीचें बोलणें ऐकून तो मुलगा ह्मणालाः "बाबा, चोरी करून पोट जाळावें किंवा मोठी मौज मारावी, यांत मला मुळीं सुख वाटत नाहीं. दुसऱ्याला नागवून कोणी सुखी होत नाहीं. असला अप्रामाणिकपणाचा व घातक धंदा पतकरून कांहीं दिवस मौज मारावी यापेक्षां माझी आहे ती स्थिति फार उत्तम आहे."

## सरदार आणि शेतकरी.

एक शेतकरी एका सरदाराकडे येऊन अशी कागाळी करूं लागला कीं, "रानाच्या लगत्यास माझें गव्हांचें शेत आहे, त्यांत तुमचे शिकारी कुत्रे हिंवाळ्यांत अनेक वेळां शिकारीसाठीं जमा होत असत. त्यांनीं तें शेत असें अगदीं तुडवून तोडून टाकिलें आहे कीं, मला त्यांतून कांहीं-एक उत्पन्न होण्याची आशा दिसत नाहीं." त्याची ती कागाळी खरी वाटून सरदार ह्मणालाः "तुझ्या नुकसानीचा बरोबर अंदाज होईल तर तेवढी मी भरून देण्यास तयार आहें." शेतकरी ह्मणालाः "महाराज, तुह्मी मोठे न्यायी व दयाळू आहां, तुह्मी माझें नुकसान भरून देण्यास कांकूं करणार नाहीं, हें जाणून माझ्या ओळखीच्या एका भल्या माणसाकडून माझ्या नुकसानीचा अंदाज मीं करविला आहे. त्याचें ह्मणणें असें आहे कीं, माझें फार तर पन्नास पौंडांचें नुकसान होईल." हें ऐकून त्या सरदारानें त्याला तेवढे पैसे तत्काळ दिले. पण पुढें शेतें पिकून हंगामाचे दिवस आले, तेव्हां त्या शेतकऱ्याला असें आढळून आलें कीं, शेताचा जो भाग कुत्र्यांनीं तुडविला होता, त्यांतलें पीक फारच नामीं आलें व नुकसान मुळींच न होतां उलट त्याचा फायदा

ला. हें पाहून तो शेतकरी त्या सरदाराकडे ती पन्नास पौंडांची कम घेऊन गेला आणि ह्मणाला: "महाराज, माझ्या शेताची खराबी ईल असें मला वाटलें होतें. पण तसें कांहींच झालें नाहीं. तर ही ापली रकम परत ध्या." सरदार ह्मणाला: "हा तुझा प्रामाणिकपणा हून मी फार खुश झालों आहें. मनुष्यांनीं परस्परांशीं असाच चोख ावहार ठेविला पाहिजे." असें ह्मणून तो सरदार घरांत जाऊन भर पौंडांचा चेक (हुंडी) घेऊन आला आणि ह्मणाला: हे भल्या मनुष्या, ही रकम नीट संभाळून ठेव, आणि तुझा मुलगा ांत आला ह्मणजे त्याला देऊन ही तुला कशी मिळाली तें सांग."

## एका शेतकऱ्याचा प्रामाणिकपणा.

एक मोठा व्यापारी एके समयीं रशियादेशांतील एका पातळ तीच्या प्रांतांतून प्रवास करीत असतां, एका गरीब शेतकऱ्याच्या ीं बिऱ्हाडास उतरला. एक रात्र त्याच्या घरीं राहून दुसऱ्या दिवशीं मार्गस्थ झाला. कांहीं मैल गेल्यावर आपली पैशांची पिशवी हरवली, सें त्यास आढळून आलें. तींत शंभर मोहरा होत्या. त्या शेतकऱ्याचा ऊगा दुसरे दिवशीं शिकारीस गेला असतां, त्याची ती मोहरांची शवी एका झाडाखालीं पडलेली त्यानें पाहिली; पण तिला हात न वितां तसाच घरीं येऊन त्यानें आपल्या बापाला तीविषयीं कळ- लें. त्यावरून तो ती पाहावयास गेला. पण त्यानेंही तिला हात न वितां आपल्या मुलास ह्मटलें: " ही कोणातरी वाटसराची पिशवी ाहे. आपण हिला हात लावूं नये. तर ही पातेरा वगैरे वाढून ाकून ठेव. ती शोधावयास कोणी आला असतां, आपण त्याला दाखवूं." ह्याप्रमाणें ती नीट झाकून ठेवून ते घरीं आले.

पुढें कित्येक महिने लोटल्यावर तोच प्रवासी पुनः त्याच शेतकऱ्याच्या घरीं उतरला; आणि भोजन आटोपल्यावर ते बोलत बसले असतां, व्यापारी ह्मणाला: " मागल्या प्रवासांत माझी शंभर मोहरांची एक पिशवी ह्या प्रांतांत हरवली. " त्या पिशवीच्या खाणाखुणा विचारून घेतल्यावर शेतकरी ह्मणाला: " तुमची पिशवी माझा मुलगा तुह्मांला दाखवील. ती पहिल्यानें त्याच्या नजरेस पडली असून, आह्मीं ती जेथल्या तेथें झाकून ठेविली आहे. तिला कोणींही हात लाविला नाहीं. " मग त्याच्या मुलानें त्या प्रवाशाला ती पिशवी दाखविली. तींतले सगळे पैसे जशाचेतसे आहेत हें पाहून त्याला मोठा हर्ष झाला, आणि त्यानें त्या शेतकऱ्याच्या प्रामाणिकपणाची फार तारीफ केली.

## खोटी शिक्षा.

कलकत्त्यास एक मोठा सधन गृहस्थ रहात असे. तो एकदां बरोबर मोठा इतमाम घेऊन हिमालयाच्या पायथ्यापर्यंत प्रवास करावयास निघाला. वाटेंत त्याच्या स्वारींतील एक हत्तीण महाताला अनावर होऊन रानांत कोठच्याकोठें निघून गेली. तिच्या मागून त्यानें पुष्कळ दौड केली, तरी ती त्याला सांपडली नाहीं. तेव्हां तो निरुपाय होऊन आपल्या धन्याकडे परत येऊन झालेली गोष्ट सांगूं लागला. पण त्याला ती खरी वाटेना. त्यानें ती हत्तीण दूर नेऊन कोणाला तरी विकून टाकिली असावी, असा वहीम येऊन त्या गृहस्थानें त्याच्यावर दगाबाजीचा खटला केला. त्यांत तो दोषी ठरला व त्याला जन्मकैदेची शिक्षा झाली. तुरुंगांत त्याची वर्तणूक उत्तम असल्यामुळें त्याला शिक्षा माफ होऊन तो कांहीं वर्षांनीं कैदेंतून सुटला. नंतर त्याला हत्ती पकडण्याच्या कामावर एका गृहस्थानें ठेविलें. हें काम

करण्यासाठीं इतर माणसांबरोबर तो रानांत गेला असतां, हत्तीच्या एका कळपांत एक हत्तीण त्याच्या नजरेस पडली. तेव्हां आपल्या हातची हत्तीण पळाली ती हीच, असा त्याला पक्का भरंवसा वाटून त्यानें तिला तिच्या नांवानें हाक मारिली. त्याबरोबर ती त्याच्याजवळ धावत येऊन गुडघे टेकून राहिली. तेव्हां तो तिच्यावर बिनदिक्कत बसला. त्या हत्तिणीनें आणखी तीन छावे आपल्या मागून आणिले. ते तिला रानांत पळून गेल्यावर झाले होते. ह्याप्रमाणें तो महात ती हत्तीण व ते छावे घेऊन आपल्या पूर्वीच्या धन्याकडे आला. तेव्हां अर्थात् त्या गृहस्थाला आपण केलेल्या अन्यायाबद्दल अतिशयित खेद झाला; आणि त्याच्या नुकसानीची भरपाई करण्यासाठीं त्या प्रामाणिक मनुष्याला आपल्या पदरीं कायमचा ठेवून घेऊन त्याला एक मोठें वतन इनाम करून दिलें.

## पैशांची पिशवी.

एक गरीब मुलगा वाटेंत एका झाडाखालीं बसून मोठ्यानें रडून देवाला आळवीत होता. इतक्यांत त्या वाटेनें एक सरदार आला. तो घोड्यावर बसून शिकारीस चालला असून त्याच्याबरोबर दुसरे शिकारी होते. तो मुलगा असा आडरानांत बसून कां रडत आहे, त्याचा तपास करावा ह्मणून तो त्याच्याजवळ जाऊन त्याला रडण्याचें कारण विचारूं लागला. मुलगा ह्मणाला: "माझी आई घरीं आजारी आहे. तिला शहरांतल्या वैद्याचें औषध चालू आहे. त्याचे कांहीं पैसे द्यावयाचे आहेत. ते माझ्या बाबानें माझ्याजवळ देऊन मला त्या वैद्याकडे जावयास सांगितलें. ते घेऊन मी चाललों असतां, वाटेंत ते कोठें सांडले. ते एका लहानशा पिशवीसकट सांडले. ती पिशवी शोधूनशोधून

मी थकलों. ती मला मिळेना. ह्मणून मी असा येथें शोक करीत बसलों आहें. माझा बाबा गरीब आहे. एवढे पैसे मजकडून सांडले हें कळलें ह्मणजे तो मला खरपूस मार देईल. आतां काय करूं!" असें बोलून तो पुनः ओकसाबोकशीं रडूं लागला. तो सरदार आपल्या बरोबरच्या एका शिकाऱ्याच्या कानांत कांहीं पुटपुटून त्या मुलास आपल्या खिशांतली रेशमी कपड्याची पिशवी दाखवून ह्मणालाः "ही पिशवी तुझी काय?" मुलानें उत्तर केलें: "ही माझी नव्हे. माझी पिशवी साध्या कपड्याची आहे, आणि तींत सोन्याचीं नाणीं नाहींत." तेव्हां त्या शिकाऱ्यानें आपल्या खिशांतली एक साधी पिशवी काढून त्याला दाखविली आणि विचारिलें: "ही तरी तुझी आहे काय?" ती पाहून तो मुलगा हर्ष पावून ह्मणालाः "होय, हीच माझी." ती त्याची पिशवी त्याला वाटेंत सांपडली होती. ह्मणून अर्थात् ती त्यानें त्याच्या स्वाधीन केली; आणि त्या सरदारानें आपली पिशवी त्याच्या हातावर ठेवून ह्मटलें: "मुला, तुझा असा प्रामाणिकपणा पाहून मी संतोष पावलों आहें. ही पिशवी तुला घे; आणि आपल्या आईच्या औषधोपचाराकडे हींतले पैसे लाव. तुला आणखी पैशांची गरज लागली तर माझ्याकडे ये, ह्मणजे मी तुला आणखी मदत करीन."

## दोन प्रामाणिक शेतकरी.

चिनदेशांतील एका शेतकऱ्यानें काटकसर करून कांहीं पैसे जमविले आणि त्यांची थोडीशी जमीन आपल्या शेजाऱ्याकडून विकत घेतली. ती हातीं आल्यावर तिची दुरुस्ती तो करीत असतां, तींत एके ठिकाणीं पुरलेलें बहुमोल जवाहीर व सोनें त्याला सांपडलें. तें पाहून त्याला तें आपल्याकडे ठेवण्याचा मोह झाला नाहीं.

तो मनांत ह्मणाला: " मी ही जमीन माझ्या शेजाऱ्याकडून योग्य किंमतीला विकत घेतली आहे. हींतलें हें धन कांहीं मीं विकत घेतलें नाहीं. तेव्हां हें त्याचें आहे, आपलें नव्हे." असा विचार करून त्यानें तें सगळें आपल्या त्या शेजाऱ्याकडे नेऊन ह्मटलें: " हें द्रव्य तुझें आहे. हें आपल्या स्वाधीन करून घे. " तो शेजारीही मोठा प्रामाणिक मनुष्य होता. तो कोणाच्या वित्ताचा हेवा करणारा नव्हता. तो म्हणाला: " बाबा, तुला मीं जमीन विकिली, यास्तव तींतल्या द्रव्यावर माझा हक्क राहिला नाहीं. हें सगळें धन तुझें आहे. त्याला मी शिवणार नाहीं. इतकीं वर्षें जमीन माझ्या ताब्यांत असून तींत मी मेहनत करीत असें, तथापि हें धन मला कधींच आढळलें नाहीं. तें तुलाच सांपडलें आहे. यास्तव तें तुझ्या नशिबानें तुला मिळालें आहे. त्याचा लोभ मीं करणार नाहीं. " हें बोलणें त्या प्रामाणिक गृहस्थाला न रुचून तो त्याला तें घेण्यासाठीं अतिशयित आग्रह करूं लागला; आणि तो त्याचा शेजारी तर मुळींच ऐकेना. असा त्यांचा वाद बरेच दिवस चालला. त्याचा निकाल लावण्यासाठीं ते जाणत्या माणसांकडे गेले. पण त्यांला तो तोडितां येईना. शेवटीं हा त्यांचा वाद राजाकडे गेला. तेव्हां त्यालाही कांहीं निकाल देतां येईना. शेवटीं राजानें त्यांला कांहीं मुलेंबाळें आहेत काय, ह्मणून विचारिलें. तेव्हां असें कळलें कीं, त्यांपैकीं एका गृहस्थाला मुलगी आहे, व दुसऱ्याला मुलगा आहे. हें ऐकून राजा ह्मणाला: " बरें तर, एकानें आपली मुलगी दुसऱ्याच्या मुलास देऊन त्यांचा विवाह करावा, आणि हें धन त्यांला आंदण ह्मणून द्यावें. " ही राजाची तोड सर्वांला पसंत वाटली, आणि त्या प्रामाणिक शेतकऱ्यांनीं त्यानें सुचविल्याप्रमाणें व्यवस्था केली.

## आब्राहाम लिंकन.

हा महापुरुष अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांचा दोन वेळां अध्यक्ष झाला. ह्याच्यासारखे सुजन व थोर पुरुष पृथ्वीतलावर फारच थोडे निर्माण झाले असतील. हा अगदीं गरीब स्थितींतल्या कुटुंबांत जन्मला असून एका झोंपडींत रहात असे. त्याची अतिशयित गरिबी असल्यामुळें त्याला शाळेंत किंवा पाठशाळेंत जाऊन विद्याभ्यास करण्याचा योग फारसा कधीं आला नाहीं. त्यानें दुसऱ्यांचीं पुस्तकें मिळवून तीं वाचून बरीच विद्या संपादन केली. त्याला लहानपणापासून पोटासाठीं मोलमजुरी करावी लागली, तरी त्यानें ग्रंथवाचनाचा हव्यास कधींही सोडिला नाहीं. कसलेही व कितीही श्रम करावे लागले, तरी फावल्या वेळीं ग्रंथावलोकन करण्याचा त्याचा क्रम आमरण कायम राहिला. आपल्या वडिलांच्या झोंपडींत राहून काबाडकष्ट करीत असतां, त्यानें एका गृहस्थाकडून जॉर्ज वॉशिंग्टन याचें चरित्र मागून आणिलें आणि तें जपून ठेवण्याचें वचन दिलें. तें तो रात्रीच्या वेळीं नित्य वाची. एके दिवशीं तें नेहमींच्या जागीं ठेवून तो निजला असतां, मोठा सोसाट्याचा वारा सुटून व पाऊस लागून त्याच्या झोंपडींत जिकडूनतिकडून पाणी आलें, आणि तें पुस्तक साफ भिजून गेलें. तें असें भिजून खराब झालेलें पाहून त्याला पराकाष्ठेचा खेद झाला. त्यानें तें उनांत वाळवून पाहिलें; पण तें कांहीं चांगलें झालें नाहीं. मग तें तसलें पुस्तक घेऊन तो त्याच्या मालकाकडे गेला, आणि तें कसें खराब झालें तें त्याला सांगून ह्मणाला: " महाराज, याच्या ऐवजीं नवें पुस्तक विकत घेऊन द्यावयास मजपाशीं किंवा माझ्या आईपाशीं पैसे नाहींत, तरी तुमची ही नुकसानी झाली आहे ती भरून देण्यासाठीं आपण सांगाल तें काम करण्यास मी तयार आहें." तो पुस्तकाचा मालक

अमळ लोभी व कठोर मनाचा मनुष्य होता. त्यानें त्याला आपलें एक मोठें शेत कापायास सांगितलें. तें कापावयास बरेच दिवस लागले. परंतु तेवढें सगळें त्याचें काम त्यानें पुरें करून दिलें. तेव्हां त्या गृहस्थानें तें खराब झालेलें पुस्तक त्याला दिलें. तें मिळाल्यानें आब्राहाम लिंकन यास मोठा आनंद झाला.

## प्रामाणिक बाई.

सेन्टपिटर्सबर्गशहराजवळील एका खेड्यांत एक जर्मन बाई रहात असे. जहाजांवरील मालीम त्या गांवांत उतरले ह्मणजे तिच्या घरीं भोजनासाठीं जात. त्यांला जेवायाला वाढून ती आपला निर्वाह चालवी. एके दिवशीं कांहीं डच मालीम तिच्या घरीं उतरले आणि रात्रीच्या समयीं भोजन करून निघून गेले. ते गेल्यावर मेजाखालीं पैशांची एक मोहोरबंद पिशवी तिला सांपडली. ती त्यांपैकीं कोणा तरी मालिमाची आहे असें वाटून तिनें ती आपल्या फडताळांत जशीची तशी जपून ठेविली. इकडे ते मालीम आपलीं जहाजें हाकारून चालते झाले. वारा अनुकूल लागल्यामुळें त्या पिशवीच्या मालकाला ती घेऊन जावयास परत येववलें नाहीं. ती पिशवी तिच्याकडे सात वर्षें राहिली. एवढ्या अवकाशांत ती मागावयास कोणी आला नाहीं. ती उघडून तींतले पैसे खर्चावे असें तिच्या मनांत कधींकधीं येई. पण ती पापभीरु असल्याकारणानें तिनें तिला मुळीं हात लाविला नाहीं. सात वर्षें लोटल्यावर एके दिवशीं चार मालीम तिच्याकडे जेवावयास आले. त्यांपैकीं तिघे इंग्रज होते आणि एक डच होता. भोजन चाललें असतां, एका इंग्रज मालिमानें त्या डच मालिमास विचारिलें: " काय हो, तुह्मी ह्या गांवीं पूर्वीं कधीं आलां होतां काय ? " तो ह्मणाला: " मला ह्या गांवाची पुरी आठवण

ाहे. ह्या गांवांतल्या एका भिकार झोंपड्यांत मीं एकदां सातशें रुबल अडीच रुपयांचें नाणें ) गमाविले आहेत. ते मीं एका पिशवींत ्विले असून असाच एका झोंपड्यांत जेवायास आलों असतां, ती ेशवी तेथें विसरून गेलों." हें त्यांचें भाषण त्या बाईनें ऐकून ाला विचारिलें: "त्या पिशवीला मोहर केली आहे काय?" तो णाला: "होय, ह्या माझ्या आंगठीचा ठसा तीवर आहे." तिनें ती- ावळ जाऊन पाहिलें, तेव्हां तिची खात्री होऊन तिनें ती पिशवी ाणून त्याच्या पुढें ठेविली. ती पाहून त्याला अतिहर्ष झाला; आणि ो उघडून तींतले पैसे त्यानें मोजून पाहिले, ते अगदीं बरोबर होते. ग त्यानें त्या बाईचे आभार मानिले व त्यांतला एक रुबल काढून टेब- ावर ठेवून ह्मटलें: "बाई, हा घे तुला." हा सगळा प्रकार पाहून ा इंग्रज मालिमांला मोठें आश्चर्य वाटलें. त्यांनीं त्या बाईच्या प्रामा- ीकपणाविषयीं अतिशयित तारीफ केली, आणि त्या डच मालिमाला टलें कीं, " हिच्या अशा प्रामाणिकपणाच्या कृतीचा मोबदला ह्मीं असा अगदीं थोडा द्यावा हें कांहीं बरोबर नाहीं. यांत तुमचा लक्केपणा मात्र दिसून येतो." मग त्यांच्या सांगण्यावरून त्यानें त्या ाईला त्यांतले शंभर रुबल दिले.

## चाकराचा प्रामाणिकपणा.

अमेरिकेंतल्या एका श्रीमंत बाईनें आपली हिऱ्याची आंगठी दुरुस्त रण्यासाठीं जवळच्या शहरांतल्या एका जवाहिऱ्याकडे नेऊन देण्यास ापल्या एका नोकराला सांगितलें. तो ती घेऊन चालला असतां, टेंत एक नाला लागला. त्यावरील पुलावरून जात असतां, तो ाला टेकून उभा राहिला, आणि ती आंगठी डबींतून काढून पाहूं ागला. ती निरखून पाहतांपाहतां त्याच्या हातांतून पडली. ती एका

लाकडाच्या पोकळ भागांत पडली असें वाटून तो ती बराच वेळ शोधीत राहिला. पण त्याला ती सांपडेना. तेव्हां तो अगदीं घाबरून गेला. परत जाऊन आंगठी सांडली ह्मणून सांगितलें, तर तें धनिणीस खरें वाटणार नाहीं. ती आपण खिशांत उतरली असें तिला खात्रीनें वाटेल. असा विचार त्याच्या मनांत येऊन तो परत तिच्याकडे गेला नाहीं. तो तेथून पळून गेला, आणि वेस्ट इन्डीज बेटांत जाऊन तेथें कांहीं उद्योग करूं लागला. त्यांत त्याला चांगली बरकत येऊन त्यानें पुष्कळ द्रव्य मिळविलें. तो असा सधन होऊन त्या प्रांतांत बऱ्याच वर्षांनीं आला. तेथें आल्यावर आपल्या त्या जुन्या धनिणीच्या मनांतला आपल्याविषयींचा किंतु काढून टाकण्याचा त्यानें निश्चय केला. मग ती जीवंत आहे असें कळल्यावरून एक हिऱ्याची आंगठी विकत घेऊन तो तिच्या गांवीं गेला. त्या गांवीं गाडीचा रस्ता नसल्यामुळें त्याला बरीच वाट पायीं चालावी लागली. तो असा चालला असतां, त्याच गांवीं जाणाऱ्या एका वाटसराशीं त्याची गांठ पडली. तेव्हां ते दोघे बोलत चालले असतां, त्यानें त्याला आपली पूर्वींची सगळी हकीकत सांगितली. पुढें त्या पुलावरून जात असतां, ज्या ठिकाणीं ती आंगठी पडली होती, तेथें तो उभा राहिला; आणि आपल्या छत्रीचें टोंक त्या लाकडाच्या पोकळ भागांत खुपसून ह्मणाला: “ ह्या जागीं ती आंगठी पडली होती.” असें ह्मणून तो छत्री उचलितो तों तिच्या टोंकांत अडकून ती सांडलेली आंगठी वर आली. ती हातांत घेऊन तो पाहतो तों ती त्या बाईची आंगठी आहे असें त्याला आढळून आलें. ती अशी इतक्या वर्षांनीं अचानक सांपडल्याबद्दल त्याला आश्चर्य व हर्ष वाटला. मग त्या बाईच्या घरीं जाऊन व ती तिची सांडलेली आंगठी तिच्या हातीं देऊन त्यानें आपली सगळी हकीकत तिला

सांगितली. तिची नोकरी सोडून आपण एकाएकीं पळून गेल्यामुळें तिला फार वाईट वाटलें व गैरसोय सोसावी लागली, ह्याबद्दलचा मोबदला ह्मणून त्यानें तिला द्यावयाला आणिलेली ती नवी आंगठी नजर केली.

## प्रामाणिकपणाचें फळ.

ख्रिस्ती लोकांच्या देशांत प्रत्येक खेड्यांत एक देवालय असतें, त्यावर एका धर्माधिकाऱ्याची नेमणूक करितात. तो तेथल्या लोकांचे सर्व धर्मसंस्कार करितो, व आठवड्यास एकदोन वेळां देवालयांत उपासना चालवून धर्मव्याख्यान देत असतो. अशा एका खेड्यांत एका धर्माधिकाऱ्याची नेमणूक झाली असून त्याचें वार्षिक वेतन अवघें चाळीस पौंडांचें होतें. एवढें वेतन त्याच्या सातआठ मुलांमाणसांस मुळीं पुरत नसे. त्यामुळें त्याला सदा विपत्तींत काळ कंठावा लागे; आणि आपली स्थिति सुधरावी कशी, ह्या विवंचनेंत तो रात्रंदिवस असे. एके दिवशीं तो आपल्या स्थितीविषयीं विचार करीत चालला असतां, त्याला वाटेंत एक पैशाची पिशवी सांपडली. तींत पुष्कळ पैसे होते. ती उचलून त्यानें घरीं नेऊन आपल्या बायकोला दाखविली. तेव्हां तिला लोभ सुटून ती ह्मणाली: “ आपली फारच गरिबी आहे, तरी हे पैसे आपल्या उपयोगास लावावे. ” तो ह्मणाला: “ असला अप्रामाणिकपणा मी प्राण गेला तरी करणार नाहीं. जें आपलें नव्हे, त्याचा अभिलाष आपण धरावा हें बरोबर नाहीं. ह्या पिशवीचा मालक सांपडेपर्यंत मी ही जशीचीतशी ठेवणार. ” पुढें कांहीं दिवसांनीं त्या पिशवीचा मालक सांपडून त्याच्या हवालीं त्यानें ती पिशवी केली. तेव्हां त्या पिशवीच्या मालकानें त्याचे नुसते आभार मानिले. तींतला एकही पौंड काढून त्यानें त्याला दिला नाहीं. तो

पिशवी देऊन परत आला तेव्हां त्याची बायको ह्मणाली: " असल्या कृतघ्न माणसाची पिशवी तुह्मीं कशाला दिली?" तो ह्मणाला: "आपण दुसऱ्याच्या पैशाचा लोभ कां ह्मणून धरावा? आपण प्रामाणिकपणानें वागलों तर त्याचें चांगलें फळ कधीं तरी मिळाल्या-वांचून रहात नसतें हें पक्कें ध्यानांत ठेव."

पुढें दोनतीन महिने लोटल्यावर त्या पिशवीच्या मालकानें त्या धर्माधिकाऱ्याला आपल्या घरीं मेजवानीस बोलाविलें आणि त्याची उत्तम बरदास्त ठेविली. भोजन आटपल्यावर तो गृहस्थ ह्मणाला: " तुह्मांला तीनशें पौंड वार्षिक वेतनाची नेमणूक एका शहरांतल्या देवळांत सांगून आली आहे. तिच्यासंबंधाचें हें पत्र व हा करार घ्या; आणि तुमची कांहीं देवघेव असल्यास ती वारून मोकळे होण्यासाठीं ही चाळीस पौंडांची रकम घ्या." हें आनंदाचें वर्तमान ऐकून व त्याचें औदार्य पाहून तो गरीब धर्माधिकारी अतिशयित हर्ष पावला आणि त्याचे आभार मानून धावत घरीं आला. त्यानें बायकोला हें वर्तमान कळवून ह्मटलें: "हें पाहा, आपल्या प्रामाणिकपणाचें कसें उत्कृष्ट फळ मिळालें तें!"

## एका पडाववाल्याचा प्रामाणिकपणा.

अमेरिकेंत मिसिसिपी नांवाची एक मोठी नदी आहे. तीवर पडाव चालविण्याचें काम करणाऱ्या एका इसमावर खुनाचा आरोप येऊन त्याला नाचेज येथील न्यायकचेरीपुढें चौकशीसाठीं आणिलें. त्या वेळीं न्यायकचेरीचें सहामाहीचें काम संपून तिला उन्हाळ्याची सुटी पडाव-याची असल्यामुळें त्याची चौकशी सुटी संपल्यावर व्हावी, आणि तितके दिवस त्याला अटकेंत ठेवावें; पण त्यानें दहा हजार डॉलरांचा जामीन

दिला तर त्याला सोडावें, असें ठरलें. त्या ठिकाणीं त्याच्या ओळखीचे फारसे कोणी नसून एवढें जोखीम घ्यावयास कोणी तयार होईना. त्यानें पुष्कळांला विनवून पाहिलें, पण कांहीं उपयोग होईना. इतक्यांत एका सधन गृहस्थाला त्याची दया येऊन तो त्याला तेवढ्या रकमेस जामीन रहावयास तयार झाला. हें त्याचें धाडस पाहून लोक त्याला नांवें ठेवूं लागले. कित्येक तर त्याला स्पष्टपणें सांगूं लागले कीं, "असल्या अनोळखी व फार दूरच्या गांवीं रहाणाऱ्या मनुष्याला जामीन राहून तुमची रकम कां व्यर्थ घालवितां?" पण त्या गृहस्थानें त्यांचा बुद्धिवाद न ऐकितां जामीनपत्रावर सही करून त्या पडाववाल्यास मोकळें केलें. मग तो तेथून आपल्या ठिकाणीं पडावांत बसून चालता झाला.

पुढें सुटी संपून न्यायकचेरी पुनः सुरू झाली, आणि त्याच्या चौकशीसाठीं नेमिलेली तारीख आली. तरी तो कांहीं त्या वेळीं कचेरींत हजर झाला नाहीं. त्याची चौकशी ऐकण्यासाठीं जमलेले लोक त्याच्या जामिनाला दोष देऊं लागले आणि त्या पडाववाल्यास शिव्याशाप देऊं लागले. पण तिसरा प्रहर उलटून गेल्यावर कचेरीचें काम आटपायाला आलें असतां, दुरून कोणी आरोळ्या मारीत आहे असें त्यांच्या कानीं आलें. त्या आरोळ्या जवळजवळ ऐकूं येऊं लागल्या; आणि आतां न्यायाधीश उठणार, तों त्याच्या समोर तो पडाववाला धावत येऊन दाखल झाला. तो धावतांधावतां अगदीं थकून गेल्यामुळें तेथें धापा टाकीत पडला. त्याच्या दाढीचे व डोकीचे केश वाढून त्यांच्या जटा झाल्या होत्या, व त्याचें डोकें रक्तानें माखलें होतें. तो असा आलेला पाहून त्या जामिनाला मोठा हर्ष झाला, आणि त्याला त्यानें मिठी मारिली. मग आपणाला कचेरींत वेळेवर दाखल

होण्यास कोणत्या अडचणी आल्या तें त्यानें सांगितलें. तो ह्मणाला: "माझें घर येथून तेराशें मैलांवर आहे. तेथें जाऊन माझ्या बायकोमुलांस भेटून परत इकडे यावयासाठीं एका पडावांत बसून मी निघालों. पण नदींतून तो पडाव चालावा तितका जलद चालेना. तेव्हां अशा ढिलाईनें आपणास नेमिलेल्या दिवशीं येथें येऊन हजर होतां येणार नाहीं असें वाटून, मीं रानांत उपळून पडलेल्या एका झाडाची लहानशी होडी बनविली आणि तींत एकटा बसून ती वल्हवून येथपर्यंत आलों." ही त्याची गोष्ट ऐकून कचेरींत जमलेल्या सगळ्या लोकांची त्याच्या प्रामाणिकपणाविषयीं खात्री झाली; आणि त्याला आपण उगीच शिव्या देत होतों असें त्यांला वाटलें. पुढें त्याची चौकशी होऊन योग्य पुराव्याच्या अभावीं तो दोषमुक्त झाला.

## आगकाड्या विकणारा मुलगा.

एडिनबरोशहरांत हिंवाळ्यामध्यें एक गृहस्थ रस्त्यांत उभा असतां, एक आगकाड्या विकणारा गरीब मुलगा आगकाड्यांच्या पेट्या पुढें करून त्याला ह्मणाला: " काड्या पाहिजेत काय ?" त्या गृहस्थानें आपणांस त्यांची गरज नाहीं ह्मणून सांगितलें. तरी तो झटीं पडून ह्मणाला: "एका पेनीला एक पुडकें देतों. एक पुडकें तरी घ्या हो ?" तो गृहस्थ ह्मणाला: "पण, बाबा, मला त्यांची जरूर नसतां त्या कशाला ह्मणून मी विकत घेऊं ?" मुलगा ह्मणाला: "महाराज, कसेंही करून एक तरी पुडकें विकत घ्या हो ! मला फार भूक लागली आहे." त्याचा असा अतिशयित आग्रह पाहून व त्याची पराकाष्ठेची कंगाल अवस्था लक्ष्यांत आणून, त्यानें एका पेनीच्या काड्या त्याच्याकडून घेतल्या; आणि तो खिशांत पाहतो तों लहान नाणें नाहीं, एक शिलिंग आहे असें त्याला आढळलें, ह्मणून तो त्याला ह्मणाला: "मुला,

मला आतां काड्या नकोत. माझ्याजवळ सुटे पैसे नाहींत. मी उद्यां तुझ्याकडून काड्या घेईन." मुलगा ह्मणाला: "महाराज, सुटे पैसे नसले तर मी शिलिंगाची मोड आणितों." असें ह्मणून त्याच्या हातचा शिलिंग घेऊन तो गेला; पण तो बराच वेळ परत आला नाहीं, तेव्हां तो गृहस्थ त्या पैशांची आशा सोडून आपल्या घरीं गेला.

बराच वेळ लोटल्यावर त्या गृहस्थाचा चाकर येऊन सांगूं लागला कीं, एक गरीब लहान मुलगा दाराशीं आला आहे, तो तुमच्यापाशीं कांहीं बोलूं इच्छीत आहे. काम काय आहे तें तो मला सांगत नाहीं." हें ऐकून तो गृहस्थ दारापाशीं आला. तेव्हां तो मुलगा ह्मणाला: "महाराज, माझ्या भावाकडच्या आगकाड्या आपणच घेतल्या काय ?" गृहस्थ ह्मणाला: "होय."मुलगा ह्मणाला: "तर मग तुमच्या अकरा पेनींपैकीं ह्या चार पेनी घ्या. माझा भाऊ अत्यवस्थ झाला आहे. तुमच्याकडचा शिलिंग वटवून आणीत असतां, वाटेंत तो गाडीखालीं सांपडून त्याच्या पायांवरून ती गेली, आणि त्याचे दोन्ही पाय तुटले. त्याच्या हातांतल्या अकरा पेनींपैकीं अवघ्या चार सांपडल्या, त्या ह्या मी घेऊन आलों आहें. वैद्य ह्मणतो कीं, तो त्यांतून वाटवणार नाहीं." असें बोलून त्यानें त्या चार पेनी त्याच्यापुढें ठेविल्या. हें खेदकारक वर्तमान ऐकून त्या गृहस्थाचें मन कळवळलें, आणि त्या लहान मुलाबरोबर तो त्या दुखापत झालेल्या मुलास पाहावयास गेला. तो त्याच्या झोंपडींत गेला तेव्हां त्याला असें आढळून आलें कीं, तो गरीब मुलगा मरणांत वेदना लागून इवळत पडला आहे; आणि त्याची शुश्रूषा वगैरे करायाला जवळ कोणी नाहीं. कारण त्या मुलांचे आईबाप मरण पावून ते अगदीं निराधार झाले होते. गृहस्थ जवळ गेला तेव्हां तो मुलगा ह्मणाला: "मी मोड घेऊन येत होतों तों माझ्या अंगावरून गाडी

गेली आणि माझे दोन्ही पाय तुटले. अररे ! आतां माझ्या चिमुकल्या लाडक्या भावाचें कसें होईल ! मी तर यांतून आतां वांचत नाहीं! माझे प्राण अगदीं कंठीं आले !" तो गृहस्थ ह्मणाला: "माझ्या बाळा, कांहीं चिंता करूं नको. तुझ्या भावाचा प्रतिपाळ मी करीन." हे आश्वासनाचे शब्द ऐकून त्या मुलानें त्याचे आभार मानिले आणि प्राण सोडिला !

## प्रामाणिक मुलगा.

एक गरीब मुलगा पौंड घेऊन मोड आणावयास बाजारांत गेला. जवळच एका मोठ्या व्यापाऱ्याचें कापडाचें दुकान होतें, तेथें तो नेऊन त्यानें वटविला आणि दुकानदारानें दिलेली मोड जपून कागदांत गुंडाळून घरीं नेली. तो संध्याकाळचा वेळ असल्याकारणानें आपण नाणीं आणलीं तीं बरोबर आहेत कीं नाहींत तें पाहण्यासाठीं घरीं गेल्यावर त्यानें तीं पुनः मोजून पाहिलीं, तों त्यांत एक पौंड आहे असें त्याला आढळून आलें. दुकानदारानें तो शिलिंगाच्या ऐवजीं चुकून दिला होता. ही चुकी आढळतांच तो ते पैसे घेऊन तसाच त्या दुकानदाराकडे धावत गेला आणि त्याला हाक मारून ह्मणाला: " तुह्मीं मला मोड बरोबर दिली नाहीं. " दुकानदार ह्मणाला: " जा ! जा ! मीं तुला ती अगदीं बरोबर मोजून दिली आहे. तूं वाटेंत त्यांतले कांहीं पैसे टाकिले असशील " मुलगा म्हणाला: " नाहीं हो! मीं सगळे पैसे कागदांत नीट गुंडाळून नेले, आणि घरीं जाऊन पुनः मोजूं लागलों तों–" ह्यापुढले शब्द तो बोलण्यापूर्वींच तो उतावळा दुकानदार ह्मणाला: " येथून चालता हो. तुझी तक्रार ऐकायाला मला वेळ नाहीं. मी मोड मोजून दिल्यावर त्यांतले कांहीं पैसे तूं खिशांत उतरले नसतील कशावरून ? " अशी त्यांची बोलाचाली चालली होती, ती दुकानाच्या मालकाच्या कानीं

जाऊन, तो तेथें येऊन काय झालें ह्मणून त्या मुलास विचारूं लागला. मुलगा ह्मणाला: " महाराज, माझ्या हातचे पैसे कांहीं सांडले नाहींत, किंवा कमी आले असेंही मी म्हणत नाहीं. पण यांनीं मला मोडींतून हा पौंड चुकून दिला आहे, हा कृपा करून परत घ्या, आणि ह्याच्या ऐवजीं मला एक शिलिंग द्या." दुकानाचा मालक ह्मणाला: "ठीक आहे. आण तो पौंड इकडे. मी तुला त्याबद्दल शिलिंग देतों. तुझ्या ह्या प्रामाणिकपणाबद्दल मी तुझा आभारी आहें. मुला, तूं गरिबाचा आहेस असें दिसतें. हे पैसे तुला चुकून दिले असून तुझी आह्मांला ओळखबिळख मुळीं नव्हती. यास्तव हा पौंड गेला कोठें याचा कांहींएक पत्ता आह्मांला लावतां आला नसता. तेव्हां हा पौंड तूं खिशांत घातला असतास तर चाललें असतें. पण तुला हा मोह कसा बरें झाला नाहीं ?" मुलगा म्हणला: "महाराज, माझ्या आईबापांचा मला असा उपदेश आहे कीं, दुसऱ्यांनीं आपल्याशीं ज्याप्रमाणें वागावें असें आपण इच्छितों, तसें आपण त्यांच्याशीं वागावें, हें आपलें कर्तव्य आहे. ह्मणून मला हा पौंड ठेवण्याचा कदाचित् मोह उत्पन्न होईल ह्या भीतीनें मी हा घेऊन लागलींच येथें धावत आलों." दुकानाचा मालक ह्मणाला: "हें तूं फार चांगलें केलें. तूं पुढेंही असाच प्रामाणिकपणानें वागून सुख पावशील अशी मला खात्री आहे. बरें, आतां ह्या तुझ्या प्रामाणिकपणाच्या वर्तनाबद्दल तुला मी काय देऊं ?" मुलगा ह्मणाला: " मला कांहींएक नको. मी प्रामाणिक मुलगा आहें अशी तुमची खात्री झाली आहे, एवढेंच मला पुरे आहे." दुकानदार ह्मणाला: "मुला, तुझा हा असा निर्लोभपणा पाहून मला अधिकच संतोष झाला आहे. मला एक मुलगा दुकानांत नोकरीस ठेवावयाचा आहे. तुझ्यासारखा प्रामाणिक मुलगा मला मिळाल्यास बरें

ोईल. यास्तव तूं माझ्या दुकानांत नोकरीस रहावयास तयार असलास र आपल्या वडिलांस विचारून ये आणि उद्यांपासून माझ्या दुकानांत हा." हें त्या मुलास पसंत वाटून त्यानें त्याबद्दल आपल्या वडिलांस वेचारिलें आणि त्या दुकानांत नोकरी धरिली. तेथें त्याच्या धन्यानें याला हिशोबाचें वगैरे काम शिकविलें आणि मोठ्या जबाबदारीचीं कामें देऊन सुखी केलें.

## पावांत मोहरा.

एक गरीब मनुष्य मोलमजुरी करून आपला व आपल्या एका लहान मुलाचा कसाबसा निर्वाह चालवीत असे. एके दिवशीं संध्याकाळीं मिळालेल्या पैशांचा एक मोठा पाव विकत घेऊन तो घरीं आला. त्याचा मुलगा भुकेनें व्याकूळ होऊन त्याची वाट पाहत होता. बापाला पाहून मुलास आनंद झाला. मग त्यानें आणिलेल्या पावाचे दोन तुकडे करून एक आपल्या मुलास दिला आणि एक आपण घेऊन ह्मणाला: "बाळा, आज फारसें काम न मिळाल्यामुळें एवढ्या पावावरच आपणांला रात्र काढिली पाहिजे. तर हा खाऊन पाणी पी आणि झोपीं जा." मुलगा ह्मणाला: "बाबा, तुह्मी सगळा दिवस कष्ट करून दमून आलां आहां, तर तुह्मी हा मोठा तुकडा घ्या आणि मला तो लहान तुकडा द्या; आणि पहिल्यानें तुह्मी हा खा, ह्मणजे मी खाईन." बापानें मुलाचें चुंबन घेऊन ह्मटलें: "बाळा, तुझें माझ्यावर असें प्रेम आहे हें पाहून मला मोठें समाधान वाटत असतें. मला कितीहि श्रम झाले तरी तुला पाहिलें ह्मणजे त्यांचा अगदीं परिहार होतो. तुझ्या संतोषासाठीं हा तुकडा मोडून थोडासा आणखी घेतों. पण मोठा तुकडा तूंच खा. तुला पोटभर खातांना पाहून मला संतोष वाटतो, तसा माझें पोट भरल्यानें मला वाटत

नाहीं." असें ह्मणून त्यानें तो तुकडा मोडिला, तों त्यांतून कांहीं सोन्याचीं नाणीं बाहेर पडलीं. तीं पाहून मुलास मोठा हर्ष झाला, आणि तीं उचलावयास तो आतुर झाला. पण बाप ह्मणाला: "बाळा, याला हात लावूं नको. हे पैसे आपले नव्हत." मुलानें विचारिलें: "बाबा, हे पैसे आमचे नव्हत, तर मग कोणाचे?" बाप ह्मणाला: "हे कोणाचे तें मला ठाऊक नाहीं. रोटीवाल्यानें ह्या पावांत ते घातले असावे आणि चुकून हा पाव मला दिला असावा. याची आपण चौकशी करूं या." मुलगा ह्मणाला: "पण, बाबा, आपण गरिब आहों; आपण कंगाल आहों; आणि हा पाव तुह्मीं विकत घेतला ना?" बाप ह्मणाला: "तुझी ही मसलत मी ऐकणार नाहीं. मीं पाव विकत घेतला, पण त्यांतले पैसे कांहीं विकत घेतले नाहींत. रोटीवाल्यानें हा पाव मला चुकून विकिला असावा. त्याला यांत पैसे आहेत हें कदाचित् कळलें नसावें. तेव्हां त्याच्या चुकीचा फायदा घेऊन मीं हे पैसे दपटले तर मी मोठा अप्रामाणिक ठरेन. हें कांहीं बरोबर नाहीं. अशी लबाडी करून पोट जाळण्यापेक्षां उपाशीं मेलेलें मला पतकरेल. तर धावत जाऊन रोटीवाल्यास हा प्रकार सांग आणि येथें बोलाव. तो येईपर्यंत मी ह्या मोहरा राखीत बसतों." बापाच्या आज्ञेप्रमाणें त्या मुलानें रोटीवाल्यास बोलावून आणिलें. तेव्हां तो गरीब मनुष्य ह्मणाला: "दादा, तूं ही अशी चुकी करून आपले पैसे नाहक गमावीत होतास. हे तुझे असल्यास उचलून घे. आह्मीं त्यांला हात सुद्धां लाविला नाहीं." मुलगा मोठ्या उत्कंठेनें ह्मणाला: "रोटीवालेदादा, माझा बाबा फार गरीब आहे, तरी—" हे शब्द तो बोलत आहे तोंच बाप त्याला दटावून ह्मणाला: "चूप, बोलूं नको. असले दीनपणाचे शब्द बोलून तूं मला लाजवूं नको. ह्या मनुष्याचें

हें असें नुकसान होत होतें तें आपण टाळिलें यांतच मला संतोष वाटत आहे." रोटीवाला त्या मनुष्याच्या व मुलाच्या तोंडांकडे चाळून-पाळून पाहून व त्या मोहरांवर नजर टाकून ह्मणाला: "बाबा, तूं मोठा प्रामाणिक व योग्य मनुष्य आहेस. आतां ह्या पैशांसंबंधाची हकीकत तुला मी सांगतों. दोन दिवसांपूर्वी एक गृहस्थ माझ्याकडे आला आणि माझ्या हातीं हा पाव देऊन ह्मणाला: "तुमच्या गांवांत जो कोणी अतिप्रामाणिक व गरीब मनुष्य असेल, त्याला हा विका किंवा फुकट द्या. तूं संध्याकाळीं पाव घ्यावयास आलास तेव्हां हा तुला मीं विकिला. तर हा पाव आणि यांतले हे सगळे पैसे तुझे आहेत. शिवाय त्या गृहस्थानें ही आपल्या नांवाची चिठ्ठी मजकडे दिली आहे. ही घेऊन त्याचा शोध लाव आणि त्याला भेट, ह्मणजे तो तुला चांगलें काम देईल." हें ऐकून त्या गरीब मनुष्याला अतिहर्ष झाला, आणि तो भुईवर दंडासारखा पडून देवाचे आभार मानूं लागला. त्या मुलानें बापाला मिठी मारून ह्मटलें: "बाबा, हें तुझ्या प्रामाणिकपणाचें फळ आहे. मीही तुझ्यासारखा प्रामाणिकपणानें वागेन."

## गुराख्याचा मुलगा आणि सरदार.

एका सरदारानें आपल्या शेजारच्या एका शेतकऱ्याकडून एक दुभती गाय विकत घेऊन ती आपल्या घरीं पोंचती करायाला त्यास सांगितलें. त्यानें आपल्या गुराख्याच्या मुलास ती त्याच्या वाड्यांत घेऊन जावयास सांगितलें. दुसरे दिवशीं सकाळीं त्या गाईच्या गळ्यांत दोरी अडकवून तो मुलगा तिला हाकून नेऊं लागला. पण ती अमळ उच्छृंखळ असल्यामुळें त्याला ती आवरेना. तिला ओढितांओढितां तो अगदीं जेरीस आला. ह्या वेळीं तो सरदार सकाळची सहल करावयास निघाला असून, तो मुलगा गाईला ओढीत चालला होता

त्याच वाटेनें आला. त्या मुलानें त्या सरदारास पूर्वीं कधीं पाहिलें नसल्यामुळें तो कोणी तरी साधारण प्रतीचा माणूस असावा असें वाटून, त्याला तो हाक मारून ह्मणाला: "अरे हे भल्या मनुष्या, ही गाय त्या समोरच्या मोठ्या वाड्यांत हाकून न्यायाला मला मदत करशील तर ह्या कामगिरीबद्दल मला जें कांहीं मिळेल, त्यांतलें तुला अर्धें देईन." हें त्याचें केविलवाणीपणाचें बोलणें ऐकून तो सरदार मागें आला आणि त्या मुलास ती गाय हाकून नेण्यास मदत करूं लागला. ते असे चालले असतां, सरदारानें त्याला विचारिलें: "ह्या कामाबद्दल तुला कांहीं मिळेलसें वाटतें काय?" मुलगा ह्मणाला: "तीं वाड्यांतलीं माणसें मोठीं उदार आहेत. तीं कोणाची मेहनत फुकट घेत नसतात. तीं कांहीं तरी देतील अशी माझी पक्की खात्री आहे." ह्याप्रमाणें बोलतांबोलतां ते वाड्याजवळच्या गल्लीच्या नाक्यावर आले, तेव्हां तो सरदार त्याला तेथें सोडून दुसऱ्या वाटेनें वाड्यांत गेला आणि आपल्या चाकराला हाक मारून ह्मणाला: "वाड्यांत एक मुलगा गाय घेऊन येईल, त्याच्या मेहनतीबद्दल हा पौंड त्याला दे." त्या चाकराला असें वाटलें कीं, एवढ्याशा कामासाठीं त्या पोराला एक पौंड द्यावयाचा ह्मणजे काय? त्याला फार तर एक शिलिंग दिला ह्मणजे बस होईल. असें मनांत आणून त्या चाकरानें त्या मुलाच्या हातावर एक शिलिंग ठेविला. तो मिळाल्याबद्दल आनंद वाटून तो गल्लीच्या तोंडाशीं आला असतां, सरदारानें त्याला गांठून विचारिलें: "काय रे, तुला त्यांनीं कांहीं दिलें कीं नाहीं?" मुलगा ह्मणाला: "होय, त्यांनीं मला हा पाहा एक शिलिंग दिला आहे; आणि मीं बोली केल्याप्रमाणें यांतल्या सहा पेनी तुझ्या आहेत." सरदार ह्मणाला: "काय, तुला अवघा एक शिलिंग मिळाला? तूं खोटें बोलतोस."

त्यानें उत्तर केलें: "मी खोटें कशाला बोलेन. त्यांनीं अधिक पैसे दिले असते, तर ते मी लपवून का ठेविले असते? त्यांनीं दिलेले पैसे हे पाहा माझ्या हातांत आहेत; आणि एवढ्याशा कामासाठीं त्यांनीं मला अधिक पैसे तरी काय ह्मणून द्यावे? हे त्यांनीं दिले आहेत, तेच कामाच्या मानानें जास्त आहेत." सरदार ह्मणाला: "छे, छे, यांत कांहीं तरी गफलत झाली आहे. तुला त्यांनीं ह्यापेक्षां कांहीं तरी जास्त द्यायाला हवें होतें. तर मजबरोबर वाड्यांत चल. तो सरदार माझ्या ओळखीचा आहे. तुला जास्त पैसे देण्यास मी त्याला सांगतों." त्यावरून तो मुलगा त्याच्याबरोबर पुनः वाड्यांत गेला. तेथें पोंचल्यावर सरदारानें आपल्या सगळ्या नोकरांस जमवून मुलास ह्मटलें: "तुला ज्या मनुष्यानें शिलिंग दिला, तो मला दाखीव." तेव्हां त्यानें त्यांतल्या एका नोकराकडे बोट केलें. त्याबरोबर तो नोकर सरदारापुढें गुडघे टेकून हात जोडून ह्मणाला: "धनीसाहेब, मला हा गुन्हा माफ करा." पण सरदार ह्मणाला: "तुझ्यासारखा लबाड मनुष्य माझ्या पदरीं राहूं देणें मुळींच ठीक नाहीं. तर तूं आतांच्याआतां माझी नोकरी सोडून चालता हो." मग तो त्या मुलाकडे वळून ह्मणाला: "मुला, तुझा हा प्रामाणिकपणा व मर्दुमकी पाहून मी संतोष पावलों आहें. तुझें हें वय विद्याभ्यास करण्याचें आहें. यास्तव तुला मी माझ्या खर्चानें शाळेंत पाठविणार आहें, व तुझें कल्याण करावें असें माझ्या मनांत आलें आहे." ते त्याचे शब्द ऐकून मुलानें गुडघे टेकून त्याचे उपकार मानिले.

## लेडी क्लेअर.

ही स्कॉटलंडांतल्या एका बड्या सरदाराची मुलगी मानिली असून, तो मरण पावल्यावर त्याच्या सगळ्या वतनाची ती वारस समजत. त्या

सरदाराचा रोनाल्ड नांवाचा एक नातलग होता. तोही मोठा सरदार असून जवळच्या गांवीं रहात असे. ह्या रोनाल्डचें त्या मानलेल्या सरदारकन्येवर प्रेम जडून तिच्याशीं विवाह करण्याचें त्यानें ठरविलें.

एके दिवशीं हा तरुण सरदार तिच्या भेटीला आला आणि तिला एक उत्तम हरिणी नजर करून परत गेला. तेव्हां तिची उपमाता ( अंगावर पाजणारी दाई ) तिच्याजवळ येऊन ह्मणाली: " काय ग, मुली, आतां येथें कोण येऊन गेला ?" तिनें उत्तर केलें: " दाई, तो माझा प्रियकर रोनाल्ड आतां आला होता. तो ही हरिणी मला देऊन गेला. आतां लौकरच त्याचें व माझें लग्न होणार. " हे शब्द ऐकून ती ह्मणाली: " तुझा त्याचा विवाहसंबंध झाल्यानें फार चांगली गोष्ट होईल. देवाच्या घरीं नेहमीं न्याय होतो ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. ह्याबद्दल मी देवाची मोठी आभारी आहें. मुली, ह्या सगळ्या वतनवाडीचा खरा वारस लॉर्ड रोनाल्डच आहे बरें; आणि तूं कांहीं खरी लेडी क्लेअर नव्हस. " मुलगी ह्मणाली: " अग दाई, तूं हें काय भलतेंच बोलतेस ? तुझ्या बुद्धीला भ्रम तर झाला नाहीं ना ?" दाई ह्मणाली: " मी देवाची आण वाहून सांगतें कीं, तूं सरदाराची मुलगी नव्हस. तूं माझी मुलगी आहेस. लॉर्ड क्लेअर याची एक मुलगी होती, तिला पाजायाला मला ठेविलें होतें. पण ती मेली तेव्हां तिच्या जागीं माझी मुलगी ठेवून, तिला मी माझ्या पोटच्या मुलीप्रमाणें मूठमाती दिली. ह्यातान्या सरदाराला एवढी एकच मुलगी होती. ती मेल्याचें दुःख त्याला होऊं नये ह्मणून मीं ही लबाडी केली. यांत एक अक्षरही खोटें नाहीं." हें ऐकून ती मुलगी ह्मणाली: " तर मग, माझे आई, तूं ह्मणतेस तें खरें असल्यास ही मोठीच लबाडी तूं केली. अग, अशा उत्तम पुरुषाला ही सगळी वतनवाडी जायाची असून तुझ्या कपटामुळें तो तिला

इतकीं वर्षें अंतरला होता ना!" दाई ह्मणाली: "मुली, आतां ह्या गुप्त गोष्टीचा बभ्रा करूं नको; नाहीं तर तुझा आणि माझा प्राण जाण्याचा प्रसंग येईल. उद्यां तुह्मां दोघांचा विवाह झाला ह्मणजे मग ही सगळी वतनवाडी त्याच्याच हातीं जाणार आहे." मुलगी ह्मणाली: "छे! छे! अशी लबाडी मी कधीं करणार नाहीं. मी गरिबाच्या पोटीं जन्मास आलें आहें हें जर खरें आहे, तर तें मी इतःपर छपवून ठेवणार नाहीं. हा माझ्या केशांतला सोन्याचा डागिना काढून टाक. हा माझ्या गळ्यांतला रत्नहार फेंकून दे." हा तिचा चित्ताचा उद्वेग पाहून दाई ह्मणाली: "मुली, ही गोष्ट बाहेर न फोडशील तर त्यांत तुझें हित आहे. अग, तुझ्या अशा करण्यानें तूं ह्या सगळ्या वैभवाला मुकशील, आणि तुला ते हालहाल करून ठार मारितील." मुलगी ह्मणाली: "कांहीं चिंता नाहीं. माझें काय होईल तें होवो. पण अशा ह्या लबाडीनें मिळविलेल्या वैभवाचा उपभोग मी कदापि घेणार नाहीं. आतां रोनाल्ड याचें मजवर प्रेम जडलें आहे तें माझ्या वतनापुरतें आहे कीं माझ्या गुणांकडेच पाहून तो मजवर प्रेम करीत आहे, हें पाहण्याची ही एक उत्तम संधि आहे" दाई ह्मणाली: "मुली, तूं वेडी आहेस. असें निर्लोभ प्रेम पुरुषानें कधीं कोणावर केलें आहे? अग, तो आपल्या हक्काची ही वतनवाडी स्वाधीन करून घेईल आणि तुला व मला शासन करावयास चुकणार नाहीं." मुलगी ह्मणाली: "कांहीं चिंता नाहीं. त्याची वतनवाडी त्याला मिळावी हें अगदीं रास्त आहे. ह्याबद्दल माझें कांहींही झालें तरी त्याची मला परवा नाहीं. मी त्याला ही गोष्ट आतांच्याआतां जाऊन कळविणार." असा तिचा विलक्षण निर्धार पाहून दाई निरुपाय झाली आणि ह्मणाली: "मुली, तूं त्याला ही गोष्ट कळवायाला चाललीसच तर एकूण? तुझ्या बऱ्यासाठीं मीं हें पाप केलें. पण तुला तें सहन

होत नाहीं. तर आतां तुझ्या ह्या प्रेमळ आईला एक मुका तरी दे." मुलगी ह्मणाली: "माझे प्रिय माते, तूं ही मोठी चमत्कारिक गोष्ट केली आहे. त्याला आतां कांहीं इलाज नाहीं. हा घे माझा मुका; आणि तूं माझी खरी आई आहेस तर माझ्या मस्तकीं तुझा हात ठेवून मला आशीर्वाद दे, ह्मणजे मी रोनाल्डच्या गांवीं जातें."

ह्याप्रमाणें त्या अत्यंत प्रामाणिक व सत्वशील मुलीनें अगदीं साध्या गरीब कुळांतल्या मुलीसारखा पेहराव करून रोनाल्डच्या गांवाची वाट तत्काळ धरिली. ती दऱ्याडोंगर ओलांडून एकटीच त्याच्या वाड्यापाशीं जाऊन पोंचली. तिला दुरून पाहून रोनाल्ड आपल्या वाड्यांतून लगबगीनें खालीं आला आणि तिचा हात धरून ह्मणाला: "प्रिये, तूं अशीं साधीं व हलकीं वस्त्रें लेवून एकटी रानावनांतून पायीं चालत आलीस हें काय? हें तुझ्या व माझ्या पदवीला मुळीं शोभत नाहीं. तूं अशी एकदम इकडे कां आलीस तें पहिल्यानें सांग." तिनें उत्तर केलें: "महाराज, मी फाटकींतुटकीं वस्त्रें नेसून आलें आहें, याबद्दल आपणांस आश्चर्य वाटायाला नको. मी गरीब कुळांत जन्मलें असून अशींच वस्त्रें वापरण्याच्या लायकीची आहें." तो ह्मणाला: "भलतेंच काय बोलतेस? हा विनोद पुरे कर आणि तूं कां आलीस तें सांग." मग तिनें आपल्या दाईचें सगळें कपट सांगून ह्मटलें: "महाराज, तुमच्या हक्काच्या आड माझी वेडी आई इतके दिवस आली ह्याबद्दल तुम्ही तिला क्षमा करा; आणि मी हलक्या कुळांतली एक गरीब मुलगी आहें, यास्तव मजवरचें प्रेम काढून घ्या." तो सरदार ह्मणाला: "अग, तूं लॉर्ड क्लेअरच्या वतनाची वारस नसलीस आणि मी असलों तरी कांहीं हरकत नाहीं. उद्यां तुझा माझा विवाह झाला ह्मणजे ती वतनवाडी व माझी वतनवाडी एक होऊन दोहोंचाही उपभोग तूं आणि मी मिळून घेऊं. माझें तुजवर प्रेम

जडलें आहे, तें कांहीं तुझा कुलीनपणा किंवा वतनवाडी पाहून जडलें नाहीं. तर तुझ्या अंगचे अप्रतिम गुण पाहून तें जडलें आहे; आणि आतां तूं जो अलौकिक प्रामाणिकपणा प्रगट केला आहे, त्याच्या योगानें माझें तुजवरचें प्रेम शतगुणित वाढलें आहे. तर आतां आपल्या वाड्यांत परत जा आणि उदयिक विवाहास तयार हो."

## एका गरीब मुलाचा प्रामाणिकपणा.

दोन गरीब मुलांचे आईबाप मरण पावल्यामुळें त्यांना त्यांच्या मावशीनें आपल्या घरीं आश्रय दिला होता. पण ती स्वत: गरीब असून काबाडकष्ट करून पोट भरी. यास्तव ह्या मुलांसही कांहीं तरी काम करून मावशीकडे पैसे आणून द्यावे लागत. तीं दोघें वर्तमानपत्रें विकीत असत. हिंवाळ्यांत एके दिवशीं तीं मुलें संध्याकाळच्या वेळीं एका मोठ्या रहदारीच्या रस्त्यावर इकडूनतिकडे धावून पत्राचें नांव पुकारीत होतीं. त्यांपैकीं मुलगी होती ती, एक मोठी भाड्याची गाडी आली, तिजकडे धावत जाऊन तींतील लोकांस पत्र पाहिजे काय ह्मणून मोठ्या दीनवाणीनें विचारूं लागली. पण तिच्याकडून कोणीही तें घेईना. तेव्हां एका गृहस्थाला दया येऊन त्यानें तिच्या-कडचें एक पत्र विकत घेतलें; पण तिला द्यायाला सुटी पेनी त्याच्या खिशांत नव्हती. एक क्राऊन ( पांच शिलिंग ) काय तो होता. मुलीनें त्याची मोड आणितें ह्मणून हातांतले कागद त्या गृहस्थाच्या मांडीवर ठेवून जवळच्या एका मोठ्या दुकानाकडे धाव मारिली. पण त्यांत गर्दी फार असल्यामुळें तिची तेथें दाद लागेना. ह्मणून तिला आणखी एकदोन दुकानें हिंडावीं लागलीं, तेव्हां तिला मोड मिळाली.

ती जाऊन दोनतीन मिनिटें झालीं, तरी ती परत येईना. तेव्हां त्याच्या बरोबरचे गाडींतले दुसरे लोक त्याची थट्टा करूं लागले आणि

ह्मणूं लागले कीं,तुह्मीं भोळ्या भावानें रुपया काढून त्या पोरीच्या हातांत दिला. ती हो आतां कशाला परत येते? आतां गाडींतून येथें उतरा आणि तिचे हे कागद विकून आपले थोडे तरी पैसे उगवून घ्या." पण त्या गृहस्थाचें मन एवढें अधीर नव्हतें. ती मुलगी आपणाला फसवील असें त्याचें मन त्याला मुळीं सांगेना. गाडीवाल्यानें त्या मुलीची थोडा वेळ वाट पाहून गाडी हाकिली.

इकडे ती मुलगी मोड घेऊन परत त्या जागीं येते तर गाडी निघून गेली असें तिला आढळलें. तेव्हां आतां काय करावें असा तिला पेंच पडला. मावशीकडे परत जावें तर कागद एकदोन खपून बाकीचे दहाबारा त्या गाडींतून गेले. आतां कागद ज्याच्याकडून विकावयास आणिले, त्याला द्यावें काय, हाही एक विचार तिच्या मनांत आला. अशी ती विवंचनेंत असतां, तिचा भाऊ तिच्याकडे येऊन ह्मणाला: "ताई, तुझें नशीब चांगलें खरें. तूं आपले सगळे कागद खपवून मोकळी झालीस ना!" हा प्रश्न ऐकून तिनें त्याला आपली सगळी हकीकत सांगितली. तेव्हां आपल्या बहिणीला एवढे पैसे अचानक मिळाल्याचा त्याला अतिहर्ष झाला, आणि तो नाचूंउडूं लागला. तो तिला ह्मणाला कीं, "ताई, हे पैसे तूं मावशीकडे देऊं नको. कागदांचे तेवढे पैसे तिच्या हातावर ठेव, आणि बाकीच्यांवर आपण आज चंगळ मारूं या." ती ह्मणाली: "भाऊ, हें तुझें ह्मणणें मला रुचत नाहीं. हे पैसे कांहीं आपले नव्हत. ते दुसऱ्याचे आहेत. ते आपण उडविले तर अप्रामाणिकपणाचें पातक आपल्या हातून होईल; आणि मग आपणांवर कोणीही विश्वास ठेवणार नाहीं. तरी हे पैसे मी असेच जपून ठेवितें आणि तो गृहस्थ भेटला ह्मणजे त्याला देतें." हें तिचें ह्मणणें त्यालाही पसंत वाटलें. मग त्या मुलीनें आपल्या भावाकडचे

थोडे कागद विकिले. सगळे कागद संपायाला रात्रीचे दहा वाजले. मग तीं दोघेंजणें बिऱ्हाडाकडे जावयास निघालीं. इतक्यांत ती मुलगी भावाला झुकांडी देऊन गेली. तिचा त्यानें कांहीं वेळ शोध केला, पण ती कोठेंच आढळेना. तेव्हां तो निरुपाय होऊन खेद करीत घरीं गेला.

त्या मुलीनें भावाची नजर चुकवून पळ काढिला, आणि ती संध्या-काळची गाडी परत येतांना आढळते कीं काय तें ती पाहूं लागली; तों त्या गाडीचा लाल दिवा दुरून तिच्या नजरेस पडला. त्याबरोबर ती त्या गाडीकडे धावत गेली, आणि ती हाकणाराला विचारूं लागली कीं, "तुमच्या गाडींतील ज्या गृहस्थास मीं पत्र विकिलें, त्याचें नांव व पत्ता हीं तुह्मांला ठाऊक आहेत काय ? मला त्याचे पैसे द्यावयाचे आहेत." तो गाडीवान ह्मणालाः "मला त्याचें नांव कांहीं ठाऊक नाहीं. पण तो कोठें रहातो तें मला ठाऊक आहे. त्याचें घर येथून बरेंच दूर आहे. पण तूं माझ्या गाडींत माझ्याजवळ बसून मजबरोबर येशील तर मी तुला त्याच्या घरापाशीं नेऊन उतरितों. तें कबूल करून ती त्याच्या गाडीवर बसून त्या गृहस्थाच्या घरीं गेली आणि दार ठोकूं लागली. तेव्हां तो स्वतः दार उघडायास आला आणि त्या गरीब मुलीस पाहून चकित झाला. ती वाऱ्यानें व थंडीनें कुडकुडत होती. ह्मणून तिचे दोन्ही हात आपल्या हातांत धरून तो तिला आपल्या शेगडीपाशीं घेऊन गेला आणि बायकोला हाक मारून ह्मणालाः "ही पाहा ग ती मुलगी. ही माझे पैसे देण्या-साठीं इतकी दूर थंडींतून आली आहे." मग तिला शेगडीपाशीं बसवून तिची सगळी हकीकत त्यांनीं मोठ्या ममतेनें ऐकून घेतली. ती ऐकून त्यांच्या डोळ्यांतून आसवें गळूं लागलीं. तिची इतकी कंगाल

स्थिति असून ती अशी प्रामाणिक आहे हें पाहून त्यांला तिचें कौतुक वाटलें. मग त्यांनीं तिला पोटभर जेवायाला वाढून निजायाला चांगली जागा दिली. सकाळीं उठून न्याहारी केल्यावर ती परत जाऊं लागली, तेव्हां त्या बाईनें तिला ह्मटलें: " मुली, मला तुझ्या वयाची व तुझ्यासारखी विश्वासू मुलगी माझें तान्हें मूल संभाळायाला हवी आहे. तूं रहात असलीस तर तुला आह्मी मोठ्या आनंदानें ठेवूं. आमच्याकडे रहाण्याची तुझी मर्जी असल्यास आपल्या मावशीस विचारून ये." हें असें सुखाचें काम मिळालेलें पाहून तिला फार हर्ष झाला; आणि ती मावशीची परवानगी घेऊन येऊन त्यांच्या घरीं नोकरीस राहिली.

# भाग पांचवा.

## अप्रामाणिकपणाचे वाईट परिणाम.

### अप्रामाणिक हमाल.

एका दारूच्या व्यापाऱ्याला आपल्या हमालास दारूच्या कोठारांत एकटें सोडून जावें लागलें. पण आपल्या पाठीमागें तो चोरून दारू पिईल या भीतीनें त्यानें त्याला ह्मटलें कीं, "तुझ्या तोंडाला खडू लावितों, ह्मणजे माझ्या मश्चात् तूं दारू प्यालास तर मला कळेल." मग त्या व्यापाऱ्यानें त्याच्या ओठांवर खडूच्या खुणा करण्याच्या मिषानें आपलें बोट त्यांवरून ओढिलें. तो गेल्यावर त्या हमालानें पिंपांतल्या दारूनें बाटल्या भरण्याचें काम करीत असतां तीवर यथास्थित ताव मारिला, आणि धनी परत येण्यापूर्वीं सगळें काम आटपून आपली चोरी उमगूं नये ह्मणून आपल्या ओठांला खडू लावून ठेविला. व्यापाऱ्यानें परत येऊन पाहिलें तों त्याच्या तोंडाला खडू लागला आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां त्याचें कपट त्याच्या लक्ष्यांत येऊन त्यानें त्याला तत्काळ कामावरून दूर केलें.

### दुधांत पाणी.

एक गौळी मोठा लबाड होता. तो नेहमीं दुधांत पाणी घालून तें विकी. एकदां गडबडीमुळें दुधांत पाणी मिसळायास विसरून तो रतीब घालायास गेला. पहिल्या गिऱ्हाईकाच्या ओटीवर तो गेला तेव्हां त्याला दुधांत पाणी घालण्याची आठवण झाली, आणि तेथें एक मोठें

पिंप शुद्ध पाण्यानें भरलेलें पाहून त्यांतलें थोडें पाणी त्यानें दुधांत मिसळिलें; आणि मग त्या घरीं दूध देऊन तो पुढल्या गिऱ्हाइकाच्या घराकडे चालला. इतक्यांत पहिल्या गिऱ्हाइकाचा चाकर त्याच्यामागून धावला आणि त्याला गांठून ह्मणालाः “ हें पाहा, तूं शुद्ध दूध आमच्याकडे आणून त्यांत आह्मांला पाणी घालायला सांगशील तर बरें होईल. कारण आमचीं मुलें घरीं समुद्राच्या पाण्यानें स्नान करीत असतात. ह्मणून तें ओटीवरचें पिंप खाऱ्या पाण्यानें भरून ठेविलें होतें. दुधांत खारें पाणी मिसळलें तर त्यांचें मिश्रण कांहीं चांगलें होत नाहीं. ”

## लोभी यहुदी.

विलायतेंत कित्येक यहुदी लोक जुनीं वस्त्रें विकत घेऊन त्यांचा व्यापार करीत असतात. असा एक यहुदी एका नेहमींच्या गिऱ्हाइकाकडे जाऊन जुन्या वस्त्रांचा सौदा करूं लागला. पण तो कांहीं नीट पटेना. कपड्यांचा मालक बरेच जास्त पैसे मागूं लागला. तें तो यहुदी प्रथम देईना. त्यांची घासाघीस चालली असतां, तो यहुदी कपडे चाचपून व उलथेपालथे करून तपासीत होता. तेव्हां त्याच्या हातास कांहीं जड व घट्ट असें लागलें. तें वाटोळें लागल्यामुळें त्याला वाटलें कीं, हें सोन्याचें घड्याळ असावें. असा मोठा लाग साधणार ह्या आशेनें त्या यहुद्यानें तो मागत होता तितके पैसे मुकाट्यानें देऊन तेथून लौकर निसटता पाय घेतला; आणि बराच दूर गेल्यावर तो घट्ट व वाटोळा पदार्थ काय आहे तो पाहण्यासाठीं तो त्यानें मोठ्या उत्कंठेनें बाहेर काढिला. तेव्हां तें मुलांच्या खेळण्यांतलें शिशाचें घड्याळ आहे असें त्याच्या नजरेस पडून तो अगदीं खजील झाला.

## एका महाताचा अप्रामाणिकपणा.

बंगाल्यांतल्या लष्करांत एक मोठा अमलदार होता. त्याचा एक पाळलेला हत्ती होता. त्याजवर त्याचें मोठें प्रेम होतें. त्याला तो आपल्या समक्ष पोटभर खाऊं घाली. एके समयीं त्याला कामगिरीवर जावें लागलें. तिकडे तो बरेच दिवस राहिला. त्या हत्तीचा महात मोठा लबाड होता. तो त्याचें नेहमींचें खुराक तोडून आपली धन करूं लागला. खुराक कमी मिळूं लागल्यामुळें तो हत्ती अगदीं आळून गेला. कांहीं दिवसांनीं त्याचा धनी परत आला तेव्हां त्या हत्तीनें अत्यंत हर्ष झाल्याचीं चिन्हें दर्शविलीं. मग त्याला खुराक द्यावयाची वेळ झाली तेव्हां त्या दिवशीं त्याला द्यावयाचें तेवढें भरपूर खुराक त्या महातानें त्याच्यापुढें ठेविलें. त्याचे त्या हत्तीनें दोन भाग करून एक लागलींच खाऊन टाकिला आणि दुसऱ्याला मुळीं स्पर्श केला नाहीं. हें त्या बुद्धिमान् प्राण्याचें वर्तन पाहून त्या महाताची लबाडी त्या अमलदाराच्या तेव्हांच लक्षांत आली, आणि ती त्याच्याकडून कबूल करून घेऊन त्याला त्यानें आपल्या नोकरीवरून काढून टाकिलें.

## दगेखोर खाटीक.

स्कॉटलंडांतल्या एका लहान खेड्यांत एक गरीब म्हातारी रहात असे. तिची झोंपडी वस्तीपासून अमळ एकीकडे होती. तिला अवचित पुष्कळ पैसे मिळाले. ते सुरक्षित कसे रहातील याची तिला चिंता लागली. शहरांतल्या एकाद्या ब्यांकेंत ते नेऊन ठेवावे, तर ती वृद्ध असल्यामुळें तेवढी मजल तिला झेपण्यासारखी नव्हती. तेव्हां एवढी मोठी रकम जवळ ठेवून घरांत एकटें रहाणें तिला सुरक्षित वाटेना. यास्तव तिच्या ओळखीचा एक खाटीक होता, त्याची ह्या बाबतींत तिनें

मसलत विचारिली. त्यानें आपला कुत्रा तिच्या रक्षणासाठीं दिला. त्याला तेनें पैसे लपवून ठेविलेल्या जागीं रात्रीचा बांधून ठेविलें. मध्यरात्रीच्या सुमारास हा खाटीक हळूच तिच्या झोंपडींत शिरून तो पैसा काढा-यास गेला, तों त्या कुत्र्यानें त्याला धरून ठेवून मोठी ओरड केली. याच्या तोंडांतून सुटून जाण्याचा त्यानें बराच प्रयत्न केला. पण तो त्याला कांहीं केल्या सोडीना. एवढ्या अवकाशांत ती बाई जागी झाली आणि चोर! चोर!' ह्मणून मोठ्यानें ओरडली. तेव्हां शेजारच्या लोकांनीं तेथें धावून येऊन त्या चोराला पकडिलें. पण त्या बाईनें मोठ्या उदार मनानें याला सोडून द्यावयास सांगितलें. त्याच्यावर तिनें खटला केला नाहीं. याप्रमाणें त्या मनुष्यापेक्षां त्याचा कुत्रा विशेष प्रामाणिक ठरला.

### एका बाईची लबाडी.

एका फ्रेंच बाईनें जर्मनींतल्या एका घड्याळें विकणाऱ्याकडून एक गजर देणारें लहान घड्याळ विकत घेतलें. तें तिला फ्रांसांत न्याव-याचें होतें. तेव्हां अर्थात् तिला दोन्ही देशांच्या सीमेवर त्याबद्दल जकात द्यावी लागणार होती. ती तिच्या मनांतून टाळावयाची होती. ह्मणून तें कसें छपवून न्यावें ह्या विचारांत ती असतां, त्या घड्याळें विकणाऱ्याच्या बायकोनें तिला तें आपल्या मोठ्या झग्यांतल्या आंतल्या बाजूस मोठा खिसा करून त्यांत घालून न्यावें असें सुचविलें. पण ही तिची लबाडी त्या व्यापाऱ्याला पसंत न वाटून त्यानें तिची फजिती करण्याची अशी युक्ति केली कीं, ती आगगाडींतून उतरून जका-तीच्या ठाण्यावर ज्या वेळीं पोंचायाची होती, त्या वेळीं घड्याळांत गजर व्हावा अशा बेतानें तें लावून त्याला त्यानें पुरी चावी देऊन ठेविली. पुढें ठरलेल्या वेळीं ती बाई गाडींत बसून जकातीच्या ठाण्यावर उत-ली, आणि कामदारांनीं तिचें सामान नीट तपासून तिला पुढें जाऊं दिलें.

ह्याप्रमाणें तेथल्या कामदारांस आपण भलें ठकविलें असें मनांत आणून हर्ष पावून ती त्या ठाण्यांतून बाहेर निघावयाला लागली, तों तिच्या झग्यांतून एकदम मोठा गजर झाला. त्याबरोबर तिच्याजवळ छपविलेलें घड्याळ आहे असें त्या कामदारांस समजून त्यांनीं तिचा झाडा घेतला, तेव्हां अर्थात् तें सांपडलें. तें त्यांनीं जप्त करून त्या लबाड बाईला दहा रुपये दंड केला.

## पोपटाची साक्ष.

एका गृहस्थाचा एक पोपट होता, तो चांगला बोलका असून आपल्या धन्यावर फार प्रीति करीत असे. एके दिवशीं हा पोपट सुटून कोठें नाहींसा झाला. त्याचा शोध करितां तो एका माणसाकडे सांपडला. पण तो माणूस तो परत देईना. तो आपला आहे असें तो ह्मणूं लागला. तेव्हां पोपटाच्या धन्यानें त्याजवर फिर्याद केली. त्यावरून त्याला तो घेऊन न्यायकचेरींत हजर होण्याचा हुकूम सुटला. त्याप्रमाणें तो कचेरींत आल्यावर न्यायाधीशानें पोपटाच्या धन्यास आपला पुरावा सादर करावयास सांगितलें. तो ह्मणाला: "पोपटच माझा साक्षीदार आहे. दुसरा कोणी साक्षीदार मला नको." मग तो पोपट पिंजऱ्यांत घालून व त्यावर कपड्याचें झाकण घालून न्यायाधीशापुढें आणिला. तेव्हां त्याच्या धन्यानें कपडा वर करून पिंजऱ्याला आपलें तोंड लावून त्या पोपटापाशीं मुका मागितला. तो त्यानें मोठ्या प्रेमानें दिला. तें पाहून तो लबाड माणूस म्हणाला: "यांत काय आहे? असा मुका तो हवा त्याला देईल." न्यायाधीशानें त्याच्यासारखा त्या पोपटाचा मुका घ्यावयास त्याला सांगितलें. तेव्हां त्यानें पिंजऱ्याला तोंड लावून पोपटापाशीं मुका मागितला. पण त्यानें त्याला मुका न देतां त्याच्या ओठाचा कडकडून चावा घेतला. तें पाहून

कचेरींतल्या सगळ्या लोकांस मोठी मौज वाटली. मग पोपटाच्या धन्यानें त्याला पिंजऱ्यांतून बाहेर काढून आपल्या हातावर बसविलें आणि त्याच्याकडून नाना प्रकारचे शब्द वदविले. हा असा धडधडीत पुरावा पाहून न्यायाधीशानें तो पोपट खऱ्या मालकाच्या स्वाधीन केला, आणि फिर्यादीचा सगळा खर्च त्या चोराला द्यावयास लाविला.

## अधाशी मुलगा.

एका बाईनें पुष्कळ खटपट करून आपल्या तरुण मुलास राजाच्या तैनातीची नोकरी मिळवून दिली; आणि तीवर तो जावयास निघाला तेव्हां त्याला तिनें मोठ्या प्रेमानें डोळ्यांत आसवें आणून येणेंप्रमाणें उपदेश केला: "माझ्या लाडक्या बाळा, देवाला सदोदित हृदयांत ठेव. आपण जें जें कांहीं करितों, तें देव पाहतो असें ध्यानांत ठेवून नेहमीं वागत जा. राजाला सर्व काळ पूज्य मान. तुझ्या बरोबरच्या लोकांशीं बंधु-प्रेमानें वागत जा; आणि तुझ्या अंगांत लोभीपणाची खोड आहे, ती आवरण्यास झट." असा चांगला उपदेश करून त्या प्रेमळ व पाप-भीरु मातेनें त्याला पाठविलें. दरबारांत राजाच्या भोजनतयारीच्या कामावर त्याची नेमणूक झाली. ह्या कामावर तो असतां, एके दिवशीं पियर नांवाचीं फळें साखरेंत शिजवून, एका बशींत ठेवून ती स्वयंपाक्यानें त्याच्या हातीं दिली. ती तो राजाच्या मेजावर ठेवायास नेत असतां, तीं सुंदर व गोड फळें पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटलें, आणि त्यांतलें एक खाण्याची त्याची इच्छा अगदीं अनावर झाली. मग त्यानें त्यांतलें एक फळ उचलून तोंडांत सारिलें, आणि ती बशी घेऊन तो राजासमोर गेला. ती टेवितांठेवितां तो कासावीस होऊन ताडकन जमिनीवर पडला आणि तत्काळ मरण पावला. त्याचें असें अकस्मात् प्राणोत्क्रमण होण्याचें कारण असें होतें कीं, त्यानें घशांत कोंबिलेलें तें

फळ अतिशयित उष्ण असल्यामुळें त्याचा घसा भाजून जाऊन तो अगदीं गुदमरून गेला.

## चाकराची दगलबाजी.

एका गृहस्थानें आपल्या चाकरास कांहीं कामासाठीं पाठविलें आणि आपला कुत्रा बरोबर न्यावयास सांगितलें. त्याप्रमाणें कुत्रा घेऊन तो चालला असतां, त्याचा एक मित्र त्याला वाटेंत भेटला. त्याला त्यानें तो कुत्रा आपल्या घरीं नेऊन बांधून ठेवायास सांगितलें. मग सांगितलेलें काम करून तो घरीं परत येऊन धन्याला सांगूं लागला कीं, "कुत्रा रस्त्यांत कोठें चुकला. तो कांहीं केल्या परत सांपडेना." आपला आवडता नामी कुत्रा सांडल्याबद्दल त्या गृहस्थाला फार वाईट वाटलें. त्या लबाड चाकरानें त्याला, जो कोणी आपला कुत्रा आणून देईल त्यास बक्षीस देऊं, अशी जाहिरात द्यावयास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें केलें. तेव्हां त्या चाकराचा तो मित्र तो कुत्रा घेऊन आला. त्याच्या धन्याला हें कृत्रिम न उमगून त्यानें त्याला ठरविलेलें बक्षीस दिलें. तें अर्थात् त्या चाकरानें आणि त्याच्या त्या मित्रानें वांटून घेतलें.

पुढें एके दिवशीं पुनः तो चाकर कांहीं कामासाठीं बाहेर जाऊं लागला, तेव्हां त्याला त्या कुत्र्यास बरोबर न्यावयास धन्यानें सांगितलें. त्याप्रमाणें तो त्याच्या गळ्यांत सांखळ अडकावायास गेला. पण तो त्याला टाळूं लागला आणि धन्याच्या खुर्चीखालीं जाऊन बसला. तो त्याला धरावयास तेथें आला आणि त्याच्या गळपट्ट्यास हात घालूं लागला, तेव्हां तो गुरगुरून त्याच्या हाताला चावला. कुत्र्याचा चाकराविषयीं असा तिरस्कार व राग पाहून त्या गृहस्थाला

मोठा चमत्कार वाटला, आणि त्यानें त्या गोष्टीची बारीक चौकशी केली. त्यावरून त्या चाकराची लबाडी उमगून त्यानें त्याला आपल्या नोकरीवरून दूर केलें.

## फोटो काढणारा आणि दोघे बंधु.

एका फोटो काढणारानें दोघां बंधूंचे फोटो घेतले; आणि ते तयार करून त्यांजकडे तो घेऊन गेला तेव्हां ते घेईनात. त्यांनीं असा बहाणा केला कीं, ते चांगले निघाले नसून त्यांत आपल्या छबी मुळीं उतरल्या नाहींत. ही त्यांची लबाडी पाहून त्यांच्यावर त्यानें फिर्याद केली. पण त्या दोघां भावांनीं आपल्या तर्फेचे साक्षीदार न्यायकचेरींत आणून त्यानें काढिलेले फोटो आपले मुळींच नव्हत असा पुरावा केला. त्यावरून अर्थात् फिर्यादीचा निकाल त्या फोटो काढणाराविरुद्ध झाला. तेव्हां त्यानें त्यांची चांगली खोड मोडण्याचा निश्चय करून त्यांच्या फोटोंखालीं, " एका शेतकऱ्याच्या दोन कोंबड्या चोरणाऱ्या दोघां चोरांचे हे फोटो, " असें लिहून ते आपल्या दुकानांत विकावयास मांडिले. हे असे चोर कोण, तें पाहण्यासाठीं त्याच्या दुकानांत सगळें शहर लोटलें, आणि त्या फोटोंच्या पुष्कळ प्रती भराभर खपल्या. त्या फोटोंतले गृहस्थ ओळखून पुष्कळ लोक त्यांच्याकडे बोटें दाखवूं लागले. ही अशी बेअब्रू झालेली त्या दोघां लबाड गृहस्थांस न खपून त्यांनीं त्या फोटो काढणारावर फिर्याद केली. पण मागल्या खटल्यांत त्यांनीं केलेला पुरावा व त्यावरून मिळालेला निकाल त्यानें न्यायाधीशापुढें सादर करून असें सांगितलें कीं, "हे फोटो आपले नव्हत, असा यांनीं एकदां पुरावा केला असून, पुनः हे आपलेच आहेत असें ह्मणण्याला यांला कोणता आधार आहे ? " ह्या त्याच्या पुराव्यावरून न्यायाधीशानें त्याला निर्दोषी ठरविलें. हा असा उलट निकाल

झाला तेव्हां त्या लबाड बंधूंना त्या आपल्या फोटोच्या सगळ्या प्रती विकत घेऊन त्यांची विक्री बंद करावी लागली.

## लबाड व्यापारी.

एका श्रीमंत बाईला आपल्या जमिनींतलीं पिकें सुधारण्याचा भारी नाद होता. तिनें अळशीची लागवड करण्याचें मनांत आणून ती आपल्या जमिनींत बरीच पेरिली. पण ती हवी तशी चांगली निपजली नाहीं. तिच्याकडून धान्य विकत घेणाऱ्या एका व्यापाऱ्याकडे ती ह्या-विषयीं बोलली, तेव्हां तो ह्मणाला: "मला एक पोतें अळशी व एक क्राऊन वरती दे, ह्मणजे मी तुला चांगल्या प्रतीच्या अळशीचें बीं आणून देतों, तें पेरून पहा." ह्या गोष्टीला कबूल होऊन त्यानें मागितली तेवढी अळशी आणि पैसे तिनें त्याला दिले. तो व्यापारी मोठा लबाड होता. त्यानें त्या बाईला फसविण्याचा बेत करून तिचें तें पोतें जशाचें तसें तिच्याकडे परत नेऊन ह्मटलें: "ही घे चांगल्या प्रतीची अळशी. तुझी जमीन सुपीक असेल व पाऊसपाणी अनुकूळ होईल, तर तुला हिचें उत्कृष्ट पीक मिळेल." त्या बाईनें मोठ्या हर्षानें तें पोतें आपल्यासमोर ओतायाला सांगितलें. तें ओतीत असतां त्या अळशींत एक हिऱ्याची आंगठी तिच्या दृष्टीस पडली. ती उचलून पाहतां, तिनें ती लागलीच ओळखिली आणि ह्मटलें: "ही आंगठी माझी आहे. गेल्या हंगामाच्या वेळीं अळशीचीं पोतीं भरतांना ही माझी आंगठी बोटांतून निघून ह्या अळशींत गेली असावी. मी ती कोठें तरी हरवली असें समजत होतें. ह्यावरून हें उघड होतें कीं, तुह्मीं माझी अळशी नेली तीच परत आणून ही दुसरी उत्तम प्रतीची आहे असें भासवूं पाहत आहां. ह्या तुमच्या लबाडीबद्दल तुह्मांला चांगलें शासन झालें पाहिजे." असें ह्मणून तिनें त्याच्यावर ठक-

बाजीची फिर्याद केली व त्याला कैदेर्च' शिक्षा करविली. ह्याप्रमाणें त्याची बदनामी होऊन त्याला तोंड दाखवायाला मार्ग उरला नाहीं आणि आपला धंदा सोडून द्यावा लागला.

### इन्डिअन आणि स्प्यानिअर्ड.

अमेरिकेंतल्या रानटी लोकांला इन्डिअन ह्मणतात, आणि स्पेन-देशांतल्या रहिवाशांला स्प्यानिअर्ड ह्मणतात. एकदां एक स्प्यानिअर्ड घोड्यावर बसून प्रवास करीत असतां त्याचा घोडा लंगडूं लागला, आणि तो आपणाला मुक्कामावर नेऊन जाईलसें त्याला वाटेना. इतक्यांत एक इन्डिअन गृहस्थ घोड्यावरून चाललेला त्याला आढळला. त्याला हाक मारून तो प्रवासी ह्मणालाः " तुझा घोडा मला दे आणि माझा तूं घे. " ही मागणी त्या इन्डिअनाला अर्थात् मान्य झाली नाहीं. तेव्हां तो उद्दाम स्प्यानिअर्ड त्याच्याशीं हातघाईवर आला आणि त्याला चीत करून त्याचा घोडा पटकावून मार्गस्थ झाला. तो इन्डिअन त्याच्या मागोमाग गेला; आणि, एका जवळच्या शहरांत तो वस्तीला राहिला आहे असें पाहून, त्यानें तेथल्या न्यायाधीशापुढें त्याजवर फिर्याद केली. तीवरून न्यायाधीशानें त्या स्प्यानिअर्डाला घोडा घेऊन कचेरींत हजर रहाण्याचा हुकूम केला. ह्या हुकमाप्रमाणें त्या उपट्यानें कचेरींत येऊन प्रतिज्ञेवर असें सांगितलें कीं, " हा घोडा माझा आहे. हा लहान शिंगरूं होता तेव्हांपासून हा मजकडे आहे." त्या रानटी मनुष्याला त्याच्याउलट कांहींएक पुरावा करितां येईना, ह्मणून न्यायाधीश त्याच्याविरुद्ध न्याय देणार होता. पण इतक्यांत तो इन्डिअन ओरडून ह्मणालाः " हा घोडा माझा आहे असा मला पुरावा करितां येईल." असें ह्मणून त्यानें आपल्या अंगांतला झगा चटदिशीं काढून त्या घोड्याच्या तोंडावर टाकिला आणि न्यायाधीशाला ह्मटलें: " हा घोडा

अगदीं लहानपणापासून आपल्याकडे आहे असें हा ह्मणतो, तर हा घोडा कोणत्या डोळ्यानें आंधळा आहे हें त्याला सांगायाला लावा." त्या लफंग्यानें लागलींच सांगितलें कीं, "हा उजव्या डोळ्यानें आंधळा आहे." तेव्हां त्या इन्डिअनानें त्याच्या डोकीवरचा झगा काढून ह्मटलें: "हा मुळीं आंधळा नाहीं. ह्याचे दोन्ही डोळे शाबूद आहेत." हा मोठा खात्रीचा व मजबूद पुरावा पाहून न्यायाधिशानें तो घोडा त्याच्या स्वाधीन करविला.

## दोन अट्टल सोदे.

एकदां एक प्रवासी एका गांवांतल्या मोठ्या मुशाफरखान्यांत येऊन उतरला आणि जेवायास मागूं लागला. तेव्हां त्याच्यापुढें भोजनाचे पदार्थ आणून मांडिले, आणि तो जेवायास लागला. पहिला घास तोंडांत घातल्याबरोबर तो कळ आल्यासारखें करून तोंडाला रुमाल लावून इवळूं लागला. ती त्याची अवस्था पाहून तेथले लोक त्याच्या भोंवतीं जमा झाले व काय झालें ह्मणून मोठ्या कळवळ्यानें विचारूं लागले. तेव्हां तो ह्मणाला: "माझे दांत आज बरेच दिवस दुखत आहेत. तोंडांत अन्न घातल्याबरोबर अशीच कळ मला नेहमीं येते." असें तो बोलत आहे तों तेथें दुसरा एक इसम आला आणि प्यावयासाठीं ब्रांडी व पाणी मागूं लागला. त्यानें त्या पहिल्या प्रवाशाची गोष्ट ऐकून ह्मटलें: "दांतांचें दुखणें! तें मीं एका पळांत बरें करितों." असें ह्मणून त्यानें आपल्याजवळची एक पुडी काढून उघडिली आणि तींतली बुकी त्याच्यापुढें करून ह्मटलें: "हींतली थोडी बोटानें घेऊन दांतांला लावा, ह्मणजे इजा हटकून थांबेल." त्या प्रवाशानें त्याप्रमाणें करितांच हर्ष पावून ह्मटलें: "काय चमत्कार पाहा! यांचें हें चूर्ण दांतांला लावितांच माझ्या वेदना लागलींच बंद

झाल्या." मग त्या इसमाचे मनापासून आभार मानून ती पुडी त्याच्याकडून चार आण्यांला त्यानें विकत घेतली आणि त्याला आपल्याबरोबर जेवायास बसविलें. हें असें विलक्षण गुणकारी औषध त्या इसमाकडे असल्याचा पुकारा सगळ्या गांवांत तत्काळ होऊन, जो तो येऊन त्याच्याकडून त्या बुकीच्या पुड्या विकत घेऊं लागला. ह्याप्रमाणें त्यानें चारपांचशें पुड्या त्या गांवांत विकून त्या प्रवाशाबरोबर दुसऱ्या गांवाचा रस्ता धरिला. इकडे त्या गांवांतल्या कित्येक असामींनीं तें औषध लावून पाहिलें. पण त्यांला त्यापासून बिलकूल गुण आला नाहीं. त्यावरून ती त्या दोघां असामींची निवळ लबाडी असून, तें चूर्ण केवळ एका प्रकारच्या फळांचें आहे, असें त्यांला आढळून आलें. मग त्यांनीं त्यांच्यासंबंधाची बातमी पोलिसांला दिली. त्यांनीं त्यांला पकडून तपास केला, तेव्हां त्यांनीं अशा प्रकारच्या पुष्कळ युक्ति लढवून शेंकडो लोकांला फसविल्याचें उघडकीस आलें, आणि त्यांला मोठी सजा झाली.

## तीक्ष्ण नजर.

दोघे चिनी गृहस्थ बोलत बसले असतां, एक जण ह्मणाला: "माझी नजर फार तीक्ष्ण आहे. मला दूरचे पदार्थ चांगले स्पष्ट दिसतात." ती त्याची फुशारकी त्याच्या मित्राला न साहून तो ह्मणाला: "तुझी नजर कितीही तीक्ष्ण असली तरी ती माझ्या नजरेहून कमीच असणार. माझ्याइतकी तीक्ष्ण नजर कोणाचीही नाहीं." असा त्या दोघांचा वाद पडून असें ठरलें कीं, त्यांच्या गांवांतल्या एका देवळाच्या मनोऱ्यावर एक लेख होता, तो दूर उभें राहून कोणाला स्पष्टपणें वाचतां येतो तें पाहावें; आणि त्यांनीं त्या देवळापाशीं जाऊन तो लेख वाचण्याचा दिवस नेमिला. त्यांच्यापैकीं एकानें केवळ हुजतीखातर आपली नजर

फार तीक्ष्ण आहे अशी फुशारकी मारिली होती. यास्तव तो नेमिलेल्या दिवसाअगोदर त्या देवळाजवळ एकटाच जाऊन तो लेख आपणाला वाचतां येतो कीं काय तें पाहूं लागला. तेव्हां तो त्याला मुळीं दिसेना. पण हार जाणें बरोबर नाहीं असें त्यानें मनांत आणिलें आणि त्या मनोऱ्यांत चढून तो लेख नीट वाचून ठेविला. तरी त्याच्या एका बाजूचे कांहीं शब्द त्याच्या नजरेस पडले नाहींत, ह्मणून ते तसेच राहून गेले. नंतर ठरलेल्या दिवशीं ते दोघे तेथें आले; आणि अगोदर येऊन तो मनोऱ्यावरचा लेख वाचून जाणारा गृहस्थ दूर उभा राहून तो वाचलासा करून पाठ ह्मणाला. पण त्यांतले कांहीं शब्द त्यानें सोडिले. तेव्हां त्याच्या मित्रानें ते उच्चारून ह्मटलें: "हे शब्द तुला तेथें दिसत नाहींत काय?" त्यानें उत्तर केलें: "नाहींत. तूं ह्मणतोस ते शब्द तेथें मुळीं नाहींत." ह्याप्रमाणें त्या दोघांचा पुनः वाद जुंपला. इतक्यांत त्या देवळाचा उपाध्याय तेथें आला. त्याला त्यांनीं आपल्या वादाचें कारण सांगून खरें कोणाचें तें पुसलें. तो हसून म्हणाला: "बाबांनो, त्या जागीं तुह्मी ह्मणतां त्या आशयाच्या लेखाची पाटी कालपर्यंत होती खरी, पण ती आजच सकाळीं काढून ठेविली आहे. तेव्हां अर्थात् असें सिद्ध होतें कीं, तुह्मीं तो लेख पूर्वीं कधीं तरी जवळ जाऊन वाचिला असावा आणि आज तो तेथें नसतां दुरून स्पष्टपणें दिसल्याचा बहाणा करीत आहां. ही तुमची दोघांचीही लबाडी आहे."

## लबाड स्त्री.

एका पांच वर्षांच्या मुलीचा वाढदिवस होता. तेव्हां तिला भेटायासाठीं तिचा एक श्रीमंत नातलग आला. तिचे आईबाप आणि तो गृहस्थ चहा प्यायाला बसून गोष्टी करीत असतां, त्यानें आपल्या खिशांतून एक सोन्याचें नाणें काढून त्या मुलीच्या हातावर मोठ्या

प्रेमानें ठेविलें. तें हातीं पडतांच ती मुलगी तेथून हळूच उठून बाहेर रस्त्यांत गेली. त्या वेळीं तिकडून एक स्त्री डोईवर फळांची टोपली घेऊन चालली होती. तिला पाहून त्या मुलीनें आपल्या हातांतलें तें सोन्याचें नाणें तिला दाखवून ह्मटलें: "पाहा, मजकडे कसें चकचकीत नाणें आहे!" ती स्त्री ह्मणाली: "तें मजकडे दे. मी तुला त्याचें एक छानदार मोठें फळ देतें." असें ह्मणून तिनें टोपली खालीं उतरिली. तींतलीं नामीं फळें पाहून मुलीस तीं फार आवडलीं; आणि तिनें तें नाणें तिच्या हातावर चटदिशीं ठेवून टोपलींतलें एक उत्तम फळ निवडून घेतलें, आणि घरांत धाव मारिली. इकडे ती लबाड स्त्री तेथून लगबगीनें चालती झाली. मुलीनें आईकडे जाऊन तें फळ तिला मोठ्या लाडीकपणानें दाखवून ह्मटलें: "हें पाहा कसें नामीं फळ मीं त्या नाण्याचें घेतलें!" हे तिचे शब्द ऐकून ती घाबरून रस्त्यांत धावत गेली आणि त्या फळें विकणाऱ्या स्त्रीला पाहूं लागली. पण तिचा कोठेंही पत्ता लागेना. तेव्हां ती निरुपाय होऊन परत घरीं आली आणि त्या मुलीस रागें भरूं लागली. तेव्हां तो त्यांचा नातलग ह्मणालाः "ह्या अज्ञान व लहान मुलीवर कशाला रागावतां? आह्मां जाणत्या माणसांच्या हातून सुद्धां ह्याहून मूर्खपणाचीं व अविचाराचीं कृत्यें घडतात." असें ह्मणून तो आपल्या घरीं गेला.

त्या नातलग गृहस्थाचें एक मोठें दुकान होतें. त्यांत तो संध्याकाळचा बसला असतां, एका स्त्रीनें तेथें येऊन कांहीं जिनसा विकत घेतल्या, आणि एक सोन्याचें नाणें देऊन ती मोड मागूं लागली. तिच्या हातीं तें नाणें पाहून त्या गृहस्थाला तिचा वहीम आला, आणि तो ह्मणालाः " हें नाणें फार दुर्मिळ आहे. हें तुझ्या हातीं कसें आलें तें मला ठाऊक आहे. हें तूं त्या मुलीच्या हातचें घेऊन तिला एक फळ

दिलें व तेथून पळालीस नाहीं काय ?" असें बोलून त्यानें तिला पोलिसांच्या स्वाधीन केलें. त्यांनीं पुरा तपास करून तिच्यावर दगाबाजीचा आरोप ठेविला, आणि न्यायाधीशानें तिची चौकशी करून तिला कैदेची शिक्षा दिली.

## अप्रामाणिक यहुदी.

मोरोकोमध्यें एका यहुदी व्यापाऱ्यानें एका फ्रेंच व्यापाऱ्याला काळ्या टोप्या, हिरव्या शाली व लाल रेशमी पायमोजे पुष्कळ आणायाला सांगितले. त्याप्रमाणें त्यानें त्या जिनसा मागविल्या तेव्हां तो यहुदी त्या घेईना. हा असा त्याचा दगलबाजपणा पाहून त्या फ्रेंच व्यापाऱ्यानें त्या देशाच्या बादशाहाकडे फिर्याद केली. कारण तेथें बादशाहा स्वतः न्यायमनसोबा करीत असे. त्यानें त्या यहुद्याला कचेरींत बोलावून "हा काय प्रकार आहे ?" ह्मणून विचारिलें. तेव्हां त्यानें कानावर हात ठेवून ह्मटलें: "ह्याला मीं असल्या वस्तु आणायास सांगितलें नाहीं, एवढेंच नव्हे तर ह्याला मी ओळखीतही नाहीं." मग बादशाहानें फ्रेंच व्यापाऱ्याला पुसलें: "ह्या व्यवहारांत तुझा कोणी साक्षीदार आहे काय ?" त्यानें नाहीं ह्मटलें. तेव्हां बादशाहा ह्मणाला: "तर मग तुझ्या फिर्यादींत कांहीं अर्थ नाहीं. असला व्यवहार तूं कोणा तरी तिऱ्हाइतासमक्ष करावयास हवा होता. तर आतां तूं येथून जा. तुझा खटला निकालांत काढण्यांत येत आहे."

ह्याप्रमाणें सरकारांत दाद लागली नाहीं, तेव्हां त्या फ्रेंच व्यापाऱ्याला मोठी चिंता पडली. त्या मालाची खरेदी करण्यांत त्याची बरीच रकम गुतंली होती, आणि तेवढ्या मालास तेथें लौकर गिऱ्हाईक मिळण्याची आशा नव्हती. पण बादशाहानें त्याला रजा दिल्यावर त्यानें मनांत आणिलें कीं, हा फ्रेंच व्यापारी भला मनुष्य आहे. त्या यहुद्यानें त्याच्याशीं

अप्रामाणिकपणाचें वर्तन करून त्याचें नुकसान केलें आहे. असें त्याचें नुकसान व्हावें हें बरोबर नाहीं. असा विचार करून त्यानें असा जाहीरनामा लाविला कीं, "प्रत्येक यहुद्यानें डोकीला काळी टोपी घालावी, अंगावर हिरवी शाल घ्यावी आणि पायांत लाल रेशमी मोजे घालावे. असा पेहराव न केलेला यहुदी रस्त्यांतून फिरतांना आढळला तर त्याला देहांत शासन केलें जाईल." हा असा जाहीरनामा लागतांच तेथले सगळे यहुदी त्या जिनसा विकत घेण्यासाठीं बाजारांत धावले. तेव्हां अर्थात् त्या फ्रेंच व्यापाऱ्याकडचा तो सगळा माल हांहां ह्मणतां संपला; आणि त्याची त्याला हवी तितकी किंमत लावितां आल्यामुळें त्याला त्यांत पुष्कळ किफायत झाली. ह्याप्रमाणें एका यहुद्याच्या अप्रामाणिकपणामुळें त्याच्या सगळ्या धर्मबांधवांस त्याबद्दल तोशीस सोसावी लागली; आणि ते त्या लबाड यहुद्याला शिव्याशाप देऊं लागले.

## झाड साक्षीदार.

एके समयीं एका तरुण गहस्थानें न्यायाधीशाकडे अशी फिर्याद केली कीं, 'तीन वर्षांपूर्वीं मी दूरदेशीं जावयास निघालों, तेव्हां माझ्यापाशीं एक हिऱ्याची मोठी मोलवान् आंगठी होती, ती मी माझ्या एका मित्रापाशीं ठेविली होती. हल्लीं मी परत आलों असून ती आंगठी त्याच्याकडे मागूं लागलों असतां, तो ती देत नाहीं." ही त्याची फिर्याद ऐकून त्या त्याच्या मित्राला त्यानें आपल्या पुढें बोलावून आणिलें, आणि, "हा सांगतो तें खरें आहे काय?" असा त्याला प्रश्न केला. तेव्हां त्यानें आपल्या छातीवर हात ठेवून असें निक्षून सांगितलें कीं, "ह्याच्या आंगठीविषयीं मला मुळीं कांहीं ठाऊक नाहीं. ह्या माझ्या मित्राच्या बुद्धीला भ्रंश झाला आहे असें वाटतें." हें त्याचें बोलणें ऐकून न्यायाधीशानें फिर्यादीला तुझा कोणी साक्षीदार आहे

काय ह्मणून विचारिलें. तो ह्मणालाः " माझा साक्षीदार कोणी नाहीं. ह्याच्या शेतांतल्या एका मोठ्या झाडाखालीं मी ह्याला भेटून ह्याचा निरोप घेऊन निघालों, त्या वेळीं मीं माझी आंगठी याजकडे ठेवायास दिली." तें ऐकून तो त्याचा मित्र ह्मणालाः " हा ह्मणतो तें झाडही मला ठाऊक नाहीं, आणि याची आंगठीही कसली ती मीं पाहिली नाहीं, अशी शपथ घ्यावयास मी तयार आहें." न्यायाधीशानें फिर्यादीला ह्मटलें: " तें झाड कसलें आहे तें मला पाहावयास हवें. तर जा, आणि त्याची एक लहानशी फांदी लौकर घेऊन ये."

न्यायाधीशाचा हा हुकूम होतांच तो त्या झाडाची फांदी आणावयास धावला. तो गेल्यावर थोड्या वेळानें न्यायाधीशानें त्या आरोपीला सहज पुसलें: " त्याला इतका वेळ कसा बरें लागला ? ती बारी उघडून पाहा बरें तो येत आहे काय. त्यानें आह्मांला येथें विनाकरण खोळंबवून ठेविलें आहे. " तो ह्मणालाः "तें झाड येथून बरेंच दूर आहे. तेथें जाऊन यावयाला निदान एक तास लागेल. " हे त्याच्या तोंडचे शब्द ऐकून न्यायाधीश ह्मणालाः " अरे लबाड मनुष्या, तें झाड तुला ठाऊक नाहीं अशी शपथ घ्यावयास तूं नुकताच तयार झाला होतास, आणि आतां तें येथून किती दूर आहे हें तुला पक्कें ठाऊक आहे, असें तुझ्या बोलण्यावरून अगदीं स्पष्ट होतें. तेव्हां अर्थात् त्या मनुष्याची आंगठीही तुला ठाऊक असली पाहिजे. तर ती तुला त्यास परत केली पाहिजे; आणि ह्या तुझ्या ठकबाजीबद्दल मी तुला एका वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा देतों. "

## बादशाहा आणि गाडीवान.

रशियाचा बादशाहा अलेकझॅन्डर याला पायीं सहल करण्याचा भारी नाद असे. तो मैलांचे मैल चालत जात असे. तो एकदां असा सहल करीत

रेच मैल गेला असतां, त्याला वाड्यांत परत लौकर जावयाचें असल्याकारणानें तो एका भाड्याच्या गाडींत बसला. गाडीवानानें गाडी राजवाड्यापासून कांहीं अंतरावर आणून उभी केली आणि ह्मटलें: "येथून पुढें गाड्या नेण्याचा हुकूम नाहीं. तुह्मी येथेंच उतरा, आणि वाड्यांत चालत जा." बादशाहाच्या अंगांत लष्करी पेहराव होता व त्याला यानें पूर्वीं कधीं पाहिलें नव्हतें, म्हणून हा कोणीतरी लष्करी अमलदार असावा असें त्याला वाटलें. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें बादशाहा गाडींतून उतरून, पैसे पाठवून देतों असें त्याला सांगून जाऊं लागला. पण तो गाडीवान त्याला जाऊं देईना. तो ह्मणाला: "तुमच्यासारखे लष्करी अमलदार मला पैसे पाठवून देतों ह्मणून सांगून जातात आणि वाड्यांत गेल्यावर विसरतात. म्हणून लष्करी अमलदारांच्या वचनावर भरंवसा ठेवूं नये, असा मीं ठराव केला आहे. तुमच्याजवळ पैसे नसल्यास ते तुह्मांला मिळत तोंपर्यंत मजकडे कांहीं तरी ऐवज ठेवून जा." बादशाहानें हसून आपल्या अंगांतला झगा काढून त्याच्या गाडींत टाकिला आणि ह्मटलें: "हा घे ऐवज." मग वाड्यांत गेल्यावर त्यानें पन्नास रुबल काढून एका चाकराच्या हातीं दिले, आणि ते त्या गाडीवानाला द्यावयास सांगितलें. एवढी मोठी रकम मिळाल्यानें तो गाडीवान अतिशयित हर्षभरित होऊन गेला.

दुसरे दिवशीं सगळ्या लष्कराची पाहणी होती. ती आटपल्यावर बादशाहानें आपल्या सगळ्या बड्या लष्करी अमलदारांला जवळ बोलावून लष्कराची तयारी उत्कृष्ट ठेविल्याबद्दल संतोष प्रगट केला आणि त्यांला शाबासकी देऊन शेवटीं ह्मटलें: "गृहस्थ हो, तुह्मी आपल्या हाताखालच्या अमलदारांला कळवा कीं, काल रात्रीं त्यांच्या पायीं मला आपला झगा गाडीवानाकडे गाहाण ठेवावा लागला; कारण तो

मजवर विश्वास ठेवीना. हा असा माझा पानउतारा त्यांच्यामुळें झाला. मीं काल रात्रीं एका गाडींत बसून वाड्यांत आलों, आणि पैसे पाठवून देतों असें गाडीवानाला सांगून गाडींतून उतरून जाऊं लागलों. पण तो मला जाऊं देईना. पैसे खरोखर मिळतील असा भरंवसा यावयासाठीं मजपाशीं तो कांहीं तरी ऐवज मागूं लागला. तो ह्मणाला कीं, ' लष्करी अमलदार अशा थापा देऊन वाडयांत जातात आणि पैसे पाठविण्याला विसरतात.' " हे बादशाहाचे शब्द ऐकून ते अमलदार लज्जित होऊन खालीं माना घालून उभे राहिले. आपला नीचपणा व अप्रामाणिकपणा बादशाहाच्या कानावर आला, ह्याबद्दल त्यांला फार दुःख वाटलें.

## बादशाहाचें चातुर्य.

जर्मनीचा बादशाहा रोडोल्फ हा आपल्या राज्यांत फिरत असतां नुरेमबर्ग शहरीं आला. तेथें तो असतां, एका व्यापाऱ्यानें त्याच्याकडे अशी फिर्याद आणिली कीं, " ह्या शहरचा एक मोठा खाणावळवाला आहे, त्याच्याकडे मीं आपली पैशांची थैली ठेविली होती, ती तो मला परत देत नाहीं. " बादशाहानें विचारिलें: " ह्या आरोपाची शाबिदी करण्यापुरता तुमच्यापाशीं कांहीं पुरावा आहे काय ? " व्यापाऱ्यानें उत्तर केलें: "मीं त्याजकडे पिशवी ठेविल्याचें दुसऱ्या कोणालाही ठाऊक नाहीं." मग त्याच्या पिशवीच्या खाणाखुणा विचारून घेऊन बादशाहानें त्याला दुसऱ्या खोलींत जाऊन बसायाला सांगितलें; आणि त्या खाणावळवाल्यास बोलावून आणावयाचा हुकूम करूं लागला. इतक्यांत तो खाणावळवाला व दुसरे कित्येक प्रमुख नागरिक बादशाहाला मुजरा करण्याकरितां तेथें आले. बादशाहाची आणि त्या खाणावळवाल्याची चांगली ओळख होती. तो त्याच्याशीं मोठ्या सलगीनें बोलतां-बोलतां ह्मणाला: " अहो, तुमच्या डोकीची ही टोपी मला फारच

आवडते. तर ती मला द्या, आणि ही माझी तुह्मी घ्या. बादशाहानें आपणास हा असा अपूर्व मान दिल्याबद्दल त्या खाणावळवाल्यास मोठा आनंद व अभिमान वाटला, आणि त्यानें आपल्या डोकीची टोपी चटदिशीं काढून बादशाहापुढें ठेविली. ती हातीं घेऊन बादशाहानें आपली टोपी काढून त्याच्या स्वाधीन केली. मग आंत जाऊन त्यानें त्या शहरच्या एका विश्वासू व प्रसिद्ध नागरिकाला बोलावून त्याच्या हातीं ती टोपी दिली आणि ह्मटलें: “ ही टोपी घेऊन त्या खाणावळवाल्याच्या बायकोकडे जा आणि तिला सांगा कीं, अशाअशा खुणांची एक पैशांची थैली आहे, ती मजकडे द्यावी असा तुझ्या नवऱ्याचा तुला निरोप आहे. त्या पिशवीचें तसेंच कांहीं काम आहे; आणि तुला हा निरोप खरा वाटावा ह्मणून त्यानें आपली टोपी तुला दाखवायासाठीं मजकडे दिली आहे. ” हा असा निरोप गेल्यामुळें त्याच्या बायकोनें ती पिशवी त्या जासुदाकडे दिली. ती हातीं आल्यावर बादशाहानें त्या व्यापाऱ्याला ती दाखविली. ती त्यानें तत्काळ ओळखून आपलीच आहे असें खातरीनें सांगितलें. मग बादशाहानें त्या खाणावळवाल्यास आपल्यासमोर बोलावून ह्मटलें: “ हा व्यापारी तुजवर असा आरोप आणीत आहे कीं, यानें तुझ्याजवळ पैशांची एक थैली अनामत ठेविली होती, ती तूं त्याला परत देत नाहींस. ” तो ह्मणाला: “हा आरोप अगदीं खोटा आहे. हा मनुष्य निवळ वेडा असावा. ह्याच्याशीं माझा जन्मांत कधीं कांहीं व्यवहार घडलेला नाहीं.” हें त्याचें उत्तर ऐकून बादशाहानें ती थैली त्याच्यासमोर धरिली. ती पाहतांच तो अगदीं गांगरून गेला आणि आपला गुन्हा कबूल आला. मग बादशाहानें ती थैली व्यापाऱ्याच्या स्वाधीन करून खाणावळवाल्यास दगाबाजी केल्याबद्दल मोठा दंड केला.

## दगेखोर सरदार.

एक गरीब पोरका मुलगा कांहीं तरी काम लागावें ह्मणून मॉस्को शहरांत फिरत असतां, एका मिठाईवाल्यानें त्याला आपल्याकडे नोकरीस ठेविलें. ह्या मिठाईवाल्यानें तयार केलेली मिठाई विकावयासाठीं तो नेहमीं रस्त्यांतून पदार्थांचीं नांवें पुकारीत फिरत असे. त्याचा कंठ अतिमधुर असल्यामुळें लोकांच्या कानीं तो पडला ह्मणजे मोठें कौतुक वाटून, ते त्याला हाका मारून बोलावीत आणि त्याच्याकडची मिठाई घेत. शिवाय तो मोठा लाघवी व आनंदवृत्ति असल्यामुळें तो पुष्कळ लोकांना मोठा प्रिय होऊन राहिला होता. ह्या त्याच्या गुणांस्तव मोठमोठ्या सरदारांच्या घरीं कांहीं उत्सव किंवा मेजवानी असली ह्मणजे त्याला ते मिठाई पुरवायास सांगत. एके समयीं रशियाचा झार पिटर धि ग्रेट हा त्या शहरांत आला असतां, त्याला एका बड्या सरदारानें मेजवानी केली. ह्या मेजवानीस लागणारी मिठाई ह्या गुणी मनुष्याला आणावयास सांगितल्यावरून तो ती घेऊन त्या सरदाराच्या मुदपाकखान्यांत गेला. तो तेथें असतां, तो सरदार येऊन आपल्या एका स्वयंपाक्यास ह्मणालाः "खास झारासाठीं ह्मणून तयार करावयास सांगितलेलें पक्वान्न कसें काय झालें आहे तें पाहूं दे." त्या स्वयंपाक्यानें तें त्याच्यापुढें आणून ठेविलें. तें पाहून त्यानें संतोष प्रकट केला, आणि कोणाला न समजतां त्यांत कसलीशी बुकी टाकून तो ह्मणालाः "हें पक्वान्न नीट राखून ठेव. हें झाराला अतिशयित आवडतें. कांहीं पक्वान्नें वाढून झाल्यावर हें आणून त्याच्यापुढें ठेव. विसरूं नको, किंवा यांतलें कोणाला देऊं नको." असें बोलून तो सरदार तेथून निघून गेला. हें त्याचें कपट त्या मिठाईवाल्याच्या नोकरानें पाहिलें, आणि झाराच्या जीवाला खास दग

आहे असें ताडून तो तेथून तत्काळ बाहेर पडला; आणि आपल्या दुकानांतली थोडीशी मिठाई घेऊन झार येणार होता त्या वाटेनें मोठ्या गोड स्वरानें ती तो पुकारूं लागला. इतक्यांत झार त्या वाटेनें गाडींत बसून आला. त्याच्या कानीं त्याचा अतिमधुर ध्वनि पडून तो अगदीं तल्लीन झाला, आणि गाडी थांबवून त्यानें त्याला आपल्या-जवळ बोलाविलें. त्यानें झारापुढें असा कांहीं विलक्षण लाघवीपणा दाखविला कीं, तो पराकाष्ठेचा खुश झाला, आणि त्यानें त्याच्या-कडची कांहीं मिठाई घेतली. मग त्यानें त्याला कांहीं प्रश्न विचारिले. त्यांचीं त्यानें अशीं समर्पक उत्तरें दिलीं कीं, तीं ऐकून राजाची त्याजवर पूर्ण मर्जी बसली. ह्मणून त्याला आपल्या तैनातीस ठेवण्याचा निश्चय करून त्यानें त्याला तत्काळ आपल्याबरोबर बोला-विलें, आणि भोजनाच्या वेळीं आपल्यामागें उभा रहाण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो झाराबरोबर जाऊन भोजनाच्या समयीं त्याच्या मागें उभा राहिला असतां, थोड्या वेळानें बुकी घातलेलें तें पक्कान्न झारापुढें आणून ठेविलें; आणि त्या सरदारानें मोठ्या अदबीनें व प्रेमानें तें पक्कान्न खाऊन पाहावयाची त्याला विनंति केली. इतक्यांत ह्या त्याच्या नव्या नोकरानें ओणवून त्याच्या कानांत कांहीं सांगितलें. तेव्हां तो मेजावरून उठून त्याला घेऊन एकांतीं गेला, आणि त्या पक्कान्नाचा त्याला असा संशय येण्याचें कारण काय ह्मणून त्यानें त्याला विचारिलें. तें त्यानें सांगितल्यावरून कांहीं तरी दगा आहे अशी झाराची खातरी झाली. मग झार परत येऊन मेजाशीं बसला आणि त्या सरदाराला तें पक्कान्न खाव-यास सांगूं लागला. तेव्हां तो ह्मणालाः “ खावंद सरकारांच्या समक्ष कांहीं खावें हें मला शोभत नाहीं. ” त्याचें असें उत्तर ऐकून झारानें तें पक्कान्न कुत्र्याला घातलें. तें त्यानें तत्काळ खाऊन टाकिलें; आणि

अमळशानें त्या प्राण्याच्या अंगांत विषार चढून तो मरण पावला. ह्याप्रमाणें त्या सरदाराचा दगा उघडकीस येऊन झारानें त्याला तेथल्या तेथें कैद करून त्याची जाहगीर जप्त केली, आणि त्याचा वाडा जमीनदोस्त केला. मग त्याचा न्याय करून त्याला बादशाहानें देहांतशासन दिलें आणि त्या आपल्या नव्या चाकराला बक्षीस देऊन मोठ्या योग्यतेस चढविलें.

# भाग सहावा.

## विश्वासूपणा.

### एका शिद्दिणीचा अलौकिक विश्वासूपणा.

इसवी सन १७७० त सेन्टडोमिंगोनामक एका बेटांत मोठा प्रचंड धरणीकंप होऊन घरेंदारें भराभर कोसळूं लागलीं, तेव्हां माणसांची पळापळ झाली. अशा गडबडींत एका सरदाराच्या घरांतली एक शिद्दीण तेवढी पळाली नाहीं. बाकी सगळीं माणसें जीव घेऊन पळालीं. ती न पळण्याचें कारण असें होतें कीं, तिच्या हवालीं एक तान्हें मूल केलें होतें, तें पाळण्यांत निजलें होतें. त्याला सोडून जाणें बरोबर नाहीं असें तिला वाटलें, आणि घराच्या भिंती हाल्रून कोसळूं लागल्या तेव्हां ती त्या मुलाच्या पाळण्यापाशीं जाऊन आपल्या अंगाची कमान त्याजवर करून राहिली. त्यामुळें भिंती तिच्या आंगावर कोसळून तिच्या पोटाखालचें मूल सुरक्षित राहिलें. पण त्या विश्वासू बाईला पराकाष्ठेची इजा होऊन तिचा लौकरच अंत झाला !

### एका अथेनिअन बाईचा अप्रतिम विश्वासूपणा.

अथेन्सशहरावर जुलमी अमल झाला तेव्हां तो झुगारून देण्याचा निश्चय अथेन्सकरांनीं करून त्या संबंधाचा गुप्त कट केला. ह्या कटाविषयीं खलबत करण्यासाठीं ते लिनानामक एका बाईच्या घरीं जमत. जुलमी सत्ताधीशांला ही गोष्ट कळून तो कट फोडण्याचा त्यांनीं उद्योग चालविला. सदरील बाईला पकडून ते त्या कटाविषयीं विचारूं लागले.

पण ती मुळीं कांहीं सांगेना. त्यांनीं तिचा फारच पिच्छा पुरविला, तेव्हां त्यांच्या छळामुळें गडबडून जाऊन आपल्या तोंडून निरुपायास्तव एकादी गुप्त गोष्ट फुटेल, ह्या भीतीनें त्या विश्वासूबाईनें आपली जीभ छाटून टाकिली ! ह्या तिच्या निःसीम विश्वासूपणाबद्दलचें चिरकाल स्मारक रहावें ह्मणून अथेन्सकरांनीं सिंहिणीचा पुतळा करून तिची जीभ छाटिली आहे असें दाखविलें आहे. तिच्या स्मरणार्थ सिंहिणीचा पुतळा करण्याचें कारण असें कीं, त्या बाईच्या नांवाचा अर्थ सिंहीण असा होतो.

## इमानी शेतकरी.

आस्त्रियाची राजधानी व्हिएना हिजवर फ्रेंच सैन्य स. १८०९ सालीं चालून जात असतां, त्याला रस्ता उमगेना. अशा अडचणींत तें सैन्य सांपडलें तेव्हां अंमलदारांनीं तेथल्या एका शेतकऱ्याला धरून त्या शहराचा रस्ता दाखवायास सांगितलें. ही गोष्ट तो कबूल करीना; आणि शत्रूचें सैन्य पाहून आसपासचे सगळे लोक पळून गेल्यामुळें त्यांला दुसरा कोणी मनुष्य आढळेना. तेव्हां ह्या शेतकऱ्याला त्यांनीं मोठें इनाम देऊं केलें, तरी तो ऐकेना. त्यांनीं पुष्कळ द्रव्य काढून त्याच्यापुढें ठेविलें, तरी तो त्यांचें ह्मणणें कबूल करीना. तेव्हां निरुपाय होऊन त्यांनीं त्याला आपल्या सेनापतीपुढें नेलें. ह्या सेनापतीनें त्याला असा धाक घातला कीं, "आह्मांला वाट दाखीव, नाहीं तर तुला आह्मी ठार करूं." त्या शेतकऱ्यानें अगदीं न डगमगतां उत्तर केलें: "तुह्मीं मला ठार मारिलें तर मी इमानी मनुष्यासारखा मरेन, माझ्या देशाशीं दगा केल्याचा दोष माथीं घेऊन मरणार नाहीं." हें असें त्याचें आपल्या देशासंबंधाचें अढळ इमान पाहून त्या सेनापतीचें मन विरघळलें, आणि त्यानें त्याला सोडून दिलें.

## पुरुराजा आणि त्याचा हत्ती.

प्राचीन काळीं आपल्या देशावर शिकंदरबादशाहानें स्वारी केली असतां, त्याच्याशीं सामना करावयास पुरुनामा राजा मोठ्या सैन्यानिशीं गेला. उभय सैन्यांची मोठी निकराची लढाई झाली. तींत पुरुराजा जखमी होऊन आपल्या हत्तीवरून खालीं पडला. तेव्हां शत्रूकडील कांहीं सैनिक राजाच्या अंगावरील बहुमोल पोशाक व जवाहीर काढून घेण्याकरितां धावले. पण राजाचा हत्ती तेथेंच उभा राहिला होता, तो त्या लोकांला त्याच्या अंगाला हात लावूं देईना. त्यानें त्या सैनिकांचे सगळे आघात सोसून आपल्या धन्याचा मोठ्या शौर्यानें बचाव केला; आणि ते निरुपाय होऊन अमळ दूर होतांच राजाला सोंडेनें उचलून आपल्या पाठीवरील अंबारींत ठेवून तो समरांगणांतून परत जाऊं लागला. इतक्यांत पुरुराजाचे सैनिक तेथें धावून आले, आणि त्यांनीं राजाला आपल्या छावणींत सुखरूप नेऊन पोंचविलें. पण तो विश्वासू हत्ती शत्रूंच्या वारांनीं बेजार होऊन लौकरच मरण पावला.

## विश्वासू कुत्रा.

एक इंग्रज गृहस्थ युरोपांत प्रवास करायाला गेला असतां, एके दिवशीं एक स्थळ पाहून यावयास आपल्याकडे पुरतसे पैसे आहेत कीं कसें तें पाहण्यासाठीं त्यानें आपली पैशांची पिशवी उघडून पाहिली, आणि मग तो तें पाहावयास निघून गेला. त्यानें ह्या प्रवासांत आपल्याबरोबर एक कुत्रा घेतला होता. त्याला त्यानें ह्या वेळीं आपल्याबरोबर नेलें नाहीं. तें स्थळ पाहावयास गेल्यावर तेथें एका खाणावळींत तो जेवला, आणि खाणावळवाल्याचे पैसे द्यावयासाठीं त्यानें आपली पिशवी उघडिली, तों तींतला एक पौंड नाहींसा झाला असें त्याला आढळून आलें. पुढें तो संध्याकाळीं बिन्हार्डी आला तेव्हां त्याच्या नोकरानें त्याला सांगितलें

तीं, आपला कुत्रा आजारी झाल्यासारखा दिसतो. कारण तो कांहींएक खात नाहीं. त्यावरून त्यानें त्या कुत्र्याला आंत आणविलें. तो विश्वासू प्राणी आंत येतांच धन्याजवळ धावत गेला, आणि आपल्या तोंडांतला पौंड त्याच्या पायांपाशीं ठेवून आपल्यापुढें ठेविलेलें अन्न त्यानें झटदिशीं खाऊन टाकिलें. आपला सांडलेला पौंड तो हाच, असें त्या गृहस्थाच्या लक्षांत येऊन त्याला आपल्या त्या कुत्र्याच्या विश्वासूपणाचें मोठें आश्चर्य वाटलें. सकाळीं निघतांना त्यानें पिशवी उघडिली होती, त्या वेळीं तींतला हा पौंड खालीं पडला होता. तो त्या कुत्र्यानें आपल्या तोंडांत धरून ठेविला होता; आणि तो सांडेल ह्या भीतीनें त्या मुक्या प्राण्यानें धनी परत येऊन त्याच्या स्वाधीन तो करीपर्यंत अन्नाला स्पर्श केला नाहीं.

## विश्वासू शिपाई.

एकदां एका लष्करांतल्या दोन शूर शिपायांला एक पत्र देऊन तें त्यांच्या सेनापतीकडे पोंचतें करावयासाठीं रवाना केलें. हा सेनापति दूरच्या एका ठाण्यांत बाकीच्या सैन्याचा तळ देऊन होता. हें पत्र पोंचविण्याचें काम मोठें जोखमाचें होतें. कारण शत्रूचे लोक चोहोंकडे फिरत होते, त्यांच्या हातीं लागण्याची त्यांला भीति होती. परंतु ते झालेला हुकूम बजावण्यासाठीं मोठा धीर करून निघाले. ते थोडी मजल चालून गेले न गेले तों त्यांला शत्रूच्या लोकांनीं गाठिलें. तेव्हां अर्थात् त्यांची यांची चकमक उडाली. तींत त्यांतला एक शिपाई ठार झाला, आणि दुसरा जखमी झाला. पण तो तें पत्र घेऊन सेनापतीच्या छावणीकडे पळत सुटला. तो घायाळ झाल्यामुळें पळतां पळतां अगदीं थकून जाऊन वाटेंत पडला. तरी तें पत्र शत्रूच्या हातीं लागूं नये ह्मणून आपणाला झालेल्या जखमेच्या घायांत

त्यानें तो कागद घालून ठेविला. असा तो तेथें निपचीत पडला असतां दुसरे दिवशीं त्याला त्याच्या लष्करांतल्या लोकांनीं पाहिलें आणि उचलून आपल्या छावणींत नेलें. त्या वेळीं त्याला बोलायाचें सामर्थ्य नव्हतें, व त्याचा प्राण अगदीं कंठीं आला होता. तरी त्यानें आपल्या जखमेंतला कागद सेनापतीला दाखवून मग प्राण सोडिला. हा असा त्याचा विश्वासूपणा पाहून त्या सेनापतीला मोठा गहिंवर आला, आणि त्यानें त्याची अतिशयित तारीफ केली. ती ऐकायाला तो बापडा जीवंत राहिला नाहीं.

## धन्याच्या शवाचें रक्षण करणारा कुत्रा.

म्यान्चेस्टरशहरांतला एक तरुण गृहस्थ आपला एक आवडता कुत्रा घेऊन कंबरलंड येथील तलाव पाहावयास गेला. तेथें तो डोंगरावरून फिरत असतां, एकाएकीं मोठें धुकें पसरलें, आणि त्याला तेथली पाऊलवाट उमगेनाशी झाली. असा तो आंधळ्यासारखा चाचपडत चालला असतां एका मोठ्या कड्यावरून खालीं खोल दरींत पडून मरण पावला. त्याचा कुत्रा बरोबर होता, तो त्याचें शव शोधून काढून त्याचें रक्षण करीत तेथें राहिला. तो जेथें पडला होता, ती जागा अगदीं एकीकडची असल्यामुळें त्या वाटेनें तीन महिने कोणीही माणूस गेला नाहीं. शेवटीं एक धनगर आपलीं मेंढरें वळीतवळीत तेथें आला. त्याची चाऊल लागतांच तो कुत्रा बारीक स्वरानें ओरडूं लागला. त्याचा तो शब्द कानीं पडतांच तो धनगर त्या ठिकाणीं गेला आणि पाहतो तों तेथें तें सडून पडलेलें प्रेत त्याला दिसलें. तेव्हां त्या डोंगरांत फिरावयास गेलेला एक गृहस्थ कोठें नाहींसा झाल्याचें त्यानें पूर्वीं ऐकिलें होतें, त्याची त्याला आठवण झाली, आणि त्यानें त्या गृहस्थाचें प्रेत त्याच्या नातलगांला दाखविलें. इतके दिवस तो कुत्रा तेथें काय खाऊन राहिला याचा

सगळ्यांला चमत्कार वाटला. तो विश्वासू प्राणी अगदीं वाळून अस्थिपंजर झाला होता. ह्या त्याच्या विश्वासूपणावर वर्डस्वर्थ व सर वॅाल्टर स्कॉट अशा दोन महाकवींनीं कविता करून त्याची कृति अजरामर केली आहे.

## कान्यूट राजा व विश्वासू गुलाम.

प्राचीन काळीं इंग्लंडांत सॅक्सन लोकांचा अमल होता. त्यांचा कान्यूट नांवाचा एक मोठा प्रतापी राजा होता. हिंवाळ्यांत एके दिवशीं त्याला कांहीं मोठ्या महत्त्वाच्या कामासाठीं इलाईनामक बेटांत जावयाचें होतें. पण त्या बेटासभोंवतालचें सगळें पाणी गोठून गेल्यामुळें होडी जाण्यासारखी नव्हती. बरफावरून चालणाऱ्या बिनचाकाच्या गाडींत बसून जावें, तर गाडीचें ओझें तोलण्याइतकें बरफ दाट असेलसें त्याला वाटेना; आणि त्यावरून चालत जावें तर पायांखालचें बरफ कोठें फुटून जलसमाधि मिळेल याचा नेम नव्हता. असा चोहोंकडून पेंच येऊन तो आपल्या लोकांनिशीं समुद्राच्या काठावर उभा राहिला. त्याच्या तैनातीच्या किंवा सभोंवतीं जमलेल्या कोणाही माणसाला कांहींएक युक्ति सुचेना; आणि राजाला तर त्या बेटांत अवश्य जावयाचें होतें. इतक्यांत एक मोठा बळकट व धिप्पाड माणूस पुढें येऊन राजाला ह्मणाला: "सरकार, मी फार जड आहें. बरफाचा थर कोठें पातळ असला, तर तो माझ्या भारानें फुटेल. तरी मी पुढें चालतों, आणि आपण माझ्या मागून चालावें." हें त्याचें ह्मणणें राजाला पसंत वाटून तो पुढें आणि राजा मागून असे ते त्या बेटांत सुखरूप जाऊन पोंचले. हा असा त्याचा विश्वासूपणा व स्वामिनिष्ठा पाहून राजा संतुष्ट झाला; आणि तो कोण व कोठला रहाणारा ह्मणून राजानें तपास करितां, त्याला असें कळलें कीं, तो एका गृहस्थाचा

गुलाम आहे. तेव्हां राजानें त्याला गुलामगिरींतून सोडवून व कांहीं जमीन इनाम देऊन सुखी केलें.

## विश्वासू घोडा.

अरब लोकांच्या एका टोळीनें एका लमाणावर हल्ला करून तें लुटलें; आणि सगळ्या उंची मालाचीं गाठोडीं बांधून ते स्वस्थानीं जावयास निघाले असतां, त्यांच्यावर एकरच्या पादशाहाच्या घोडदळानें हल्ला करून त्यांची दाणादाण केली. त्यांत बरेच अरब ठार झाले व कांहीं शत्रूच्या हातीं लागले. ते सगळे बंदीवान करून घेऊन त्या घोडदळाचा सरदार एकरशहराकडे चालला. त्या बंदीवानांपैकीं एक-जण त्या टोळीचा मुख्य होता. त्याच्या हाताला गोळी लागून तो जाय-बंदी झाला होता. त्याला त्यांनीं उंटावर बांधून चालविलें होतें, आणि त्याचा एक उमदा घोडा होता, तो त्याच्याबरोबर चालविला होता.

रात्रीच्या वेळीं ते लोक एके ठिकाणीं राहुट्या ठोकून मुक्कामास राहिले असतां, त्या अरबांच्या सरदाराचे हातपाय बांधून त्याला एका राहुटीच्या बाजूस टाकिलें होतें. तेथें तो जखमेच्या वेदनेनें कण्हत पडला असतां, मध्यरात्रीच्या सुमारास त्यानें आपल्या घोड्याचें खिंका-ळणें ऐकिलें. तें कोणत्या दिशेकडून आलें त्याचा अंदाज करून तो सरपटत सरपटत त्या आपल्या आवडत्या घोड्यापाशीं गेला आणि त्याला म्हणाला कीं, " मित्रा, आपण बऱ्याच वर्षांचे सोबती होतों. पण आतां तुझीमाझी तुटातूट होणार. माझें ते काय करितील याचा नेम नाहीं. पण तुझेही त्यांनीं हाल करावे, हें मला बरें वाटणार नाहीं. तर तुला मी सोडवितों. तूं येथून माझ्या तंबूंत जा आणि माझ्या बायकोला कळीव कीं, माझी व तिची पुनः भेट होणार नाहीं. माझीं मुलें तुझी चांगली जतन करितील." असें ह्मणून त्यानें त्याची कातड्याची

दोरी मोठ्या प्रयासानें कुरतडून तोडिली. तेव्हां तो मोकळा झाला, आणि आपल्या धन्याला तशा स्थितींत तेथें ठेवणें बरें नाहीं, असें वाटून त्यानें त्याच्या कंमरबंदांत आपले दांत खुपसून त्याला अलग उचलिलें आणि तेथून एकदम धूम ठोकून त्याच्या तंबूच्या दाराशीं त्याच्या बायकोजवळ त्याला सुखरूप नेऊन ठेविलें. हें असें त्याला भरधाव पळावें लागल्यामुळें तो अगदीं थकून गेला, आणि तेथें अंग टाकून त्यानें प्राण सोडिला !

## पतिव्रता स्त्रिया.

बाराव्या शतकांत कानर्डनामा एक जर्मनीचा बादशाहा होऊन गेला. त्यानें विन्सबर्गशहराला वेढा घातला असतां, आंतील लोकांनीं मोठें शौर्य प्रगट करून बरेच दिवस त्याला दाद दिली नाहीं. तरी शेवटीं त्यांला हार खाऊन बादशाहास शरण जावें लागलें. पण तो बादशाहा कठोर हृदयाचा होता. त्यांनीं इतके दिवस शौर्यानें लढून शहर हस्तगत होऊं न दिल्यामुळें त्याच्या सैन्याची बरीच खराबी झाली होती. ह्मणून तो त्यांजवर मनस्वीं संतापला होता. शहर हातीं आल्यावर त्यानें असें जाहीर केलें कीं, शहरांतल्या एकूणएक पुरुषांची कत्तल उडविण्याचा आपला निश्चय झाला आहे. हा जाहीरनामा ऐकून शहरांतलीं सगळीं माणसें घाबरून गेलीं. तेथील सगळ्या बायकांची बादशाहासमोर गर्दी झाली, आणि त्यांनीं आपल्या नवऱ्यांला जीवदान देण्याविषयीं त्याची पराकाष्ठेच्या दीन वाणीनें प्रार्थना केली. पण त्या पाषाणहृदय बादशाहाला दयेचा पाझर बिलकूल फुटेना. तरी त्यांनीं रडूनओरडून अतिशयित आकांत केला, तेव्हां त्यानें त्यांला निक्षून सांगितलें कीं, "तुमच्या नवऱ्यांचे प्राण वांचण्याची तर आशा सोडाच. तुह्मी आपली कांहीं चीजवस्त असेल ती घेऊन शहराबाहेर पडा; व तीही

तुमच्यानें उचलून नेववेल तेवढीच न्या; मी जास्त नेऊं देणार नाहीं." हा त्याचा अखेरचा निकाल ऐकून त्या निरुपाय होऊन शोक करीत शहरांत परत जात असतां, त्यांतल्या एकीनें आपल्या भगिनींना अशी युक्ति सुचविली कीं, आमच्या ओझ्यानें जाईल तेवढी चीजवस्त घेऊन शहरांतून बाहेर पडण्याची बादशाहानें आपणांस परवानगी दिली आहे, तर आपण आपल्या नवऱ्यांला पाठीवर घेऊन शहरांतून निघावें, दुसऱ्या कसल्याही वस्तूची आशा धरूं नये. ही युक्ति सगळ्यांला पसंत वाटून नेमिलेल्या दिवशीं आपल्या प्रिय पतींला पाठीवर घेऊन त्या शहराबाहेर जाऊं लागल्या. हा असा अनपेक्षित प्रकार पाहून शत्रूच्या सैनिकांला राग आला, आणि आपल्या बादशाहाचा ठराव व्यर्थ करण्याची ही युक्ति आहे, तेव्हां ती चालवूं द्यावयाची नाहीं, असें मनांत आणून ते त्यांला हरकत करावयास जाऊं लागले. पण ती त्या स्त्रियांची पतिभक्ति पाहून बादशाहा चकित झाला, आणि त्याचें हृदय विरघळून, त्यांला हरकत करूं नये, असा हुकूम त्यानें आपल्या लोकांस केला. इतकेंच नव्हे तर त्यानें त्या शहरांतल्या सगळ्या लोकांला जीवदान देऊन आपआपल्या घरीं निर्भय राहूं दिलें.

## नावडता कुत्रा.

एका गृहस्थाचा एक कुत्रा होता. तो दिसायाला चांगला नसल्याकारणानें तो त्याच्या आवडीचा नव्हता. तरी तो आवारांत राहून त्याच्या घराची राखण चांगल्या रीतीनें करी. असा तो उपयोगी असल्यामुळें त्याला त्या गृहस्थानें ठेविला होता. एके दिवशीं रात्रीं तो निजावयासाठीं माडीवर गेला असतां, हा कुत्रा त्याच्या मागून हळूच वर गेला आणि त्याच्या निजावयाच्या खोलींत शिरला. त्याला तेथें पाहून त्या गृहस्थाला आश्चर्य वाटलें. कारण तो असा कधीं माडीवर जात

नसे. ह्मणून त्यानें त्याला बाहेर हाकून देण्याविषयीं चाकराला सांगितलें. तसें त्यानें करून दार लावून घेतलें असतां, अमळशानें पुनः तो कुत्रा माडीवर जाऊन मोठ्यानें ओरडूं लागला व दार ओरबाडूं लागला. तेव्हां त्या गृहस्थानें त्रासून त्याला पुनः हाकून द्यावयास सांगितलें. त्याला असें हाकून दिलें, तरी तो परत येऊन पूर्वींपेक्षां मोठ्यानें ओरडून दारावर धक्के देऊं लागला. हें असें त्याचें विलक्षण वर्तन पाहून त्या गृहस्थाला मोठा अचंबा वाटला, आणि त्याचा त्रास चुकविण्यासाठीं त्यानें दार उघडून त्याला आंत घेतलें. तो आंत गेल्यावर धन्याच्या तोंडाकडे पाहून व मोठ्या प्रेमानें शेंपूट हलवून त्याच्या पलंगाखालीं जाऊन निजला. हें त्याचें करणें त्याच्या धन्याला बरें वाटलें नाहीं. तरी त्याला झोंप येत असल्यामुळें त्याला पुनः हाकून देण्याची दगदग त्यानें केली नाहीं, आणि त्याला तेथें राहूं देऊन तो स्वस्थ निजला.

असा तो निश्चिंत निजला असतां, मध्यरात्र उलटल्यावर एक माणूस त्याच्या खोलींत हळूच शिरला. त्याची चाऊल लागतांच तो गृहस्थ जागा होऊन पलंगावरून खालीं आला. इतक्यांत त्या कुत्र्यानें त्या माणसावर झडप घालून त्याच्या पायाला सडकून चावा घेऊन त्याला जागच्याजागीं धरून ठेविलें. त्याच्या धन्यानें ओरड केल्यावरून घरांतलीं माणसें जागीं होऊन तेथें आलीं. त्यांनीं त्या माणसाला पकडून बांधून ठेविलें. तो चोर त्या गृहस्थाचा चाकर होता. असा अपरात्रीचा खोलींत शिरण्याचें कारण तो कांहींच नीट सांगेना, ह्मणून त्याला पोलिसांच्या हवालीं केलें. त्यांजकडे त्यानें असें कबूल केलें कीं, धन्याला ठार मारून त्याची दौलत लुटावी असा आपला इरादा होता. ह्या कबुलीजबाबावरून त्याला न्यायाधीशानें शिक्षा केली. त्या इमानी

कुत्र्यानें आपला असा जीव वांचविल्याबद्दल त्या गृहस्थास केवढें समाधान व आनंद वाटला असावा, हें कांहीं सांगायाला नकोच. त्यानें आपलें व आपल्या त्या कुत्र्याचें एक चित्र काढवून आपल्या दिवाणखान्यांत टांगून ठेविलें.

## एका रशिअन नोकराची स्वामिभक्ति.

रशियाच्या उत्तरभागीं हिंवाळ्यांत बरफ इतकें पडतें कीं सगळे रस्ते त्यानें आच्छादून जातात. त्याचे मोठे थर जमिनीवर होतात. त्यांतून जाण्यासाठीं बिनचाकाच्या गाड्या असतात, त्यांना स्लेज ह्मणतात. अशा एका गाडींत बसून एक सरदार आपल्या बायकोसह दूरच्या गांवीं ऐन हिंवाळ्यांत चालला होता. त्याच्याबरोबर त्याचा एक विश्वासू नोकर होता. ते असे रात्रीचे एका दाट अरण्यांतून चालले असतां, त्यांची चाऊल लांडग्यांला लागली; आणि ते त्यांच्या पाठीस लागले. गाडीवानानें घोडे जलदी हांकण्याची पराकाष्ठा केली. पण लांडग्यांनीं अगदीं लगट केली. तेव्हां त्या सरदारानें चाकराला एक घोडा सोडून द्यावयास सांगितलें.तो अर्थात् अशाकरितां कीं, त्याला खायाला ते गुंतले ह्मणजे तेवढें त्यांना मागें टाकितां येऊन पुढली मजल झेपतां येईल. पण त्या हिंसक प्राण्यांची झुंड मोठी असल्याकारणानें त्यांनीं तो घोडा तेव्हांच फाडून खाल्ला आणि पुनः गाडीमागून दौड करून त्यांना गांठिलें. तेव्हां चाकरानें दुसरा घोडा सोडून दिला आणि उरलेले दोन घोडे पराकाष्ठेच्या वेगानें पिटिले. हाही घोडा त्या खाखा सुटलेल्या लांडग्यांनीं चट करून पुनरपि त्या गाडीमागून धाव घेतली; आणि ते येऊन तिशीं अगदीं भिडले. तेव्हां आतां काय करावें तें त्यांना सुचेना. उरलेले घोडे तर गाडी ओढायाला अवश्य हवे होते. त्यांतला आणखी एक सोडून देऊन

चाललें नसतें. आतां आपलीं शंभर वर्षें खास भरलीं असें त्या सरदाराला आणि त्याच्या बायकोला वाटलें. इतक्यांत त्यांच्या चाकरानें भरलेली बंदूक घेऊन गाडीखालीं उडी टाकून ह्मटलें "लांडग्यांला मी अडवून धरितों. तुह्मी गाडी झपाट्यानें हाकून टप्पा जवळ आला आहे तो कसा तरी गांठा. क्षणाचाहि विलंब लावूं नका. माझी बायकोमुलें आहेत, त्यांचें चालवा ह्मणजे झालें." ती वेळ आढेवेढे घेण्याची नव्हती. त्या सरदारानें घोड्यांच्या लगामा धरून घोडे भरधाव सोडिले, आणि थोड्याच अवकाशांत त्यानें जवळचा टप्पा गांठिला.

ठाण्यावर पोंचतांच तो सरदार कांहीं मनुष्य जमवून व बंदुका आणि मशाली घेऊन, त्या चाकरानें गाडीखालीं उडी टाकिली होती, त्या ठिकाणीं आला. पण तेथें त्याच्या रक्तावांचून कसलाच मागमूस राहिला नव्हता. त्या क्रूर प्राण्यांनीं त्या शूर पुरुषाला अगदीं चट करून टाकिलें होतें! पुढें आपल्या गांवीं गेल्यावर त्या सरदारानें त्याचें संगमरवरी दगडाचें एक स्मारक उभारून त्याखालीं धन्याच्या बचावासाठीं त्यानें आपले प्राण कसे वेंचिले तें तपशीलवार कोरून ठेविलें.

## एका सरदाराचें इमान.

प्राचीन काळीं स्पेनच्या गादीसंबंधानें वाद उपस्थित झाला असतां तिला हक्क सांगणारे दोन पुरुष पुढें आले. त्यांचीं नांवें आल्फॉन्सो व जॉन अशीं होतीं. त्या दोघांच्या कित्येक लढाया होऊन आल्फॉन्सोचा पुरा मोड झाला, आणि जॉननें गादी बळकाविली. त्यानें बहुतेक सगळा मुलूख आपल्या सत्तेखालीं आणिला. पण एक मजबूत तटबंदीचें शहर अगायलरनामक सरदाराच्या ताब्यांत राहिलें. हा सरदार आल्फॉन्सोच्या पक्षाकडचा होता. हें शहर हस्तगत करावें ह्मणून जॉननें त्याला वेढा

दिला. पण अगायलरनें तें बरेच दिवस मोठ्या शौर्यानें लढविलें. तो सरदार त्याला मुळीं हार जाईना, तेव्हां त्यानें त्याला असा निरोप पाठविला कीं, “ तुझ्या धन्याचा चोहोंकडून मोड होऊन तो अगदीं दुर्बळ झाला आहे. तर त्याच्या पक्षानें लढण्यांत आतां काय अर्थ आहे? शहर माझ्या स्वाधीन करून दे आणि मला शरण ये. मी तुला कांहींएक अपाय करणार नाहीं.” त्या सरदारानें असा जबाब पाठविला कीं, “ माझ्या घराण्यांत बेइमानपणानें वागण्याची चाल नाहीं; आणि शेवटपर्यंत लढावें, शत्रूला सहसा हार जाऊं नये, असा माझ्या घराण्याचा रिवाज आहे. तो मला पाळिला पाहिजे. जिवाच्या आशेनें बेइमान व्हावें हें मला कधींही पसंत वाटणार नाहीं.” जॉननें त्याला पुनः असें सांगून पाठविला कीं, “ तुझी व तुझ्या लोकांची मी उपासमार करीन व तुमची सगळ्यांची कत्तल उडवीन.” त्याला त्या सरदारानें असें उत्तर पाठविलें कीं, “ हा परिणाम सोसण्यास आमची तयारी आहे. शहर तुमच्या हातीं गेल्यावर तुह्मी आमची कत्तल करणार. तोंपर्यंत तर करीत नाहीं?”

ह्या अशा नेटानें त्या सरदारानें शत्रूशीं लढण्याचा निर्धार केला असतां, एके दिवशीं पुनः त्याला शहराच्या तटावर बोलावून जॉननें असें सांगितलें कीं, “तुझा धनी मरण पावला आहे; आतां त्याच्या पक्षानें लढून तूं आपला प्राण कां व्यर्थ खर्ची घालीत आहेस?” सरदार ह्मणाला: “तुह्मी मला ही बातमी सांगत आहां ती खोटी नसेल; पण त्याचें प्रेत प्रत्यक्ष पाहीपर्यंत मला ही खरी वाटणार नाहीं.” जॉन ह्मणाला: “ तुला त्याचें प्रेत स्वतः डोळ्यांनीं पाहावयाचें असल्यास मी तुला शहराबाहेर सुरक्षितपणें जाऊं देतों. तुझी खातरी झाल्यावर शहराच्या किल्ल्या मात्र तूं माझ्या स्वाधीन केल्या पाहिजेत.”

असें अभय दिल्यावरून तो सरदार आपल्या कांहीं शूर शिपायांसह, आपल्या धन्याचा अंत्यविधि ज्या देवळांत होणार होता, तेथें गेला. तो असा बाहेर पडला असतां, त्याच्याशीं जॉननें दगा केला नाहीं. अगायलरनें देवळांत जाऊन आल्फॉन्सोचें प्रेत पाहिलें, आणि त्याच्या मरणाबद्दल बहुत दुःख करून शहराच्या किल्ल्या त्याच्या कफणांत ठेविल्या आणि ह्मटलें: " ह्या किल्ल्या तुझ्याशिवाय कोणाच्याही स्वाधीन मी करणार नाहीं, असें वचन मीं तुला दिलें होतें, तें मीं शेवटपर्यंत पाळिलें." असें बोलून तो परत आपल्या शहराकडे आला. तेव्हां जॉननें त्याजपाशीं शहराच्या किल्ल्या मागितल्या. त्याला त्यानें असा जबाब दिला कीं, " किल्ल्या ज्याच्या होत्या, त्याच्या स्वाधीन करून मी मोकळा झालों आहें. आतां ह्या शहराचें व माझें जें कांहीं तुह्मांला करावयाचें असेल तें करा." हें असें त्याचें अढळ इमान पाहून जॉन अतिशयित खुश झाला, आणि त्यानें त्याला ह्मटलें कीं, "हे अतिशूर व विश्वासू पुरुषा, हें शहर तुझ्याच स्वाधीन असूं दे. ह्या शहरावर तुला मी माझ्या वतीनें सुभेदार नेमितों. जसा तूं आलफॉन्सोशीं शेवटपर्यंत इमानानें वागलास, तसाच मजशींही वागशील, अशी माझी पक्की खातरी आहे."

### विश्वासू नोकर.

सुमारें दोनशें वर्षांपूर्वी हॉलन्डांतील एका गरीब कुटुंबांत मायकल नांवाचा मुलगा होता. त्याला कोणतातरी धंदा शिकवावा असें त्याच्या बापाच्या मनांत होतें. पण ह्या मुलास खलाश्याचें काम पसंत वाटलें, व त्याशिवाय दुसरें कसलेंही काम आपणाला नको असें त्याचें ह्मणणें पडलें, ह्मणून त्याच्या बापानें त्याला एका जहाजावर नोकरी मिळवून दिली. हें जहाज एका व्यापाऱ्याचें होतें. तो

आफ्रिकेच्या उत्तरकिनाऱ्यावर जाऊन कापडाचा व्यापार करी. तो स्वतः ह्या जहाजांतून आपला माल नेई. यास्तव हा नवा मुलगा कसा चालतो हें त्याला प्रत्यक्ष पाहायाला मिळे. मायकलास जेंजें काम सांगावें किंवा शिकवावें, तें तो मनापासून करी व त्यांत लौकर हुशार होई. त्याला कोणतेंही काम नेमून दिलें म्हणजे तो तें इमानानें करी. त्यांत टंगळमंगळ किंवा दिरंगाई करीत नसे. ही अशी त्या मुलाची हुशारी व इमान पाहून तो व्यापारी फार खुश झाला, आणि त्यानें त्याला एकामागून एक बढतीच्या जागा देऊन मोठ्या हुद्याला चढविलें.

एके समयीं हें जहाज मोरोकोबंदरास जावयास निघालें असतां, तो व्यापारी आजारी पडला. तेव्हां आपला माल कोणाच्या ताब्यांत द्यावा, असा त्याला विचार पडला. शेवटीं त्यानें असा निश्चय केला कीं, मायकलाशिवाय दुसरा कोणी विश्वास ठेवण्यास पात्र नाहीं, तर त्याच्याच स्वाधीन आपला माल करावा. मग त्याला बोलावून आणून व आपल्या सगळ्या मालाचा हवाला देऊन, त्याची कशी काय व्यवस्था करावयाची तें समजावून सांगितलें. मायकल वयानें लहान असून त्याला असल्या कामाची अगोदर कधीं माहिती मिळाली नव्हती. तरी धन्यानें आपणावर सोपविलेलें हें काम साधेल तेवढें हुशारीनें व इमानानें करावें, हें आपलें कर्तव्य आहे असें त्याला वाटत होतें.

मोरोकोशहरीं जाऊन पोंचल्यावर त्यानें सगळें कापड बाजारांत नेऊन विकायाला मांडिलें असतां, त्या शहराचा सुभेदार तेथें कांहीं मालाची खरेदी करण्याकरितां आला. हा अमलदार मोठा जुलमी असून मनास वाटे तें करी. न्यायान्यायाची त्याला बिलकूल परवा नसे. मायकलानें बाजारांत मांडिलेलें कापड पाहून त्यानें त्यांतलें कांहीं

निवडिलें आणि त्याची किंमत विचारिली. ती त्यानें सांगितल्यावर तो माल त्यानें निमे किंमतीस मागितला. मायकल तेवढ्या किंमतीस तो देण्यास तयार होईना. तो ह्मणाला: “ह्या मालाची वाजवी किंमत आहे तीच मीं सांगितली आहे. हीहून कमी किंमतीस माल विकूं नको, असें माझ्या धन्याचें मला सांगणें आहे. मी त्याचा नोकर आहें. मला ह्या मालाची किंमत कमी घेतां येणार नाहीं.” हें त्याचें उत्तर ऐकून तो सुभेदार रागानें लाल झाला आणि ह्मणाला: “ह्या गोष्टीचा विचार करावयास तुला मी उद्यांपर्यंत अवकाश देतों.” असें ह्मणून तो चालता झाला. तो गेल्यावर आसपासचे लोक त्याला सांगूं लागले कीं, सुभेदार मागत आहे तेवढ्या किंमतीला तुझा माल देऊन आपला जीव बचाव; नाहींतर तुला तो देहांतशासन करील.” मायकल ह्मणाला: “माझें जीवित देवाच्या स्वाधीन आहे. माझ्यामुळें माझ्या धन्याचें एका पईचें नुकसान होईल तर मी त्याचा विश्वासू नोकर ठरणार नाहीं.”

दुसऱ्या दिवशीं तो सुभेदार पुन: बाजारांत आला आणि त्या कपड्याची किंमत विचारूं लागला. ती त्यानें आदल्या दिवसाच्या इतकीच सांगितली आणि ह्मटलें: “ ह्याबद्दल आपण माझा प्राण घेतला तरी चिंता नाहीं. माझ्या धन्याची प्रामाणिकपणानें व विश्वासानें नोकरी करण्यांत मला मृत्यु आला, तर त्याबद्दल मला कांहींएक वाटणार नाहीं.” हें त्याचें उत्तर ऐकून तो सुभेदार रागावून, “ ह्याचें डोकें उडवा” असा हुकूम तत्काळ देईल, असें तेथें जमलेल्या लोकांस वाटलें होतें. पण असा हुकूम त्यानें केला नाहीं. त्याची मुद्रा एकदम पालटली, आणि तो मोठ्यानें ह्मणाला: “तूं मोठा उमदा मनुष्य आहेस. तुझ्यासारखा नोकर मला मिळता तर मी आपणांला मोठा भाग्यवान्

लेखितों. तुझा हात मला धरूं दे. इतःपर तुला मी माझा मित्र लेखीन. तुझ्या ह्या विश्वासूपणाचें स्मारक ह्मणून मी ह्या कपड्याचा मला झगा करणार आहें. हे घे त्याचे पैसे.'' असें ह्मणून त्यानें त्या कपड्याची वाजवी किंमत मोजून दिली.

हा प्रामाणिक व इमानी तरुण गृहस्थ पुढें आपल्या अंगच्या उत्तम गुणांमुळें उत्कर्ष पावून आरमारावरच्या मुख्य सेनापतीच्या हुद्यास पोंचला आणि आपल्या देशाच्या रक्षणार्थ मोठमोठ्या लढाया मारून लोकप्रिय व राजप्रिय झाला.

# भाग सातवा.

## वचन पाळणें.

### फ्रान्सचा जॉन राजा.

चौदाव्या शतकांत इंग्लंड व फ्रान्स यांमध्यें युद्ध उपस्थित झालें असतां, एका लढाईत इंग्रजांनीं फ्रान्सचा राजा जॉन यास पकडून कैद केलें आणि इंग्लंडास आणिलें. तेथें तो चार वर्षे कैदेंत राहिल्यावर इंग्लंडच्या तिसऱ्या एडवर्डराजानें त्याला बंदींतून सोडून स्वदेशीं परत जाण्याची परवानगी दिली, ती अशा अटीवर कीं, त्यानें आपल्या प्रजेला तहाचीं कलमें कबूल करावयास लावून लढाई बंद करावी. ह्याप्रमाणें जॉनराजानें स्वदेशीं जाऊन एडवर्डराजानें सुचविलेलीं तहाचीं कलमें आपल्या प्रजेनें मान्य करावीं ह्मणून बरीच खटपट केली. पण त्यास फ्रेंच लोक कबूल होत ना. तेव्हां पुनः इंग्लंडास जाऊन इंग्लिशांच्या स्वाधीन होण्याचा त्यानें निश्चय केला. असें करूं नये ह्मणून त्याच्या मंत्र्यांनीं त्याला बहुत प्रकारीं सांगितलें. पण त्यांची ती सल्ला तो महामनस्क राजा ऐकेना. तो ह्मणाला: "विश्वास आणि प्रामाणिकपणा ह्या सद्वृत्ति जगांतील इतर जनांच्या हृदयांतून नष्ट झाल्या तरी त्या राजांच्या हृदयांत अढळ असल्या पाहिजेत." असा निश्चय करून तो परत इंग्लंडास गेला आणि तेथें शेवटपर्यंत बंदीवानदशेंत राहून स. १३६४ त मरण पावला.

## ह्मातारा होऊन मरावें.

एका राजाच्या पदरीं एक नकल्या होता. तो नानाप्रकारच्या चेष्टा करून त्याला व दरबारच्या इतर लोकांना रिझवी. ह्या त्याच्या चेष्टा कित्येक प्रसंगीं केवळ मूर्खपणाच्या असत, व त्यांमुळें कांहींतरी नुकसानी होई. पण राजा त्याला नेहमीं क्षमाच करी. ह्यामुळें तो फारच शेफारून भलभलतीं कर्मे करूं लागला. त्यानें एके समयीं एक भयंकर गुन्हा केला. त्याबद्दल त्याचा मनस्वी संताप येऊन राजानें त्याला देहांतशिक्षा करण्याचें ठरविलें. तेव्हां तो गायांवायां करून राजाची क्षमा मागूं लागला. पण त्यानें त्याला निक्षून सांगितलें कीं, "तुला आतां क्षमा तर बिलकूल व्हावयाची नाहीं. तरी कोणत्या प्रकारचें मरण तुला इष्ट वाटतें तें सांग, ह्मणजे त्या रीतीनें तुझा शेवट करण्यांत येईल." हे शब्द ऐकून तो नकल्या ह्मणाला: "महाराज, आपलें मन मोठें उदार आहे. आपण माझ्यावर एवढी तरी कृपा केली, ह्याबद्दल मी आपला ऋणी आहें. मी अगदीं ह्मातारा होऊन मरावें अशी माझी इच्छा आहे. ती आपल्या वचनाप्रमाणें पूर्ण करा." आपल्या वचनाचे शब्द स्मरून व त्याची अशी समयसूचकता पाहून राजा निरुत्तर झाला, आणि त्यानें त्याला सोडून दिलें. ह्यानंतर तो फार जपून वागत गेला. राजाला किंवा दुसऱ्या कोणाला राग येईसें कांहींएक त्यानें कधीं केलें नाहीं.

## शिकंदरबादशाहाचें वचन.

एके समयीं शिकंदरबादशाहाच्या लष्करांतल्या एका शिपायानें त्याची कांहीं मोठी महत्त्वाची कामगिरी केल्याबद्दल त्याला त्यानें जामदारापाशीं जाऊन हवी तेवढी रकम मागून घ्यावयास सांगितलें. त्याप्रमाणें तो शिपाई जामदाराकडे जाऊन फार मोठी रकम बादशाहानें

देऊं केलेल्या इनामादाखल मागूं लागला. ती ऐकून तो जामदार चकित झाला आणि ह्मणाला: " सगळा जामदारखाना खलास करून तुझी भर करावयास तूं मला सांगतोस काय?" तो शिपाई ह्मणाला: " बादशाहांनीं मला लागेल ती रकम मागून घ्यावयास सांगितलें आहे. हें बादशाहांचें वचन आहे. हें तुह्माला कसें मोडितां येईल?" जामदारानें त्याची समजूत घालण्याचा पुष्कळ यत्न केला. पण तो कांहीं आपली मागणी कमी करीना. तेव्हां शेवटीं निरुपाय होऊन जामदारानें खुद्द बादशाहाला त्याबाबद विचारिलें. त्यानें त्याला सांगितलें कीं, "तो जेवढी रकम मागत आहे, तेवढी त्याला दे. त्यानें माझ्या वचनावर पूर्ण भरंवसा ठेविला आहे; आणि मी राजा आहें, ह्मणून मी औदार्यांत हार जाणार नाहीं, अशी त्याची पक्की खातरी वाटून, त्यानें एवढी मोठी रकम मागितली आहे. यांत त्यानें मला मोठा मानच दिला असें मी समजतों."

## आजिलनामक पारधी.

आजिल नांवाच्या एका पारध्यानें आपल्या राजाची कांहीं आगळीक केल्यावरून त्याची त्याजवर इतराजी झाली; आणि राजाच्या लोकांनीं त्याला व त्याच्या एका लहान मुलाला पकडून राजासमोर आणिलें. हा राजा अमळ क्रूर स्वभावाचा होता. तो त्याला ह्मणाला: " माझ्या मनांतून तुला देहांतशासन करावयाचें आहे. परंतु, तूं नेम मारण्याच्या कसबांत पुरा वाकबगार आहेस, असें लोक ह्मणतात, तें खरें आहे कीं काय हें पाहावें असें माझ्या मनांत आलें आहे. तर तुझा जीव वांचविण्याचा एक उपाय तुला मी सांगतों." असें ह्मणून राजानें त्याच्या मुलास अमळ दूर उभा करून त्याच्या मस्तकावर एक फळ ठेविलें आणि ह्मटलें: "ह्या फळावर बाण मार. तुझा नेम चुकल

लेखितों. तुझा हात मला धरूं दे. इतःपर तुला मी माझा मित्र लेखीन. तुझ्या ह्या विश्वासूपणाचें स्मारक ह्मणून मी ह्या कपड्याचा मला झगा करणार आहें. हे घे त्याचे पैसे.'' असें ह्मणून त्यानें त्या कपड्याची वाजवी किंमत मोजून दिली.

हा प्रामाणिक व इमानी तरुण गृहस्थ पुढें आपल्या अंगच्या उत्तम गुणांमुळें उत्कर्ष पावून आरमारावरच्या मुख्य सेनापतीच्या हुद्यास पोंचला आणि आपल्या देशाच्या रक्षणार्थ मोठमोठ्या लढाया मारून लोकप्रिय व राजप्रिय झाला.

व थकलेला वाटसरू सायंकाळच्या समयीं माझ्या तंबूपाशीं येऊन मजकडे कांहीं खायाला मागूं लागला. त्याची ती दशा पाहून माझ्यानें त्याला नाहीं ह्मणवलें नाहीं. तो खानाचा शत्रु होता हें मला ठाऊक नव्हतें. हा मजकडून खानाचा नकळत अपराध झाला आहे. याबद्दल मला क्षमा करावी." हें त्याचें बोलणें खानानें मनास न आणून त्याला ठार मारण्याचा हुकूम केला. त्याप्रमाणें त्याला वधस्थानीं नेलें; आणि आतां त्याला मारणार इतक्यांत तो प्यावयास पाणी मागूं लागला. खानानें तें त्याला द्यावयास सांगितलें आणि ह्मटलें कीं, "हें पाणी तूं पीस तोंपर्यंत तुझा प्राण घेतला जाणार नाहीं." हे खानाचे शब्द ऐकून त्या सरदारानें पाण्याचें भांडें हातीं घेतलें आणि तें तोंडास न लावितां खालीं भुईवर जोरानें फेंकून फोडून टाकिलें. मग तो खानाकडे वळून ह्मणाला: "हें पाणी मी पिईंपर्यंत माझ्या जिवाला धक्का लागणार नाहीं असें वचन तुह्मीं आतांच दिलें आहे. तर हें आतां मला कदापि पितां येणार नाहीं. ह्मणून माझी शिक्षा तुह्मीं रद्द केली पाहिजे." हा त्याचा समयोचितपणा पाहून खान थक्क झाला. तो जात्या दयाळू असल्याकारणानें त्याला आपलें वचन मोडवलें नाहीं, आणि त्याला त्यानें सोडून दिलें.

## मूर आणि स्प्यानिअर्ड.

कांहीं शतकांपूर्वीं मोरोकोदेशांतल्या मूरलोकांचा अमल स्पेनदेशाच्या कांहीं भागावर असतां, एका स्प्यानिश गृहस्थाचें एका तरुण मुराशीं भांडण जुंपलें. त्यांत त्या मुराला त्यानें ठार केलें आणि तेथून पळ काढिला. त्या मुराच्या बरोबर लोक होते, ते त्याच्या पाठीस लागले. त्यांची नजर चुकवून तो एका बागेच्या आवारांत शिरला त्या बागेचा धनी मूर होता; व तो त्या वेळीं बागेंत होता. त्याला त

शरण गेला आणि आश्रय मागूं लागला. त्याची अशी स्थिति पाहून त्याला त्याची दया आली. मग त्यानें त्याला बागेंतलें एक फळ खायाला देऊन त्याचें रक्षण करण्याचें वचन दिलें. त्याला त्यानें फळ खायाला देण्याचें कारण असें कीं, ज्यानें आपल्याबरोबर बसून एकदां कांहीं खाल्लें असेल, त्याशीं दगा करूं नये, असा त्या काळच्या मूरलोकांचा रिवाज होता. त्यानें त्याला आपल्या बागेंतल्या मांगरांत लपवून ठेविलें आणि असें वचन दिलें कीं, "रात्र पडतांच तुला मी विशेष सुरक्षित जागीं नेऊन पोंचवीन."

मग तो मूर आपल्या घरीं जाऊन स्वस्थ बसला असतां, त्याचे कांहीं लोक त्याच्या मुलाचें प्रेत घेऊन रडतओरडत घरांत आले. प्रिय पुत्राचा वध झालेला पाहून तो पराकाष्ठेचा दुःखी झाला; आणि त्याला कोणीं कसें मारिलें हें त्याला कळलें, तेव्हां त्याची अशी पक्की खातरी झाली कीं, ज्याला आपण आश्रय दिला आहे, त्यानेंच आपल्या पुत्राचा प्राणनाश केला आहे. पण ह्यासंबंधानें आपल्या लोकांकडे तो एक शब्दही बोलला नाहीं; आणि रात्र पडून अंधार झाला तेव्हां तो त्या स्पानिअर्डाकडे गेला, आणि त्यानें त्याला बाहेर काढून व आपल्या एका चपळ घोड्यावर बसवून ह्मटलें: " हे ख्रिस्ती मनुष्या, तूं ज्याला आज ठार मारिलें, तो माझा स्वतांचा मुलगा होता. ह्याबद्दल तुला शासन होणें इष्ट आहे. तथापि मी तुला अभयवचन देऊन चुकलों आहें, तें मला मोडितां येत नाहीं. तर आतां येथून त्वरित निघून जा. उजाडण्यापूर्वीं तूं आपल्या मुक्कामीं सुखरूप जाऊन पोंचशील. "

### वचन पाळण्याचा अप्रतिम दाखला.

आपल्या देशांत ब्रिटिश सेनेचें सेनापतित्व उत्तम प्रकारें करून प्रख्यातीस आलेला सर उइलिअम नेपीअर हा स्वदेशीं गेल्यावर एके

दिवशीं गांवढयांत सहल करावयास निघाला असतां, वाटेंत त्याला एक लहान मुलगी स्फुंदूनस्फुंदून रडतांना दिसली. तिच्याजवळ जाऊन तिच्या रडण्याचें कारण त्यानें पुसलें. मुलीनें सांगितलें: "माझा बाप कामावर गेला आहे, त्याला जेवण पोंचविण्यासाठीं मी गेलें होतें. तें त्याला देऊन हें भांडें मी घरीं परत नेत होतें. तें माझ्या हातचें पडून फुटलें. त्याचे हे तुकडे पाहा. आह्मी गरीब आहों. भांडें फोडून नुकसान केलें ह्मणून मला घरीं खातरीनें मार बसेल, ह्या भीतीनें मी रडत आहें. बाबा, तुह्मांला हें सांधून देतां येईल तर पाहा." सर उइलिअम ह्मणाला: "हें भांडें तर मला किंवा दुसऱ्या कोणाला धड करितां येणार नाहीं. असलें दुसरें नवें भांडें घ्यायाला तुला मी सहा पेनी देतों." असें ह्मणून त्यानें आपली पिशवी उघडून पाहिली, तों तींत सुटे पैसे नव्हते. तेव्हां तो फार कष्टी होऊन त्या मुलीस ह्मणाला: "आतां माझ्याजवळ पैसे नाहींत. उद्यां ह्याच वेळीं तूं येथें मला भेटशील तर मी तुला ते देईन. आतां घरीं जा आणि घडलेला सगळा प्रकार आईला सांग." हें त्याचें आश्वासन मिळाल्यानें त्या मुलीचें थोडेंसें समाधान झालें, आणि डोळे पुसून ती तेथून निघून गेली.

इकडे सर उइलियम सहल करून घरीं आला तों त्याच्या हातीं एक आमंत्रणचिट्ठी पडली. ती बाथशहरीं एका गृहस्थाच्या सन्मानार्थ होणाऱ्या मेजवानीची होती. हा गृहस्थ त्याचा परम स्नेही होता; व त्याला भेटण्यास तो फार आतुर झाला होता. ह्या प्रसंगीं तो त्यास भेटला नाहीं तर तो पुनः बरेच दिवस भेटण्याचा संभव नव्हता. तेव्हां त्या मुलीस दिलेल्या वचनाप्रमाणें उदयिक त्या जागीं भेटून बाथशहरीं संध्याकाळीं मेजवानीच्या वेळीं पोंचण्याची मुळीं आशा नव्हती.

तेव्हां आतां कसें करावें हा विचार त्याला पडला. शेवटीं त्या थोर मनाच्या व सत्यप्रिय गृहस्थानें त्या मुलीची निराशा करून खोटेपणाचा दोष माथीं घेऊं नये; मेजवानी चुकली व त्या मित्राची भेट अंतरली तरी कांहीं चिंता नाहीं, असा आपल्या मनाचा निश्चय करून त्यानें आमंत्रण-चिठ्ठीचा जबाब असा पाठविला कीं, "पूर्वींच वचन देऊन गुंतलों असल्या-मुळें मला मेजवानीस येतां येत नाहीं, ह्याबद्दल दिलगिरी वाटते."

## शरण आलेल्याचें रक्षण.

प्राचीन काळीं स्कॉटलंडांत कांहीं कडव्या जातींचे लोक रहात असत. तो देश डोंगराळ असल्या कारणानें तेथल्या गढींत निर-निराळ्या जाती ठाणीं धरून रहात. त्यांचे मुख्य नायक असत. त्यांच्याशिवाय त्या कोणांचा हुकूम मानीत नसत. ह्या जातींला त्यांच्या मूळच्या मुख्य पुरुषांवरून नांवें मिळालीं असत. अशा एका जातीला ग्रेगॉर असें नांव होतें. ह्या जातीच्या नायकाचा मुलगा एकदां शिकारीस गेला असतां, त्याची कॅम्पबेलनामक जातीच्या नायकाशीं गांठ पडली. ह्या दोन्ही जातींचें भांडण नसल्यामुळें ते रात्रीचे एकत्र वस्तीस राहून एके ठिकाणीं बसून जेवले. पण भोजनानंतर त्या दोघांचा कांहीं कारणा-वरून वाद झाला, आणि ते हातपिटीला आले. तींत ग्रेगॉर जातीच्या नायकाचा मुलगा जखम लागून ठार झाला. ही गोष्ट त्याच्या लोकांला कळतांच त्यांनीं त्या नायकाचा पाठलाग करून त्याला अगदीं जेरीस आणिलें. अशा आणीबाणीच्या वेळीं तो ग्रेगॉरलोकांच्या नायकाच्या दाराशीं जाऊन त्याजकडे आश्रय मागूं लागला. शरण आलेल्यास अभय द्यावें, असा त्या डोंगरी मुलखांतल्या शूर लोकांचा संप्रदाय होता, त्यास अनुसरून त्यानें त्याला अभय देऊन आपल्या पाठीशीं घातलें. इत-क्यांत त्या नायकाचे लोक त्या मनुष्याला शोधीत तेथें आले. त्यांला

त्यांचा तो नायक ह्मणाला: "तो मनुष्य मला शरण आला आहे. त्याच्या केशासही तुह्मीं धक्का लावितां कामा नये." हें ऐकून त्याच्या लोकांनीं त्याला त्या माणसानें कोणता भयंकर गुन्हा केला होता तो सांगितला. त्यावरून अर्थात् त्या मनुष्यानें प्रत्यक्ष आपल्या प्रिय पुत्राचा वध केला आहे असें त्याला समजलें. पण त्याला एक वेळ अभय दिलें तें दिलें. आतां दिलेलें वचन कांहीं झालें तरी मोडावयाचें नाहीं, असा त्यानें निश्चय केला. त्याच्या बायकोमुलांनीं सुद्धां त्याला पुष्कळ रडूनओरडून सांगितलें कीं, त्या मनुष्याचा वध करावा हेंच योग्य आहे. पण तो कांहीं त्यांच्या विनवण्यांनीं वळला नाहीं आणि ह्मणाला कीं, "माझ्या घरांत तो आश्रयास आहे तोंपर्यंत मी त्याच्या जिवाला धक्का लागूं देणार नाहीं." असें ह्मणून त्यानें दुसऱ्या दिवशीं त्या मनुष्याला त्याच्या गांवीं नेऊन सुखरूप पोंचविलें आणि बजाविलें कीं, " तूं माझ्या मुलास ठार मारिल्यामुळें माझे लोक तुझा सूड उगविल्यावांचून रहाणार नाहींत. तरी तूं त्यांच्या हातीं पुनः न लागण्याची खबरदारी ठेव."

पुढें स्कॉटिश सरकारानें त्या ग्रेगॉरजातीला देशांतून साफ निघून जाण्याचा हुकूम केला; आणि त्यांतल्या एकाही माणसाला कोणी आपल्या घरीं आश्रय देऊं नये असा जाहीरनामा लाविला. त्यामुळें त्या जातीचे लोक वाट फुटली तिकडे वेषांतर करून निघून गेले. त्या जातीचा तो वृद्ध नायक आपल्या मुलांमाणसांसह देशोधडीस लागला. तेव्हां त्याच्या उपकाराची आठवण होऊन कॅम्पबेल जातीच्या नायकानें त्याला व त्याच्या कुटुंबाला आपल्या घरीं आश्रय दिला.

## वचनाचा खरा.

अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रेंच लोक इंग्लंडावर स्वारी करणार असा धाक वाटल्यावरून ग्लासगो येथें एक मोठी पलटण तयार

करून ठेविली होती. ह्या पलटणींत फिसाद होऊन बंड होण्यापर्यंत पाळी आली. पण अमलदारांच्या हुशारीमुळें बखेडा मोडून सगळे लोक शांत झाले. अशा बिकट प्रसंगीं त्यांचा बखेडा देशाच्या नाशाला कसा कारणीभूत झाला असता, याविषयीं त्यांनीं बखेडेखोर लोकांस शांतपणें समजावून सांगितलें आणि लष्करी कायद्याप्रमाणें पाहतां ते सगळे शिक्षेला पात्र आहेत अशी त्यांची खातरी करून दिली. त्या वेळीं त्या बखेडेखोरांपैकीं चौघे असामी आपण होऊन पुढें आले आणि ह्मणाले कीं, "आमच्यावर ह्या गुन्ह्याचा आरोप ठेवून आमची चौकशी व्हावी, आणि बाकीच्या सगळ्यांसाठीं आह्मांस देहांतशिक्षा करावी." ह्यावरून त्या चौघां जणांची चौकशी करण्यासाठीं एडिनबरो येथें नेण्याचें ठरून, त्यांस एका लष्करी अमलदाराच्या हवालीं केलें. तो त्यांस तिकडे घेऊन चालला असतां, त्या चौघांपैकीं एक जण त्यास ह्मणाला: " ग्लासगो येथें एका मित्रापाशीं माझें कांहीं अतिमहत्त्वाचें काम आहे, तें मरण्यापूर्वीं मला अवश्य केलें पाहिजे. मी तर आपखुशीनें मरायाला तयार झालों आहें. पण माझ्या मित्राशीं माझें जें काम आहे, तें केल्यावांचून मला सुखाचें मरण यावयाचें नाहीं. तर मला ग्लासगोशहरांत परत जाऊं द्या. माझें काम उरकून मी थोड्या तासांनीं माघारीं फिरून तुह्मी एडिनबरो शहरीं जाऊन पोंचण्यापूर्वीं तुह्मांला येऊन मिळतों. मला तुह्मी बाळपणापासून ओळखितां. माझा गांव व गोत हीं तुह्मांला चांगलीं ठाऊक आहेत. तर मी हें वचन देत आहें, तें मोडून तुह्मांला गोत्यांत आणण्याचें अधम कर्म माझ्या हातून कदापि व्हावयाचें नाहीं, ह्याविषयीं तुह्मी खातरी बाळगा. तुह्मी आह्मांला किल्ल्यांत नेऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर उभे करण्याच्या वेळीं मी तुमच्याबरोबर आहेंच ह्मणून समजा."

ही अशी विलक्षण विनंति जबाबदार लष्करी अमलदारास गुन्हेगार-मनुष्यानें करावी हें मोठें चमत्कारिक होतें. पण त्या अमलदाराला त्याचा पक्का भरंवसा वाटून त्याला त्यानें परत जाऊं दिलें. त्यानें रातोरात ग्लासगोशहरांत जाऊन आपलें काम उरकिलें आणि उजाडण्यापूर्वी तेथून माघारीं दौड केली. पण आपण लष्करांतला शिपाई पळून जात असल्याचा वहीम येऊन कोणीं आपणास पकडूं नये म्हणून तो आड-वाटेनें एडिनबरोशहराकडे चालला. ती वाट मोठ्या फेऱ्याची असल्या-मुळें त्याला त्या अमलदारास लौकर गांठितां आलें नाहीं. एडिनबरोशहर जवळ आलें तरी तो येईना, तेव्हां त्या अमलदाराला मोठें संकट पडलें. तो अगदीं हळूहळू वेळ काढीत चालूं लागला. शेवटीं तो एडिनबरोशहरांत जाऊन पोंचला, तरी तो आला नाहीं. तेव्हां आतां कसें करावें असा त्याला मोठा पेंच पडला. तेथें त्यानें त्याची आणखी थोडा वेळ वाट पाहून शेवटीं निरुपायास्तव त्या तिघां असामींसच किल्ल्यांत नेलें; आणि आतां तो त्यांला अधिकाऱ्यापुढें उभे करणार, इतक्यांत तो शिपाई धापा टाकीत तेथें आला आणि त्या तिघां कैद्यांबरोबर उभा राहिला. पुढें त्या चौघां इसमांची चौकशी होऊन त्यांला देहांत-शिक्षा द्यावी असा निकाल झाला. पण नंतर असें ठरलें कीं, बंड करणाऱ्या लोकांस धाक वाटावा म्हणून त्यांपैकीं एकालाच तेवढें देहांतशासन द्यावें, व बाकीच्यांना सोडून द्यावें. त्यावरून त्यांतल्या कोणत्या मनु-ष्याला अशी शिक्षा करावी, हें चिठ्या टाकून ठरविलें; ह्याप्रमाणें त्यांतले तिघे सुटले. त्यांत हा वचनाचा खरा माणूस सुटला.

## वचनाचा अढळ.

रोमन व कार्थेजिअन लोकांचें युद्ध पुष्कळ वर्षें चाललें होतें. त्यांच्या एका लढाईत रोमनलोकांचा रेग्युलसनामा सेनापति शत्रूंच्या

हातीं लागून त्यांच्या कैदेंत पांच वर्षें होता. एवढ्या अवकाशांत रोमन लोकांची अनेक लढायांत फत्ते होऊन कार्थेजिअन लोक अगदीं जेरीस आले. तेव्हां तहाचें बोलणें लावावें असें त्यांच्या मनांत आलें. ह्या कामीं रेग्युलसाचा चांगला उपयोग होईल असें वाटून त्यांनीं आपल्या वकिलांबरोबर त्याला पाठविलें. जातेवेळीं त्याच्याकडून त्यांनीं अशी शपथ घेवविली कीं, "तहाचें बोलणें रोमन लोकांनीं मान्य केलें नाहीं, तर मी परत कार्थेजशहरीं येईन."

रोमशहराच्या वेशीपाशीं जाऊन पोंचल्यावर रेग्युलस शहरांत जाईना. तो ह्मणालाः " मी आतां रानटी लोकांचा गुलाम आहें; आणि सिनेट सभा नवल्या लोकांस तटाच्या आंत जाऊं देणार नाहीं." तो वेशीपाशीं आला आहे असें ऐकून त्याची बायको आणि दोन मुलगे त्याला भेटायाला आले. त्यांनीं त्याला शहरांत येण्याविषयीं पराकाष्ठेचा आग्रह केला. पण तो कांहीं केल्या जाईना. तेव्हां सिनेट सभा शहराबाहेर भरली, आणि कार्थेजिअन वकिलांनीं आपलें ह्मणणें तिला प्रथमतः कळविलें. मग रेग्युलस उभा राहून ह्मणालाः " महाराज, मी कार्थेजिअन लोकांचा गुलाम ह्या नात्यानें त्यांच्या तर्फे तहाचें बोलणें लावायास आलों आहें." एवढे शब्द बोलून तो वकिलांबरोबर तेथून जाऊं लागला. कारण सिनेट सभेंत कोणत्याही बाबीविषयीं खलबत होत असतां, तेथें परक्या लोकांनीं राहूं नये, असा रोमन लोकांचा कायदा होता. तो जाऊं लागला तेव्हां सिनेट सभेंतले त्याचे मित्र त्याला सभेंत राहून सिनेटर ह्या नात्यानें आपला अभिप्राय देण्याविषयीं आग्रह करूं लागले. पण तो त्या सभेची इभ्रत कमी करण्यास तयार होईना. हा त्याचा हट्ट पाहून कार्थेजिअन वकिलांनीं त्याला सिनेटसभेंत रहाण्याचा हुकूम

केला. त्यामुळें त्याला तेथें रहाणें भाग पडलें. पण तो तेथें उभा राहिला, बाकीच्या सभासदांबरोबर बसला नाहीं. तो बोलला: "तुह्मी लढाई बंद करूं नका. कार्थेजिअन लोकांची सध्यां फार हवलदिल स्थिति झाली आहे. अशा वेळीं लढाई बंद कराल तर त्यांत त्यांचा फायदा होईल, आणि तुमचें नुकसान होईल. आतां कैद्यांच्या अदला-बदलीसंबंधानें त्यांचें बोलणें आहे, तेंही तुह्मीं मनास आणूं नका. कारण शत्रूच्या हातीं सांपडलेले आपले सगळे सेनापति सुखरूप आहेत. ते निरोगी आणि सशक्त आहेत. आतां मजविषयीं ह्मणाल तर माझी प्रकृति अगदीं ढासळली आहे. ती पुन: ताळ्यावर येऊन मी कोणतीही जोखमाची कामगिरी करण्यास समर्थ होईन असें मला मुळीं वाटत नाहीं. शत्रूंनीं मला अशा तऱ्हेचें विष पाजिलें आहेसें वाटतें कीं, मी तेणेंकरून हळूहळू झुरून मरणार. तेव्हां अर्थात् मी थोड्या दिवसांचा सोबती आहें. तर तुह्मी कैद्यांची अदलाबदल करून आह्मांला सोडविण्याची गोष्ट मनास आणूं नका."

ह्या त्याच्या सल्ल्याप्रमाणें वागण्याचें रोमन लोकांनीं ठरविलें. पण ते त्याला परत कार्थेज येथें जाऊं देतना. तो ह्मणाला: "तह्याचें बोलणें रोमन लोकांस मान्य झालें नाहीं तर मी परत येईन, अशी शपथ मीं वाहिली आहे." तेव्हां मुख्य धर्माध्यक्षानें आपला असा स्पष्ट अभिप्राय दिला कीं, रेग्युलसाकडून त्यांनीं जुलमानें शपथ करविली आहे, ह्मणून तीप्रमाणें त्यानें वागण्याचें कारण नाहीं. हा असा त्यांचा आग्रह पाहून रेग्युलस ह्मणाला: "मला माझी शपथ मोडा-वयाला सांगून माझी बेअब्रू करावी अशी तुमची इच्छा आहे काय? मी तेथें गेल्यावर ते माझे पराकाष्ठेचे हाल करून माझा प्राण घेतील हें मला ठाऊक आहे. पण अशा दगाबाजीनें वागून जो दुर्लौकिक

ह्मोणार आहे, व मनाला जी नेहमीं हुरहुर लागून रहाणार आहे, त्यांपेक्षां मरणाचें भय मला विशेष वाटत नाहीं. मी सध्यां कार्थेजकरांचा गुलाम झालों आहें, तरी मी मूळचा रोमन असून रोमच्या नांवाचा मला पूर्ण अभिमान आहे. मी परत येईन अशी शपथ वाहिली आहे, तर मीं परत जावें हा माझा धर्म आहे. पुढें काय होईल तें होवो." असें ह्मणून तो आलेल्या वकिलांबरोबर पुनः कार्थेज येथें गेला; आणि रोमन लोकांनीं त्याच्या सल्ल्याप्रमाणें लढाई पुढें चालविल्याकारणानें कार्थेजकरांनीं त्याला हाल करून ठार मारिलें. ह्याप्रमाणें ह्या महाशय पुरुषाला आपली अब्रू आपल्या जीवितापेक्षां विशेष प्रिय वाटल्यामुळें तो असा देशकार्याला बळी पडला.



# भाग आठवा.

## समाधानवृत्ति.

### समाधानवृत्तीची कसोटी.

आस्त्रियादेशांतल्या एका सरदारानें व्हिएनाशहरांत एक मोठें छानदार घर बांधून त्याच्या पुढल्या भागीं एका दगडाच्या पाटीवर पुढील लेख कोरिला: "हें घर काउन्ट डॉर्नें यानें बांधिलें आहे. जो कोणी आपल्या समाधानवृत्तीसंबंधानें त्याची खात्री करील त्यास हें घर तो देणार आहे." एके दिवशीं एक नवखा माणूस त्या घराच्या मालकाकडे येऊन ह्मणाला: "जो कोणी खऱ्या समाधानवृत्तीचा माणूस असेल, त्याला देण्यासाठीं हें घर तुह्मीं बांधिलें आहे, तरी मी अगदीं अशा वृत्तीचा मनुष्य आहें, असें हवें असल्यास मी शपथेवर सांगण्यास तयार आहें. तर हें घर माझ्या स्वाधीन करा." ही त्याची धीटपणाची मागणी ऐकून तो सरदार ह्मणाला: "महाराज, खऱ्या समाधानवृत्तीच्या मनुष्यास हें घर देऊन टाकावें अशी माझी इच्छा आहे, हें अगदीं बरोबर आहे. पण तुमच्या ठायीं समाधानवृत्ति बाणल्याचें यत्किंचित्हि लक्षण दिसत नाहीं. तुह्मी अगदीं समाधानी असतां तर हें घर मिळविण्याची इच्छा तुह्मांला मुळीं झाली नसती. तर आपण आल्या वाटेनें चालते व्हा."

### वेडगळ भिक्षुक.

कांहीं भिक्षुक भिक्षा मागून उपजीवन करीत, तरी ते धष्टपुष्ट असत. त्यांची अशी चांगली प्रकृति पाहून कांहीं गृहस्थांला चमत्कार

चाटे. ते म्हणतः " हे भिकारी दुसऱ्यांनीं दिलेल्या भाकरतुकड्यावर उपजीविका करीत असून असे गलेलठ्ठ आहेत याचें बीज काय ? " एका गृहस्थानें त्यांच्या अशा स्थितीचें कारण लक्षांत आणून आपल्या मित्रांपाशीं अशी प्रतिज्ञा भोगिली कीं, " ह्या भिक्षुकांला मी थोड्याच दिवसांत रोड करून सोडितों. " मग त्यानें त्या भिक्षुकांला आपल्या घरीं भोजनास बोलाविलें आणि त्यांस उत्तम व दुर्मिळ पक्वान्नें खाऊं घातलीं. तशीं स्वादिष्ठ व मिष्ट पक्वान्नें त्यांला साऱ्या जन्मांत चाखावयास मिळालीं नव्हतीं. ह्या मेजवानीनंतर त्या भिकाऱ्यांला तशा मधुर अन्नाची रुचि लागल्यामुळें त्यांला साध्या अन्नाची चव लागेनाशी झाली; आणि राहूनराहून त्यांला त्या एकदां खाल्लेल्या मिष्टान्नांची आठवण होई. अशा स्थितींत त्यांला साध्या अन्नाचा कंटाळा येऊन तें ते पोटभर खातनासे झाले. त्यामुळें ते हळूहळू रोडावत चालले. अशी त्यांची अवस्था झाल्यावर त्यांला रोड करण्याची प्रतिज्ञा ज्यानें केली होती, त्याला त्याच्या मित्रांनीं विचारिलें: "तुह्मीं यांला रोड करण्याचा कोणता उपाय योजिला ? " तो ह्मणालाः "पूर्वी हे भिक्षुक पुष्ट होते याचें कारण असें कीं, यांला जें कांहीं भिक्षान्न मिळे, तें सेवन करून त्यांत हे तृप्त असत. पण आतां यांला स्वादिष्ठ अन्नाची गोडी लागल्यामुळें साध्या अन्नाचा त्यांला वीट येऊं लागला. तेव्हां अर्थात् तें ते पुरेसें खातनासे झाले आणि तेंही कंटाळत खाऊं लागले, त्यामुळें त्यांच्या अंगीं तें लागेनासें झालें आहे. यास्तव ते आतां रोडावत चालले आहेत." ह्यावरून असा बोध घ्यावयाचा कीं, ज्याला सुखाची चाड असेल, त्यानें प्राप्त स्थितीमध्यें जें कांहीं मिळेल, त्यांत संतोष मानावा; उगीच जळफळ करीत रहाणें मुळीं हिताचें नाहीं.

## समाधानाचें बक्षीस.

फ्रान्सदेशांत एकदां मोठा दुष्काळ पडून गोरगरिबांचे अन्नावांचून हाल होऊं लागले. तेव्हां दयाळू व उदार गृहस्थ त्यांला आपआपल्या-परी मदत करूं लागले. एक गृहस्थ आपल्या आसपासच्या वीस गरीब मुलांस आपल्या घरीं बोलावून प्रत्येकाला एकएक पाव देऊं लागला. हे पाव तो एका टोपलींत ठेवी, आणि तीं मुलें ते एकएक उचलून घेऊन जात. त्यामुळें त्यांतला सगळ्यांत मोठा पाव मिळविण्याविषयीं प्रत्येक जण धडपड करी. त्या मुलांमध्यें एक मुलगी असे, ती मात्र असली धडपड मुळीं करीत नसे. बाकीच्या मुलांनीं पाव नेले म्हणजे उरलेला पाव ती उचली आणि त्या परोपकारी गृहस्थाचे आभार मानून कृतज्ञतापूर्वक त्याच्या हाताचें चुंबन करी. तिच्या सौजन्यामुळें व सभ्यतेमुळें तिच्या वांट्यास नेहमीं अगदीं लहान पाव येई. हा प्रकार त्या गृहस्थानें दोनतीन दिवस पाहिल्यावर त्या मुलीच्या चांगुल-पणाविषयीं त्याची खातरी झाली. दुसरीं मुलें अधाश्यासारखीं पावांच्या टोपलीवर तुटून पडत आणि मिळवेल तेवढा मोठा पाव उचलून पळून जात. त्या गृहस्थाचे आभार देखील तीं मानीत नसत. पण त्या मुलीची रीत अगदीं निराळी होती. हावरेपणानें मोठ्या पावासाठीं ओढाताण करणें तिला मुळीं आवडत नसे. केवढाही पाव मिळाला तरी त्यांत तिला संतोष वाटे.

एके दिवशीं नेहमींच्या रीतीप्रमाणें ती सुजन मुलगी अगदीं लहान पाव टोपलींत राहिला तो उचलून त्या गृहस्थाचे आभार मानून घरीं गेली. मग तिच्या आईनें तो कापिला. तेव्हां त्यांतून सोन्याचीं कित्येक नाणीं खळकन बाहेर पडलीं. तीं पाहून ती बाई चपापली आणि त्या मुलीस ह्मणाली: "हीं नाणीं त्या गृहस्थाकडे नेऊन दे. कांहीं तरी गफ-

लत होऊन हीं पावांत आलीं आहेत." त्यावरून त्याच्याकडे जाऊन तीं नाणीं पावांत सांपडलीं म्हणून सांगून ती परत करूं लागली. तेव्हां तो ह्मणालाः "मुली, हीं नाणीं मी त्या पावांत मुद्दाम घालावयास लाविलीं होतीं. सगळ्यांहून लहान पाव तुझ्या हातीं येणार हें मला पक्केपणीं ठाऊक होतें. तुझी समाधानवृत्ति व सौजन्य पाहून हें मीं तुला बक्षीस दिलें आहे. हे पैसे नेऊन तुझ्या आईपाशीं दे आणि तिला सांग कीं, तुमचा प्रामाणिकपणा व चांगुलपणा पाहून मी संतोष पावलों आहें."

## राजा आणि धनगराचा मुलगा.

वसंतऋतूंत एके दिवशीं एका सुंदर दरींत एक तरुण वयाचा धनगर मेंढरें चारीत होता. त्या दरीची ती शोभा पाहून तो तरुण मुलगा अगदीं दंग झाला होता, आणि वनांतल्या झाडांचीं फुलें तोडून त्यांचा एक मजेदार गुच्छ त्यानें केला होता. हा गुच्छ तो हातांत धरून फिरवीत होता व आनंदभरानें गात व नाचत होता. पक्ष्यांचे मधुर ध्वनि ऐकून त्यांच्यासारखे स्वर काढून तो आपल्याशींच खदखदां हसत होता.

त्या वेळीं त्या देशाचा राजा त्या वाटेनें सहल करीत चालला होता. त्या मुलाचा तो उल्हास व मधुर गीत ऐकून त्याचें लक्ष त्याजकडे गेलें, आणि त्याला त्यानें आपल्याजवळ बोलावून पुसलें: "बाळा, तूं फार आनंदी दिसतोस. असा उल्हास तुझ्या अंगीं असण्याचें कारण मला सांगतोस काय?" आपणाला प्रश्न करणारा राजा आहे हें न जाणून तो ह्मणाला:"मी आनंदी कां नसावें? मी आमच्या परम दयाळू राजासारखा संपन्न आहें, किंबहुना त्याच्याहूनही अधिक आहें." हें त्याचें उत्तर ऐकून

राजाला नवल वाटलें आणि, "तूं संपन्न कसा आहेस तें मला सांग," असा त्यानें त्याला पुनरपि प्रश्न केला. मुलानें उत्तर केलें: "हा देदीप्यमान सूर्य ह्या निळ्या निरभ्र आकाशांत प्रकाशत आहे, त्याचा प्रकाश मजवर व राजावर सारखाच पडत आहे. ह्या सुंदर डोंगरावर व दरींत वनाची जी ही अप्रतिम शोभा आहे, ती त्याच्याप्रमाणें माझ्यासाठींही आहे. ह्या वनप्रदेशांतलीं अनंत रंगांची पुष्पें आणि अतिमधुर गायन करणारे शेंकडो पक्षी त्याच्याप्रमाणें मलाही रिझविण्यास तयार आहेत. माझे हे बळकट व जोमदार बाहु आहेत, ते कोणीं मला लक्षावधि रुपये दिले तरी त्याला मी देणार नाहीं. माझे हे डोळे तर कोणीं मला राजाच्या जामदारखान्यांतील सगळें द्रव्य दिलें तरी त्याला कदापि देणार नाहीं. मला ज्या ज्या वस्तूची आवश्यकता आहे ती ती मला अनुकूळ आहे. मला जें कांहीं मिळतें त्याहून अधिकाची वांच्छा मला कधींही होत नसते. मला पोटभर अन्न मिळतें व अंगभर वस्त्र मिळतें. त्याहून अधिकाची अपेक्षा मी करीत नाहीं. मी उभें वर्ष जे हे श्रम करितों, त्याचा योग्य मोबदला मला मिळतो. तेवढा माझ्या सगळ्या गरजा भागविण्यास पुरेसा असतो. असा मी सर्वदा समाधानी असतां, राजा झाला तरी तो मजहून विशेष संपन्न आहे असें तुह्मांला वाटतें काय ?"

हें त्याचें उत्तर ऐकून राजा हसला आणि आपण कोण हें त्याला कळवून ह्मणाला: "बाळा, तुझें ह्मणणें अगदीं बरोबर आहे. ही समाधानवृत्ति अशीच शेवटपर्यंत कायम राखिशील तर तूं सर्व काळ राजाहून सुखी असशील. खरें सुख मोठ्या राजलक्ष्मीनें प्राप्त होत नाहीं, तें तुझ्यासारख्या सर्वदा तृप्त असणाऱ्या माणसांलाच मिळतें."

## चांभार व सावकार.

एक चांभार होता, तो आपल्या झोंपडीच्या दाराशीं बसून लोकांचे जोडे शिवून देई. तो सगळा दिवस कामांत गुंतलेला असे. तो हातांनीं काम करी आणि तोंडानें गाणीं ह्मणे. त्याची वृत्ति नेहमीं आनंदी असे. त्याच्या शेजारीं एक मोठा सावकार रहात असे. तो एके दिवशीं ह्या चांभाराच्या दुकानापाशीं येऊन उभा राहिला आणि त्याची ती आनंदीवृत्ति पाहून त्यास ह्मणाला: "गड्या, तूं सर्वदा संतुष्ट व आनंदी दिसतोस. ह्यावरून ह्या धंद्यांत तुला बरीच कमाई होत असावी असें दिसतें. तुझें वर्षाचें उत्पन्न किती आहे बरें?" चांभार हसून ह्मणाला: "वर्षाचा हिशोब कांहीं मी ठेवीत नसतों. येरे दिसा आणि भररे पोटा, अशी माझी स्थिति आहे. दिवसभर काम करून जें कांहीं मला मिळतें, तेवढ्यानें माझा आणि माझ्या मुलांमाणसांचा चरितार्थ जेम-तेम चालतो. तेवढ्यांतच मी तृप्त असतों. माझ्यापाशीं शिल्लक ह्मणाल तर कांहींही नाहीं." सावकार ह्मणाला: "बरें, दररोज तुला काय मिळतें?" चांभारानें उत्तर केलें: "तें कांहीं नक्की सांगतां येत नाहीं. कधीं जास्त पैसे मिळतात, तर कधीं कमी मिळतात. पण अन्नवस्त्राची ददात कांहीं ह्मणण्यासारखी मला पडत नाहीं. यांतच मी सुख मानितों." सावकार ह्मणाला: "तुझी अशी स्थिति आहे, त्यापेक्षां तुला कधींही वाण पडूं नये असें करण्याचें मीं योजिलें आहे. तर हे शंभर क्राउन घे. हे नीट संभाळून ठेव. तुला गरज लागेल तेव्हां यांतले लागतील तेवढे पैसे खर्चीत जा."

एवढे पैसे एकदम हातीं आलेले पाहून त्याला अतिहर्ष झाला. कारण एवढी मोठी रकम त्यानें साऱ्या जन्मांत पाहिली नव्हती. ही रकम त्यानें आपल्या झोंपडीच्या एका कोपऱ्यास पुरून ठेविली. पण

त्या दिवसापासून त्याची ती पूर्वीची आनंदीवृत्ति नाहींशी झाली. तो काम करीत असतां गाणीं ह्मणत असे, तीं आतां तो ह्मणेनासा झाला. त्याला नेहमींची चिंता लागून राहिली. कारण आपण पुरून ठेविलेली ती रकम कोणी काढून नेईल कीं काय, अशी त्याला भीति वाटूं लागली. तो वारंवार रकम पुरलेल्या जागीं जाऊन ती सुरक्षित आहे कीं काय तें पाही. ह्या चिंतेमुळें त्याला धड झोंपही येईना. कोठें कसला आवाज होतांच तो धडबडून उठे आणि आपले पैसे सुरक्षित आहेत कीं काय तें पाही. त्याला आतां सगळ्यांचा संशय येऊं लागला. तो काम करीत बसला तरी त्याचे डोळे वेळोवेळां पैसे पुरलेल्या जागेकडे जात. ह्या अशा मनाच्या स्थितीमुळें त्याला पूर्वीप्रमाणें कशांतही सुख वाटेनासें झालें. शेवटीं ह्या स्थितीला तो अगदीं कंटाळला, आणि आपल्या चिंतेचें व असुखाचें तें कारण नाहींसें करण्याचा निर्धार करून तो ती रकम घेऊन त्या सावकाराकडे गेला आणि ह्मणाला: "महाराज, कृपा करून ही आपली रकम माघारीं घ्या. हिच्या पायीं मी सुखास मुकलों आहें; आणि मला नेहमींची चिंता लागून राहिली आहे. मला सुखाची झोंपही येईनाशी झाली आहे. तरी ही आपली रकम परत घेऊन मला माझी पूर्वींची समाधानवृत्ति व चित्ताची शांति परत द्या." असें ह्मणून ते पैसे त्याला मोजून देऊन मोठ्या आनंदानें तो परत गेला.

## तृप्त मुलगा.

फ्रान्सदेशाचा बारावा लुई राजा एके दिवशीं आपल्या वाड्यांतल्या मुदपाकखान्यांत सहज गेला असतां, तेथें एक लहान मुलगा त्याच्या दृष्टीस पडला. तो तेथें कांहीं काम करण्यांत गुंतला असून मोठ्या उल्हासानें गात होता. त्या मुलाच्या डोळ्यांत तेज चमकत होतें. त्याचें

तोंड तेजःपुंज होतें, आणि त्याची चालचर्या मनोहर होती. त्याला पाहून राजाला आनंद वाटला, आणि त्याच्या डोकीवर हात ठेवून त्यानें त्याला त्याचें नांव विचारिलें. त्याबरोबर त्या मुलानें डोकें वर करून त्याजकडे पाहिलें. राजाचा पेहराव अगदीं साधा असल्यामुळें हा कोणी राजसेवक आहे असें वाटून तो ह्मणाला: "माझें नांव सायमन." राजानें त्याला आणखी कित्येक प्रश्न विचारिले, त्यांवरून त्याचे आईबाप मरण पावले असून तो पोरका झाला आहे, असें त्याला कळलें. राजानें त्याला पुसलें: "तुला हें भांडींकुंडीं घासण्याचें काम मिळालें आहे त्यांत तूं तृप्त आहेस काय? इतर चाकरमाणसें वाड्यांत दुसरीं चांगलीं कामें करीत असतां, मुदपाकखान्यांत सगळा वेळ काम करीत रहाणें तुला पसंत वाटतें काय? मुलानें उत्तर केलें: "कां वाटूं नये? दुसरीं चाकरमाणसें जशीं सुखी आहेत, तसाच मीही आहें. फार काय, पण खुद्द राजासुद्धां मजहून सुखी नसेल." हें त्याचें उत्तर ऐकून राजा चकित होऊन ह्मणाला: "हें तूं कशावरून ह्मणतोस?" मुलगा म्हणाला: "महाराज, हें पाहा, राजा जीवंत आहे, तसाच मीही आहें. तो याहून जास्त तें काय करीत असतो? शिवाय मी सर्वदा संतोषी असतों, तसा राजा असतो काय?"

हे त्याचे शब्द ऐकून राजा तेथून निघून गेला. ह्या वेळीं त्याच्या मनांत पूर्वीं कधीं न सुचलेले असे विचार घोळूं लागून तो अमळ खिन्न झाला. समाधानवृत्ति बहुशः राजेलोकांच्या गावींही नसते; आणि राजमुकुट धारण करणारांला नेहमीं चिंता लागून राहिलेली असते, तशी दुसऱ्या फारच थोड्यांला लागलेली आढळते, हें त्या राजाच्या मनावर स्वतांच्या अनुभवावरून चांगलें बिंबलें. नंतर दुसरे दिवशीं त्यानें त्या मुलास आपल्यासमोर बोलावून नेलें. तेव्हां आदल्या

दिवशीं आपणांशीं जो बोलत होता, तो राजा आहे असें आढळून येऊन तो अचंबा पावला. राजानें त्याच्याशीं मोठ्या प्रेमानें बोलून त्याला आणखी कांहीं प्रश्न विचारिले. त्यांचीं त्यानें समर्पक उत्तरें दिलीं. त्यांवरून त्याची बुद्धि तीव्र असून तो मोठा चपळ व हुशार आहे, अशी राजाची खात्री झाली. मग तो त्याला आपल्या वाड्यांतलीं विशेष चांगलीं कामें सांगूं लागला. तीं तो मन लावून इमानानें करी. हें पाहून राजानें त्याला लष्करांत ठेवून लढाईच्या कामांत तरबेज केलें. येथें त्याला झपाझप बढती मिळत जाऊन तो सेनापतीच्या पदाला पोंचला. त्यानें अनेक लढाया लढून आपल्या अंगचे शौर्य, वीर्य, दक्षता इत्यादि गुण उत्तम प्रकारें प्रगट केले, व तो सगळ्या फ्रान्सदेशाला मोठा प्रिय व मान्य झाला.

## खरी दौलत.

इराणदेशाचा शाहा एके समयीं आपल्या राज्यांतून फिरत असतां, एक धनगराचा मुलगा एका झाडाखालीं बसून पांवा वाजवीत आहे, असें त्यानें पाहिलें. त्याच्या पांव्याचा मधुर ध्वनि ऐकून राजा तल्लीन होऊन त्याच्या जवळ गेला आणि त्याची मुद्रा व चालचर्या पाहून खुश झाला. राजानें त्याला कांहीं प्रश्न विचारिले, त्यांचीं त्यानें समर्पक उत्तरें दिल्यावरून तो मोठा बुद्धिमान् आहे अशी त्याची खातरी होऊन, त्याला आपल्या दरबारीं नेऊन ठेवावें व त्यास चांगलें शिक्षण द्यावें, असें त्यानें मनांत आणिलें. त्याप्रमाणें राजानें त्याला आपल्याबरोबर नेलें; आणि त्याच्या विद्याभ्यासासाठीं हुशार गुरूंची योजना केली. तो जात्या चलाख असून त्याची धारणाशक्ति उत्तम असल्याकारणानें तो लौकरच सर्व विद्यांत प्रवीण झाला. शिवाय त्याचें वर्तन निर्दोष असल्यामुळें राजाचें त्याजवर पुत्राप्रमाणें प्रेम जडलें; आणि तो त्याला

एका मागून एक अशीं मोठमोठ्या हुद्यांचीं कामें सांगूं लागला. तीं तो मोठ्या हुशारीनें व दक्षतेनें करी. शेवटीं त्याला जामदाराचा हुद्दा मिळून सगळ्या राज्याचा खर्चवेच त्याच्या हातून होऊं लागला.

ह्याप्रमाणें एका यःकश्चित् धनगराच्या पोराला राजानें एवढ्या मोठ्या योग्यतेस चढविल्यामुळें दरबारचे सगळे लोक त्याचा हेवा व द्वेष करूं लागले. ते त्याला अगदीं पाण्यांत पाहूं लागले. हा असा त्यांचा मत्सर व द्रोह पाहून तो वेळोवेळां फार कष्टी होई. त्याच्या चित्ताला स्वस्थता अशी कधीं वाटत नसे. आपले विरोधी केव्हां कसला गहजब आपणावर आणितील याचा नेम नाहीं, असें मनांत येऊन तो सर्वदा चिंतातुर असे. त्यामुळें त्याला आपली पूर्वीची स्थिति किती तरी सुखाची व समाधानाची वाटे. पण तो राजा हयात होता तोंपर्यंत त्या हेवेखोर व मत्सरग्रस्त लोकांचा कसलाही कावा चालला नाहीं. शिवाय तो अत्यंत प्रामाणिकपणानें व दक्षतेनें वागत असल्याकारणानें राजाचा त्याजवरचा विश्वास अखेरपर्यंत कायम राहिला. पुढें तो राजा मरण पावून त्याचा तरुण मुलगा गादीवर बसला. तो हलक्या कानांचा असून लोकांच्या भुलथापांनीं व खुशामतीनें सहज वळत असे. तेव्हां अर्थात् ह्या धनगराच्या शत्रूंनीं त्या तरुण राजाचें मन अगदीं कलुषित केलें. त्यांनीं राजाच्या मनांत असें भरून दिलें कीं, " ह्या जामदारानें सरकारी पैशाचा अपहार करून आपली भर केली आहे. त्यानें जामदारखान्यांतलें बहुमोल जवाहीर लांबविलें आहे. त्यानें आपली सगळी दौलत एका जागीं पुरून ठेवून त्यावर दगडांचें एक घुमट बांधिलें आहे. त्यांत तो नित्य तासांचे तास बसून आपली दौलत गणीत असतो. "

हें त्यांचें सांगणें खरें वाटून एके दिवशीं सकाळीं तो तरुण राजा त्या जामदाराच्या घरीं अचानक गेला आणि त्यास ह्मणालाः "तुझ्या त्या घुमटाची किल्ली मजकडे दे. तेथें तूं तासांचे तास बसत असतोस, व कोणाही मित्राला तेथें येऊं देत नाहींस. तेव्हां त्या जागीं तूं काय ठेविलें आहे तें मला पाहावयाचें आहे." हे राजाचे शब्द ऐकून त्यानें तत्काळ ताडिलें कीं, दरबारच्या लोकांनीं याचे कान भरल्या-कारणानें हा आपल्या घराचा झाडा घ्यावयास आला आहे. मग त्यानें किल्ली राजाच्या हातीं दिली. ती घेऊन राजानें त्या घुमटाचें दार उघडून आंत प्रवेश केला आणि पाहिलें, तों त्या जागीं एक पांवा, धनगराची घोंगडी व काठी एवढींच त्याच्या नजरेस पडलीं. तेव्हां तो जामदार राजाला ह्मणालाः "खाविंद, माझ्या पूर्वींच्या सुखाचीं हीं चिन्हें आहेत. मीं हीं येथें जपून ठेविलीं आहेत. येथें मी नित्य येऊन बसतों आणि माझ्या पूर्वस्थितीचें व माझ्या नातलगांचें स्मरण करण्यांत थोडा वेळ घालवीत असतों. आपल्या थोर मनाच्या वडिलांनीं कृपावंत होऊन जें कांहीं मला दिलें आहे, तें सगळें आपण खुशाल परत घ्यावें, आणि माझा हा धनगराचा वेष मला परत द्यावा. यांत मला मोठें समाधान व सुख वाटेल."

हें ऐकून राजाला मोठा गहिंवर आला; आणि तो आपल्या दरबारच्या लोकांवर पराकाष्ठेचा रागावला. अशा प्रामाणिक व निरिच्छ पुरुषाविषयीं संशय घेतल्याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. त्यानें त्याला आपल्या राज्यांतील अत्यंत उच्च पदास चढविण्याचा निश्चय केला. पण तो राजाला ह्मणालाः "महाराज, हें वैभव मला मुळीं नको. याचा मला आतां पुरा वीट आला आहे. कारण ज्या स्थितींत मनाला शांति व सुख यांचा अनुभव घडत नाहीं, ती कितीही थोर

असली तरी ती मला नको. " असें ह्मणून त्या निरिच्छ पुरुषानें आपल्या अंगावरचा सगळा पेहराव उतरून राजाच्या चरणांवर ठेविला, आणि आपली ती जुनी घोंगडी पांघरून व तो पांवा घेऊन तो तेथून तत्क्षणीं निघून गेला. त्यानें आपलें उरलेलें आयुष्य आपल्या पूर्वाश्रमीं मोठ्या समाधानानें घालविलें.

# भाग नववा.

## महत्त्वाकांक्षा.

### कावळा आणि राजहंस. ( कल्पित ).

एका वेड्या कावळ्याला राजहंसासारखें शुभ्र व्हावें असें वाटलें; आणि आपल्या बांधवांना सोडून तो एकटाच एका सरोवराजवळ राहूं लागला. तेथें तो प्रत्यहीं पाण्यांत डुंबून आपलीं पिसें धुऊं लागला. असें करितांकरितां तो अगदीं थकून व त्रासून गेला. ह्या नादामुळें त्याला पोटभर खायालाही मिळेनासें झालें. तेव्हां तो हळूहळू रोड व अशक्त होत गेला. पण त्याच्या पिसांचा काळा रंग कांहीं गेला नाहीं; आणि शेवटीं उपासमार होऊन तो प्राणास मुकला.

### गरुड आणि कावळा. ( कल्पित ).

एका गरुडानें उंच कड्यावरून खाली झेंप घालून कुरणांत चरत असलेल्या एका कोंकरास आपल्या गवींत धरून चटदिशीं उचलिलें आणि आपल्या घरट्यांत नेलें. हा प्रकार एका कावळ्यानें पाहून मनांत आणिलें कीं, आपणही असेंच करावें; आणि झाडावरून खालीं उतरून त्यानें आपलीं नखें एका कोंकराच्या लोकरींत गुंतविलीं, आणि त्याच्यासकट उडून जाण्याचा प्रयत्न केला. पण तें त्याला कोठून उचलायाला ! तो त्याच्या लोकरींत अडकून मात्र पडला. तींतून त्याला आपले पाय सोडवितां आले नाहींत. तेव्हां तो तेथें तडफडून ओरडूं लागला. ही त्याची ओरड ऐकून धनगर तेथें आला, आणि त्याला

पकडून त्यानें घरीं नेऊन आपल्या मुलांस खेळायाला दिलें. तो कसा सांपडला ह्मणून मुलांनीं विचारिल्यावरून धनगर ह्मणाला: "हा वेडा पक्षी थोड्या वेळापूर्वी आपणास गरुडासारखी ताकद आहे असें समजत होता. पण आतां त्याची खातरी झाली आहे कीं, आपली शक्ति पाहून कोणत्याही कामास हात घालावा. दुसरे करितात ह्मणून आपण करणार असा नुसता बेत करून उपयोग नाहीं."

## आजा आणि नातू.

एका गृहस्थाचा एक पांच वर्षांचा नातू होता. आपण लवकर मोठें व्हावें, तट्टावर बसावें आणि मोठींमोठीं पुस्तकें वाचावीं, असें त्या मुलास वाटे. तो आपल्या मनाशीं असें ह्मणे कीं, "आपले आजोबा मोठे झाले आहेत याचें कारण ते न्यहारीच्या वेळीं कॉफी पितात व अंडीं खातात; आणि ते चष्मा लावितात ह्मणून त्यांला मोठीं पुस्तकें वाचितां येतात. मला चष्मा मिळेल, आणि न्यहारीला दूधभाकरी मिळते तिच्याऐवजीं कॉफी मिळेल, तर आजोबा जेंजें करितात, तेंतें मला करितां येईल."

एके दिवशीं सकाळीं न्यहारीच्या वेळीं ह्या मुलाचा आजा घरांतून बाहेर कोणाशीं बोलावयास गेला असतां, त्यानें त्याच्या खोलींत जाऊन त्याचा चष्मा नाकाला लाविला, आणि त्याच्यासाठीं कॉफी आणून ठेविली होती, तिचा एक घोट घेऊन तो त्याचें एक मोठें पुस्तक वाचूं लागला. त्यांत त्याला कांहींएक स्पष्ट दिसेना. तेव्हां त्यानें चष्मा वर करून नुसत्या डोळ्यांनीं वाचायाचा प्रयत्न केला. त्या वेळीं अक्षरें त्याला स्पष्ट दिसूं लागलीं, पण शब्द फार मोटे असल्यामुळें त्याला ते वाचितां आले नाहींत. तो असा पुस्तकाकडे पाहत असतां, त्याचा आजा खोलींत आला; आणि त्याचें तें विचित्र वर्तन पाहून त्यानें त्याला

पुसलें: "बाळा, हें तूं काय करीत आहेस?" त्यानें उत्तर केलें: "आजोबा, मी मोठा होण्याचा प्रयत्न करीत आहें. मला वाटलें होतें कीं, मीं चष्मा लाविला आणि कॉफी प्यालों ह्मणजे मला सहज मोठें होतां येईल." हें त्याचें बोलणें ऐकून तो हसला आणि ह्मणाला: "बाळा, अशानें तूं नाहीं हो मोठा व्हावयाचा. तुला अजून पुष्कळ वर्षें वाढत राहिलें पाहिजे. तुला कित्येक वर्षेंपर्यंत दररोज एकसारखा अभ्यास करीत राहिलें पाहिजे; तेव्हां तुला असलीं मोठीं पुस्तकें वाचितां येतील." मुलगा ह्मणाला: "आजोबा, मला दररोजचे धडे शिकण्याचा कंटाळा येतो. धडे शिकण्याची दगदग करीत रहाण्यापेक्षां मला एकदम असलीं पुस्तकें वाचितां येतील तर बरें होईल." आजोबा ह्मणाला: "बाळा, कोणतीही गोष्ट एकसारखे श्रम केल्यावांचून मिळत नसते. तूं लौकरलौकर आपले धडे शिकशील तर तुला हीं पुस्तकें वाचितां येतील." हा आजोबाचा उपदेश ऐकून तो चांगला मुलगा तेव्हांपासून मोठ्या आवडीनें व उत्साहानें आपले धडे करूं लागला.

## एका मुलाची महत्त्वाकांक्षा.

एकदां इंग्लंडाची परराष्ट्रांशीं लढाई चालली असतां, तिची बातमी दररोज वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होऊं लागली. ती एक लहान मुलगा नेहमीं वाची. असें करितांकरितां त्याला आपल्या देशाच्या तर्फे लढण्याची उत्कट इच्छा होऊन तो एके समयीं मोठ्यानें बोलला: "अरेरे, काय करूं! मी ह्या वेळीं जाणता असतों तर लष्करी शिपाई बनलों असतों, व रणांगणावर तलवार गाजवून आपलें शौर्य प्रगट करण्याची सुसंधि मला आज प्राप्त झाली असती. मी कसल्याही संकटाला डगमगलों नसतों. शत्रूला मीं पाठ दाखविली नसती. जेथें अतिभयंकर रण माजून राहिलें असेल तेथें मी गेलों असतों. रात्रीचा

मोठ्या धैर्यानें मीं पहारा केला असता. केवढाही काळोख असता तरी मी भ्यालों नसतों; आणि कोणी दगेखोर माणूस आढळता तर त्याच्याशीं शौर्यानें लढलों असतों. मी माझें कर्तव्य उत्कृष्ट प्रकारें करून बढती पावलों असतों. ह्या वेळीं मी शिपाई झालों असतों तर ठीक झालें असतें. मी मोठा बाप्या होऊन लष्करी नोकरींत शिरें-पर्यंत ही लढाई कांहीं रहाणार नाहीं. ह्मणून अर्थात् मला ह्या लढाईवर जातां येत नाहीं. आमच्या देशाच्या निशाणाच्या रक्षणार्थ मला पराक्रम गाजवण्याची संधि अर्थात् प्राप्त होणार नाहीं. माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीं लढून रणांत घायाळ झाल्याचें किंवा पडल्याचें यश मला प्राप्त होणार नाहीं; आणि शौर्याबद्दल माझी कीर्ति होणार नाहीं, याचें मला अतिशयित वाईट वाटतें.'' असें बोलून तो मोठ्यानें सुसकारे टाकूं लागला. हे त्याचे बोल ऐकून, त्याची आई जवळ होती, ती त्याला मोठ्या प्रेमानें व सौम्यपणानें ह्मणाली: ''माझ्या लाडक्या बाळा, असा कष्टी होऊं नको. ही असली लढाई तुला अंतरली तरी हीहून विशेष चांगली लढाई तुझ्यापुढें आहे. ती एव्हांपासूनच सुरू झाली आहे. तूं शौर्यानें आणि खरेपणानें वागशील तर ह्या लढाईंत तूं यशस्वी होशील. माझ्या बाळा, तूं छोटा शिपाईच आहेस असें समज; आणि तुझ्या हृदयरूप प्रदेशांत प्रत्येक वाईट गोष्ट शिरूं पाहत आहे, तिला तसें न करूं देण्यासाठीं लष्करांतल्या शिपायाप्रमाणें तुला टेहळणीवर जागरूकपणें राहिलें पाहिजे. तर अनाचाररूप महाशत्रूंशीं मोठ्या शौर्यानें व हिंमतीनें सर्व काळ लढून आपली हृदयभूमि पवित्र राखण्याच्या प्रयत्नांत तुला सुयश आलें असतां, तुझी कीर्ति इहलोकीं व परलोकीं होईल. समरांगणावर कितीही मोठा पराक्रम गाजविल्यानें अशी कीर्ति प्राप्त होणार नाहीं, हें ध्यानांत बाळगीव.''

## महत्त्वाकांक्षी मुलगा.

एक मुलगा चित्रें काढण्यांत अगदीं गढला असतां, त्याची मावशी त्याच्याजवळ येऊन ह्मणाली: "सेसिल, तुला चित्रकलेचा इतका नाद असल्याचें मला ठाऊक नव्हतें. तुझी ह्या कलेंत बरीच गति झाली आहे असें दिसतें." सेसिल ह्मणाला: "ह्या सहामाहीच्या परीक्षेंत चित्रकलेचें बक्षीस मिळवावें असा मीं निश्चय केला आहे. ह्मणून मला ह्या विषयावर अशीच नेटाची मेहनत केली पाहिजे." मावशी ह्मणाली: "मला वाटतें तुझ्या वर्गांत टॉम नांवाचा मुलगा आहे, त्याच्यावर तुझी सरशी कधींही व्हावयाची नाहीं. त्याचा बाप स्वत: चित्रकलेंत निष्णात असल्याकारणानें त्याला अगदीं लहानपणापासून चित्रकलेचा अभ्यास घडला आहे." सेसिल ह्मणाला: "अशी त्याला सगळी सोय असूनही त्याच्यावर मीं सरशी केली तर त्यांत मला दुप्पट आनंद होईल. हल्लीं मी दररोज चारचार तास चित्रें काढीत बसत असतों. तो फार तर दोन तास बसत असेल." मावशी बोलली: "ह्या विषयाच्या नादास लागून तूं आपलें लाटिन विसरूं नकोस ह्मणजे झालें. गेल्या तीन वर्षांच्या प्रत्येक सहामाहीस तुला लाटिनचें बक्षीस मिळत आलें आहे." सेसिल अमळ गर्वानें हसून ह्मणाला: "अग, त्या विषयांत तर माझी बरोबरी कोणालाही व्हावयाची नाहीं. अलीकडे रसेल त्या विषयावर विशेष परिश्रम करीत आहे असें ऐकितों. पण त्याला देखील मी जुमानीत नाहीं. ह्या खेपेस लाटिनचें व चित्रकलेचें अशीं दोन्ही बक्षिसें मारावीं, अशी माझी उत्कट इच्छा आहे. एका बक्षिसानें मी तृप्त होणार नाहीं. टॉम दरखेपेस चित्रकलेचें बक्षीस हटकून पटकावितो. तें मिळवींपर्यंत मी स्वस्थ बसणार नाहीं. चितान्याच्या मुलाचा असा पराभव करण्यांत

मला केवढें भूषण वाटेल ह्मणून सांगूं!" त्याच्या मावशीनें मोठ्या ममतेनें त्याच्या खांद्यावर हळूच हात ठेवून ह्मटलें: "जें बक्षीस तुला मिळण्याचा संभव फारच कमी आहे, त्याच्या पाठीस लागून लाटिनचें बक्षीस गमावूं नको ह्मणजे झालें. कल्पित गोष्टींतला कुत्रा तोंडांतली खरीखुरी भाकरी टाकून तिची पाण्यांतली पडछाया घेण्यास धावला आणि फसला, तसें तूं करूं नको."

शेवटीं सहामाहीची परीक्षा होऊन बक्षिसें मिळविणारांचीं नांवें वाचिलीं. त्यांत सेसिलचें नांव नव्हतें. ह्मणून तो संध्याकाळीं अगदीं खिन्न व उदास होऊन घरीं आला. त्याची ती चर्या पाहून त्याच्या मावशीनें तर्क केला कीं, ह्याला कोणतेंच बक्षीस मिळालें नसावें. ह्मणून त्याला त्यासंबंधानें प्रश्न विचारून अधिक कष्टी करावें; हें तिला बरें वाटलें नाहीं. पण त्या मुलाची एक लहान बहीण होती, ती त्याच्याकडे उत्कंठेनें धावत जाऊन ह्मणाली: "भाऊ, तुला दोन्ही बक्षीसें मिळालीं ना?" सेसिल मोठ्या कष्टानें बोलला: "नाहीं." तिनें किंचित् खट्टू होऊन पुनः विचारिलें. "एकच मिळालें तर?" तो हळूच म्हणाला: "एकही नाहीं. टॉमवर सरशी करण्याच्या प्रयत्नांत मी इतका गढून गेलों कीं, मी लाटिनकडे दुर्लक्ष केलें. त्यामुळें रसेलाची मजवर सरशी होऊन त्याला बक्षीस मिळालें."

## महत्त्वाकांक्षी चक्कीवाला.

विलायतेंत एक चक्कीवाला होता. तो लोकांचे दाणे दळून देऊन आपला व आपल्या कुटुंबाचा यथास्थित निर्वाह चालवी व कांहीं पैसे दरमहिन्यास संग्रहीं टाकी. ते तो पुनःपुनः मोजून पाही आणि मोठें समाधान मानी. पण पुढें मोठमोठ्या श्रीमंत लोकांच्या गोष्टी ऐकून त्याला आपल्या थोड्याशा संग्रहानें समाधान वाटेनासें झालें. आपणा-

पाशीं पुष्कळ वित्त असावें अशी त्याला प्रबळ इच्छा होऊं लागली. आपल्या ह्या हलक्या धंद्यांत पुष्कळ पैसे मिळण्यासारखे नाहींत असें मनांत आणून तो सर्वदा खिन्न व उदास असे. तेणेंकरून त्याचें आपल्या धंद्यावरही चांगलें लक्ष्य लागेना. त्यामुळें त्याचें नेहमींचें उत्पन्नही कमी झालें. एके दिवशीं त्याच्या कानीं अशी गोष्ट आली कीं, कोणा एका इसमाला जमिनींत द्रव्याचा हांडा पुरलेला असल्याचें स्वप्न लागोपाठ तीन दिवस पडलें. तेव्हां त्यानें ती जमीन खणिली आणि तींत त्याला खराच हांडा सांपडला. त्यामुळें तो एकदम मोठा गबर झाला. ही गोष्ट ऐकिल्यापासून तर तो अगदींच बेचैन झाला. त्याला ह्या गोष्टीचा सारखा निदिध्यास लागला. आपणाला असें एकादें स्वप्न पडेल तर केवढी मौज होईल असें त्याला वाटूं लागलें. ही स्वप्नाची गोष्ट रात्रंदिवस त्याच्या मनांत एकसारखी घोळूं लागल्यामुळें एके दिवशीं रात्रीं तो निजला असतां, त्याच्या चक्कीच्या इमारतीच्या एका भिंतीखालीं सोन्यारत्नांचा मोठा हांडा पुरलेला आहे, असें त्याला स्वप्न पडलें. हें स्वप्न पडल्याबद्दल त्याला मोठा आनंद झाला, व त्यानें तें कोणालाही सांगितलें नाहीं. खुद्द आपल्या बायकोलाही तें त्यानें कळविलें नाहीं. पण तें आणखी दोन वेळां पडल्याखेरीज खरें समजतां नये, असें त्याच्या मनांत येऊन तो पुनः असेंच स्वप्न पडतें कीं काय तें पाहूं लागला. त्याच्या इच्छेप्रमाणें तें स्वप्न त्याला आणखी दोन रात्री लागोपाठ पडलें. तेव्हां त्याबद्दल त्याची पुरी खात्री होऊन चौथे दिवशीं पहाटेस हातीं कुदळ घेऊन आपल्या चक्कीच्या इमारतीच्या भिंतीखालीं तो खणण्यास गेला, आणि मोठ्या आवेशानें व जोमानें त्यानें भिंतीचा पाया खणून काढण्यास आरंभ केला. ह्याप्रमाणें बरेंच खोल खणिल्यावर त्याला एक मोठी दगडाची लादी लागली. तेव्हां ह्या लादीखालीं तो द्रव्यनिधि खास आहे, असें वाटून त्याला अत्या-

नंद झाला. पण ती लादी फार जड असल्यामुळें त्याला एकट्याला ती उचलण्याजोगी नव्हती. ह्मणून ह्या कामीं आपल्या बायकोची आतां मदत घेणें जरुरीचें आहे, असें त्याच्या मनांत येऊन तो घरीं धावत गेला, आणि आपणास चक्कीच्या खालीं मोठा निधि सांपडल्याचें वर्तमान त्यानें तिला सांगितलें. तें कानीं पडतांच त्या बाईला तर हर्षवायुच झाला. तिनें त्या हर्षभरांत त्याला दृढ आलिंगन दिलें. मग तीं उभयतां चक्कीकडे धावत आलीं आणि पाहतात तों चक्कीची इमारत कोसळून पडली आहे असें त्यांच्या नजरेस पडलें. ह्याप्रमाणें एकदम मोठा श्रीमंत होण्याची हांव धरल्यामुळें त्या चक्कीवाल्याची पुरी दुर्दशा झाली. त्याचें नेहमींचें उत्पन्न बुडून त्याचे व त्याच्या कुटुंबाचे हाल झाले.



# भाग दहावा.

## क्षमाशीलता.

### वायुमापक यंत्र.

एका ज्योतिष्यानें पुष्कळ पैसे खचून एक वायुमापक यंत्र मिळविलें होतें. हवा किती थंड किंवा उष्ण आहे, व पाऊस किंवा बरफ केव्हां पडेल हें ह्या यंत्रावरून कळतें. हें यंत्र त्या ज्योतिष्यानें भिंतीस लावून ठेविलें होतें. एके दिवशीं त्याच्या ओळखीचा एक तरुण गृहस्थ त्याला भेटायास आला. त्याच्या दृष्टीस तें यंत्र पडलें, आणि तें पाहण्याची त्यास इच्छा झाली. तेव्हां तें त्याला नीट पाहतां यावें ह्मणून त्या ज्योतिष्याच्या नोकरानें तें खालीं काढून हातांत धरिलें असतां, तें त्याच्या हातचें सुटून खालीं पडून फुटलें. हें पाहून तो तरुण गृहस्थ अतिशयित खट्टू झाला. आपल्या चौकसपणामुळें त्याचें असें नुकसान झालें हें मनांत येऊन त्यानें खेद प्रगट केला. ती त्याच्या मनाची अवस्था पाहून ज्योतिष्याला वाईट वाटलें, आणि त्याचा तो विषाद घालविण्यासाठीं तो हसून विनोदानें ह्मणाला: "अहो, ह्या यंत्रांतला पारा एकदम खालीं पडला आहे, ह्यावरून आतां पाऊस लौकरच पडेल असें वाटतें. अलीकडे बरेच दिवस हवा फार उष्ण व रुक्ष झाली होती."

### कुटुंबांतील शांति.

चीनदेशाचा एक बादशाहा एके समयीं आपल्या राज्यांत फिरत असतां वाटेंत कांहीं अडचण आल्याकारणानें त्याला एका मोठ्या

गृहस्थाच्या घरीं दोन दिवस रहावें लागलें. त्या घरांत बरींच मुलेंमाणसें होतीं. तीं सगळीं एकत्र गुण्यागोविंदानें नांदत असत. त्यांची गडबड किंवा धुसफुस अशी मुळीं नसे. एवढीं निरनिराळ्या वयाचीं व भिन्न-भिन्न स्वभावाचीं माणसें अशीं शांतीनें एकत्र रहात आहेत, हें पाहून त्या बादशाहाला मोठा चमत्कार वाटला, आणि त्या गृहस्थास त्यानें पुसलें: " अहो, तुमच्या येथें मी आज दोन दिवस आहें. एवढ्या अवकाशांत तुमच्या कुटुंबांतलीं सगळीं माणसें परस्परांशीं मोठ्या प्रेमानें व रहसाळीनें वागत असून कोणत्याही प्रकारची गडबड किंवा कलह माझ्या नजरेस आला नाहीं. तेव्हां एवढ्या भिन्न प्रकृतीच्या माणसांला अशीं एकोप्यानें नांदविण्याची कोणती युक्ति तुह्मी योजीत असतां बरें?" त्यानें उत्तर केलें: " सरकार, ह्या बाबतींत माझी युक्ति अगदीं सोपी आहे. ती एका शब्दानें सांगतां येण्यासारखी आहे. तो शब्द **सहन-शीलता** होय. ह्या एका शब्दांत माझ्या एवढ्या मोठ्या कुटुंबांतील शांतीचें रहस्य सांठवलें आहे."

## आज्ञांकित करण्याची चांगली युक्ति.

इंग्लिश आरमाराचा कॉलिंग उड नांवाचा एक सेनापति होता. तो आपल्या हाताखालच्या लोकांला मोठ्या ममतेनें वागवी. त्यांनीं कांहीं अपराध केला तर त्यांला तो फारकरून शिक्षा करीत नसे. कांहीं ना कांहीं युक्ति योजून तो त्यांला वाटेवर आणी. कोणतीही शारीरिक शिक्षा करण्याचें तर त्याच्या जीवावर येई. त्याच्या हाताखालच्या एकाद्या अमलदारानें कोणत्याही माणसासंबंधानें एकादी कागाळी त्याच्याकडे आणिली म्हणजे तो त्या अमलदाराला एकीकडे बोलावून ह्मणे कीं, " ह्या प्रकरणीं तुझाही थोडाबहुत दोष असावा. तरी ज्याच्यासंबंधानें तूं कागाळी आणिली आहे, तो आपला बंधु आहे. त्याजवर आपण अमल

चालवावा, आणि त्यानें आपल्या हुकमाप्रमाणें चालावें, हा योग केवळ दैवगतीनें आला आहे. तरी तो आपल्याहून कमी योग्यतेचा आहे असें सहसा मानितां कामा नये. तर आतां असें कर कीं, उद्यिक त्याचा न्याय करायाला मी बसलों ह्मणजे तूं त्याच्यासंबंधानें रदबदली करून त्याला क्षमा करावी अशी मला विनंति कर." ह्या त्याच्या सूचनेप्रमाणें हाताखालच्या अमलदारांनीं केलें ह्मणजे कॉलिंगउड अमळ आढेवेढे घेई, आणि अपराध्याला क्षमा करण्याविषयीं नाखुशी दर्शवी. पण शेवटीं तो अपराध्याला ह्मणे कीं, "हा तुझा उपरी तुझ्यासंबंधानें रदबदली करीत आहे, ह्मणून मी तुला ह्या वेळीं माफी करीत आहें. पुनरपि असली कागाळी माझ्या कानावर येऊं देऊं नको." ह्या युक्तीचा फारच नामी परिणाम होई. अपराधी पुनः कधींही ठपका न येऊं देण्याविषयीं झटे.

## दहा अंक मोजणें.

एका मुलाच्या मावशीनें त्याला एकदां एक कुदळ व कांहीं बीं अशीं पाठविलीं. तीं पाहून त्याला हर्ष झाला, आणि तीं घेऊन तो परसांत गेला. तेथें त्याची ह्मणून थोडीशी जमीन राखून ठेविली होती, ती तो त्या कुदळीनें खणूं लागला. त्याच्याबरोबर त्याची धाकटी बहीण गेली होती. तो जमीन खणीत असतां, ती त्याचें तें बीं हातांत घेऊन उभी होती. तें एका डबींत होतें. ती हातांत खेळवीत असतां त्या मुलीनें ती जमिनीवर टाकिली. तेव्हां तिचें झांकण निघून सगळें बीं जमिनीवर विखरलें. त्यामुळें ती खट्टू होऊन तें लौकरलौकर वेचूं लागली आणि त्याबद्दल आपल्या भावाची क्षमा मागूं लागली. पण तो कांहींच बोलेना. त्यावरून तो फार रागावला असावा असें वाटून ती ह्मणाली: "दादा, तुला माझा राग आला ह्मणून बोलत नाहींस काय रे? मी कांहीं तुझें

बीं मुद्दाम सांडिलें नाहीं. हें पहा, मीं तें सगळें टिपलें." मुलगा ह्मणालाः "ताई, मी दहा अंक मोजींपर्यंत थांबलों होतों." ती ह्मणालीः "दहा मोजीपर्यंत! याचा अर्थ मला समजत नाहीं." तो ह्मणालाः "माझ्या मावशीनें मला असें सांगितलें आहे कीं, 'राग आला ह्मणजे दहा अंक मोजावे आणि मग बोलावें.' ताई, तुझ्यावर कधींकधीं मी एकदम रागावून वाईट शब्द बोलतों. त्याचें मला मागाहून फार वाटत असतें. ह्यासाठीं मावशीच्या उपदेशाप्रमाणें मी दहा अंक मोजीत होतों." हे त्याचे शब्द ऐकून ती ह्मणालीः "अहा रे, माझ्या मायाळू दादा! तूं किती चांगला आहेस! मी मोठी हलगरजी व अविचारी पोर आहें. पण इतःपर मी अगदीं जपून वागण्यास झटेन."

## महमद आणि अल्ली.

मुसलमानी धर्माचा आद्यप्रवर्तक महमदपैगंबर हा एके समयीं अल्ली नामक एका पट्टशिष्यास बरोबर घेऊन मार्गक्रमण करीत असतां, एक मनुष्य अल्लीच्या अंगावर चालून येऊन त्याला शिव्याशाप देऊं लागला. त्या त्यानें कांहीं वेळ निमूटपणें ऐकून घेतल्या. पण शेवटीं त्याचा धीर सुटून तो त्या मनुष्यावर संतापून त्याला उलट शिव्या देऊं लागला. ह्याप्रमाणें दोघांचें भांडण जुंपलें, तेव्हां महमद मुकाट्यानें पुढें चालता झाला. आपल्या शिष्याला मदत करण्यास किंवा मध्यें पडून त्यांचा कलह मिटविण्यास तेथें तो थांबला नाहीं.

पुढें अल्लीची व महमदाची पुनः गांठ पडली तेव्हां अल्लीनें ह्मटलेंः "त्या आडदांड मनुष्यानें माझ्यावर हल्ला केला असतां, आपण माझ्या साहाय्याला न रहातां खुशाल पुढें निघून गेलां, याचें कारण काय?" महमद ह्मणालाः "तो मनुष्य प्रथम तुला अपशब्दांचा प्रहार करूं लागला तेव्हां तूं तो कांहीं वेळ शांतपणें सोशीत राहिला होतास.

तुझी ती वृत्ति कायम होती तोंपर्यंत तुझ्या सभोंवतीं सात देवदूत उभे असून त्या मनुष्याला तुझ्या तर्फे उलट जबाब देत होते. पण तूं त्याच्यावर संतापून तोंड सोडिलेंस तेव्हां तुझ्या भोंवतालचे देवदूत एकएक निघून गेले. ते सगळे गेले हें पाहून मीही तुला सोडून गेलों. ह्यावरून असा बोध घे कीं, आपणास कोणीं कशाही शिव्या दिल्या किंवा आपली बेअदबी केली, तरी ती शांतपणानें सोसावी. त्याच्याप्रमाणें आपण रागास चढून त्याला उलट शिव्याशाप देऊं लागलों, तर त्यापासून कलह मिटत तर नाहींच, पण उलट अधिक वाढून त्यामुळें आपणाला अधिकच दुःख व त्रास होतो. आपल्याशीं शत्रुत्वानें वागणारास किंवा आपणांवर रुष्ट होऊन आपलें नुकसान चिंतिणारास वळवून आपलासा करण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे त्याचे सगळे अपकार सोसून त्याच्यावर उपकार करण्यास झटावें हा होय."

## राजा आणि सेवक.

एका राजाचे कांहीं सेवक त्याच्याकडून वेळोवेळां आपल्या वेतना-बाहेर उसने पैसे घेत. अशी उसनवारी फारच झाली, तेव्हां त्या राजाला मोठा राग येऊन त्यांच्याकडे थकलेल्या बाक्या वसूल करण्याचा त्यानें निश्चय केला आणि प्रत्येकाकडे आपल्या येण्याची मागणी केली. त्या वेळीं कित्येक सेवकांनीं आपआपल्या कर्जाची थोडीबहुत फेड करून बाकीचें कर्ज हप्त्यांनीं फेडण्याचें कबूल केलें. त्यांच्यामध्यें एक अगदीं कफल्लक सेवक होता. त्याच्याकडे बरेंच येणें निघालें होतें. पण त्यांतला एक छदामही फेडण्याचें त्याला सामर्थ्य नव्हतें. हें पाहून राजाला मोठा त्वेष आला, आणि त्याला व त्याच्या बायकोमुलांस गुलाम ह्मणून विकून आपली रकम वसूल करण्याचा त्यानें विचार केला. हा घोर प्रसंग पाहून

तो सेवक राजाला साष्टांग नमस्कार घालून अतिदीन स्वरानें ह्मणालाः "खावंद, मी आपला बहुत वर्षांचा इमानी सेवक आहें. मला गय करून मी आपल्या सेवेस अंतरणार नाहीं असें करा." ही त्याची अतिनम्रतेची विनवणी ऐकून त्यानें त्याला क्षमा केली, व त्याजकडचें येणें सोडून दिलें.

पुढें ह्या सेवकानें एके दिवशीं आपल्या बरोबरच्या एका सेवकाकडे थोडेसे पैसे येणें होते, त्यांबद्दल त्याला तगादा लाविला. पण तो ते देईना ह्मणून त्याजवर त्यानें फिर्याद केली व त्यास तुरुंगांत पाठविलें. हें त्याचें वर्तन राजाच्या कानावर आलें तेव्हां त्याला त्याचा अतिशयित राग आला, आणि त्यानें त्यास आपल्या समोर बोलावून आणून ह्मटलें: "मीं तुला एवढी रकम सोडिली असतां, आपल्या बरोबरीच्या माणसाला लहानशी रकम सोडून देण्याची बुद्धि तुला झाली नाहीं. यावरून तूं माझ्या दयेस मुळीं पात्र नाहींस. तुला माझें सगळें देणें दिलें पाहिजे." असें ह्मणून राजानें त्याला तुरुंगांत रवाना केलें, आणि तो आपलें कर्ज फेडीपर्यंत त्याला बंदमुक्त करावयाचें नाहीं असें ठरविलें.

## न्युटन आणि त्याचा कुत्रा.

इंग्लंडांत सर ऐझाक न्युटन नामेंकरून एक अतिविख्यात तत्त्वज्ञ सतराव्या शतकांत होऊन गेला. पदार्थविज्ञानशास्त्र व गणितशास्त्र यांतील त्याचे शोध अत्यंत महत्त्वाचे व अप्रतिम आहेत. ह्या महातत्त्वज्ञाचा स्वभाव अतिशांत व सौम्य होता. चित्ताला क्षोभ होण्यासारखी कसलीही गोष्ट घडली तरी त्याच्या मनाची यत्किंचित्‌ही चलबिचल होत नसे. तें सर्वदा गंभीर व शांत राही. ह्या महापुरुषाचा एक लहान कुत्रा होता. त्याचें नांव त्यानें डायमन्ड असें ठेविलें होतें. तो त्याला फार आवडे आणि त्याला क्षणभरही विसंबत नसे. एके दिवशीं रात्रीं तो आपल्या

अभ्यासाच्या खोलींतून कांहीं कामासाठीं अमळ बाहेर गेला असतां, त्याच्या त्या कुत्र्यानें टेबलावर उडी मारून जळती मेणबत्ती जवळच्या कागदांच्या पुडक्यावर पाडिली. त्यामुळें ते सगळे जळून गेले. न्युटन परत येऊन पाहतो तर आपल्या ग्रंथाचा सगळा हस्तलेख जळून खाक झाला आहे, असें त्यास आढळून आलें. त्यामुळें त्याला पराकाष्ठेचें दुःख झालें. कारण पुष्कळ वर्षें सतत परिश्रम करून त्यानें आपल्या नवीन शोधांचीं प्रमेयें सिद्ध केलीं होतीं, व त्यांचा हा ग्रंथ रचिला होता. तो पुनः लिहून काढावयाचें काम अतिश्रमाचें असून, त्याला बरींच वर्षें लागणार होतीं. शिवाय त्या समयीं त्याचें उतार वय झालें होतें. यास्तव त्याला आतां स्वजीविताचा भरंवसाही नव्हता. ह्यावरून पाहतां, कधीं भरून न येणाऱ्या ह्या नुकसानाबद्दल त्या कुत्र्याचा त्याला अतोनात राग यावा. पण तो थोर मनाचा पुरुष यत्किंचित्‌हि न रागावतां एवढेच शब्द बोलला: "डायमन्ड ! डायमन्ड ! तूं जें माझें नुकसान केलें आहे, त्याचें तुला बापड्याला कायसें ज्ञान असणार !" केवढी विलक्षण क्षमाशीलता ही ! ह्या महापुरुषानें हा ग्रंथ पुनः लिहून काढून प्रसिद्ध केला. खरे तेजस्वी पुरुष असतात ते अंगीकृत कार्यांत कितीही प्रत्यवाय आले, तरी तें शेवटास नेण्यास सर्वदा झटत असतात, याचें हें एक उत्कृष्ट उदाहरण होय.

## महाराणीची क्षमाशीलता.

आमच्या व्हिक्टोरिया महाराणीसाहेब इंग्लंडच्या गादीवर बसल्या तेव्हां त्यांचें वय वीस वर्षांहून कमी होतें. ह्या अशा अल्प वयांत त्यांला अनेक कामें नित्य करावीं लागत. तीं निरलसपणें वेळच्या वेळीं करावीं, असा त्यांचा निर्धार असे. एके दिवशीं लष्करी खात्याचा प्रमुख ड्यूक ऑफ वेलिंग्टन हा कांहीं कागद घेऊन महाराणीसाहेबांच्या वाड्यांत

आला. त्यांवर त्यांच्या सह्या घ्यावयाच्या होत्या. त्यांमध्यें एक कागद एका शिपायाला देहांतशिक्षा देण्यासंबंधाचा होता. त्यावर त्यांची सही तो अधिकारी मागूं लागला. तेव्हां त्याच्यावर कोणत्या गुन्ह्याची शाबिदी झाली आहे, असें त्यांनीं त्याला विचारलें. तो ह्मणाला: "हा शिपाई मोठा कोडगा आहे. हा तीन वेळां लष्करी नोकरी सोडून पळाला. त्याला त्याबद्दल लहान शिक्षा केल्या, पण तो कांहीं सुधरला नाहीं." हें ऐकून राणीसाहेबांनीं विचारिलें: "ह्या मनुष्याच्या तर्फेनें कांहींएक सांगण्यासारखें नाहीं काय?" असा प्रश्न विचारितांना त्यांला गहिंवार आल्याचें त्या अधिकाऱ्यानें पाहून उत्तर केलें: "हा मनुष्य मोठा शूर व धैर्यशाली आहे. आपल्या देशाच्या रक्षणासाठीं यानें अनेक वेळां आपल्या प्राणांचीही परवा केली नाहीं." राणीसाहेब ह्मणाल्या: "असें आहे तर ह्या मनुष्याला ह्या वेळीं क्षमा करून काय परिणाम होतो तें पाहूं या. तुह्मी त्याला सांगा कीं, 'तूं मोठा शूर आहेस ह्मणून तुला एक वेळ क्षमा केली आहे.' असें ह्मणून त्यांनीं त्या कागदावर 'क्षमा केली आहे' असे शब्द लिहून ठेविले. राणीसाहेबांनीं आपणांस क्षमा केल्यामुळें आपला घोर मृत्यु टळला, ही गोष्ट त्या गुन्हेगार माणसाला कळली तेव्हां त्याच्या वृत्तींत एकदम पालट झाला, आणि त्यानें लष्करांत राहून मोठ्या इमानानें व हुशारीनें पुष्कळ वर्षें नोकरी केली; आणि शेवटीं पेन्शन घेऊन तो सुखवस्तु राहिला. राणीसाहेबांच्या ह्या कृपाळूपणाचें स्मरण त्याला आमरण राहिलें, हें कांहीं सांगायाला नको.

## नवी शिक्षा.

एका पलटणींत एक शिपाई अनेक वेळां अपराध करून लहान-मोठ्या शिक्षा पावला होता. एके समयीं त्या पलटणीच्या मुख्य अमलदारा-

पुढें कांहीं गुन्हेगारांचीं नांवें आलीं, त्यांत त्या शिपायाचें नांव होतें. तें पाहून तो ह्मणाला: "ह्या शिपायाला अनेक प्रकारच्या शिक्षा आजपर्यंत आपण केल्या. त्याला फटके तर मारिले; त्याची सगळ्यांसमोर फजिती केली; त्याला अटकेंत ठेविलें; पण तो कांहीं सुधरत नाहीं." आतां त्याला कसली शिक्षा करावी, ह्या विचारांत तो अमलदार असतां, त्याच्या हाताखालचा एक हवालदार बोलला: "मी मध्यें बोलतों याची क्षमा असावी. आपण त्या शिपायाला आजपर्यंत अनेक शिक्षा करून पाहिल्या आहेत. पण आपण त्याच्यावर एका उपायाचा प्रयोग करून पाहिला नाहीं. तो आपण अवश्य करून पाहावा." तो कोणता असें त्या अमलदारानें विचारिलें, तेव्हां तो ह्मणाला: "त्याला आपण एक वेळ क्षमा करून पाहावी." हा सुचविलेला उपाय ऐकून त्या अमलदाराला आश्चर्य वाटलें. पण थोडासा विचार केल्यावर त्यानें त्या गुन्हेगाराला आपल्यासमोर बोलावून विचारिलें: "तुला आपल्या बचावासाठीं कांहीं बोलावयाचें आहे काय?" त्यानें खालीं मान घालून उत्तर केलें: "महाराज, मला कांहींएक बोलावयाचें नाहीं. माझ्या हातून गुन्हा घडला याचें मला आतां अतिशयित वाईट वाटत आहे." ह्यावरून केलेल्या गुन्ह्याबद्दल त्याला लाज वाटत आहे असें दिसलें. पण अशी लाज त्याला ह्यापूर्वीं अनेक वेळां वाटली होती.

पुनः गुन्हा केल्याबद्दल आपणाला पूर्वींपेक्षां जबर शिक्षा खातरीनें होणार आहे असें त्या मनुष्यास ह्या वेळीं वाटत होतें. पण त्या मुख्य अमलदारानें त्याच्याकडे दयेनें पाहून ह्मटलें: "हें पाहा, तुला आह्मीं सगळ्या प्रकारच्या शिक्षा करून पाहिल्या. पण तूं कांहीं वाटेवर येत नाहींस. तेव्हां आतां आह्मीं तुजवर शेवटल्या उपायाचा प्रयोग करण्याचें योजिलें आहे. तुला ह्या वेळीं क्षमा करून पाहावी असा आह्मीं

ठराव केला आहे." हे अमलदाराच्या तोंडचे शब्द ऐकून तो शिपाई अगदीं चकित झाला. त्याच्या डोळ्यांत आसवें आलीं. त्याचें तोंड शरमेनें लाल झालें, आणि तो मुलाप्रमाणें रडूं लागला. त्यानें आपल्या अमलदाराला अगदीं लवून मुजरा केला, आणि त्याचे मनःपूर्वक आभार मानून तो तेथून निघून गेला.

त्या वेळेपासून त्याच्या आचरणांत एकदम मोठा पालट झाला; आणि तदनंतर त्याच्या हातून कसलाही गुन्हा तर झाला नाहींच, पण त्याची उत्तम वर्तणूक पाहून सगळे लोक त्याला नावाजूं लागले.

## क्षमाशीलतेचा प्रभाव.

एका मुलास त्याच्या चुलतभावानें एक लहान छानदार होडी दिली होती. ती दोऱ्या, डोलकाठ्या व शिडें लावून चांगली सजविली होती. ती आपल्या घराजवळच्या तळ्यांत सुटीच्या दिवशीं चालविण्याचा बेत करून त्यानें आपल्या शाळेंतल्या कांहीं सोबत्यांला तिसऱ्या प्रहरीं बोलाविलें होतें. ती त्यानें तळ्याजवळच्या एका ढोलींत ठेविली होती. सुटीच्या दिवशीं सकाळीं उठल्यावर ती पाहावयासाठीं तो त्या ढोलीकडे मोठ्या उल्हासानें धावत गेला. पण ती मोडूनतुटून पडलेली पाहतांच त्याला पराकाष्ठेचा खेद झाला; आणि हें आपलें नुकसान कोणीं केलें असावें याचा तो क्षणभर विचार करीत राहिला. तेव्हां तें काम आपल्या शेजारच्या एका मुलाचें असावें असें त्याच्या लक्षांत आलें. कारण ह्या मुलास त्यानें होडी लोटतांना पाहावयास बोलाविलें नव्हतें, त्याचा राग येऊन त्यानें हा असा सूड घेतला असावा, असा तर्क करण्यास त्याला जागा होती. मग त्यानें आपली होडी मोडणाऱ्या त्या मुलाचा सूड उगविण्याचा निश्चय करून, तो ज्या वाटेनें बाजारांत अंडीं व दूध घेऊन नेहमीं सकाळीं जात असे, त्या वाटेवर जमिनीपासून थोडीशी

उंच एक बारीक सुतळ आडवी बांधून तो जवळच्या झाडीआड लपून बसला. इतक्यांत त्या वाटेनें त्याला होडी देणारा त्याचा चुलतभाऊ आला. त्याला पाहून तो मुलगा चपापला आणि झाडींत दडूं लागला. पण त्या चुलतभावाची त्याजवर नजर गेलीच, आणि त्यानें त्याला तेथें लपून बसण्याचें कारण विचारिलें. तेव्हां अर्थात् त्याला झालेला प्रकार सांगावा लागला. तो ह्मणाला: "त्या पोराची खोड मोडावी म्हणून मी येथें ही दोरी बांधून ठेविली आहे. तो इतक्यांत ह्या वाटेनें अंडीं व दूध घेऊन जाणार आहे. तो ह्या दोरीला अडखळून पडला ह्मणजे त्याचीं अंडीं फुटतील आणि दूध सांडेल. हें असें त्याचें नुकसान झालें ह्मणजे मला थोडेंसें समाधान वाटेल."

त्याचा तो चुलतभाऊ मोठा समंजस व सुजन होता. हा असा त्याचा सूड उगविण्याचा बेत त्याला मुळीं आवडला नाहीं. पण तो फार संतापला आहे असें पाहून त्याला युक्तीनें वाटेवर आणण्याचें त्यानें मनांत आणिलें आणि ह्मटलें: "त्यानें तुझें असें नुकसान केल्याबद्दल त्याला कांहीं तरी शिक्षा ही झालीच पाहिजे. पण त्याची खोड मोडण्याची ह्याहून चांगली युक्ति मी तुला सांगतों." तो मुलगा ह्मणाला: "कोणती युक्ति ती सांग लौकर पाहूं." चुलतभाऊ ह्मणाला: "त्याच्या डोकीवर निखारे ठेविले तर तुला कसें वाटेल?" तो म्हणाला: "होय, भाऊ, ही शिक्षा त्याला करितां येईल तर मोठी मौज होईल. त्याच्या डोकीवर रांठ केश आहेत, त्यांवर निखारे ठेविले तर ते जळतांजळतां त्याला ते झाडून टाकितां येतील. तर आतां त्याच्या डोकीवर निखारे कसे ठेवावे तें सांग पाहूं." चुलतभाऊ ह्मणाला: "अशा शिक्षेचा प्रकार आपल्या बायबलांत (ख्रिस्ती धर्मशास्त्रांत) चांगला सांगितला आहे. त्यांत ह्मटलें आहे कीं, 'तुझा

शत्रु भुकेनें व्याकुळ झाला असतां, त्याला जेवायाला वाढ; तो तृषाक्रांत झाला असतां, त्याला पाणी पाज. कारण असें केल्यानें त्याच्या मस्तकावर तूं निखारे ठेविल्याप्रमाणें होईल." हें ऐकून तो मुलगा तोंड वाईट करून ह्मणाला: " ही रे कसली शिक्षा! ही आपली तूं कांहीं तरी गप्प सांगत आहेस. असल्या निखाऱ्यांनीं त्याचें काय होणार?" त्यानें उत्तर केलें: " तुला असल्या निखाऱ्यांचें कांहींएक वाटत नाहीं हा तुझा भ्रम आहे. असल्या निखाऱ्यांच्या योगानें द्वेष, मत्सर, हेवा इत्यादि दुष्ट मनोवृत्ति साफ जळून जातात, असा माझा अनुभव आहे." तो मुलगा ह्मणाला: " ठीक आहे; तूं ह्मणतोस तसेंच का होईना. त्या पोराच्या डोकीवर अशा तऱ्हेचा कोणता निखारा मी ठेवूं बरें!" त्यानें उत्तर केलें: "हें पाहा, तो मुलगा फार गरीब आहे. त्याला पुस्तकें वाचण्याचा नाद मनस्वी आहे. पण त्याच्याजवळ पुस्तकें विकत घ्यावयाला पैसे नाहींत. तुझ्याकडे पुष्कळ पुस्तकें आहेत. तर तुला त्यास एकादेंदुसरें पुस्तक वाचायाला सहज देतां येईल." असें बोलून तो तेथून निघून गेला; आणि तो मुलगा तेथेंच उभा राहून त्या गोष्टीचा विचार करूं लागला. इतक्यांत त्याची होडी मोडणारा तो मुलगा अंडीं व दूध घेऊन त्या वाटेनें आला. त्याला हाक मारून तो ह्मणाला: " कायरे, आतांशा तुला वाचायाला वेळ मिळतो काय?" त्यानें उत्तर केलें: " गाई चारून आणून गोठ्यांत बांधिल्यावर व दुसरीं नित्याचीं कामें उरकल्यावर संध्याकाळचा थोडासा वेळ मला मिळतो खरा. पण नवींनवीं पुस्तकें मिळण्याची पंचाईत असल्यामुळें मला ह्या फुरसतीचा चांगला उपयोग करितां येत नाहीं." तो मुलगा ह्मणाला: "बरें, मी तुला माझीं पुस्तकें देऊं काय? हें पाहा, मीं प्रवासवर्णनाचें एक नवें पुस्तक नुकतेंच

घेतलें आहे. तें माझें वाचून झालें आहे. तें तुला वाचावेंसें वाटत असल्यास मी तुला तें अवश्य देईन." तो गरीब मुलगा अमळ ओशाळून ह्मणाला: "तें पुस्तक मला वाचावेंसें वाटत आहे. तें तूं मला देशील तर तें मी संभाळून ठेवीन." मग तो मुलगा ह्मणाला: "आज तुला मीं एक मोठी मौज दाखविली असती. पण काय करूं! मीं एक नवी मचेजी होडी तळ्यांत लोटायासाठीं ठेविली होती. ती कोणीं मोडून टाकिली आणि तिच्या बुडाशीं एक भोंक पाडिलें. हें असलें नीच काम कोणीं केलें असावें बरें?" हे शब्द ऐकून तो अतिशयित लज्जित होऊन खालीं मान घालून क्षणभर उभा राहिला, आणि मग मोठ्या प्रयासानें वर मान करून ह्मणाला: "मित्रा, तें काम माझ्या हातून झालें आहे. त्याबद्दल मला आतां अतिशयित खेद वाटत आहे. तूं आतां मला पुस्तकें वाचावयास देतों ह्मटलें, त्या वेळीं माझ्या हातून असलें नीच कर्म झाल्याचें तुला ठाऊक होतें काय?" तो ह्मणाला: "तूंच तें काम केलें असावें असें मला वाटलें होतें." तो अपराधी मुलगा ह्मणाला: "असें वाटूनही तूं मजवर उपकार करण्यास तयार झालास ना!" इतकें बोलल्यावर त्याच्या तोंडावाटे शब्द निघतना. त्याचा गळा भरून आला. त्याचें तोंड गोरेंमोरें झालें. त्याच्यानें तेथें उभें रहावेना. तो तेथून खालीं मान घालून चालता झाला.

अशी त्याची अवस्था पाहून त्या मुलास वाटलें कीं, आपल्या चुलतभावाच्या ह्मणण्याप्रमाणें त्याच्या डोकीवर हा निखरा चांगलाच पेटला. त्याचीं सगळीं अंडीं फुटलीं असतीं, व सगळें दूध सांडलें असतें, तर त्याला इतकें वाईट वाटलें नसतें. ह्याप्रमाणें तो मुलगा समाधान पावून तेथून घरीं निघून गेला.

तिसरे प्रहरीं ठरल्याप्रमाणें त्याचे सोबती होडी तळ्यांत चालविण्याची मौज पाहायाला जमा झाले. पण ते नेमिलेल्या जागीं येण्यापूर्वीं तो अपराधी मुलगा तेथें येऊन ती मोठ्या उत्कंठेनें नीट करीत होता. होडीचा मालक तेथें आला तेव्हां त्यानें त्या होडीवर लावण्यासाठीं एक सुंदर बाहुटा त्याच्या हातीं दिला. हा बाहुटा त्यानें अंडीं विकून आलेल्या कांहीं पैशांचा विकत आणिला होता; आणि ती त्याची होडी त्यानें चांगली दुरुस्त केल्यामुळें ती हुबेहूब मूळच्यासारखी होऊन पाण्यांत उत्तम रीतीनें तरली. ह्याप्रमाणें आपल्या शेजाऱ्याचा सूड न उगवितां उलट त्याजवर उपकार करण्याचें त्यानें मनांत आणिल्यामुळें तो त्याचा विशेष प्रेमळ मित्र झाला आणि त्याच्यावर अतिशयित प्रीति करूं लागला.

# भाग अकरावा.

## कृतज्ञता.

### कृतज्ञ सिंहीण.

बर्लीनशहरांतल्या पशुसंग्रहालयांत एक सिंहीण होती. ती आजारी पडली असतां, तिला उंदरांचा भारी उपद्रव होऊं लागला. ती अत्यवस्थ होऊन पडल्याकारणानें तिला त्यांस निवारितां येईना. ते तिच्या पंज्यांचीं नखें बेलाशक कुरतडूं लागले. तेव्हां तिला त्यांपासून उपद्रव होऊं नये ह्मणून एक लहान कुत्रा तिच्या पिंजऱ्यांत सोडिला. त्याला पाहून ती पहिल्यानें गुरगुरूं लागली. पण अमळशानें त्या कुत्र्यानें पिंजऱ्यांत येणाऱ्या उंदरांचा सप्पा उडविण्याची सुरुवात केली, तेव्हां तिला तो फार आवडूं लागला. त्याला आपल्याजवळ घेऊन ती चाटूं लागली व पंज्यांनीं कुरवाळूं लागली. रात्र झाली ह्मणजे ती त्याला आपल्या उराशीं घेऊन निजे. तो कुत्रा ह्याप्रमाणें तिचा अतिशयित प्यारा झाला. कारण तो तिला उंदरांचा उपद्रव होऊं देत नसे. शेवटीं ती सिंहीण त्या दुखण्यानें मरण पावली. मरेपर्यंत तिनें त्या आपल्या उपकारकर्त्या कुत्र्यावर पराकाष्ठेचें प्रेम केलें.

### माजराची कृतज्ञता.

एका बाईची एक माजर होती. तिचीं कांहीं पोरें होतीं. त्यांतलें एक पोर आजारी झालें. तेव्हां त्या माजरीनें त्याला बरें करण्यासाठीं हरउपाय केला. पण तें कांहीं बरें होईना. तेव्हां त्याला दांतांत धरून

तिनें आपल्या धनिणीकडे आणिलें आणि तिच्या ओटींत ठेविलें. माजरीचा उद्देश जाणून त्या बाईनें त्या पोराची चांगली निगा करून त्याला लौकरच बरें केलें आणि पुनः तिच्या स्वाधीन केलें. नंतर कांहीं दिवसांनीं ती बाई आजारी होऊन बिछान्याला खिळली. धनिणीची ती अवस्था त्या माजरीच्या ध्यानांत येऊन ती अस्वस्थ झाली, आणि तिच्या खोलींत जायाला पाहूं लागली. पण तिचें दार बंद असल्यामुळें तिचा आंत प्रवेश होईना. तेव्हां ती भिंतीवर चढून खिडकीवाटे तिच्या खोलींत गेली आणि तिच्या उशाजवळ एक मारलेला उंदीर ठेवून तेथून निघून गेली. आपल्या धनिणीचे उपकार स्मरून तिच्या आजारीपणांत तिला आपल्याकडून कांहीं तरी मदत व्हावी अशा भावनेनें तिनें हा असा प्रकार केला, हें उघड आहे.

## आजारी हत्ती.

एका गृहस्थाचा एक हत्ती होता. त्याच्या डोळ्यांला कांहीं विकृति होऊन तो कित्येक दिवस आंधळा झाला. तेव्हां त्या गृहस्थानें एका नेत्रवैद्याला बोलावून आणून त्याचे डोळे दाखविले. वैद्यानें ते पाहून, तशा विकृतीवर मनुष्याला जें औषध योजितात, तें त्या प्राण्याच्या डोळ्यांत घातलें. तें घालण्यासाठीं त्याला आडवा निजवावा लागला. तें औषध तीव्र असल्यामुळें तें त्याच्या डोळ्यांला झोंबून तो मोठ्यानें ओरडला. त्या औषधामुळें त्याला बराच आराम पडून त्याला थोडेंसें दिसूं लागलें. दुसरे दिवशीं पुनः तो वैद्य त्याच्या डोळ्यांत औषध घालायासाठीं आला. तेव्हां त्याच्या शब्दावरून त्याला ओळखून तो तत्काळ जमिनीवर आपण होऊन निजला, आणि आपलें तोंड एके बाजूस करून व सोंड फिरवून स्थिर राहिला. औषध घातल्यावर त्यानें आपणाला

मोठा आराम झाल्याचें दर्शविलें आणि आपली सोंड फिरवून व इतर प्रकारीं हावभाव करून आपली कृतज्ञता व्यक्त केली.

## हत्तीची उपकारस्मृति.

हिंदुस्थानांतील एका शहरांतल्या बाजारांत एका गरीब बाईचें भाजीपाल्याचें दुकान होतें. त्या वाटेनें एक हत्ती नेहमीं नेत. तो तिच्या दुकानापाशीं आला ह्मणजे उभा राहून तिच्या भाजीपाल्याकडे पाही. त्यावरून त्या बाईच्या मनांत असें आलें कीं, ह्या प्राण्याला फळें फार आवडतात, तर आपण त्याला एकादें द्यावें. मग ती त्याला नेहमीं एकादें-दुसरें फळ खावयास देई. एके दिवशीं हा हत्ती चिडून महाताला जुमानिनासा झाला आणि भररस्त्यांतून धावत सुटला. त्यामुळें त्याच्या पायांखालीं जेंजें सांपडे त्याचा चुराडा होऊं लागला. ह्याप्रमाणें धावतां-धावतां तो बाजाराच्या रस्त्यावर आला. त्याला पाहून सगळे दुकानदार भयभीत होऊन पळत सुटले. बाकीच्यांबरोबर ती बाईही पळाली. पण त्या धांदलींत तिचें लहान मूल दुकानापाशीं रांगत होतें त्याला उचलून न्यावयाचें तिला भान झालें नाहीं. तें मूल हत्तीच्या अगदीं वाटेंत होतें, आणि आतां तें त्याच्या पायांखालीं सांपडून गतप्राण होतें असें त्या बाईला वाटलें. पण तो हत्ती अतिशयित खवळला असतांही त्या दुकानापाशीं आला तेव्हां त्याला त्या बाईच्या उपकाराची आठवण झाली, आणि चटकन थांबून तिच्या मुलास त्यानें सोंडेनें हळूच उचलून एकीकडे ठेविलें; आणि मग तो पुनः दौडत सुटला!

## कुत्रा राजाचा बचाव करितो.

इंग्लंडचा तिसरा उइलियमराजा एकदां एका मोहिमेवर गेला असतां एके ठिकाणीं रात्रीचा छावणीस राहिला. तो नेहमीं जागरूक राहून सर्व काळ हत्यारबंद असे. तो झोपीं गेला तरी तो आपला

लष्करी जामानिमा काढून ठेवीत नसे; आणि त्याच्या तंबूपाशीं एक घोडा खोगीर वगैरे घालून तयार ठेविला असे. अशा तयारीनें तो झोपीं गेला असतां, शत्रूनें त्याच्या छावणीवर एकदम छापा घातला आणि त्याच्या तैनातीच्या दोघां अमलदारांची कत्तल उडविली. राजाचा एक लहान कुत्रा होता, तो ही गडबड ऐकून तंबूच्या कनातीवर मोठ्यानें ओरबाडूं लागला. तो आवाज ऐकून राजा जागा झाला, आणि शत्रूची चाऊल लागतांच तंबूबाहेर येऊन आपल्या घोड्यावर बसून तेथून तत्काळ निसटून गेला. कुत्र्यानें त्याला उठविलें नसतें तर शत्रूच्या लोकांनीं त्याच्या तंबूंत शिरून त्याला ठार केलें असतें. ह्यामुळें अर्थात् त्या कुत्र्यावर राजाचें अतिशयित प्रेम जडलें; आणि तो कुत्रा मेल्यावर त्याच जातीचे कुत्रे तो शेवटपर्यंत आपल्याजवळ बाळगीत असे.

## उपकारस्मृति.

एका कामकऱ्याचा हात कारखान्यांतल्या यंत्रांत सांपडून बराच दुखवला, ह्मणून त्याला एका रुग्णालयांत नेलें. तेथल्या वैद्यांनीं त्याचा तो चेंगरलेला हात पाहून तो कापून काढिला पाहिजे असें ठरविलें. त्या वेळीं तेथें डोरा नांवाची एक मोठी परोपकारी परिचारिका उभी होती. ती ह्मणाली: "ह्या तरुण मुलाचा हात कापून ह्याला जन्माचा थोटा करूं नका. हा त्याचा उजवा हात आहे. ह्याची चांगली निगा केली तर हा बरा होण्यासारखा आहे." हें तिचें कळवळ्याचें बोलणें ऐकून वैद्यांनीं त्याचा हात कापण्याचा बेत रहित केला. मग डोराबाईनें त्याच्या हाताला मोठ्या मायेनें योग्य औषधोपचार वगैरे केल्यामुळें तो कांहीं दिवसांनीं बरा झाला, आणि तो त्या हातानें पूर्वींप्रमाणें कामकाज करूं लागला. आपल्या हाताचा बचाव त्या दयाळू माऊलीनें केला, हें तो कधींही विसरला नाहीं. दररविवारीं कारखान्याला सुटी असली

ह्मणजे तो आपल्या ठिकाणाहून अकरा मैल चालून जाऊन डोराबाईचें दर्शन घेत असे. ती कांहीं कामांत असली किंवा कोठें गेली असली, तर तो तिच्या दारांतल्या घंटेची दोरी ओढी आणि तिचा चाकर बाहेर आला ह्मणजे त्याला सांगे कीं, "डोराबाईला माझा प्रेमपूर्वक प्रणाम सांगा आणि कळवा कीं, तुह्मीं ज्या गरीब मनुष्याचा हात बचाविला तो आपली खुशाली विचारायास आला होता."

## उपकाराची फेड.

एका गांवांतल्या एका चक्कीवाल्याचा लहान मुलगा एका नदीच्या तीरावर बागडत असतां पाण्यांत पडला. त्याबरोबर त्याच्या संवगड्यांनीं ओरड केली. ती जवळच एक लोहार रहात असे त्याच्या कानीं पडली. तेव्हां तो तेथें धावत गेला, आणि पाण्यांत उडी घालून त्यानें त्या गटंगळ्या खात असलेल्या मुलास तीरावर आणिलें, आणि त्याला चांगला सावध करून त्याच्या बापाजवळ नेलें. त्याबद्दल चक्कीवाल्यानें त्याचे आभार मानिले.

ह्या गोष्टीला एक वर्ष लोटल्यावर एके दिवशीं त्या लोहाराच्या घराला आग लागून तें चोहोंकडून पेटलें. त्या वेळीं तो व त्याचीं बायकोमुलें घराबाहेर सुरक्षितपणें पडलीं. त्या गडबडींत त्याची एक लहान मुलगी घरांत निजली होती, तिची त्याला आठवण झाली नाहीं. ती आतां जागी होऊन बारीपाशीं येऊन मोठ्यानें किंकाळ्या मारूं लागली. पण तिला तेथून आणायासाठीं आगीच्या डोंबांत शिरण्याची छाती कोणालाही होईना. इतक्यांत तेथें तो चक्कीवाला धावत आला, आणि त्या मुलीचें तें संकट पाहून एकदम आगींत शिरला आणि तिला उचलून घेऊन सुखरूप बाहेर आला. आपल्या मुलीचा बचाव झालेला पाहून त्या आईबापांस पराकाष्ठेचा हर्ष झाला, हें सांगावयास नकोच.

त्या वेळीं तो चक्कीवाला त्या लोहारास ह्मणालाः " गत वर्षीं तूं माझ्या मुलाचा जीव वांचविला, आणि आज मला तुझ्या मुलीचा जीव वांचविण्याची संधि मिळाली, ह्याबद्दल मी देवाचे आभार मानितों. माझ्यावर तुझा उपकार झाला होता, त्याची फेड मला कशी करितां येईल, हा विचार माझ्या मनांत सर्व काळ घोळत होता."

## कृतज्ञ कप्तान.

एक बाई भाड्याच्या गाडींत बसून चालली असतां, वाटेंत एक गरीब मुलगा तिला दिसला. त्याच्या पायांत जोडा नव्हता, व तो चालूनचालून त्याचे पाय सुजले होते. त्याची ती अवस्था पाहून त्या बाईला कळवळा आला, आणि तिनें गाडीवानाला त्या मुलास गाडींत घ्यावयास सांगितलें. मुकामावर गाडी पोंचली तेव्हां त्याचें भाडें देऊन तिनें त्या मुलास पुसलें: " बाळा, तुला कोठें जावयाचें आहे?" तो ह्मणालाः " मला जवळच्या बंदरांत जावयाचें आहे. मीं तारवावर नोकरी धरिली आहे. आज मला तीवर रुजू व्हावयाचें आहे." असें सांगून व त्या बाईचे आभार मानून तो मुलगा चालता झाला.

पुढें वीस वर्षांनीं त्याच रस्त्यानें जहाजावरील एक कप्तान गाडींत बसून चालला असतां, एक गरीब ह्मातारी बाई वाटेनें हळूहळू चालत असलेली त्यानें पाहिली. ती अशक्त असून चालतांचालतां अगदीं थकली होती. तिची ती दशा पाहून तो कप्तान गाडीवानाला ह्मणालाः " त्या वृद्ध बाईला गाडींत घे. तिचे पैसे मी देईन." त्यावरून त्या बाईला गाडींत बसायाला मिळालें. पुढला टप्पा आला, व घोडे बदलण्यासाठीं गाडी थांबली, तेव्हां ती बाई गाडींतून उतरली आणि त्या कप्तानाचे आभार मानून ह्मणालीः "तुह्मीं माझ्यावर दया केली ह्मणून

मला एवढी मजल सुखानें झेपतां आली. मी फार गरीब आहें. गाडीला देण्यास मजपाशीं पैसे नसल्यामुळें मी पायीं चालत होतें." तो कप्तान ह्मणालाः "बाई, तुझ्यासारखें ज्या माणसाला पायांनीं चालावें लागतें, त्यांची मला नेहमीं दया येते. वीस वर्षांपूर्वीं मी गरीब मुलगा असून ह्याच गांवाजवळून चालतांचालतां थकलों असतां, एका दयाळू बाईला माझी करुणा येऊन तिनें मला गाडींत घेतलें आणि माझे पैसे दिले; हें मला पक्कें आठवत आहे." ती ह्मातारी ह्मणाली, "तुला गाडींत घेणारी बाई ती मीच बाबा. गेल्या वीस वर्षांत माझी स्थिति अगदीं बदलून मी आतां अगदीं गरीब झालें आहें. माझा निर्वाह चालण्याचीही पंचाईत झाली आहे." कप्तान ह्मणालाः "बाई, तूं इतःपर अगदीं निश्चिंत रहा. मी तारवावर नोकरी करून बरेच पैसे मिळविले आहेत; आणि आतां कोठें तरी सुखवस्तु रहाण्याचा माझा मानस आहे. तूं जीवंत आहेस तोंपर्यंत तुला मी दर वर्षीं पंचवीस पौंडांची मदत करीन, तिचा तूं स्वीकार करावा." हे शब्द ऐकून त्या बाईला पराकाष्ठेचा गहिंवर आला, आणि तिचे डोळे आसवांनीं भरून येऊन तिनें त्याच्या हातांचें मोठ्या प्रेमानें चुंबन केलें.

## शेळीची कृतज्ञता.

स्कॉटलंडदेशांतल्या लोकांनीं स. १७१५ सालीं बंड केलें होतें, तें प्रेस्टनच्या लढाईनंतर साफ मोडलें असतां, त्यांतल्या एका प्रमुख गृहस्थाला पळून जावें लागलें. तेव्हां तेथल्या डोंगराळ प्रदेशांतल्या एका खेड्यांत त्याच्या ओळखीची एक बाई होती, तिच्या घरीं तो लपून राहिला. पण पुढें बंडाच्या पुढाऱ्यांचा शोध मोठ्या जारीनें सुरू झाला, तेव्हां तेथें रहाणें सुरक्षित न वाटून तो डोंगरांतल्या एका गुहेंत जाऊन राहिला, आणि तेथें त्याला ती बाई अन्नपाणी पाठवी.

त्या गुहेंत जाण्याची वाट अगदीं लहान होती. तींत सरपटत जावें लागे. चाकर त्या गुहेबाहेर उभा राहून खुणेचा शब्द बोलला ह्मणजे तो गृहस्थ बाहेर येऊन त्यानें आणिलेलें अन्न आंत घेऊन जाई. एके दिवशीं तो असा बाहेर येऊन अन्न घेऊन परत गुहेंत रांगत जात असतां, त्याच्या हाताला कांहीं लागलें. तेव्हां तो पहिल्यानें चपापला. पण अंधारांत चाचपून पाहतां, ती एक शेळी असून ती आपल्या पोराला घेऊन तेथें पडली आहे, असें त्याला आढळून आलें. मग ती तेथें तशी कां पडली आहे हें तो पाहूं लागला, तों तिच्या एका पायाला मोठी दुखापत झाली असल्यामुळें तिला चालतां येत नाहीं, असें त्याला दिसून आलें. तिची अशी अवस्था पाहून त्याला दया आली, आणि तिला आंत मोकळ्या जागीं नेऊन तिची जखम त्यानें बांधिली; आणि ती भुकेनें अगदीं व्याकुळ झालेली पाहून तो तिला भाकर भरवूं लागला. पण तिला ती तोंड लाविना. ती तोंड वासून पडली होती. तेव्हां त्यानें तिच्यापुढें पाणी ठेविलें. तें ती मोठ्या असोशीनें प्याली. मग त्याच्या हातची भाकर खाऊन ती चांगली हुशार झाली. तें पाहून त्या गृहस्थाला मोठें समाधान वाटलें. अमळ काळोख पडला ह्मणजे गुहे-बाहेर जाऊन तिच्यासाठीं तो कोंवळा पाला व हिरवळ घेऊन येई. ह्याप्रमाणें त्यानें तिची कित्येक दिवस जोपासना केल्यावर तिचा पाय साफ बरा झाला, आणि ती आपल्या करडाला घेऊन गुहेबाहेर चरा-वयास जाऊं लागली. ती नित्य संध्याकाळीं गुहेंत परत येऊन त्याला सोबत करी. एके दिवशीं असें झालें कीं, त्याच्यासाठीं अन्न घेऊन यणारा चाकर आजारी पडला. ह्मणून दुसऱ्या मनुष्याला ती कामगिरी सांगावी लागली. हा नवखा मनुष्य अन्न घेऊन गुहेच्या दाराशीं आला तेव्हां ती शेळी त्याला आंत शिरूं देईना. ती त्याच्यावर मोठ्या त्वेषानें

मुसंड्या मारूं लागली. ही गडबड ऐकून तो गृहस्थ गुहेच्या दाराशीं आला, आणि त्या नवीन मनुष्याला खुणेचा शब्द विचारून त्याच्या जवळचें अन्न त्यानें घेतलें. ह्या वेळीं त्या शेळीनें असा कांहीं विलक्षण आवेश व त्वेष दर्शविला कीं, ती आपल्या उपकारकर्त्याच्या बचावासाठीं आपला प्राण देण्यासही तयार होती असें स्पष्ट दिसून आलें.

## विद्यासागर व एक गरीब मुलगा.

बंगाल्यांत विद्यासागर नामेंकरून एक विख्यात गृहस्थ होऊन गेला. स. १८६५ सालीं तिकडे मोठा दुष्काळ पडला असतां, हा गृहस्थ कांहीं कामानिमित्त बरद्वानशहरीं गेला. तेथल्या रस्त्यांतून तो चालला असतां, एक गरीब मुलगा त्याला भेटला; आणि हा कोणी थोर पुरुष आहे असें समजून तो मुलगा त्याच्यापुढें हात पसरून एक पैसा मागूं लागला. त्याची दीन अवस्था पाहून विद्यासागर यास करुणा आली, आणि त्यानें त्याला पुसलें: "तुला मीं चार पैसे दिले तर त्यांचें तूं काय करिशील?" मुलानें उत्तर दिलें: "दोन पैशांचें मी कांहीं तरी घेऊन खाईन आणि दोन माझ्या आईला देईन." त्याला त्यानें पुनः विचारिलें: "बरें, दोन आणे दिले तर त्यांचें काय करिशील?" हा प्रश्न ऐकून हा गृहस्थ आपली थट्टा करीत आहे, असें त्या मुलास वाटलें, आणि तो तोंड फिरवून जाऊं लागला. तेव्हां विद्यासागरानें धावत जाऊन त्याचा हात धरून आपल्या दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर सांगण्याचा त्याला आग्रह केला. त्या मुलानें डोळ्यांत आसवें आणून ह्मटलें: "महाराज, चार पैशांचे तांदूळ घेईन आणि बाकीचे आईकडे देईन." त्यानें पुनः विचारिलें: "आणि चार आणे दिले तर त्यांचा कसा काय उपयोग करिशील?" मुलानें उत्तर केलें: "दोन आण्यांचें दोन दिवस पुरेल इतकें धान्य मी विकत घेईन

आणि दोन आण्यांचे आंबे घेऊन चार आण्यांस विकीन, आणि ह्याप्रमाणें व्यापार करीत राहून माझा आणि माझ्या आईचा चरितार्थ चालवीन."

तें ऐकून विद्यासागरानें त्याला एक रुपया दिला. तो पाहून त्या मुलास पराकाष्ठेचा हर्ष झाला, आणि त्या दयाळू पुरुषाचे मनापासून आभार मानून तो तेथून निघून गेला. पुढें दोन वर्षांनीं पुनः विद्यासागर त्या शहरीं गेला, आणि तो एका रस्त्यांतून चालला असतां, एक चांगला बळकट मुलगा आपल्या दुकानांतून उडी टाकून रस्त्यांत आला आणि त्याला मोठ्या अदबीनें प्रणाम करून ह्मणाला: "महाराज, माझ्या दुकानांत. येऊन क्षणभर बसण्याची मेहरबानी कराल काय?" विद्यासागर ह्मणाला: "मी तुला ओळखीत नाहीं" त्या मुलानें डोळ्यांत आसवें आणून व हात जोडून दोन वर्षांपूर्वी आपणांस त्यानें एक रुपाया दिल्याची आठवण दिली आणि ह्मटलें: "महाराज, तुह्मीं दिलेले ते पैसे मीं व्यापारांत घातले. त्यांत मला एकसारखी बरकत येत गेली, आणि आज मीं हें फळांचें दुकान ह्या पेठेंत मांडून बसलों आहें. यांत मला चांगलें उत्पन्न आहे. आपल्या कृपेनें मला ही स्थिति आली आहे. तुमचे उपकार मी आमरण विसरणार नाहीं." असें बोलून त्या मुलानें त्याला दुकानांत येऊन बसण्याविषयीं मोठ्या प्रेमानें विनंति केली. ती मान्य करून तो परोपकारी पुरुष त्याच्या दुकानांत बसून त्याच्याशीं थोडा वेळ बोलला, आणि त्यानें दिलेलीं फळें त्यानें मोठ्या आवडीनें खाल्लीं.

### एका वृद्ध मनुष्याची कृतज्ञता.

एके समयीं बगदादच्या कांहीं अमिरांनीं बंड केलें. तें तेथल्या खलिफानें मोडून व त्या अमिरांना पकडून देहांतशिक्षा केली. त्यांचे

मोठे वाडे होते तेही त्यानें जमीनदोस्त केले. त्यांपैकीं एका वाड्याच्या जागीं एक वृद्ध मनुष्य नित्य येई आणि तेथें पूर्वीं रहात असलेल्या अमिराचें गुणवर्णन करून शोक करी. हें वर्तमान खलिफाला कळलें तेव्हां त्यानें त्या वृद्ध मनुष्यास आपल्यासमोर आणवून विचारिलें: "तूं माझ्या शत्रूचें नेहमीं गुणवर्णन करीत असतोस याचें कारण काय?" त्यानें उत्तर दिलें: "महाराज, त्यांनीं मजवर उपकार केले आहेत ह्मणून मी त्यांचे गुण आठवून विलाप करीत असतों. महाराज, माझी हकीकत कृपा करून ऐकून घ्या, आणि मग मला जो कांहीं दंड करावयाचा तो करा. मी मूळचा दमास्कसशहरचा रहिवासी. तेथली माझी सारी चीजवस्त नष्ट होऊन मी भिकेस लागलों. ह्मणून मला परागंदा होऊन बगदादशहरीं यावें लागलें. त्या वेळीं माझ्या कुटुंबांत तीस माणसें होतीं. येथें येऊन मी भिक्षा मागून निर्वाह करूं लागलों. असा भिक्षा मागत एके दिवशीं रस्त्यांतून चाललों असतां, त्या अमिरांच्या वाड्यापाशीं आलों. त्या वेळीं तेथें लग्नसमारंभ चालला होता. माझी कंगाल दशा पाहून त्यांला करुणा आली, आणि मला त्यांनीं लग्नसमारंभाच्या मेजवानीस बोलाविलें. मेजवानी आटपल्यावर त्यांनीं माझी हकीकत ऐकून घेतली, आणि त्यांला माझा अतिशयित कळवळा येऊन त्यांनीं मला उदार आश्रय दिला. मग मी त्यांच्या वाड्यांत सगळ्या कुटुंबानिशीं राहूं लागलों. ह्याप्रमाणें मीं त्यांच्या घरीं तेरा वर्षें सुखानें राहिलों. पुढें आपण त्यांजवर फिसादीचा आरोप ठेवून त्यांचा संहार केला. तेव्हां अर्थात् माझा आश्रय तुटला. त्यांनीं मला थोडीशी जमीन दिली होती, तीवर आपल्या सरसुभ्यानें जबर कर बसविल्यामुळें तींत होणारें उत्पन्न तो कर देण्यासही पुरत नाहीं. ह्याप्रमाणें मला पुनः कंगाल स्थिति आली आहे."

हें त्याचें गाऱ्हाणें ऐकून खलिफानें सरसुभ्यास बोलावून आणून पुसलें: "हा वृद्ध मनुष्य तुझ्या ओळखीचा आहे काय?" त्यानें उत्तर केलें: "होय, सरकार; हा त्या बंडखोर अमिरांचा अनुयायी आहे." खलिफानें विचारिलें: "ह्याच्याजवळून तूं प्रतिवर्षी केवढा कर घेत असतोस?" सुभ्यानें ती रकम सांगितल्यावर खलिफानें त्याला त्याच्याकडून घेतलेल्या कराची सगळी रकम परत करायाला सांगून त्याची जमीन त्याच्याकडे वंशपरंपरा रहावी असा हुकूम केला. हें ऐकून त्या वृद्ध मनुष्याला अतिशयित आनंद होऊन त्याचे डोळे आसवांनीं भरले; आणि तो उपकारकर्ता अमीर गत झाल्यास बरींच वर्षें लोटलीं असतांही त्यानें केलेल्या उपकारांची सर्व काळ आठवण करणाऱ्या त्या वृद्ध मनुष्याच्या निष्ठेचें चोज वाटून खलिफाच्याही डोळ्यांतून अश्रु गळूं लागले.

## सिंहाची कृतज्ञता.

पूर्वकाळीं रोमशहरांत गुलामांचा व्यापार चालत असे. तेथें प्रत्येक मध्यम व उच्च प्रतीच्या माणसाच्या घरीं गुलाम पाळलेले असत. त्यांचा व्यापार पशूंप्रमाणें चाले; आणि त्यांला केवळ गुरांप्रमाणें लेखीत. पाळलेला गुलाम धन्याच्या त्रासानें पळून गेला तर त्याला मोठी जबर शिक्षा करावी असा कायदा असे.

एके समयीं एक गुलाम आपल्या धन्याच्या घरून पळून गेला, तेव्हां त्याचा शोध लावून त्याला पकडून आणिलें, आणि त्याला देहांत-शिक्षा देण्याचें ठरविलें. मग त्याला एका मोठ्या आवारांत नेलें. त्या आवाराच्या सभोंवतीं उंच भिंती होत्या. तेथें त्याला ठेविल्यावर त्याच्या अंगावर एक मोठा क्रूर सिंह सोडिला. त्या हतभाग्य गुलामाची आणि

त्या सिंहाची झटापट पाहण्यासाठीं त्या आवारासभोंवतीं हजारो प्रेक्षव जमले.

तो मनुष्य पाहतांच मोठी गर्जना करून सिंह त्याच्या अंगाव धावून गेला. पण लागलींच तो थबकला आणि शेंपूट हालवून मोठ आनंद प्रगट करूं लागला. तो अतिनम्रतेनें त्या गुलामाजव जाऊन त्याचे हात चाटूं लागला व त्याच्यासभोंवतीं हर्षानें बाग लागला. हा प्रकार पाहून सर्व प्रेक्षकांना मोठा अचंबा वाटला, आणि त्यांनीं त्या गुलामाला त्यासंबंधाचा खुलासा पुसला. तेव्हां त्यानें त्यांल पुढील हकीकत सांगितली:—

"मी माझ्या धन्याच्या घरून पळालों तो रानांतल्या एका गुहेंत जाऊन लपून बसलों. इतक्यांत एक सिंह त्या गुहेकडे येतांना मं पाहिला. तो दुःखस्वरानें कण्हत होता. माझ्याजवळ येऊन त्यानें आपल एक पंजा उचलून मजपुढें धरिला. त्यांत एक मोठा कांटा रुतला होता. तो मीं हळूच काढून टाकून जखमेंत झालेला पू पिळून टाकिल आणि त्यांत एका झाडाच्या पाल्याचा रस पिळिला. त्यामुळें त्याच्य वेदना तत्काळ नाहींतशा होऊन थोड्याच दिवसांत त्याचा पंजा साप बरा झाला. हा आपणावर मोठा उपकार झाला असें समजून त मजवर प्रेम करूं लागला आणि जनावरें मारून गुहेंत आणून मल देऊं लागला. ह्याप्रमाणें त्या गुहेंत बरेच दिवस मी त्याच्या संगतीन सुखानें काढिले. पण पुढें त्याला व मला त्या गुहेंतून पकडून आणिलें. त्यामुळें त्याची माझी तुटातूट झाली. आज मी पुन्हा त्याच्या दृष्टीस पडल्यामुळें त्याला असा हर्ष झाला आहे."

अशा हिंसक प्राण्याच्या ठायीं एवढी कृतज्ञबुद्धि पाहून प्रेक्षक जनांला मोठा संतोष वाटला, आणि ते सगळे एकदम ओरडून बोलले

कीं, " ह्या दयाळू मनुष्याला व ह्या कृतज्ञ सिंहाला जीवंत सोडून द्यावें." त्यावरून त्या गुलामाला तत्काळ सोडून दिलें. इतकेंच नव्हे, तर प्रेक्षकजनांपैकीं जे सधन व दयाळू होते, त्यांनीं त्याला बक्षिसें दिलीं. तीं घेऊन तो आवारांतून बाहेर आला, तेव्हां तो सिंह त्याच्यामागून कुत्र्यासारखा आला. पुढें तो सिंह सर्व काळ त्याच्याजवळ राहिला. तो जिकडेजिकडे जाई तिकडेतिकडे तो त्याच्याबरोबर असे, कोणास कधीं इजा वगैरे करीत नसे.

## एका गरीब मुलीची कृतज्ञता.

एका शहराच्या कोतवालाची एक मुलगी होती. तिची शेजारच्या एका गरीब मुलीशीं मैत्री झाली. त्या दोघी जणी नेहमीं एकत्र खेळत. त्या गरीब मुलीचा बाप मोलमजुरी करी. एकदां ती गरीब मुलगी फार आजारी झाली. तिला अन्नद्वेष होऊन ती कांहींएक खाईना. कोतवालाची मुलगी दररोज तिच्या समाचारास जाई. तिची ती अवस्था पाहून ती फार कष्टी होई. ती तिच्यासाठीं रसा तयार करून तिला नेऊन देई. तो आपल्या प्रेमळ मैत्रिणीच्या हातचा ह्मणून मोठ्या आवडीनें ती पिई. त्यामुळें तिचा शक्तिपात झाला नाहीं, आणि ती कांहीं दिवसांनीं बरी झाली. मग आपल्या उदार मैत्रिणीचे उपकार कसे फेडावे ह्या विचारांत ती पडली. तेव्हां तिला आठवण झाली कीं, आपल्या दयाळू मैत्रिणीला भुईकमळें फार आवडतात; तर आपण तीं पैदा करून तिला द्यावीं. ते दिवस वसंतऋतूचे असल्याकारणानें तीं फुलें नुकतीं उमलूं लागलीं होतीं. त्यांच्या शोधासाठीं ती रानोमाळ हिंडूं लागली. अशी ती फिरतांफिरतां एका खोल दरींत उतरली, तेथें एका मोठ्या वृक्षाच्या छायेखालीं मोठ्या झुडपांत भुइकमळांचे कित्येक घोस तिच्या नजरेला पडले. ते खुडण्यासाठीं ती गेली असतां,

जवळच्या दाट झाडींत कोणी माणूस बोलत असल्याचा तिला भास झाला. म्हणून ती चपापून कानोसा घेऊं लागली. तेव्हां तिच्या कानीं पुढील शब्द पडले. एक दुसऱ्याला ह्मणतो: "कोतवालानें माझ्या भावाला कैद करून त्याच्यावर गुन्ह्याची शाबिदी केली आणि त्याला तुरुंगांत पाठविलें. त्याचा सूड उगविण्याची संधि आतां आली आहे. ही पहा त्याच्या घराच्या दाराची किल्ली. त्याचा चाकर दार उघडिल्यावर ही काढून ठेवायास विसरला. ह्मणून मला ही उपटतां आली." दुसरा ह्मणाला: "फार चांगलें झालें. आज रात्रीं त्याच्या घरांत शिरून त्याला, त्याच्या बायकोला व त्याच्या मुलीला ठार मारून त्याची सगळी चीजवस्त लुटून आणूं."

हें दोघांचें भाषण ऐकून ती मुलगी अगदीं घाबरून गेली. तिनें तीं फुलें काढून घेऊन तेथून हळूच निसटता पाय घेतला. त्या चोरांला आपली चाऊल लागूं दिली नाहीं. मग ती धावतच आपल्या मैत्रिणीच्या घरीं गेली; आणि तिला तीं फुलें देऊन तिनें त्या चोरांचा तो बेत कळविला. त्या मुलीनें तो आपल्या बापाला कळविला. त्यावरून त्यानें सावध होऊन त्या रात्रीं आपल्या घरांतल्या निरनिराळ्या भागीं हत्यारबंद लोक ठेविले, आणि तो त्या चोरांची वाट पाहत बसला. मध्यरात्र उलटल्यावर त्याचें दार उघडून ते चोर आंत घुसले. त्याबरोबर हत्यारबंद शिपायांनीं त्यांला पकडून कैद केलें.

ह्याप्रमाणें प्राणावरचें संकट टळल्यामुळें त्या कोतवालास मोठा आनंद झाला, आणि तो आपल्या मुलीस म्हणाला: "बाळे, तूं आपल्या त्या गरीब मैत्रिणीवर उपकार केले त्यांचें हें असें उत्तम फळ आपणांस मिळालें. तर इतःपर त्या गरीब व कृतज्ञ मुलीस लागेल

ती मदत करीत जा, आणि तिच्याप्रमाणें ज्या कोणी दुसऱ्या गरीब मुली असतील, त्यांसही आपल्या शक्तीप्रमाणें साहाय्य करीत जा."

## अप्रतिम कृतज्ञता.

इंग्लंडांत स. १८२६ सालीं व्यापारी लोकांत मोठी गडबड उडून जोतो ब्यांकांत ठेविलेल्या रकमा काढून घेऊं लागला. इतर ब्यांकांप्रमाणें एका मोठ्या सावकाराच्या ब्यांकेवरही लोकांच्या मागण्या झाल्या. त्याच्या ब्यांकेंतून रकमा काढण्यासाठीं लोकांची गर्दी झाली असून त्याचे कारकून त्यांला भराभर रकमा मोजून देत होते, तें पाहत तो गृहस्थ किंचित् उदास होऊन जवळच्या खोलींत बसला होता. ह्या सावकाराची पत उत्तम होती. तथापि लोक अगदीं घाबरून गेले असल्याकारणानें आपल्या रकमा आपण केव्हां काढून घेऊं असें त्यांला झालें होतें. त्या सावकाराला सगळयांच्या मागण्या पुरवून आपली ब्यांक चालू ठेवण्याचें सामर्थ्य असल्यामुळें त्याला ह्या गोष्टीचें फारसें कांहीं वाटलें नाहीं. ह्या वेळीं त्याला चमत्कार एवढाच वाटला कीं, ज्यांना तो आपले मोठे स्नेही ह्मणून समजत असे, त्यांच्या मनांतसुद्धां बेभरंवसा उत्पन्न होऊन ते आपल्या रकमा काढावयास आले; इतकेंच नव्हे, तर त्यांनीं इतरांस तसें करण्यास भर दिली. तो सावकार ह्याप्रमाणें मनुष्यस्वभावाचा चमत्कार करीत बसला असतां, त्याच्या खोलीचा दरवाजा उघडून एक मनुष्य आंत आला; आणि त्या खिन्न झालेल्या सावकाराकडे क्षणभर पाहून जवळच्या एका खुरचीवर तो बसला आणि त्याला ह्मणाला: "मीं असा अवचित आंत येऊन तुह्मांला त्रास दिला आहे याची मला क्षमा करा. मी एक साधा माणूस आहें. मी अघळपघळ बोलत बसून आपला अमोल वेळ घेऊं इच्छीत नाहीं. मुद्याची गोष्ट बोलून चालता होतों. आपल्या ब्यांकेवर लोकांच्या मागण्या होऊं लागल्या आहेत

हें खरें काय?" सावकार ह्मणाला: " ह्या प्रश्नाचें उत्तर मी तुह्मांला देण्यास तयार नाहीं. तुमचे कांहीं पैसे माझ्या ब्यांकेंत असतील तर ते लागलींच काढून घेऊन स्वस्थ व्हा. तुमची मागणी होतांच माझे कारकून तुमची रकम परत देतील." असें बोलून त्या मनुष्यानें तेथून निघून जावें असें सुचविण्यासाठीं तो सावकार आपल्या खुरची-वरून उठला. तेव्हां तो गृहस्थ ह्मणाला: " माझा तुमच्या ब्यांकेशीं मुळीं संबंध नाहीं. मी तींत एक छदामही ठेविलेला नाहीं. परंतु तुमच्यावर तूर्त हें संकट आलें आहे, त्यांतून निभावून जाण्यास तुह्मांला थोडीशी तरी मदत व्हावी, ह्यासाठीं मीं माझी लहानशी रकम तुमच्या ब्यांकेंत ठेवायास आणिली आहे." हे शब्द ऐकून तो साव-कार त्याच्याकडे टकमक पाहत उभा राहिला. तो गृहस्थ ह्मणाला: " महाराज, ह्याबद्दल तुह्मांला मोठें आश्चर्य वाटल्यासारखें दिसत आहे. मी कोण आहें, व कोणत्या कारणास्तव माझी रकम तुमच्या स्वाधीन करावयास आलों आहें, हें तुह्मांस ठाऊक नाहीं. यास्तव ह्या गोष्टीचा मी थोडक्यांत खुलासा करितों. वीस वर्षांपूर्वीं तुह्मी एसेक्सशहरीं रहात होतां. तेथें असतां तुह्मी नित्य एका बेड्यावरून जात असां. तेथल्या फाटकावर माझा बाप असे. त्याच्याशीं तुह्मीं नेहमीं दोनचार मिनिटें उभे राहून बोलत असां. नाताळच्या सणांत माझा बाप आजारी झाल्यामुळें मी त्या फाटकावर जाऊन राहिलों. तुह्मी येथें नित्याप्रमाणें आलां तेव्हां तुह्माला मीं फाटक उघडून दिलें, आणि नाताळाचा सण तुमचा आनंदांत जावो, असें ह्मटलें. तेव्हां तुह्मींही तसेंच बोलून माझ्या अंगावर सात शिलिंगांचें एक नाणें टाकिलें. माझ्या हातीं पैसे आले असे पहिले तेच. त्या वेळीं मला जो आनंद झाला, आणि ते पैसे देतांना तुह्मीं जें हास्यवदन केलें,

त्याचा मला कदापि विसर पडणार नाहीं. तुह्मीं दिलेले पैसे मीं संभाळून ठेविले, आणि मी मोठा होत गेलों तसा त्यांत आणखी थोडी-थोडी भर घालीत गेलों. पुढें कांहीं वर्षांनीं मला जकातीचा मक्ता घेण्याचें सामर्थ्य आलें. ह्याप्रमाणें मला एकसारखी बरकत येत जाऊन हल्लीं मजकडे बराच पैसा झाला आहे. तुमच्या ब्यांकेवर मागण्या होऊं लागल्या आहेत, असें आज सकाळीं मला अवचित कळलें. तेव्हां मी माझे सगळे पैसे एकवट करून आणिले आहेत. ते तुमच्या ब्यांकेंत ठेवून तुह्मांला ह्या संकटांत थोडीतरी मदत करावी अशी माझी इच्छा आहे." असें बोलून त्या कृतज्ञ पुरुषानें त्या सावकाराच्या हातीं नोटांचें एक पुडकें दिलें, व आपल्या नांवाचें कार्ड त्याच्यापुढें ठेवून तो तेथून लागलींच उठून गेला. तो गेल्यावर त्या सावकारानें तें पुडकें उघडून पाहिलें तों त्यांत तीस हजार पौंडांच्या नोटी आहेत असें त्यास आढळून आलें. खरें ह्मटलें असतां त्याला ह्या मदतीची मुळीं गरज नव्हती. पण ती देणाराचा उद्देश अत्यंत प्रशंसनीय होता. आपल्या संकटाच्या वेळीं, ज्याचा आपला कधींही व्यवहार झाला नव्हता, अशा एका अपरिचित गृहस्थानें हें असें औदार्य दर्शविलें, हें पाहून त्या सावकाराला गहिंवर येऊन त्याचे डोळे आसवांनीं भरले. ही त्याची ब्यांक लंडनशहरांत अद्यापि कायम असून चांगल्या स्थितींत आहे, आणि त्या कृतज्ञ व थोर मनाच्या पुरुषाची ती रकम त्या ब्यांकेंत अद्यापि राहिली असून ती प्रतिवर्षीं व्याजानें वाढत चालली आहे.

## एक कृतज्ञ यहुदी.

लंडनांतला एक सरदार आपली वतनवाडी पाहावयासाठीं गाडींत बसून चालला असतां, वाटेंत एका रानांत त्याला सहा चोरांनीं गांठिलें. त्यांतल्या दोघांनीं गाडीवानास धरून ठेविलें, दुसऱ्या दोघांनीं

त्याच्याबरोबरच्या चाकरास धरून ठेविलें, आणि बाकीच्या दोघांनीं गाडीच्या दोन बाजूंस उभें राहून आपलीं पिस्तुलें त्याच्यावर रोंखून ह्मटलें: "सरदारसाहेब, आपल्या खिशांतलें नोटांचें पुडकें काढा." हा असा जीवावरचा प्रसंग पाहून सरदारानें आपल्या खिशांतली पैशांची पिशवी काढून एका चोराच्या हातीं दिली. तेवढ्यानें त्या चोरांचें समाधान न होऊन ते नोटांचें पुडकें मागूं लागले. तेव्हां अर्थात् नाइलाजास्तव त्याला आपल्या खिशांतलें नोटांचें पुडकें काढून द्यावें लागलें. तें हातीं आल्यावर चोरांनीं त्यांतल्या अडीच हजार पौंडांच्या नोटा काढून घेऊन बाकीच्या त्याला परत दिल्या.

पुढें कित्येक वर्षांनीं ह्या सरदाराला पुढील मजकुराचें पत्र आलें: "सरदारसाहेब, मी एक गरीब यहुदी आहें. ज्या देशांत माझी मूळची वस्ती होती, तेथल्या राजानें आमची सगळी मालमिळकत हिरावून घेतल्यावरून मी व आणखी दुसरे पांच यहुदी असे जीव बचाविण्यासाठीं इंग्लंडांत पळून गेलों. आह्मी ज्या जहाजांत बसलों होतों, तें वादळांत सांपडून एका किनाऱ्यावर आपटून फुटलें. त्या वेळीं मी बुडून मरणार होतों. पण एका शूर इंग्रज गृहस्थानें मला वांचविलें. असें करण्यांत त्यानें आपला जीव धोक्यांत घातला होता. मला त्यानें किनाऱ्यावर सुखरूप आणून आपल्या घरीं नेलें आणि वैद्याला बोलावून मला औषधोपचार केले. त्याच्या कृपेनें मी बरा झाल्यावर त्याला मी कांहीं मोबदल्यादाखल देऊं लागलों, पण तो तें घेईना.

"हा माझा प्राणदाता सज्जन गृहस्थ लोकरीचा व्यापारी होता. त्याला बारा मुलें होतीं. पुढें थोड्या दिवसांनीं त्याच्या व्यापारांत खोट येऊन देणेदारांनीं त्याला तगादे लाविले. त्यांचें देणें फेडण्याचें सामर्थ्य त्याला मुळीं नव्हतें. हें त्याचें संकट पाहून मला अतिशयित वाईट वाटलें. पण

त्याला मदत करण्याचें सामर्थ्य मला मुळीं नव्हतें. ह्मणून कोणत्या तरी मार्गानें पैसे मिळवून त्या माझ्या उपकारकर्त्याला संकटांतून सोडवावें असा मीं निश्चय केला. मग माझ्याबरोबर आलेल्या दुसऱ्या पांच यहुद्यांस मदतीला घेऊन, ज्या रानांतून तुह्मी जाणार होतां, तेथली वाट धरून आह्मी राहिलों आणि तुह्मांला लुटिलें. माझ्या उपकारकर्त्याला जेवढ्या रकमेची गरज होती, तेवढीच तुमच्याकडून लुबाडून ती मीं त्याजकडे पाठविली. ह्या मदतीच्या योगानें त्याचा बराच बचाव झाला. पण तो नंतर आठ दिवसांनीं मरण पावला. त्यामुळें त्याला सगळ्या देणे-दारांचा निकाल करितां आला नाहीं. हल्लीं मला चार हजार पौंड सोडतींत मिळाले आहेत. तेव्हां तुमचे लुटलेले सगळे पैसे मी सव्याज परत करीत आहें. त्यांचा तुह्मीं स्वीकार करावा, आणि बाकीचे एक हजार पौंड पाठविले आहेत ते त्या माझ्या प्राणदात्या व्यापाऱ्याच्या कुटुंबाला पावते करा. त्यांचा पत्ता ह्या पत्राच्या शेवटीं दिला आहे. मीं जी ही गोष्ट तुह्मांस कळविली आहे, ती त्याच्या कुटुंबांतल्या माण-सांस विचारून खातरी करून घ्या. मला आणखी एवढेंच सांगावयाचें कीं, तुमच्यावर आह्मीं हल्ला केला त्या वेळीं आमच्या एकाही पिस्तु-लांत बार भरला नव्हता, व आमच्या कंबरांस कट्यारी होत्या खऱ्या, पण त्या उपसून तुमच्यावर चालविण्याचा आमचा मुळीं इरादा नव्हता."

त्या सरदारानें त्या व्यापाऱ्याच्या कुटुंबाचा पत्ता काढून त्या यहु-द्याच्या पत्रांतल्या गोष्टीचा तपास केला, तेव्हां ती अक्षरशः खरी आहे अशी त्याची खातरी झाली. मग त्या सरदारानें त्या परोपकारी व्यापा-ऱ्याच्या कुटुंबाचा चांगला परामर्ष घेतला. पण त्या यहुद्याचा त्याला कधींच पत्ता लागला नाहीं.

# भाग बारावा.

## एकमेकांस साहाय्य.

### दोन बोकड.

एका उंच डोंगराच्या सुळक्याच्या अरुंद कड्यावर दोन बोकड समोरासमोरून आले. तो कडा फारच सांकडा असल्याकारणानें त्यांला परस्परांजवळून जातां येण्यासारखें नव्हतें, व मागें वळूनही परत जातां येणें शक्य नव्हतें. त्या कड्याचा वरला भाग सुळासारखा उभा असल्यामुळें त्यांला वरही चढून जाण्याची सोय नव्हती, आणि खालीं फार खोल दरी असल्या कारणानें खालीं उडी टाकितां येण्याजोगी नव्हती. तेथें ते परस्परांकडे पाहत क्षणभर उभे राहिले, आणि मग त्यांतल्या एकानें फार संभाळून हळूच पाय दुडून आपलें अंग खालीं टेकिलें; तें पाहून दुसरा बोकड त्याच्या अंगावर जपून पाय ठेवून पलीकडे गेला. तो असा सुखरूप पार गेल्यावर तो बसलेला बोकड जपून उठला आणि आपल्या वाटेनें गेला. ह्याप्रमाणें एकमेकांची सोय पाहून ते दोघेही त्या संकटांतून पार पडले.

### पाकोळ्यांचें परस्पर साहाय्य.

पाकोळ्यांच्या एका जोडप्यानें एका घराच्या वळचणीस आपलें घरटें करून त्यांत पांच पिलें घातलीं होतीं. हें घरटें बहुतेक मातीचें केलें होतें. एकदां बरेच दिवस एकसारखा पाऊस लागून त्याची माती भिजून तें अगदीं नरम झालें आणि खालीं पडलें. तें एका

खिडकीच्या कोपऱ्यावर पडलें, आणि त्यांतलीं पिलें उघडीं होऊन त्यांच्यावर पावसाचा मारा होऊं लागला. हें घरधन्याच्या दृष्टीस पडलें तेव्हां त्याला त्या पोरांची कींव येऊन त्यांला त्यानें तेथेंच झांकून ठेविलें. पाऊस ओसरतांच पाकोळ्यांचा एक मोठा थवा येऊन त्या खिडकीपाशीं घिरट्या घालूं लागला. हा प्रकार पाहून त्या गृहस्थानें त्या पिलांवरचें झांकण काढिलें. तेव्हां तीं पिलें जीवंत व सुखरूप आहेत हें पाहून त्या सगळ्या पाकोळ्यांस मोठा आनंद झाला. मग त्यांच्या तोंडांत थोडासा चारा घालून त्या पाकोळ्या नवें घरटें करावयाच्या कामास लागल्या. त्या पुष्कळ असल्यामुळें तें करावयाला त्यांला फारसा वेळ लागला नाहीं. हें घरटें त्यांनीं तीं पिलें जेथें पडलीं होतीं त्याच जागीं केलें; आणि पिलांना जागच्याजागीं राहूं देऊन त्यांचें वाऱ्यापावसापासून चांगलें रक्षण होईसें त्यांनीं केलें. हें नवें घरटें तयार करण्याचें काम त्या पिलांच्या आईबापांना दोघांनाच करावें लागलें असतें तर तें तयार करावयास त्यांला बरेच दिवस लागते; आणि तीं उघड्यावर पडलेलीं पिलें थंडीवाऱ्याच्या माऱ्यांत जीवंत राहिलीं नसतीं.

## एकमेकांला मदत करा.

रोमनगरींत मागल्या काळीं मोठमोठ्या स्नानाच्या जागा बांधिल्या होत्या. तेथें लोक येऊन स्नान करीत. अशा एका स्नानाच्या जागे-जवळून आगस्टस बादशाहा चालला असतां, एक वृद्ध शिपाई स्नान करितांना त्याच्या नजरेस पडला. तो एका खांबाशीं आपली पाठ घाशीत होता. तें पाहून बादशाहानें त्याला पुसलें: “ तूं अशी पाठ घाशीत आंहेस, तर ती घासायाला एकादा नोकर कां ठेवीत नाहींस?” तो शिपाई ह्मणाला: “ खावंद, मी फार गरीब आहें. नोकर ठेवण्याचें

मला सामर्थ्य नाहीं." आपल्या लष्करांत पुष्कळ वर्षे राहून मोठमोठ्या लढाया मारिलेल्या त्या वृद्ध शिपायाची अशी गरीबी पाहून बादशाहाला फार वाईट वाटलें, आणि तत्काळ त्याला चांगली नेमणूक करून देऊन त्याची आपदा त्यानें दूर केली.

ह्या गोष्टीचा चोहोंकडे पुकारा झाला, आणि पुष्कळ लोक स्नानाच्या जागीं जाऊन त्या शिपायाप्रमाणें स्नान करितांना खांबांशीं अंग घासूं लागले. बादशाहा पुनः एके दिवशीं त्या स्नानाच्या जागा पाहावयास गेला असतां, पुष्कळ लोक खांबांशीं अंग घासतांना त्याला दिसले. तेव्हां तो त्यांला ह्मणाला: "तुह्मी असे खांबांशीं आपलीं अंगें कां घाशितां?" ह्या प्रश्नाचें उत्तर त्यांनीं त्या शिपायासारखें दिलें. त्यावर बादशाहा त्यांला ह्मणाला: "तुह्मी इतके जण एके ठिकाणीं जमून स्नान करीत आहां, तरी तुह्मी परस्परांचीं अंगें घासाल तर तुमचें सगळ्यांचें काम चांगलें होईल. दुसऱ्या कोणाच्या मदतीची आशा न करितां तुम्ही एकमेकांस मदत कराल तर चांगलें."

## आंधळा आणि पांगळा.

एक पांगळा माणूस अतिकंगाल होता. त्याला मोठ्या प्रयासानें लंगडत दारोदार हिंडून भीक मागावी लागे. असा तो एके दिवशीं फिरतांफिरतां अगदीं थकला आणि रस्त्याच्या बाजूस विश्रांति घेण्यासाठीं पडून राहिला. तो तहानेनें आणि भुकेनें व्याकुळ झाल्यामुळें त्याला विशेष थकवा आला होता. इतक्यांत तिकडून एक आंधळा माणूस काठी टेकीतटेकीत आला. तो वाट चुकून कोठल्या कोठें भटकत चालला होता; व तोही कफल्लक असून भीक मागत फिरत होता. त्याला पाहून तो लंगडा माणूस ह्मणाला: "आंधळे दादा तुह्मी असे चाचपडत कोणीकडे चाललां आहां?" त्यानें

उत्तर केलें: " मी आज सगळा दिवस घराबाहेर पडलों आहें. आतां बिऱ्हाडीं जावें ह्मणून मी नेहमींच्या वाटेनें चाललों असतां भलत्याच वाटेला लागलों असें मला वाटत आहे. माझें बिऱ्हाड कसें सांपडतें याची चिंता मला लागली आहे." लंगडा ह्मणाला: " आंधळे दादा, तुमच्याप्रमाणें मीही गरीब असून सारा दिवस दारोदार हिंडून अगदीं थकलों आहें. मी लंगडा आहें. मला आतां घरीं जाण्याचें त्राण उरलें नाहीं. ह्मणून मी येथें पडलों आहें. तुमचें बिऱ्हाड कोठें आहे तें मला सांगाल तर मी तुह्मांला तेथें घेऊन जाईन. पण मला एक पाऊल टाकायाचेंही सामर्थ्य नाहीं; आणि तुह्मी तर चांगले बळकट व जोमदार आहां. यासाठीं मला आपल्या खांद्यावर घेऊन चालाल तर तुमच्या बिऱ्हाडाची वाट मी तुह्मांला दाखवीन." ह्या त्याच्या ह्मणण्यास तो आंधळा कबूल झाला, आणि आपल्या बिऱ्हाडाचा पत्ता सांगून त्याला त्यानें आपल्या खांद्यावर घेतलें. ह्याप्रमाणें आंधळ्याचे पाय पांगळ्याच्या उपयोगीं पडून व पांगळ्याचे डोळे आंधळ्याच्या उपयोगीं पडून दोघेही आपापल्या बिऱ्हाडीं जाऊन पोंचले.

## मुंग्यांची परस्परांस मदत.

एके दिवशीं एका गृहस्थानें बऱ्याचशा मुंग्यांची रांग आपल्या बारीवर पाहिली. बारीच्या चौकटीच्या खालच्या भागावर थोडीशी साखर पडली होती, ती त्या घेऊन जात होत्या. कांहीं वेळानें तेथली बहुतेक सगळी साखर संपल्यावर त्यानें तेथें आणखी साखर विखरिली. ह्याप्रमाणें त्या मुंग्यांस पुष्कळ साखर न्यावयास मिळाली. नंतर त्यानें थोडी साखर एका बाटलींत भरून ती खिडकीच्या वरल्या भागीं टांगून ठेविली आणि तींत थोड्याशा मुंग्या धरून सोडिल्या. बाटलींत घातलेल्या ह्या मुंग्या तेथल्या साखरेचे कण तोंडांत धरून बाटलीच्या

बाहेर आल्या आणि तिच्या दोरीवरून खिडकीच्या चौकटीवर जाऊन तीवरून खालीं आल्या. त्यांनीं आपल्या दुसऱ्या मैत्रीणींला अन्न मिळ-ण्याच्या ह्या नव्या ठिकाणाची बातमी देऊन तिकडे नेलें; आणि मग त्या बाटलीपर्यंत त्यांची सारखी रांग लागली. पण कांहीं वेळानें त्यांची बाटलींत जाणारी रांग बंद झाली, आणि सगळ्या मुंग्या पुनः बारीच्या खालच्या बाजूवर जमा झाल्या. हा काय प्रकार आहे हें पाहतां, त्या गृहस्थाच्या लक्षांत असें आलें कीं, थोड्याशा मुंग्या बाटलींत राहून तींतली साखर घेऊन बाटलीबाहेर टाकीत आहेत; आणि ती नेमकी खिडकीच्या खालच्या चौकटीवर पडत असून ती बाकीच्या सगळ्या मुंग्या उचलून आपल्या वारुळांत नेत आहेत. ह्याप्रमाणें बाटलींत थोड्याशा मुंग्या राहून खालीं असलेल्या आपल्या सगळ्या मैत्रिणींस साहाय्य करीत आहेत, आणि खिडकीवर चढून बाटलींत उतरण्याची त्यांची मेहनत वांचवीत आहेत, हें पाहून त्याला मोठें नवल वाटलें. असले सूक्ष्म कीटकही जर परस्परांस साहाय्य करण्यास असे तयार असतात, तर आह्मी मानव जे आपणांस सर्व प्राण्यांहून श्रेष्ठ समजतों, त्यांनीं परस्परांच्या हितासाठीं किती झटलें पाहिजे बरें!

## चित्रकलेचा अभ्यास.

इंग्लंडांत क्यान्टरबरी नांवाचें एक शहर आहे. तेथें एक अति-प्राचीन देवालय आहे. त्याची रचना अतिसुंदर असल्याकारणानें मोठमोठे चित्रकार त्याचीं चित्रें काढावयास मुद्दाम तेथें जात असत. ह्या शहरांत एक गरीब गृहस्थ रहात असे. तो रात्रंदिवस खपून आपल्या कुटुंबाचा कसाबसा निर्वाह चालवी. पुढें त्याला बिकट दुखणें लागून तो मरण पावला, आणि त्याचीं लहान-लहान पांच मुलें व बायको हीं निराधार झालीं. सगळ्यांत वडील

मुलगा होता, तो एका वैद्याकडे नोकरीस राहिला. ह्या मुलाबरोबर त्याचा धाकटा भाऊ केव्हांकेव्हां त्या वैद्याच्या घरीं जाई. एके दिवशीं त्या वैद्यानें असें पाहिलें कीं, ह्या लहान मुलास स्लेटीवर पेन्सिलीनें चित्रें काढण्याचा नाद आहे; आणि तीं तो फार चांगलीं काढितो. ह्यामुळें त्याची त्याजवर ममता जडली, आणि तो त्याला जवळ घेऊन चित्रें कशीं रंगवावीं तें शिकवूं लागला. पुढें हा धाकटा मुलगा अमळ जाणता झाला तेव्हां त्याच्या आईनें त्याला एका गाड्या तयार करणाऱ्याकडे नोकरीस ठेविलें. तें काम करून त्या मुलास फुरसद सांपडली ह्मणजे तो वर सांगितलेल्या देवालयापाशीं उभा राहून त्याचें चित्र स्लेटीवर काढी. एके दिवशीं एक मोठा प्रसिद्ध कारागीर त्या वाटेनें जात असतां, तो मुलगा तेथें उभा राहून स्लेटीवर काय काढीत आहे तें पाहण्यासाठीं त्याच्याजवळ गेला, आणि त्यानें स्लेटीवर त्या देवळाचें चित्र काढिलेलें पाहून तो थक्क झाला. असा लहान वयाचा मुलगा चित्रकलेंत एवढा प्रवीण आहे हें पाहून त्याला मोठें नवल वाटलें. मग त्यानें त्याची विचारपूस केली, त्यावरून तो अगदीं गरीब आहे असें त्याला आढळून आलें, आणि त्यानें त्या मुलास लागतील तेवढे कागद व पेन्सिला पुरविण्याचें कबूल केलें. ह्याप्रमाणें कागदपेन्सिला मिळण्याची सोय झाली तेव्हां तो त्या देवालयाचीं चित्रें कागदांवर काढून एका दुकानदारास विकी. त्यांचे त्याला कांहीं पैसे मिळत. ते तो आपल्या आईजवळ आणून देई. असें सांगतात कीं, त्याच्या सगळ्या पेन्सिला एकदां झरून जाऊन त्याचें चित्रें रेखाटण्याचें काम अडून राहिलें. इतक्यांत त्या वाटेनें एक मोठा विद्वान् अध्यापक जात होता, त्याला हाक मारून आपल्या पेन्सिला करावयास खिशांत चाकू असल्यास अमळ देतां काय, असें त्यानें त्याला विचारलें. तो गृहस्थ दयाळू

स्वभावाचा होता. तो त्या मुलाजवळ येऊन तो कसलें चित्र काढीत आहे तें पाहूं लागला. तें पाहून तो चकित झाला, आणि अशा अल्पवयी मुलाची चित्रकलेंत एवढी गति झाली आहे हें पाहून त्याला मोठें कौतुक वाटलें. मग त्यानें त्याच्या सगळया पेन्सिला तासून दिल्या. पुढें दररोज तो अध्यापक त्या वाटेनें जाई तेव्हां त्याच्या पेन्सिला तासून देऊन पुढें जाई.

ह्या अशा अडचणींत व विपत्तींत असतांही त्या मुलानें आपला चित्रकलेचा अभ्यास एकसारखा चालू ठेवून तो पुढें मोठा नामांकित कारागीर झाला; आणि त्या कलेंत पुष्कळ द्रव्य मिळून तो चांगला गबर झाला. त्याच्यापाशीं बरेंच द्रव्य जमलें तेव्हां त्यानें आपल्या जन्मभूमीच्या ठिकाणीं एक मोठी चित्रशाळा स्वतांच्या पैशानें बांधून तेथें चित्रकला शिकविण्याच्या सगळया सोई यथास्थित करून ठेविल्या. त्यामुळें त्या प्रांतांतल्या तरुण विद्यार्थ्यांस ह्या कलेचा अभ्यास करण्याची उत्तम सोय झाली. ह्या कारागिराचें नांव सिडनेकूर असें होतें. तो नव्याण्णव वर्षांचा होऊन स. १९०२ सालीं वारला.

## लांकूडतोडे आणि पक्षी.

दोन लांकूडतोडे दररोज रानांत बरोबर जात आणि सगळा दिवस खपून आपला व आपल्या कुटुंबाचा जेमतेम निर्वाह चालवीत. त्या दोघांला बरींच मुलें होतीं. त्यांचें कसें चालेल ही चिंता दोघांला नेहमीं असे. पण त्यांतला एक जण होता, तो आनंदी व उल्हासी स्वभावाचा होता. तो आपल्या स्थितीसंबंधानें फारसा कष्टी होत नसे. पण दुसरा होता, तो सर्व काळ खिन्न व उदास असे; आणि पुढें आपलें व आपल्या कुटुंबाचें काय होईल ही चिंता त्याला नेहमीं लागून राहिली असे. तो आपल्या ह्या मित्रास वारंवार ह्मणे कीं, " गरिबी किती तरी

कष्टदायक आहे हो! मी आजारी झालों तर माझ्या बायकोमुलांची काय अवस्था होईल बरें!"

एके दिवशीं ते रानांतून चालले असतां, त्यांनीं एका झाडावर पक्ष्यांचीं दोन घरटीं पाहिलीं. त्यांत माद्या आपल्या अंड्यांवर बसल्या होत्या. तेव्हांपासून ते तीं घरटीं दररोज जाऊन पाहूं लागले. पुढें अंडीं उबून पिलें बाहेर पडलीं आणि घरट्यांत चिंवचिंव करूं लागलीं; आणि त्यांच्या आया चारा आणून त्यांस भरवूं लागल्या. एके दिवशीं तो उदास लांकूडतोड्या एकटाच रानांत चालला असतां, नेहमीं-प्रमाणें त्या घरट्यांकडे पाहूं लागला, तों एक पक्षीण तोंडांत चारा धरून आपल्या घरट्याकडे येत आहे असें त्याच्या नजरेस पडलें. पण ती घरट्याजवळ येऊन पोंचण्यापूर्वींच एका ससाण्यानें तिजवर झडप घालून तिला आपल्या गवींत धरून नेलें. हें पाहून तो लांकूड-तोड्या मनांत ह्मणाला: "बिचारे पक्षिणी! तुझ्या पिलांची आतां काय गत होईल बरें! तीं खास भुकेनें मरतील. मला असाच अकस्मात् मृत्यु आला असतां, माझ्या लेंकरांचीही अशीच दशा होईल!" हा विचार त्याच्या मनांत त्या दिवशीं सगळा वेळ घोळत होता; आणि त्यामुळें तो अधिकच खिन्न व उदास झाला. त्या दिवशीं सायंकाळीं तो निराळ्या वाटेनें आपल्या घरीं गेला. कारण त्या पक्षिणीच्या पिलांचा आक्रोश कानीं पडल्यानें आपला खेद दुणावेल असें त्याला वाटलें.

दुसरे दिवशीं तो नित्याप्रमाणें रानांत चालला असतां त्या पिलांची काय दशा झाली आहे तें पाहण्यासाठीं त्यांच्या घरट्यापाशीं गेला. तीं भुकेनें व्याकुळ होऊन गतप्राण झालीं असावीं असें त्यास त्या वेळीं वाटलें होतें. पण शेजारच्या घरट्यांतली मादी तोंडांतून चारा आणून त्या पोरक्या झालेल्या पिलांस मोठ्या ममतेनें चारीत आहे, हें पाहून

त्याला मोठा अचंबा वाटला. इतक्यांत त्याचा तो उल्हासी सोबती तेथें आला. त्याला त्यानें झालेली सगळी हकीकत सांगितली आणि ह्मटलें: "हा प्रकार मोठा हृदयंगम नाहीं काय? ह्या बिचाऱ्या पोरक्या पिलांस जर अशी विलक्षण रीतीनें मदत होत आहे, तर आह्मीं तरी आपल्या लेंकरां-विषयीं कां चिंता वाहावी?" त्याचा मित्र ह्मणाला: "आपल्या मुलां-विषयीं तूं इतःपर मुळीं चिंता करूं नको. तूं कधीं आजारी झालास तर ह्या पक्षिणीप्रमाणें तुझ्या बायकोमुलांचा संभाळ मी करीन; आणि मी आजारी पडलों तर तूं माझ्या कुटुंबाचें चालविशील, ही मला पक्की खातरी आहे. आतां आह्मां दोघांचाही अंत झाला तर देवाला आमच्या कुटुंबाची काळजी आहेच. तो त्यांचा प्रतिपाळ कोणत्यातरी रीतीनें करील."



# भाग तेरावा.

## गर्व.

### एक अभिमानी सरदार.

स्कॉटलंडांतला मॅकडॉनल्ड नांवाचा एक बडा सरदार एकदांआयर्लंडांत गेला असतां, तेथल्या व्हाइसरॉयानें (सुभेदारानें) त्याला मेजवानीस बोलाविलें. हा सरदार इतर सगळ्या पाहुण्यांच्या मागून मेजवानीच्या जागीं आला. तेव्हां मेजाच्या सगळ्या जागा अगोदरच अडून गेल्यामुळें त्याला अगदीं शेवटाला बसावें लागलें. सुभेदारानें पाहिलें तों तो बडा सरदार अग्रभागीं नाहीं. त्यावरून, "आपण अग्रभागीं येऊन बसावें, कारण आपला ह्या मंडळींत पहिला मान आहे," अशी विनंति त्यानें एका नोकराकरवीं त्याला केली. तेव्हां तो अभिमानी सरदार ह्मणाला: "मॅकडॉनल्ड जेथें बसला आहे, तोच मेजवानीचा अग्रभाग समजावा, असें सुभेदाराला जाऊन सांगा."

### नम्रता आणि ताठा.

एक मोठा गर्विष्ठ सरदार आपल्या शेतवाडींतून आपला कुणबी बरोबर घेऊन फिरत होता. हा कुणबी वयातीत असून अतिकष्ट केल्यामुळें वांकला होता. त्याची अमळ थट्टा करावी ह्मणून तो सरदार त्याला ह्मणाला: "अरे, तूं असा पोंग काढून व मान खालीं करून कां चालतोस? माझ्यासारखा ताठ मान धरून कां चालत नाहींस?"

प्रश्न त्यानें त्याला केला त्या वेळीं ते एका पिकलेल्या शेताजवळून ालले होते. तेव्हां त्या शेतांतल्या कणसांकडे बोट दाखवून ो कुणबी त्या गर्विष्ठ सरदाराला ह्मणाला: "धनीसाहेब, तीं पिकलेलीं णसें पाहा कशीं दाण्यांच्या भारानें अगदीं लवलीं आहेत. तींच ुसरीं कणसें पाहा. त्यांत दाणे नसल्याकारणानें तीं कशीं ताठ ुभीं आहेत तीं." हें मार्मिकपणाचें उत्तर ऐकून तो खुशालचंद ारदार भारी ओशाळला.

## डॉ. फ्रान्कलीन.

हा एक मोठा विख्यात पुरुष अमेरिकेंत होऊन गेला. हा लहान असतां एका धर्माधिकाऱ्यास भेटायास गेला. हा धर्माधिकारी मोठा सज्जन व शहाणा होता. तो तरुण जनांस योग्य उपदेश करण्यास सर्वदा तत्पर असे. फ्रान्कलीन त्याचा निरोप घेऊन जाऊं लागला तेव्हां तो धर्माधिकारी त्याला ह्मणाला: "तुला मी जवळची वाट दाखवितों." असें ह्मणून तो त्याला एका अरुंद व अंधाराच्या जागेंतून घेऊन जाऊं लागला. जातांजातां वाटेंत वर एक आडवें बहाल लागलें. तेव्हां तो धर्माधिकारी त्याला ह्मणाला: "मुला, जरा थांब." ह्या त्याच्या सांगण्याचा अर्थ फ्रान्कलीन याच्या लक्षांत न येऊन तो न थांबतां पुढें चालला. त्याबरोबर त्याचें डोकें बहालास आपटून बरेंच दुखावलें. ह्मणून तें चोळीत तो उभा राहिला. हा त्याचा अल्लडपणा पाहून तो धर्माधिकारी ह्मणाला: "बाळा, ह्या प्रपंचांत सर्वदा नमून चाललें पाहिजे. तूं ताठ्यानें चालशील तर तुला असेच धक्के खावे लागतील."

## आपढंगी मुलगा.

कांहीं मुलें रानाजवळील उघड्या बखळींत खिदळत होतीं. थोड्या वेळानें त्यांतल्या एकास मनस्वी तहान लागली, आणि तो जवळपा

पाणी शोधूं लागला, तों त्याला एका झाडाच्या मुळाशीं वाहत असलेला एक झरा दिसला. त्याबरोबर तो त्याचें पाणी पिण्यासाठीं धावला. त्याचा भाऊ जवळ होता. तो त्याला ह्मणाला: "दादा, उनांत खिदळून अंग तप्त झालें असतां थंड पाणी पिऊं नये, असें बाबानें आपणांस सांगितलें आहे, तें तुला आठवत नाहीं काय?" तो अल्लड मुलगा ह्मणाला: "अरे जारे, असल्या भ्याडपणाच्या गोष्टी तूं मला सांगूं नको. पराकाष्ठेची तहान लागली असतां ह्मणे पाणी पिऊं नये! तुझें हें शहाणपण ठेव गुंडाळून." असें ह्मणून तो त्या झऱ्यावर जाऊन त्याचें पाणी यथेच्छ प्याला. त्याबरोबर त्याच्या देहावर त्या अतिथंड पाण्याचा परिणाम लागलींच झाला. त्यामुळें तो तेथें मूर्च्छा येऊन पडला. अमळशानें तो शुद्धीवर येऊन घरीं गेला. तेथें त्याला सडकून ताप भरला. त्यानें तो बरेच दिवस बेजार होऊन पडला. ह्याप्रमाणें त्या आपढंगी मुलाची चांगली खोड मोडली.

## गोसावी आणि राजपुत्र.

एक राजपुत्र आपल्या पदवीचा व श्रीमंतीचा अतिशयित गर्व वाहत असे. शिवाय तो दिसायाला चांगला असल्यामुळें त्याला आपल्या रूपाचाही मोठा अभिमान होता. तो एके समयीं शिकारीस जाऊन रानांत फिरतांफिरतां एका गोसाव्याच्या पर्णकुटीपाशीं आला. तो गोसावी मोठा ईश्वरपरायण व ज्ञानसंपन्न असल्याविषयीं ख्याति होती. तो आपल्या पर्णकुटीच्या बाहेरल्या बाजूस स्वस्थ बसून एका नरवटीकडे गंभीर मुद्रेनें पाहत होता. त्याला असा विचारांत गढलेला पाहून राजपुत्र त्याला मोठ्या दिमाखानें हटकून ह्मणाला: ' अरे गोसाव्या, ह्या नरवटीकडे तूं इतकें बारकाईनें काय पाहत आहेस?" गोसाव्यानें चटदिशीं उत्तर केलें: " ही नरवटी कोणा राजाची आहे

कीं कोणा रंकाची आहे तें निरखून पाहत आहें. पण मला हीवरून कांहींच पारख होत नाहीं. यास्तव मला असें वाटूं लागलें आहे कीं, जीवंतपणीं कोणी केवढाही मोठा असला तरी तो मेल्यावर सगळ्यांची गति तीच त्याची गति."

## आरशांत पाहणारीं भावंडें.

एका बाईचीं दोन मुलें एकदां सहज एकत्र उभीं राहून मोठ्या आरशांत आपलीं रूपें पाहूं लागलीं. त्यांतला मुलगा होता तो चांगला देखणा होता; आणि मुलीचें तोंड देवी येऊन गेल्या असल्यामुळें अमळ कुरूप दिसत होतें. आपण आपल्या बहिणीपेक्षां सुरूप आहों असा गर्व त्या मुलास वाटून तो तिला हिणवूं लागला. तेव्हां ती मुळमुळ रडूं लागली. इतक्यांत त्यांची आई तेथें आली. तिनें आपल्या मुलीस उगी करून ह्मटलें कीं, " नुसतें तोंड सुंदर असल्यानें कोणाला कोणी चांगलें ह्मणत नाहीं. तर ज्याच्या अंगीं चांगले गुण असतात, त्यालाच लोक चाहतात. ह्यासाठीं तूं आपल्या अंगीं चांगले गुण वाढवून आपणाला जनांकडून बरें ह्मणून घे." मग ती त्या वृथा गर्व वाहणाऱ्या मुलास ह्मणाली: "बाळा, नुसत्या रूपावरून तूं आपणास श्रेष्ठ समजूं नको. हें रूप कांहीं तुला तुझ्या श्रमानें मिळालेलें नव्हे. हें तुला स्वभावतः आलें आहे. एवढ्यानें लोकांत तुझी चहा होईल असें नाहीं. तर तूं आपल्या स्वतांच्या पराक्रमानें चांगल्या विद्येची व सद्गुणांची जोड केलीस, तरच तुला लोक मानितील. नुसतें रूप चांगलें असून जर तूं निरक्षर व दुराचारी निपजलास, तर तुला ते तुच्छ लेखितील."

## माझें तोंड हेंच माझें तिकीट.

एक गृहस्थ मोठा दिमाखखोर होता. त्याला वाटे कीं, आपण मोठ्या योग्यतेचा माणूस आहें. तो लंडनशहराबाहेर रहात असून त्याला उद्योगा-

साठीं नेहमीं आगगाडीनें शहरांत यावें लागे. ह्मणून त्याला आगगाडीचा तीनतीन महिन्यांचा पास काढावा लागे. तो असा नेहमीं आगगाडींतून प्रवास करीत असल्याकारणानें त्याला असें वाटे कीं, आपणाला रेलवेचे सगळे नोकर ओळखितात. एके दिवशीं स्टेशनांत गाडी थांबली असतां, एक जण तिकिटें तपासायाला आला. त्यानें ह्या दिमाखदार गृहस्थाला तिकीट दाखवायाला सांगितलें. तेव्हां तो मोठ्या डौलानें ह्मणाला: "माझें तोंड हेंच माझें तिकीट आहे." हा तपासणी करणारा नवा मनुष्य होता. ह्मणून तो त्याला ओळखीत नव्हता. त्याचें हें उद्दामपणाचें उत्तर ऐकून तो संतापला, आणि अस्तनी मागें सारून व ठोसा उगारून त्याला ह्मणाला: "सगळ्या उतारूंचीं तिकिटें कापावीं असा मला हुकूम आहे, तर तुमचें हें तिकीट नीट वर करा!" हा प्रकार पाहून तो अहंमन्य गृहस्थ किती ओशाळला असावा बरें!

## शेतकऱ्याची टीका.

फ्रान्सांतील एका विख्यात चिताऱ्यानें घोड्याचें उत्कृष्ट चित्र काढिलें आणि तें लोकांनीं पाहावें ह्मणून उघड्या जागेंत लावून ठेविलें. हें चित्र दौडत असलेल्या घोड्याचें असून त्याच्या तोंडाशीं फेस आलेला दाखविला होता. लोक तें उत्तम चित्र पाहून त्या कारागिराची वाहवा करूं लागले, व वर्तमानपत्रांतून त्याची स्तुति होऊं लागली. तेव्हां त्या चिताऱ्याला आपल्या कौशल्याचा विशेषच अभिमान वाटूं लागला. पुष्कळ श्रीमंत लोक मोठी किंमत देऊन तें विकत घेऊन संग्रहीं ठेवण्यास तयार झाले. ह्याप्रमाणें त्या चित्राची सारखी तारीफ होऊन राहिली असतां, एके दिवशीं एक शेतकरी सहज त्या वाटेनें आला; आणि लोक जमा होऊन काय पाहत आहेत, तें समजावें ह्मणून तो त्या चित्रापाशीं गेला. तें पाहून तो खदखदां हसूं लागला.

तो चितारी जवळच उभा होता. त्यानें त्या शेतकऱ्याला असा मोठ्यानें हसतांना पाहून अमळ रागावून पुसलें: "अरे, असें हसायाला कारण काय झालें ?" शेतकऱ्यानें उत्तर केलें: "अहो, हसतों कशाला ह्मणून काय विचारितां ? हें घोड्याचें चित्र काढणारा वेडा पीर कोण आहे त्याला मी हसत आहें. अहो, घोड्याच्या तोंडांत लगाम असल्यावांचून तो कधीं फेसाळायाचा नाहीं, हें सगळ्यांला माहीत असतां, या घोड्याच्या तोंडांत त्या मूर्खानें लगाम दिली नाहीं."

## आपल्या रूपाचा गर्व.

फ्रान्सांतला एक बडा सरदार अतिशयित देखणा होता. त्याला आपल्या अप्रतिम रूपाचा मोठा अभिमान वाटे. एके दिवशीं तो पारिसशहरांतील एका देवळांत उपासनेला गेला असतां, गर्दीत त्याला एक मनुष्य पुनःपुनः धक्के देऊं लागला. ह्मणून त्याच्यावर रागावून त्याला तो सरदार असें करण्याचें कारण विचारूं लागला. तेव्हां तो ह्मणाला कीं, " सरदारसाहेब, एका बड्या बाईनें तुमची छबी काढून आणण्यासाठीं एक कारागीर पाठविला आहे. तो पलीकडे उभा राहून तुमच्या चेहऱ्याची तसबीर कागदावर उतरूं पाहत आहे, तर तुह्मी त्याच्याकडे एकसारखे पाहत जागच्याजागीं घटकाभर स्वस्थ बसून रहा. " हें त्याचें सांगणें खरें वाटून तो गर्विष्ठ मनुष्य, समोर एक जण पेन्सिल घेऊन उभा होता, त्याच्याकडे सारखा पाहत उभा राहिला. कांहीं वेळ लोटल्यावर पेन्सिल घेऊन रेघा काढण्याचें मिष केलेल्या त्या मनुष्यानें खुणेनें दर्शविलें कीं, आपलें काम आटपलें. मग त्याला धक्का मारणाऱ्या त्या इसमानें त्याचे आभार मानून तेथून निसटता पाय घेतला. अमळशानें तो सरदार आपलें घड्याळ पाहूं लागला, तों तें त्याच्या हातीं लागेना. त्याप्रमाणेंच त्याच्या खिशांतली पैशांची

पिशवीही नाहींशी झाली. तेव्हां अर्थात् छबी काढण्याचें मिष करणारे भामटे होते, असें त्याच्या लक्षांत आलें.

### एका वकिलाची खोटी फुशारकी.

इंग्लंडांत एक मोठा नामांकित वकील होता. त्याला सरकारांतून सॉलिसिटर जनरल अशी पदवी मिळाली होती. ह्या पदवीचा त्याला मोठा अभिमान वाटे. एका वर्षी न्यायकचेऱ्यांला रजा झाली, तेव्हां ते रजेचे दिवस जर्मनींत फिरून घालवावे असें त्याच्या मनांत येऊन तो तिकडे गेला. तेथें त्याच्या नांवाचा व पदवीचा पुकारा चोहोंकडे झाला. तो ऐकून त्या देशाच्या राजाला वाटलें कीं, हा इंग्लंडांतला जनरल ( सेनापति ) असावा, तर त्याला आपल्या दरबारांत बोलावून त्याचा बहुमान करावा. ह्मणून त्या वकिलास दरबारचें आमंत्रण आलें. त्यावरून तो राजाच्या भेटीस गेला. तेव्हां राजानें आपल्या लष्कराची पाहणी करण्याचें योजून ह्या नामधारी जनरलास एक उमदा घोडा देऊन आपल्याबरोबर नेलें. सगळ्या लष्कराची कवायत होईपर्यंत राजा स्वतः घोड्यावर स्वार होऊन त्यांतून एकसारखा दौडत राहिला; आणि त्या इंग्रज पाहुण्यालाही त्याच्याबरोबर दौडावें लागलें. तेव्हां त्याला मोठें संकट पडलें. त्याला घोड्यावर बसून अशी दौड करण्याची सवय नसल्यामुळें त्याला प्रतिक्षणीं अशी भीति वाटली कीं, घोड्यावरून कोसळून आपला कपाळमोक्ष होतो. पण घोडा हुशार असल्यामुळें तो त्यांतून बरेपणीं निभावला. त्यानंतर पुनः कधींही त्यानें आपल्या पदवींतील जनरल ह्या शब्दाचा अभिमान वाहिला नाहीं.

### खोटी फुशारकी.

एका शाळेंतल्या मुलींनीं आपलें कशिद्याचें वगैरे काम विकून पैसे मिळवावे आणि गरीब लोकांला धर्मार्थ द्यावें असें मनांत आणिलें.

मग त्यांनीं आपल्या शिक्षक बाईच्या साहाय्यानें आपल्या जिनसा एका दुकानांत विकायाला मांडिल्या. त्यांपैकीं एका मुलीस असें वाटे कीं, कशिद्याच्या कामांत आपल्यासारखी हुशार मुलगी दुसरी कोणतीही नाहीं. पण बाकीच्या मुली कांहीं तिला हुशार समजत नसत. पुढें त्यांनीं सगळ्यांनीं केलेल्या वस्तु बाजारांत नेऊन मांडिल्यावर ती त्या दुकानांत गेली, आणि त्या विकायास उभी असलेल्या दुकानदार बाईस तिनें एका वस्तूची किंमत विचारिली. ती तिनें तीन शिलिंग ह्मणून सांगितली. ही वस्तु दुसऱ्या मुलीनें केली होती. मग तिनें आणखी एका मुलीनें केलेल्या वस्तूची किंमत विचारिली. ती तिनें चार शिलिंग ह्मणून सांगितली. ह्याप्रमाणें दुसऱ्या. दोघां मुलींनीं केलेल्या वस्तूंची किंमत विचारिल्यावर तिनें आपण केलेल्या वस्तूची किंमत पुसली. तेव्हां ती विकणारी बाई नाक मुरडून ह्मणाली: "ही वस्तु आपली सरासरीच आहे. हिची तुला कांहीं जास्त किंमत पडावयाची नाहीं. त्या दोन वस्तु तूं घेशील तर ही तुला फुकट सुद्धां द्यायाला मला परवडेल." ही अशी आपल्या वस्तूची अगदीं थोडी किंमत आहे हें ऐकून त्या मुलीचें तोंड उतरलें, आणि तिनें ओशाळून खालीं मान घातली. तिच्या मुद्रेंत अशी चलबिचल झालेली पाहून त्या बाईनें ताडिलें कीं, ह्या मुलीनें केलेली ही वस्तु असावी. मग ती तिला ह्मणाली: " मुली, तुझ्या वस्तूची किंमत किती आहे हें जाणण्यासाठीं तूं येथें आली असावीस. पण तुला मी प्रांजळपणें सांगतें कीं, तुझें हें काम कांहीं ह्मणण्याजोगें चांगलें नाहीं. ह्याहून चांगलें करण्यास झट."

## एक गर्विष्ठ नाईक.

अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांतले लोक आपल्या स्वातंत्र्यासाठीं इंग्लंडशीं लढत असतां, एके ठिकाणीं कांहीं लष्करी काम चाललें होतें.

तेथें कांहीं लष्करी शिपाई एक मोठें बहाल एका इमारतीवर चढविण्यांत गुंतले होते. तें अमळ भारी असल्यामुळें ते शिपाई मोठ्या नेटानें त्याचे दोर ओढीत होते; आणि त्यांचा नाईक मोठमोठ्यानें ओरडून त्यांला दोर ओढण्याविषयीं हुकूम करीत होता. इतंक्यांत तिकडून एक घोड्यावर बसलेला गृहस्थ आला. त्यानें तो सगळा प्रकार पाहून त्या अमलदाराला विचारिलें: "तुह्मी कां हात लावीत नाहीं?" ते शब्द ऐकून तो नाईक त्याच्याकडे वळून मोठ्या दिमाखानें ह्मणाला: "मी यांचा नाईक आहें." तो गृहस्थ ह्मणाला: "असें काय? मला हें ठाऊक नव्हतें. तुह्मांस असा प्रश्न मीं विचारिला याची मला क्षमा करा." असें बोलून तो घोड्यावरून उतरला आणि त्या शिपायांबरोबर दोर ओढावयास लागला. कांहीं वेळानें तें बहाल एकदांचें वर चढलें. तेव्हां तो गृहस्थ श्रम केल्यामुळें आलेला घाम पुसून पुनः आपल्या घोड्यावर बसला, आणि जाते वेळीं त्या अमलदाराला ह्मणाला: "नाईकसाहेब, असेंच एकादें काम निघून तें करायाला पुरेतशीं माणसें नसलीं ह्मणजे तुह्मांला मदत करायाला तुमच्या कमान्डर--इन--चीफला (मुख्य सेनापतीला) अवश्य बोलवा बरें." हे शब्द ऐकतांच तो नाईक चकित होऊन अगदीं गर्भगलित झाला. अशा साध्या पोषाखानें तेथें आलेला तो गृहस्थ आपला मुख्य सेनापति खुद्द जॉर्ज वॉशिंग्टन आहे हें त्याला कळलें तेव्हां त्याच्या मनाची स्थिति कशी काय झाली असेल, याची कल्पना सहज होण्याजोगी आहे.

### दिमाखखोर सरदारकन्या.

एका सरदाराची एक मोठी दिमाखखोर तरुण मुलगी होती. तिला आपल्या दौलतीचा व पदवीचा मोठा अभिमान वाटे. एके दिवशीं एका गरीब गौंड्याची मुलगी येऊन तिला ह्मणाली: "बाई-

साहेब, माझा बाबा अगदीं मरायाला टेकला आहे. तो ह्मणतो कीं, तुह्मांला कांहीं गुप्त गोष्ट सांगायाची आहे. तरी तुह्मी आमच्या झोंपडींत चला." ती कुरेबाज मुलगी ह्मणाली: "माझ्यासारख्या थोर पदवीच्या बाईस तुझा भिकारडा बाप आपल्या झोंपडींत बोलवीत आहे काय? मला तेथें चल ह्मणून सांगायाला जी तूं आलीस त्या तुला लाज नाहीं वाटत काय ग?" हे तिचे रागाचे शब्द ऐकून ती साधीभोळी मुलगी खट्टू होऊन परत गेली. पण ती पुनः अमळशानें धावतच त्या गर्विष्ठ सरदारणीच्या वाड्यांत येऊन घाबऱ्यांघाबऱ्यां तिला सांगूं लागली कीं, "बाईसाहेब, माझा बाबा आतां घटकेचा सोबती आहे. तर आमच्या झोंपडींत लौकर चला. गेल्या लढाईच्या धामधुमींत तुमच्या आईनें तुमच्या वाड्याच्या भिंतींत पुष्कळ द्रव्य ठेविलें आहे. तें माझ्या बाबावांचून दुसऱ्या कोणाला ठाऊक नाहीं. आणि तुह्मी वयांत आलां ह्मणजे तुह्मांलाच फक्त तें सांगावें अशी तुमच्या मयत आईची आमच्या बाबाला ताकीद होती. तर आतां मरणापूर्वीं तुह्मांला ती जागा सांगावी अशी त्याची इच्छा आहे. ह्मणून तुह्मांला बोलावण्यासाठीं त्यानें मला पाठविलें आहे." हे त्या मुलीच्या तोंडचे शब्द ऐकतांच ती सरदारीण मोठ्या त्वरेनें तिच्या झोंपडीकडे धावत सुटली. पण ती तेथें जाऊन पोंचण्यापूर्वीं त्या गौंड्याचा प्राण निघून गेला होता. मग ती हिरमुष्टी होऊन वाड्यांत परत गेली; आणि त्या द्रव्याच्या आशेनें तिनें आपल्या वाड्याच्या भिंती एकामागून एक पाडून फोडून पाहिल्या. पण तिला तो ठेवा कोठेंही सांपडला नाहीं. त्यामुळें तिला अतिशयित दुःख झालें, आणि आपण वृथा अभिमानानें त्या मुलीच्या पहिल्या निरोपासरशीं तिच्या झोंपडींत जाण्यास तयार झालें नाहीं याचा तिला पश्चात्ताप वाटला.

## गर्विष्ठ मुलगी.

एका सधन कुटुंबांतल्या एका मुलीचा वाढदिवस आला. तेव्हां ख्रिस्ती समाजाच्या चालीप्रमाणें तिला कुटुंबांतल्या सगळ्या माणसांनीं व इतर नातलगांनीं कांहींनाकांहीं बक्षीसें देऊन तिला संतुष्ट केलें. तिची आजी जवळच्या गांवीं रहात असे, ती त्या दिवशीं तिला भेटण्यासाठीं मुद्दाम आली, आणि तिनेंहि तिला देण्यासाठीं एक पुष्पगुच्छ आणिला. त्याला मोत्यांच्या लढी लाविल्या असून तो एका रेशमी फितीनें बांधिला होता. तो गुच्छ त्या मुलीच्या हातीं देऊन आजी मोठ्या प्रेमानें ह्मणाली: "माझे लाडके ! ह्या मोत्यांप्रमाणें तुझ्या ठायींचे सद्गुण शोभा पावोत, आणि ह्या सुंदर फुलांप्रमाणें तुझा स्वभाव मोहक व कोमल होवो."

तो गुच्छ हातीं घेऊन त्या मुलीनें त्याकडे तिरस्कारानें पाहिलें आणि आपल्याशीं ह्मटलें कीं, "आजीनें असलें भिकार बक्षीस मला द्यावयाचें नव्हतें. हीं फुलें तीं काय ! त्यांला कांहीं दाम पडत नाहींत; आणि मोत्यें पाहिलीं तर तीं दोन दमड्यांला कोणाला नकोत." असें ह्मणून तिनें तो गुच्छ आपल्या धाकट्या बहिणीच्या हातीं देऊन ह्मटलें: "हा तुला खेळायाला बरा आहे. हा तुझ्यासारख्या मुलीस शोभण्यासारखा आहे. मला तो काय करावयाचा आहे ?"

हें तिचें वर्तन पाहून आजीला वाईट वाटलें आणि ती त्या धाकट्या मुलीस ह्मणाली: "बाळे, तुझ्यासारख्या सरळ व साध्या स्वभावाच्या मुलीसच हा गुच्छ शोभण्यासारखा आहे. तुझ्या बहिणीस तो शोभणार नाहीं, हें तिच्या वर्तनावरून उघड होत आहे. त्याला लाविलेलीं मोत्यें तुझ्या बहिणीला तुच्छ वाटलीं खरीं. पण मला तीं विकत घ्यावयास शंभर क्राऊन पडले आहेत बरें ! आणि त्या लाल

फितीवर ' बहुमोल रत्नांहून सदाचाराचा महिमा मोठा आहे ' असें वचन कलाबतूचें विणिलें आहे, तें ध्यानांत वागवून त्याप्रमाणें सदोदित वागत जा. "

फुलांच्या गुच्छाला लाविलेल्या मोत्यांची किंमत शंभर क्राऊन आहे असें कळलें तेव्हां त्या गर्विष्ठ मुलीस केवढा पस्तावा झाला असावा, याची कल्पना सहज करितां येण्याजोगी आहे.

## वृथाभिमानी राजपुत्र.

एका सज्जन राजाचा एक मुलगा होता. त्याचा स्वभाव अगदीं निराळा होता. आपल्याहून कमी पदवीच्या लोकांचा तो तिरस्कार करी. आपल्या सेवकांस व दरबारच्या सर्व अमीरउमरावांस तो तुच्छ लेखी. त्यांनीं आपली सेवा करावी व आपल्या आज्ञेंत वागावें, एवढाच त्यांचा अधिकार आहे, असें तो समजे. त्याला शिक्षण द्यावयासाठीं ज्यांस ठेविलें होतें, त्यांना राजपुत्राच्या या वृत्तीचा निषेध करून त्याला वाटेवर आणण्याचें धैर्य झालें नाहीं. यामुळें त्याच्या अंगीं ताठा व अभिमान ह्या दुर्वृत्ति फारच वाढल्या. हा त्याचा असा वाईट स्वभाव पाहून राजाला फार दुःख वाटे. त्यानें त्याला त्या बाबतींत अनेक वेळां बोध केला, पण त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. हा असा दुरभिमानी मुलगा आपल्या मागून गादीवर बसला तर ह्या स्वभावामुळें पुष्कळ लोक त्याचे शत्रु होतील, असें मनांत येऊन राजा नेहमीं चिंतेंत असे.

पुढें त्या राजपुत्राचें लग्न होऊन त्याला एक मुलगा झाला. तेव्हां राजानें त्याला वाटेवर आणण्याची एक युक्ति योजिली, ती अशीः—त्यानें त्या नव्या जन्मलेल्या बालकाच्या वयाचें एक दुसरें अगदीं त्याच्यासारखें

बालक शोधून आणवून व त्याला हुबेहूब त्याच्यासारखें सजवून पाळण्यांत त्याच्या शेजारीं निजविलें. दुसऱ्या दिवशीं तो राजपुत्र उठून आपल्या पुत्रास पाहावयास गेला तों पाळण्यांत दोन मुलें त्याच्या दृष्टीस पडलीं. तेव्हां त्यांपैकीं आपलें कोठलें तें त्याला कळेना. हें पाहून तो फार रागावला आणि आपल्या सेवकांला हा काय प्रकार आहे ह्मणून विचारूं लागला. पण त्यांच्या नकळत ती युक्ति केली असल्यामुळें त्यांलाही तें कोडेंच वाटलें. ही गफलत केल्याचें कोणीही कबूल करीना, तेव्हां तर तों फारच खवळला. इतक्यांत राजा तेथें येऊन त्याला ह्मणाला: "मुला, तुझा पुत्र तुला ओळखितां येईना हें कसें ? अरे तो राजवंशांत निर्माण झाला असतां दुसऱ्या हलक्या माणसाच्या मुलासारखा असेल तरी कसा ? ह्यावरून तुला आपल्या कुलीनतेचा जो एवढा अभिमान वाटत आहे, तो एकंदरींत व्यर्थच ना ?" असें ह्मणून राजानें आपल्या नातवास पाळण्यांतून उचलून त्याच्या हातीं दिलें आणि सांगितलें कीं, "मी ह्याच्या पायाला खुणेसाठीं रेशमाचा धागा बांधिला नसता तर मलाही हा ओळखितां आला नसता. तुझ्या वृथाभिमानाचा परिहार करण्यासाठीं मींच ही युक्ति योजिली होती. तर ह्यावरून असा बोध घे कीं, सगळ्यांचें रक्त मूळचें अगदीं सारखें असतें. त्यांत अमुक श्रेष्ठ व अमुक कनिष्ठ असा भेद मुळीं नसतो. मनुष्याला श्रेष्ठत्व मिळतें तें त्याच्या गुणांवरून व पराक्रमावरून मिळतें. नुसत्या बड्या बापाचा बेटा झाल्यानें कोणी बडा होत नाहीं."

## मला तें सहज करितां येईल.

एका गरीब कुटुंबांत एक लहान मुलगी होती. ती घरांतलें कामकाज करण्यास नेहमीं तयार असे. आपल्या आईला लागेल ती मदत

ती मोठ्या आनंदानें करी. ती आपल्या लहान भावंडांची निगा राखून त्यांला आपल्याबरोबर शाळेंत घेऊन जाई; आणि शाळेंतून आल्यावर, " मला सांगण्यासारखें कांहीं काम आहे काय?" असें ती आपल्या आईला विचारी. तिनें कांहीं काम सांगितलें नाहीं तर ती आपल्या भावंडांस घेऊन खेळावयास जाई. अशी ती चांगल्या गुणांची मुलगी पाहून तिच्यावर सगळीं जणें प्रीति करीत. पण पुढें तिच्या मनाला असें वाटूं लागलें कीं, आपण आईचें इतकें काम करितें, तेव्हां आपण आतां मोठी झालें. आपणाला हवें तें काम करितां येईल. असा तिला गर्व झाला, तो तिला लौकरच नडला.

आई कसलेंही काम करूं लागली ह्मणजे त्या मुलीनें ह्मणावें कीं, " आई, मला तें येईल. तें मला करूं दे." तिची आई शहाणी होती. ती म्हणे कीं, "माझे लाडके, तूं अजून लहान आहेस. तुला असलीं कामें व्हावयाचीं नाहींत. तुला झेपेल तेंच काम मी तुला सांगेन." एके दिवशीं आई कपड्यांच्या सुरकुत्या मोडण्याचें यंत्र कांहीं कपड्यांवर फिरवीत असतां, ती तेथें येऊन ह्मणाली: " हें काम मला सहज करितां येईल. मला हें करूं देसना." आई ह्मणाली: " तुला हें यंत्र फिरवितां यावयाचें नाहीं." हे नाउमेदीचे शब्द ऐकून ती अहंमन्य मुलगी तेथून फुणफुणत गेली. मग थोड्या वेळानें तिची आई कांहीं कामासाठीं बाहेर गेली असतां, तिनें असें मनांत आणिलें कीं, मला तें यंत्र फिरवितां येणार नाहीं, असें आई ह्मणते. तर ती परत येण्यापूर्वी आपण तें फिरवून पाहावें. असा विचार करून ती धावत घरांत गेली आणि एक कपडा घेऊन त्यावर तें यंत्र फिरवूं लागली. पण तें तिला फिरवितां न आल्यामुळें तिचा हात त्यांत सांपडून बराच जायबंदी झाला, व तिनें मोठ्यानें किंकाळी

मारिली. ती ऐकून तिची आई घरांत धावत आली आणि पाहते तों मुलीचा हात यंत्रांत सांपडून रक्तबंबाळ झाला आहे. मग तिनें वैद्याला बोलावून त्याला औषधोपचार केले. हे उपचार चालले असतां, एके दिवशीं वैद्य ह्मणाला कीं, "ह्या मुलीचा हात कापिल्यावांचून गति नाहीं. एरवीं तो बरा होईलसें दिसत नाहीं." हे शब्द ऐकून ती ह्मणाली: "वैद्यबुवा, माझा हात न कापितां बरा होईल तर पाहा. कारण हा तुह्मीं तोडिला तर माझ्या प्रिय आईस व बाबास मला मदत करितां येणार नाहीं." पुढें तिचा हात बरा होण्याचें चिन्ह दिसूं लागलें, तेव्हां अर्थात् तो तोडून टाकण्याचा विचार वैद्यानें रद्द केला. मग ती लौकर बरी होऊन पुनरपि घरांतलें कामकाज करूं लागली. त्यानंतर तिनें आपल्या आईबापांच्या सांगण्याबाहेर कधींही वर्तन केलें नाहीं.

## बादशाहा आणि लष्करी अमलदार.

रशियाचा बादशाहा अलेकझान्डर हा आपल्या राज्यांत फिरतां-फिरतां एका लहानशा शहरापाशीं आला. तेथें त्याच्या गाडीचे घोडे बदलावयाचे होते. ते बदलीत तोंपर्यंत शहर पाहावें असें त्याच्या मनांत येऊन तो एकटाच गेला. त्या वेळीं त्याचा पेहराव साध्या लष्करी अमलदाराच्यासारखा होता. जातांजातां जेथें दोन रस्ते फुटले होते, तेथें तो आला. तेव्हां आपल्या मुकामावर परत कोणत्या रस्त्यानें जावें तें त्याला कळेना. ह्मणून तेथें एक लष्करी अमलदार उभा होता, त्याला त्यानें त्या मुकामाची वाट विचारिली. त्यानें मोठ्या उद्धटपणानें ह्मटलें कीं, " उजव्या हाताच्या रस्त्यानें जा. "

हें त्याचें उद्दामपणाचें उत्तर ऐकून बादशाहाच्या मनांत असें आलें कीं, ह्या गर्विष्ठ अमलदाराला चांगली रीत शिकवावी. मग त्यानें

याला विचारिलें: "लष्करांत आपला कोणता दरजा आहे?" तो ह्मणाला: "तर्क करा पाहूं." बादशाहानें ह्मटलें: "आपण लेफटेनन्ट आहां काय?" तो गर्वानें म्हणाला: "त्याहून वरचा." बादशाहानें ह्मटलें: "तर मग, आपण कॅपटन आहां वाटतें?" तो ह्मणाला: "त्याच्याही वरचा." बादशाहानें पुनः विचारिलें: "तर तुह्मी मेजर असाल." तो गर्वानें ह्मणाला: "होय, होय, मी मेजर आहें बरें!"

त्या नवख्या माणसानें आपल्यासंबंधानें अशी चौकशी केली, तर आपणही तो कोण ह्मणून विचारावें, असें त्या मेजराच्या मनांत येऊन त्यानें मोठ्या दिमाखानें त्याला पुसलें: "तुमचा दर्जा काय आहे?" बादशाहा ह्मणाला: "तर्क करा पाहूं" मेजर ह्मणाला: "तुह्मी लेफटेनन्ट असाल." बादशाहा ह्मणाला: "त्याच्याहून वरचा." मेजर ह्मणाला: "तर तुह्मी कॅपटन असाल." बादशाहा ह्मणाला: "त्याच्याही वरचा." मेजर ह्मणाला: "तर काय, तुम्ही मेजर आहां?" बादशाहा म्हणाला: "त्याच्याही वरचा." मेजर ह्मणाला: "तुह्मी कर्नल आहां काय?" बादशाहा ह्मणाला: "अजून वरचें नांव द्या." हें ऐकून तो मेजर अमळ घाबरून हलक्या स्वरानें ह्मणाला: "तर मग आपण जनरल आहां काय?" बादशाहा ह्मणाला: "आणखी वरचें नांव द्या." ह्या वेळीं त्या मेजराच्या अंगांत कांपरें भरलें व डोकीची टोपी काढून व लवून नमन करून तो ह्मणाला: "तर मग आपण फील्डमार्शल आहां!" बादशाहा ह्मणाला: "त्याच्याही वर कोणाचा दरजा असतो तें पाहा." हे शब्द ऐकून तर तो अगदीं घाबरून जाऊन व गुडघे टेकून ह्मणाला: "आपण प्रत्यक्ष बादशाहा आहां तर एकूण!" बादशाहानें ह्मटलें: "तोच मी." मग त्यानें मोठ्या दीनवाणीनें ह्मटलें: "खावंद सरकारांचा साधा पेहराव असल्यामुळें मला

ओळख पटली नाहीं. याबद्दल मला क्षमा असावी." बादशाहानें त्याचा हात धरून त्याला उठविलें आणि ह्मटलें कीं, "तूं कांहीं अपराध केला नाहीं. पण ह्यापुढें कोणाशीं आढ्यतेनें बोलत जाऊं नको."

## एका शिक्षकबाईचा तोरा.

युरोपांत पूर्वकाळीं अशी चाल असे कीं, जे कोणी ऐपतदार गृहस्थ असत, ते आपल्या मुलांस शिकविण्यासाठीं घरीं शिक्षकबाया (गवर्नेस) ठेवून देत असत. ह्या चालीप्रमाणें विलायतेंतल्या एका बड्या सरदारानें आपल्या नातवंडांस शिक्षण देण्यासाठीं एका चांगल्या सुशिक्षित बाईची नेमणूक केली. ही बाई दूरच्या गांवीं रहात असे. ती आपल्या नोकरीवर रुजू होण्याकरितां निघाली. त्या काळीं आगगाड्या नव्हत्या. एका गांवाहून दुसऱ्या गांवास जावयाचें झालें ह्मणजे लोक भाड्याच्या गाड्यांत बसून जात. ह्या गाड्या भल्या मोठ्या असून त्यांत दोन प्रती केल्या असत. ज्यांला जास्त पैसे देण्याचें सामर्थ्य असे, ते गाडीच्या खालच्या भागीं बसत, व जे गरीब असत ते वरल्या भागीं उघड्यावर बसत. ही शिक्षकबाई मोठी डौली असल्यामुळें तिनें आंतली तिकीट घेतली. कांहीं मैलपर्यंत त्या गाडींत ती एकटीच होती. नंतर एक वयोवृद्ध गृहस्थ गाडींत चढला. तो गाडीच्या वरल्या भागीं बसला. जास्त पैसे देऊन आंत बसला नाहीं. पुढें पहिल्या टप्प्यावर गाडी उभी राहिली तेव्हां ती बाई तेथल्या खाणावळींत भोजन करावयासाठीं गेली. ती तेथें एका खोलींतल्या मेजापाशीं बसली असतां, तो वयोवृद्ध गृहस्थही त्याच खोलींत शिरून तिच्यासमोर जेवावयास बसला. त्याला पाहून त्या बाईला कसेंसेंच वाटलें; आणि तिनें घांट वाजवून तेथल्या नोकराला बोलाविलें आणि म्हटलें: "ह्या गाडीच्या वरल्या भागीं

सणारा हलका मनुष्य आहे. याच्याबरोबर बसून जेवण्यांत मला हमीपणा वाटतो. तर याची निराळी सोय करा. " हे दिमाखाचे शब्द ऐकून तो वृद्ध गृहस्थ उठला आणि त्या बाईला लवून नमन करून दुसऱ्या खोलींत गेला. भोजन आटपल्यावर तीं दोघें पुनः गाडींत बसून मार्गस्थ झालीं, आणि शेवटीं ज्या सरदाराच्या वाड्यांत तिला जावयाचें होतें, त्यापाशीं गाडी उभी राहिली. तेथें कांहीं चाकर उभे होते, ते त्या वर बसलेल्या वृद्ध गृहस्थाच्या तैनातीस लागले. ती बाई खालीं उतरून त्या चाकरांस ह्मणूं लागली कीं, "मी ह्या वाड्यांत शिक्षक ह्या नात्यानें रहावयास आलें आहें. माझें सामान गाडींतून काढून घ्या." ते ह्मणाले: "आमच्या धन्याची नोकरी आह्मांला पहिल्यानें बजाविली पाहिजे. त्यांची व्यवस्था लागली ह्मणजे तुमचें सामान न्यावयास आह्मी येतों." हें ऐकून त्या बाईला तो वृद्ध मनुष्य कोण होता हें कळून आलें, आणि ती अगदीं काळवंडून गेली. मग वाड्यांत गेल्यावर त्या दिमाखखोर बाईला त्या सरदारानें आपल्यासमोर बोलावून आणून ह्मटलें कीं, " तूं आज जी वृत्ति दाखविली, ती मला अगदीं निषिद्ध वाटते. माझ्या नातवंडांला असले विचार शिकवावे अशी माझी मुळींच इच्छा नाहीं." तें ऐकून त्याच्यापुढें गुडघे टेकून तिनें मोठ्या लीनतेनें क्षमा मागितली आणि ह्मटलें कीं, "असें उद्दामपणाचें वर्तन मी पुनः कधींही करणार नाहीं." तिला असा पश्चात्ताप झालेला पाहून त्यानें तिला आपल्या घरीं ठेवून घेतलें. ही अशी खोड मोडिल्यामुळें ती बाई तेथें मोठ्या नम्रतेनें व गरिबीनें वागून सगळ्या माणसांला प्रिय झाली.

# भाग चौदावा.

## लोभाचे वाईट परिणाम.

### अधाशीपणा.

एके दिवशीं एक लहान मुलगा आपल्या बापाबरोबर वाण्याच्या दुकानीं गेला. तेथें भुईवर बराच मध सांडला असून त्यावर पुष्कळ माशा बसल्या होत्या, त्या त्यानें पाहिल्या. तेव्हां त्यांला तो हाकूं लागला. पण त्या कांहीं केल्या उडून जातना. तें पाहून त्यानें बापाला विचारिलें: " बाबा, ह्या माशा मधाला अशा चिकटून कां राहिल्या आहेत ? त्यांला मीं हाकिलें, पण त्या मुळीं हालत नाहींत." बाप ह्मणाला: " बाळा, त्या अधाशी माशा त्या मधावर बसून तो इतका प्याल्या आहेत कीं, त्यांला आतां जागचें हालतांही येईनासें झालें आहे. त्या अशाच येथें चिकटून राहून थोड्या वेळानें मरतील. हा अधाशीपणाचा परिणाम बरें ! "

### मुलगा आणि बोरें.

एका मुलानें एक भांडें पाहिलें. त्यांत त्याच्या आईनें कांहीं बोरें ठेविलीं होतीं. तीं पाहून त्याला मोठा आनंद झाला; आणि, तीं घेऊं काय, असें त्यानें आईला विचारिलें. तिनें तीं घे ह्मणून सांगतांच त्यानें त्या भांड्यांत हात घालून मुठींत राहिलीं तेवढीं बोरें घेतलीं, आणि तो भांड्याबाहेर हात काढूं लागला. पण त्याचें तोंड लहान असल्यामुळें त्याची मूठ बाहेर निघेना. तें पाहून आई ह्मणाली: " बाळा,

एकएक बोर काढिशील तर तुला तीं सगळीं बोरें काढितां येतील. असा हावरेपणा तूं कशाला करितोस? तीं सगळीं तुझ्यासाठींच आहेत." तें आईचें सांगणें ऐकून त्यानें मूठ सोडून एकएक बोर बाहेर काढिलें.

## लोभाबद्दल पारिपत्य.

एका मनुष्याचा एक मोठा फळबाग होता, तो वाढविण्याची त्याला इच्छा होऊन, शेजारीं दुसऱ्या माणसाची जमीन होती, तींतली थोडी आपलीशी करण्याचा त्यानें बेत केला. मग एके दिवशीं रात्रीं त्यानें आपल्या बागेच्या सीमेचा नीस काढून शेजाऱ्याच्या जमिनींत नेऊन पुरिला. अशी लबाडी केल्यावर एके दिवशीं त्या ठिकाणच्या एका झाडाला शिडी लावून त्यावरील फळें काढायाला तो चढला असतां, शिडी फार उभी लागल्यामुळें त्याचा तोल जाऊन तो खालीं पडला; आणि त्याचें डोकें त्या दूर लाविलेल्या निसावर आपटलें. त्यामुळें त्याला मोठी इजा झाली. त्यानें तो नीस नेऊन तेथें रोंविला नसता, तर त्याला ही इजा झाली नसती.

## सिंह आणि ससा.

एका सिंहानें भक्ष्यासाठीं हिंडत असतां एक ससा झाडींत निजलेला पाहिला. त्यावर तो झडप घालणार तों एक मोठा हरिण जवळून पळतांना त्यानें पाहिला. त्याबरोबर तो त्याच्या पाठीस लागला. ही गडबड ऐकून ससा जागा होऊन तेथून पळून गेला. इकडे सिंहानें त्या हरिणाचा बराच वेळ पाठलाग केला. पण तो अतिचपळ असल्यामुळें त्याच्या तावडींत सांपडला नाहीं. तो त्याला झुकांडी देऊन कोठच्याकोठें निघून गेला. तेव्हां सिंह निराश होऊन ससा निजला होता तेथें माघारीं आला आणि पाहतो तों ससाही तेथून पसार झाला,

असें त्याला आढळून आलें. ह्याप्रमाणें हातचें सोडून पळल्याच्या मागें लागल्याचा त्याला पस्तावा वाटला.

## अतिलोभाचा भयंकर परिणाम.

तीन प्रवासी वाट चालत असतां, त्यांला एक मोठी पैशांची थैली सांपडली. ते पैसे त्यांनीं सारखे वांटून घेण्याचें ठरविलें. पुढें वाट चालतांचालतां ते थकले, व त्यांला भूकही लागली. तेव्हां त्यांतला एक जण शेजारच्या गांवांतून कांहीं तरी खायाला आणावयास गेला. तो गेल्यावर बाकीच्या दोघांनीं तो परत आल्यावर त्याला ठार मारून सगळा पैसा वाटून घेण्याचा बेत केला. इकडे जो माणूस बाजारांत गेला होता, त्यानें खायाच्या पदार्थांत विष घालून आपल्या दोघां सोबत्यांला ठार करून तो सगळा ऐवज पटकाविण्याचा बेत केला. ह्याप्रमाणें कपट करून तो बाजारांतून परत आला. तेव्हां त्याच्या सोबत्यांनीं त्याला धरून ठार मारिलें, आणि त्यानें आणिलेले पदार्थ ते मोठ्या आनंदानें खायाला बसले. पण त्यांतलें जहर त्यांच्या अंगांत तत्काळ भिनून ते जागच्या जागीं मरून पडले. ह्याप्रमाणें त्या सगळ्यांचा अतिलोभामुळें अंत होऊन त्यांला सांपडलेला पैसा त्या वाटेनें जाणाऱ्या दुसऱ्याच एका प्रवाशाच्या हातीं लागून तो गबर झाला.

## पैशांसाठीं धाडस.

वसंतऋतूंत एके दिवशीं प्रातःकाळीं रशियाचा बादशाहा निकोलास हा सेन्टपिटर्सबर्ग येथील आपल्या महालाच्या खिडकींत उभा राहून बाहेरील शोभा पाहत होता. त्या वेळीं बरफ वितळायाला लागलें असून नदीचें थिजलेलें पाणी भराभर फुटत चाललें होतें. अशा समयीं नदीच्या तीरावर पुष्कळ लोक जमले आहेत, व एक मनुष्य मोठें धाडस करून बरफाच्या वाहात्या पाळ्यांवर भराभर उड्या

टाकीतटाकीत दुसऱ्या तीराकडे चालला आहे, त्याला पाहत आहेत, असें बादशाहाच्या नजरेस पडलें. तेव्हां हा काय प्रकार आहे, हें बरोबर समजावें ह्मणून त्यानें आपल्या एका मानकऱ्याला तिकडे पाठविलें. त्यानें बरोबर सगळा तपास करून येऊन त्याला कळविलें कीं, " नदीवरील थिजलेलें बरफ फुटून वाहूं लागलें ह्मणजे त्याच्यावरून उड्या टाकीत पलीकडच्या तीरास जाण्याची पैज एका शेतकऱ्यानें मारिली आहे. तो असा पलीकडच्या तीरास गेला तर त्याला लोक वीस रुबल देणार आहेत." हें ऐकून बादशाहानें हुकूम केला कीं, त्याला असल्या अप्रयोजक धाडसाबद्दल वीस फटके द्या. कारण जो मनुष्य एवढ्याशा क्षुल्लक लाभासाठीं आपला जीव धोक्यांत घालायास तयार झाला आहे, तो पैशासाठीं हवें तें करायास मागेंपुढें पाहणार नाहीं. ह्या त्याच्या वृत्तीला आळा घातला नाहीं तर तो पुढें घोर कर्मे करावयास चुकणार नाहीं."

### द्रव्यलोभास्तव प्राणनाश.

कांहीं वर्षांपूर्वी केन्ट नांवाचें एक जहाज इंग्लंडाहून हिंदुस्थानाकडे यावयास निघालें असतां, त्याला वाटेंत आग लागली. ती विझविण्यासाठीं पराकाष्ठेची खटपट खलाश्यांनीं व उतारूंनीं केली. पण ती मुळीं आवरेना. इतक्यांत दुरून येणारें एक जहाज दिसलें. तेव्हां त्यांनीं संकटाचा इशारा देऊन तें जहाज आपल्या मदतीस आणिलें. त्यानें त्या जळत्या जहाजावरील सगळीं माणसें घेण्याचें कबूल केलें. पण त्या वेळीं समुद्राला तुफान होऊन मोठमोठ्या लाटा उसळूं लागल्या होत्या. म्हणून त्या जहाजावरचे पडाव जळत्या जहाजाला लावून ठेवण्याची मुळीं सोय नव्हती. तेव्हां पडाव दूर राखून त्यांवर जळत्या तारवावरचे दोर सोडावे, आणि

त्यांला लोंबकळत जाऊन माणसांनीं त्या पडावांत उड्या टाकाव्या, असें ठरलें. त्याप्रमाणें जळत्या जहाजावरील उतारू व खलाशी भराभर जाऊं लागले. अशा गडबडींत सगळे लोक गुंतले असतां, त्या जळत्या जहाजावरील एका खलाश्याला अशी आठवण झाली कीं, आपल्या मालिमाच्या पेटींत बरेंच द्रव्य आहे, तेवढ्यावर हात मारून तें घेऊन जावें. मग त्यानें त्याच्या खोलींत शिरून त्याची पेटी उघडून तींतलें सगळें नगदी नाणें आपल्या कमरबंदाच्या कशांत गच्च भरिलें. पुढें त्याची पडावांत जाण्याची पाळी आली तेव्हां बाकीच्यांप्रमाणें दोराला लोंबकळत पडावाजवळ जाऊन तो आंत उडी टाकण्याच्या बेतांत होता, इतक्यांत मोठी लाट उसळून होडी एकाएकीं कलली. त्यामुळें त्याची उडी होडींत न पडतां पाण्यांत पडली, आणि तो एकदम पाण्याखालीं गेला. तो पटाईत पोहणारा होता. पण त्याच्या कमरेला पैशांचें भारी ओझें असल्याकारणानें त्याला पाण्यावर येतां आलें नाहीं; ह्मणून तो बुडून मेला. त्याच्या कमरेला तें ओझें नसतें तर तो सहज वर येऊन पोहत राहिला असता, आणि त्याला पडावांत चढतां आलें असतें.

**भिकाऱ्याची पिशवी.** ( कल्पित. )

एक भिकारी पाठीवर भिक्षेची झोळी टाकून वाटेनें लंगडत चालला असतां आपल्या मनांत ह्मणूं लागला कीं, “ हे श्रीमंत लोक पाहा कसे मूर्ख आहेत ते ! त्यांला कितीही द्रव्य मिळालें तरी त्यांला तें पुरेसें वाटत नाहीं. त्यांला आणखी मिळवावेंसें वाटतें. मला थोडेंसें द्रव्य मिळालें तर मी तेवढ्यावरच चैन करीन; आणखीआणखी मिळविण्याची इच्छा कदापि करणार नाहीं.” असें तो आपल्याशींच बोलत आहे तों लक्ष्मी त्याच्यासमोर प्रगट झाली, आणि ह्मणाली: “ तूं आतां जें कांहीं बोललास तें मीं ऐकिलें आहे. तर आतां तुला

मी श्रीमंत करितें. तुझी ती झोळी पुढें कर. तींत जें कांहीं पडेल त्याचें सोनें होईल, आणि जें कांहीं जमिनीवर पडेल त्याची माती होईल. तुझी झोळी जीर्ण झाली आहे, तर संभाळ." हे लक्ष्मीचे शब्द ऐकून त्या भिकाऱ्याला इतका आनंद झाला कीं, त्याला क्षणभर देहभानही उरलें नाहीं. मग त्यानें आपली झोळी तिच्या पुढें पसरिली, आणि ती तींत सोनें टाकूं लागली. तिनें तींत बरेंच सोनें टाकिल्यावर त्याला ह्मटलें: "तुला एवढें बस आहे कीं आणखी पाहिजे?" तो ह्मणाला: "अजून नाहीं." ती म्हणाली: "अरे, पण ही तुझी झोळी फाटायाला आली आहे. तें पाहा तिला भोंक पडलें आहे." तो म्हणाला: "कांहीं चिंता नाहीं. हींत अजून थोडें सोनें रहाण्यास हरकत नाहीं." ती ह्मणाली: "एवढें सोनें मिळाल्यानें तूं बराच श्रीमंत होशील." तो ह्मणाला: "निदान आणखी एक मूठभर सोनें तूं हींत घालावें अशी माझी तुला प्रार्थना आहे." लक्ष्मीनें आणखी थोडें सोनें झोळींत टाकून ह्मटलें: "आतां तुझी झोळी अगदीं भरून गेली आहे. एवढेंच संभाळून घेऊन जा. तें जमिनीवर पडूं देऊं नको." पण तेवढ्यानें तो लोभी माणूस संतुष्ट झाला नाहीं. तो तिच्याकडे आणखी थोडें सोनें मागूं लागला. इतक्यांत त्याची ती झोळी सोन्याच्या भारानें फाटून तींतलें सगळें सोनें भुईवर पडलें, आणि त्याची तत्काळ माती झाली! आणि लक्ष्मीही अदृश्य झाली!

## लोभ्याला बक्षीस.

एका गरीब बागवानानें आपल्या बागेंतील फळझाडांवर चांगलीं मोठीं फळें येण्यासाठीं पुष्कळ मेहनत घेतली. तींत त्याला चांगलें यश आलें. त्याच्या एका झाडावर तर फारच मोठीं फळें आलीं. तेव्हां त्यांतलें एक फळ आपल्या गांवच्या जाहगीरदार सरदाराला नजर

करावें असें त्याच्या मनांत आलें; आणि त्याप्रमाणें तो एक फळ घेऊन त्या सरदाराकडे गेला. त्यानें तें असें मोठें फळ पाहून मोठा संतोष प्रगट केला. कारण शेतकऱ्यांनीं व बागवानांनीं आपल्या जमिनींतील उत्पन्न सुधारावें व वाढवावें अशी त्याची फार इच्छा असून तो त्यांला त्याबद्दल वारंवार उत्तेजन देई. ह्मणून त्यानें बागवानाच्या फळाचा स्वीकार करून त्याला बरीच मोठी रकम इनाम दिली.

ह्या बागवानाच्या शेजारीं एक मनुष्य रहात असे, त्यानें ही हकीकत ऐकून मनांत आणिलें कीं, अशा माळगंडाला जर एवढ्याशा फळाबद्दल एवढें मोठें इनाम त्या उदार सरदारानें दिलें आहे, तर आपण एक लठ्ठशी गाय नेऊन त्याला नजर केल्यास आपणाला तो पुष्कळच इनाम देईल. असें योजून तो एक गाय घेऊन त्या सरदाराकडे गेला. आणि त्याला ती देऊं लागला. तो सरदार मोठा धूर्त होता. ह्या मनुष्यानें आपणाला नजर करण्यासाठीं ही गाय आणिली आहे, त्यांत याचा कोणता मतलब आहे हें त्यानें तेव्हांच ताडिलें आणि, आपणाला ही गाय नको, असें त्याला निक्षून सांगितलें. पण त्या मनुष्यानें तिचा स्वीकार करण्याविषयीं त्याला अतिशयित आग्रहाची विनवणी केली. तेव्हां शेवटीं तो ह्मणालाः "बरें तर, ही मी घेतों; आणि तूं मजवर एवढा अनुग्रह करावयास सिद्ध झाला आहेस, त्यापेक्षां मलाही तुझ्या उपकाराची फेड चांगल्या रीतीनें केली पाहिजे." असें ह्मणून त्या बागवानानें आणिलेलें तें फळ त्या मनुष्याच्या हातीं देऊन तो ह्मणालाः " ह्या फळासाठीं मीं तुझ्या गाईच्या किंमतीच्या दुप्पट दाम दिले आहेत. तेव्हां हें मी तुला देतों, याचा तूं स्वीकार कर. "

## लोभीपणाबद्दल शिक्षा.

एका तुर्की व्यापाऱ्याची दोनशें मोहरांची एक पिशवी हरवली. ह्मणून त्यानें ती आपली पिशवी सांडल्याची दवंडी पिटवायास लावून

असें जाहीर करविलें कीं, जो कोणी ती पिशवी आंतील सगळ्या पैशांसह आणून देईल, त्याला त्यांतले निमे दिले जातील. ही पिशवी एका खलाश्याला सांपडली होती, त्यानें ती दवंडी पिटणाराकडे नेऊन ह्मटलें कीं, "हिच्या मालकानें जाहीर केल्याप्रमाणें हींतली निमे रकम मला दिली तर ही मी त्याला परत करीन." आपली पिशवी त्याला सांपडली हें त्या व्यापाऱ्यास कळलें, तेव्हां त्याला कराराप्रमाणें कांहींएक न देतां ती आपण त्याजकडून घ्यावी, असा त्यानें विचार केला, आणि तो त्या खलाश्यास ह्मणाला: "तुला कराराप्रमाणें बक्षीस हवें असेल, तर ह्या पिशवींत पाचेची आंगठी होती तीही तुला परत करावी लागेल." खलाशी ह्मणाला: "हींत दोनशें मोहराच काय त्या होत्या. हींत मला आंगठी सांपडली नाहीं. तर कराराप्रमाणें हींतली निमे रक़म मिळाल्यावांचून ही मी तुला देणार नाहीं." ह्यावरून त्या व्यापाऱ्यानें काजीकडे फिर्याद केली. तेव्हां काजीनें त्या खलाश्याला बोलावून आणून पिशवी न देण्याचें कारण विचारिलें. खलाशी ह्मणाला: "ह्या व्यापाऱ्यानें पिशवी सांपडून देणाराला शंभर मोहरा देण्याचें कबूल केलें असून, आतां तो असा बहाणा करीत आहे कीं, 'तींत एक पाचेची आंगठी होती, ती तींत नाहीं ह्मणून इनामाची रकम द्यावयाची नाहीं. पण मी असें प्रतिज्ञेवर सांगतों कीं, मला ती मिळाली तेव्हां तींत मोहरांशिवाय दुसरें कांहींएक नव्हतें." ह्यावरून काजीनें त्या व्यापाऱ्याला पाचेच्या आंगठीचें वर्णन करावयास सांगितलें, व ती त्याला कोठें कशी मिळाली तें विचारिलें. तेव्हां व्यापाऱ्यानें त्या प्रश्नाचें उत्तर कसेंबसें जुळवून बनवून सांगितलें. पण तें सांगतांना तो असा कांहीं गोंधळला व गडबडला कीं, त्यावरून तो लबाड आहे अशी काजीची

खातरी झाली; आणि त्यानें येणेंप्रमाणें निकाल दिला: "तुझी पिशवी सांडली तींत दोनशें मोहरा आणि एक पाचेची मोलवान आंगठी होती. पण ह्या खलाश्याला सांपडलेल्या पिशवींत फक्त दोनशें मोहराच काय त्या आहेत. तेव्हां अर्थात् ही पिशवी तुझी नव्हे. तूं पुनः दवंडी पिटायाला लाव, आणि पिशवींतली आंगठी कोणत्या प्रकारची होती तें जाहीर कर." मग काजी त्या खलाश्याकडे वळून ह्मणाला: "तूं ही पिशवी आपल्याकडे आणखी चाळीस दिवस जशीची तशी ठेव. तींतल्या पैशांना शिवूं नको. एवढ्या अवकाशांत ह्या पिशवीचा खरा मालक सांपडला तर त्याला ही दे; आणि कोणी सांपडला नाहीं, तर ही तुला घे."

## द्रव्यलोभ.

एके दिवशीं सायंकाळीं एक चमत्कारिक पेहराव केलेला माणूस एका शेतकऱ्याच्या दाराशीं आला. त्याच्या काखेस एक मोठें चोपडें होतें, आणि हातांत पांढरी काठी होती. तो त्या शेतकऱ्याला ह्मणाला: "तुला एक गुप्त गोष्ट सांगायाला मी आलों आहें. तुझ्या एका शेतांत एक भांडें पुरिलें आहे. त्यांत पुष्कळ सोनें आणि रुपें आहे. त्याचा एकदशांश मला देशील तर मी तुला ती जागा दाखवून तींतलें भांडें खणून काढून देईन. तें तुला मिळालें ह्मणजे तूं ह्या सगळ्या गांवांत मोठा श्रीमंत होशील." हें ऐकून त्या शेतकऱ्याला मोठा हर्ष झाला. आतां आपण एकदम मोठा श्रीमंत होणार हें मनांत येऊन तो नाचूं उडूं लागला. मग त्यानें त्या मनुष्याच्या बोलण्यास रुकार देऊन त्याला आपल्या घरीं ठेवून घेतलें; आणि मध्यरात्रीच्या सुमारास कुदळी पावडीं घेऊन तो त्या माणसाबरोबर गेला; आणि त्यानें दाखविलेली जागा त्यानें खणिली, तों तींत एक मोठी जड पेटी लागली. ती त्यांनीं

जेमतेम उचलून, हातगाडी बरोबर आणिली होती, तींत घातली आणि घरीं आणिली. तेथें तो नवखा माणूस ती चोहोंकडून तपासून पाहूं लागला, आणि तिच्यावरून आपली हातांतली पांढरी काठी फिरवूं लागला. असें करीत असतां तो मधुनमधून आपल्या चोपड्यांतले कांहीं दुर्बोध शब्द वाचूं लागला व त्या पेटीवर कांहीं जादूच्या खुणा करूं लागला. असा प्रकार कांहीं वेळ केल्यावर तो मोठ्या गंभीर स्वरानें त्या शेतकऱ्याला ह्मणालाः "ही पेटी उघडली असतां हींतील द्रव्याचे कोळसे होतील, ते न होण्यासाठीं हिला पहिल्यानें जादूनें भारिलेली ओषधी लाविली पाहिजे. ही ओषधी एका वृद्ध ओषधविक्याकडेच तेवढी सांपडेल. हा ओषधविक्या येथून तीस मैलांवर रहातो. ती ओषधी तो फार महाग विकितो. ती त्याच्याकडून आणायाला आठ मोहरा हव्या आहेत." त्या शेतकऱ्यानें आपला एक घोडा नुकताच विकून तेवढी रकम घेतली होती. ती त्यानें चटदिशीं आणून त्या जादूगिराच्या हातावर ठेविली. ती खिशांत घालून तो तत्काळ तेथून निसटला. तो पुनः कधींच परत आला नाहीं. त्या लोभी शेतकऱ्यानें त्याची बरेच दिवस वाट पाहिली, व शेवटीं निराश होऊन त्यानें ती पेटी फोडून पाहिली, तों तींत जवळच्या ओहळांतल्या गोट्या भरल्या आहेत, असें त्याला आढळून आलें. त्यावरून तो नवखा मनुष्य ठक होता असें त्याच्या प्रत्ययास आलें, आणि एकदम मोठा द्रव्यलाभ होणार ह्या आशेनें हातचे पैसे घालविल्याबद्दल त्याला मोठा पश्चात्ताप झाला.